म. ग्रं. सं. ठाणें
निबंध
२८७५




REFBK-0022622

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्रु.मा.प.)

निबंध
२२६२२
आराध
संदर्भ
२७७५



# आराध

२२६२२
निबंध २७७५

सामाजिक संक्रमण चालू आहे
म्हणूनच समाज जिवंत आहे ।
माणूस तेथून एक होईल
तरीहि संक्रमण चालूच राहील ।।

REFBK-0022622

लेखक :

मुक्तेश्वर



अनुक्रम :


- महाराष्ट्रातील जातीभेदाचा इतिहास
- लाड समाजाचा शोध
- महाराष्ट्र व सीमाभागातील हिंदू खाटीक समाज



सत्यशोधक समाजाचे अग्रदूत

# डॉ. संतुजी रामजी लाड

यांचे स्मृतीस सादर

प्रकाशक :

**एम्. के. घोडके**

एकता कार्यालय,

२२१, शुक्रवार पेठ, तुळजापूर

★

पहिली आवृत्ति प्रकाशन :

दि. २ ऑक्टोबर – गांधीजयंती–१९७८

स्थळ :

**श्री क्षेत्र तुळजापूर**

**किंमत : १२ रुपये**

मुद्रक : श्री. भगवान कृष्णाजी मोरे

विहार मुद्रणालय

कला आणि साहित्याचे शिल्पकार, बार्शी.

## आराधचे शिल्पकार

- **मुखपृष्ठ** – आर्टिस्ट : नागेश सुरवसे, सोलापूर
- **नकाशा रेखाटन**– आर्टिस्ट : कै. भानुदास टाकळीकर
  जो. डी. आर्ट अ‍ॅण्ड कॉम. बार्शी.
- **ब्लॉक मेकर्स** – व्ही. जोशी अ‍ॅण्ड को. पुणे २
- **कंपोझिटर** – सदाशिव वेदपाठक
- **प्रिंटर** – प्रद्युम्न काशीद • हरिश्चंद्र पाठक
- **संयोजक** – सुभाषचंद्र मोरे

# शुभ संदेश

मंत्री

महाराष्ट्र शासन

कामगार व पर्यटन मंत्री
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई, ४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर १९७८

आपण लिहिलेल्या "आराध" या पुस्तकांची प्रत मिळाली.

एक वेगळाच विषय पुस्तकासाठी निवडल्याबद्दल प्रथम आपले हार्दिक अभिनंदन. विषयाची मांडणी, भाषा, समाज एकीकरणाचा मूळ उद्देश केंव्हाही दृष्टीआड न होऊ देण्याची खबरदारी आणि पुस्तक लिहिण्यासाठीं संशोधकाप्रमाणे ध्यास घेऊन केलेली मेहनत या गोष्टी पुस्तक वाचतांना लक्षांत आल्याखेरीज रहात नाहीत.

हिंदू समाज हा अनेक घटक आणि पोट घटकांनी बनलेला आहे. हिंदु समाजच नव्हे सबंध भारतीय समाजाचें ऐक्य घडवून आणण्याचें आपले उद्दीष्ट आहे. त्यासाठी कोणत्याही शक्तीतील पोटशाखांना एकत्र आणण्याचा उपक्रम हा पूरकच ठरेल.

कोणत्याही विशिष्ट शक्तीतील पोटशाखांना एकत्र करतांना त्या विशिष्ट शक्तीबद्दलचा वाजवीपेक्षा जास्त अभिमान बाळगून सामाजिक एकीकरणाच्या प्रक्रियेला बाध येणार नाही याचें अवधान आपण राखले पाहिजे.

आज शोषक आणि शोषित अशा दोनच संदर्भात समाजाचा विचार करावयाचा असून शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वंकष प्रयत्न आपणांस करावयाचे आहेत.

महाराष्ट्रांतील हिंदू खाटीक समाजाचे ऐक्य हे अंती भारतीय समाज ऐक्याला पोषक ठरेल व त्या दृष्टीने आपले पुस्तक या समाजाला नवी दृष्टी देईल असा विश्वास आहे. पुन्हा एकदा आपल्या समाज प्रबोधनात्मक लिखाणाबद्दल हार्दिक अभिनंदन.

( सुशीलकुमार शिंदे )

श्री. एम. बी. गायकवाड ( मुक्तेश्वर )
एकता कार्यालय, तुळजापूर.

वि. द. घोटणे, एम्. ए. बी. टी.
कोल्हापूर दि. १९-९-७८

मुक्तेश्वर लिखित " आराध " ग्रंथ समग्र वाचला. कोणत्याही विद्यापिठाने संशोधन कार्यातील डॉक्टरेट द्यावी असा हा बहुमोल आणि उपयुक्त ग्रंथ आहे. भाषा साधी, सोपी व प्रवाही आहे. कुठेही अभिनिवेश नाही. इतिहास संशोधकाच्या समतोल वृत्तीने जातीची उत्पत्ती आदि ऐतिहासिक भाग दिला आहे तर तत्त्वचिंतकाच्या भूमिकेतून सद्य:स्थितीवर प्रकाश टाकला आहे व भविष्यकालीन विकासाच्या वाटचालीचें दिग्दर्शन केले आहे.

महाराष्ट्रातील प्रत्येक ज्ञातीबांधवाने संग्रही ठेवावा असा हा उपयुक्त ग्रंथ आहे. इतकेच नव्हे तर विद्यापिठीय स्तरावर अध्यापन करणारे समाजशास्त्राचे प्राध्यापक, विद्यार्थी, समाजसेवक, नेते, कार्यकर्ते यानाही उपयुक्त व मार्गदर्शक असा हा ग्रंथ आहे.

महाराष्ट्रमाता तुळजा भवानीच्या चरणी मुक्तेश्वरांची ' आराधना ' रुजू होवो व त्यांच्या इच्छित कार्यात यश लाभो, अशी करवीर निवासिनी महालक्ष्मीच्या परिसरातून मी प्रार्थना करतो.

— वि. द. घोटणे

---

डी. आर. जमदाडे, बी. ए. एल्एल्. बी.
ॲडव्होकेट, लातूर.

समाजात जागृती निर्माण व्हावी, आपसांतील मतभेदाना तिलांजली द्यावी व समाज संघटीत, सुसंस्कृत आणि एकजीव व्हावा या करता लेखक श्री. मुक्तेश्वर यांनी परिश्रमपूर्वक " आराध " या ग्रंथाची निर्मीती केली याबद्दल प्रस्तूत लेखकाचे कौतुक जेवढे करावे तेवढे थोडेच आहे. लेखकाने प्रस्तूत ग्रंथात मानव समाज निर्मीती, जगांत जगण्याकरता व स्वतःचे आस्तित्व टिकवण्याकरता मानव समाजाने केलेली धडपड, त्यातून निर्माण झालेले वर्गविग्रह इत्यादिचा उल्लेख करुन आपल्या अभ्यासू आणि चिकित्सक बुद्धीची साक्ष पटवून दिली आहे.

आज सामाजिक उत्थानाचा, परिवर्तनाचा, संक्रमणाचा काळ आहे. अशा वेळी आपसातील जाती-पोटजाती विसरुन राष्ट्र उभारणेचे कामी सर्वांनी सुसंघटीतरित्या एकत्रित येण्याचा हा काळ आहे. प्रस्तुत "आराध" या साहित्य मूल्यांतून लेखकाने हाच संदेश देऊन आपणास एकतेचे आवाहन केले आहे.

— डी. आर. जमदाडे

---

रघुनाथराव जाधव
अध्यक्ष, महाराष्ट्र क्षत्रिय धनगर समाज
नासिक, दि. २०-९-७८

प्रिय मुक्तेश्वर,

आपण 'आराध' प्रकाशीत करीत आहात याबद्दल आम्हांस अतिशय आनंद आणि अभिमान वाटतो. 'आराध' हे समाजाचे "आराध्य दैवत" बनो हीच मल्हारी मार्तंड चरणी प्रार्थना. आपल्या आराधमुळे समाजात निश्चितच चेतावणी निर्माण होऊन समाजकार्यासाठी 'आराध' दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरेल. समाजाचे बांधणीसाठी केवळ राजकीय नेतृत्व पुरेसे नसून इतर विधायक क्षेत्रातील बुद्धीनिष्ठ नेतृत्वही फार महत्वाचे असते.

'आराध' चे लेखक "मुक्तेश्वर" समाजऋणातून मुक्त झाले आहेत. त्यांनी अपार कष्ट घेऊन समाजाला जागृतीचे आणि संघटनेचे आवाहन केले आहे. या आवाहनाला समाजाने प्रतिसाद देणें आवश्यक आहे. यात समाजाचे हित आहे. सदरील पुस्तक समाजाला मार्गदर्शक आहे. त्याच प्रमाणे अभ्यासुना संदर्भासाठी अत्यंत उपयुक्त आहे. श्री क्षेत्र तुळजापूर येथील हे लिखाण समाजातील अज्ञान आणि दारिद्रय नष्ट करणारे श्री तुळजाभवानी मातेने दिलेले खड्ग ठरो. ज्याचे हातात खड्ग तो क्षत्रिय. या रुपात समाजाचा सर्व क्षेत्रात पराक्रम व्हावा आणि समाजाचे भले व्हावे यासाठी 'चांगभलें'. धन्यवाद.

— रघुनाथराव जाधव

चंद्रकान्त स. बेन्द्रे
विशेष कार्यकारी दंडाधिकारी
मुंबई, दि. १९-९-७८

प्रिय मुक्तेश्वर,

'आराध' या आपल्या पुस्तकांत आपल्या समाजाचा व महाराष्ट्रातील जातीभेदाचा इतिहास कथन केला आहे. आजच्या तरुण पिढीस व भावी समाज कार्यकर्त्यांना या पुस्तकरुपाने चांगलीच माहिती होणार आहे. हे पुस्तक प्रत्येक समाजबांधवाने आपल्या घरी ठेवले पाहिजें.

समाजाचें एकीकरण व्हावे यासाठी आपण केलेला "आराध" निश्चितच समाजास जाग आणेल.

— चं. स. बेन्द्रे

---

तुकाराम नथुजी घोडके
मुंबई, दि. २३-९-७८

प्रिय मुक्तेश्वर,

आपण 'आराध' हा ग्रंथ तयार करण्याकरिता जे श्रम घेतलेंत त्याबद्दल अनेक धन्यवाद. हा ग्रंथ लिहून आपण एक महान सामाजिक कार्य केलेले आहे. आपल्या ग्रंथाने उद्दिपीक होऊन आपले बांधव एका व्यासपीठावर येऊन आपल्या समाजाच्या प्रगतिचा रथ पुढे नेवोत हीच सदिच्छा.

— तु. न. घोडके

रामचंद्र भगवंतराव कांबळे
बार्शी, २०-९-७८

प्रिय मुक्तेश्वर,

आपण अभ्यासू वृत्तीनें लिहिलेल्या " आराध " पुस्तकाबद्दल अभिनंदन ! या पुस्कामुळे ज्ञातिबांधवात निश्चितपणें एकतेची भावना निर्माण होईल असा मला विश्वास वाटतो.

— रा. भ. कांबळे

---

प्रा. वि. ह. देवकर
चिटणीस, अहिल्योत्सव समिती, तुळजापूर.

प्रिय मुक्तेश्वर,

आपण महत्प्रयासाने लिहिलेले ' आराध ' हे पुस्तक वाचून अत्यंत समाधान वाटले. जाती व्यवस्थेमुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता नष्ट होणे महत्वाचे आहे. आपल्या पुस्तकामुळे समाज एकीकरणास चालना मिळणार आहे. श्री मार्तंड कृपेनें आपण आरंभिलेले कार्य यशस्वीं होवो.

आपला ' आराध ' एकतेचा मार्गदीप व्हावा हीच आराधना.

— वि. ह. देवकर

---

सौ. दिपाली मो. कांबळे
भवानी पेठ, पुणें.

जोपर्यंत भेद आहेत तोपर्यंत ऐक्य शक्य नाही व समाजाचा उत्कर्ष नाही. हे ओळखून श्री मुक्तेश्वर यानी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन समाजाचा अभ्यास केला आहे. पुस्तकास

नांवसुद्धा समर्पक दिले आहे. मुक्तेश्वर हे समाजरुपी देवतेंची आराधना करुन ऐक्य निर्माण करण्याची इच्छा प्रकट करत आहेत. त्यांच्या या थोर कार्यास श्री तुळजाभवानीमाता यश देवो हीच सदिच्छा.

– सौ. दिपाली कांबळे

---

भालचंद्र पी. गायकवाड
स्पेशल एक्झीक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट
मुंबई, २२-९-७८

प्रिय मुक्तेश्वर,

'आराध' लिहिण्यासाठी आपण घेतलेले कष्ट अवर्णनीय आहेत. या पुस्तकाचा संदर्भ ग्रंथ म्हणून प्रत्येक ज्ञातीबांधवाने त्याचें वाचन व संग्रह करणें आवश्यक आहे. समाजातील पोटजातीचे एकीकरण हे समाजोन्नतीचे पहिले पाऊल आहे व ते टाकण्यासाठी आपण ज्ञातीबांधवाना एकमेकांची ओळख पटविण्यासाठी जो इतिहास सांगितला आहे तो वाचून समाधान झाले.

– भा. पां. गायकवाड

---

खुलासा :

लेखकाचे निवेदनात या पुस्तकावर कोणाचेही अभिप्राय घेतले नाहीत असा उल्लेख केलेला आहे. परंतू जवाहर मुद्रणालयाचे सौजन्यामुळे प्रकाशनपूर्व पुस्तकाच्या २५ प्रति अभिप्रायार्थ उपलब्ध झाल्या आणि समाजबांधवानी व आदरणीय मंत्रीमहोदयांनी त्यांचे शुभसंदेश व अभिप्राय त्वरीत पाठवून लेखकास उपकृत केले. यामुळेच ते या ठिकाणी प्रसिद्ध करण्याचे भाग्य लाभले.

– मुक्तेश्वर

No. 4215 / RM / 78

रक्षा मंत्री, भारत

MINISTER OF DEFENCE, INDIA

नई दिल्ली

दिनांक २१ सितम्बर, १९७८

श्री. एम. बी. गायकवाड द्वारा महाराष्ट्र और सीमा परिसर के हिन्दू-खटीक समाज एकता विषयपर 'आराध' नामक एक पुस्तक लिखी गयी है, जिसका प्रकाशन समारंभ दिनांक २ अक्तूबर, ७८ को श्री क्षेत्र तुळजापूर ( महाराष्ट्र ) में होने जा रहा है, यह जानकर प्रसन्नता है ।

समय आ गया है जब हिन्दू समाज में खटीक ही नही सभी दलित व पिछडें वर्गो को संगठित रुप में समाज में अपना सम्मानपूर्व स्थान और समानता पर आधारित अपने अधिकार प्राप्त करनेके लिए एकजूट होकर संघर्ष करना चाहिए ।

आशा है, पुस्तक अपने लक्ष्य में सफल सिद्ध होगी ।

— जगजीवन राम

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | |
|---|---|---|
| ६ | १५ | संदर्भ ऐवजी संपर्क |
| ७ | १३ | कै. सौ. ऐवजी सौ. |
| ७ | १४ | जगन्नाथ ऐवजी कै. जगन्नाथ |
| ७ | २६ | मोतराम ऐवजी मोतीराम |
| १५ | ५ | ऐंकी ऐवजी एकी |
| १५ | १५ | करण्यात ऐवजी करण्यास |
| १९ | ९ | पणिस्थितीत ऐंवजी परिस्थितीत |
| २१ | २७ | लागते ऐवजी लागले |
| २३ | ३ | वशिक ऐंवजी वांशिक |
| २३ | २४ | विदभ ऐवजी विदर्भ |
| २८ | १६ | संस्कृतिभ्दव ऐवजी संस्कृतोभ्दव |
| ३० | ८ | मूस्थान ऐवजी मूळस्थान |
| ३३ | १५ | उपयुक्त ऐवजी उपरोक्त |
| ३९ | २५ | देशातेहि ऐंवजी देशाचेहि |
| ४५ | ९ | लाट ऐवजी लाड |
| ४६ | २३ | पोटजात ऐवजी पोटजाती |
| ८५ | १४ | रसेळें ऐवजी रसेल |
| ९० | १० | गोगार ऐवजी बोगार |
| ११८ | २ | मातीचा ऐवजी मातीची |
| १२० | १५ | मराठा धनगर ऐवजी धनगर |
| १४५ | ३ | समजत ऐंवजी समजूत |
| १५४ | ८ | भरोबा ऐंवजी भैरोबा |
| १६० | ५ | राष्ट्रीक ऐवजी राष्ट्रीय |

## लेखकाचे निवेदन

आजच्या वैज्ञानिक युगात ज्ञाति संस्थांची खरोखरच गरज आहे काय ? आणि ती असेल तर त्या गरजेचे व संस्थांचे स्वरुप कसे असावयास हवे, हा प्रश्न नेहमीच अनुत्तरीत ठेवण्याची दक्षता घेतली जाते. जातियवादावर गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत भाषणाचा जोष उठविण्यात आला तरी देखील सामाजिक व सांस्कृतिक विकासासाठी आजतरी ज्ञाति संस्थांची गरज आहे, हे नाकारुन चालणार नाही. विशेषत: अल्पसंख्याक व उपेक्षित मागास ज्ञाति संस्थानी जर त्या त्या समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचा विडा उचलला तर देशातील अशा सर्व बांधवाच्या विकासासाठी झटणाऱ्या शासनाला ते एक पूरक कार्यच ठरेल. हे सारे करण्यासाठी अशा ज्ञातीतील विचारवंतांनी पुढे आले पाहिजे. प्रथम स्वतःच्या ज्ञातीतील अनेक पोटशाखाना एकत्र आणले पाहिजे व त्यांच्यातील क्षुद्र मतभेद मिटविले पाहिजेत. जातिभेद नाशाची ही पहिली व्यवहार्य पायरी आहे. सामुदायिक विवाह, आंतरजातीय विवाह असे नवे नवे उपक्रम अशाच ज्ञातिसंस्थानी सुरू केले पाहिजेत. तरच आज स्वातंत्र्य मिळून तीस वर्षे झाले तरी जी जातीयता दिसते, ती कमी कमी होऊन आपल्या देशाचे जातीधर्म निरपेक्षतेचे स्वप्न साकार होईल.

प्रस्तूत ठिकाणी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व सीमा भागातील मद्य-मांस विक्री करणारा मराठी भाषिक समाज आपआपसातील मतभेद विसरुन सुसंघटीत व्हावा यासाठी साधार विवेचन करण्यात आले आहे. या सर्व मंडळीत आज मतभेद असले तरी

मूलत: हे सर्व हिंदूखाटिक आहेत व त्यांचा मांस विक्रीचा मूळचा वंशपरंपरागत व्यवसाय सार्वत्रिक आहे. पश्चिम महाराष्ट्रातील मंडळी केवळ मांस विक्रीचा व्यवसाय करतात म्हणून 'खाटिक' या नावाने ओळखली जातात तर मराठवाडा व सीमा भागातील मंडळी मांस विक्रीबरोबर मद्य विक्रीचा व्यवसाय पूर्वपार करतात व ते 'कलाल' या नांवाने ओळखली जातात.

सन १९०१ पासून दर दहा वर्षांनी भारताची शिरगणती होते त्यावेळी सरकारने निरनिराळ्या प्रांतातील भाषा, जाती, देव, दैवते ह्याबद्दल पुष्कळ माहिती गोळा करून छापलेली आहे. तसेच इ. स १८८०-१९३९ ह्या काळात जिल्हावार गॅझेटियर्स मधून निरनिराळ्या प्रांताच्या जाती जमातीबद्दल माहिती छापलेली आहे. याशिवाय दशवार्षिक शिरगणतीचे अहवाल व गॅझेटियर्स यावरून प्रत्येक जातीची स्वतंत्र माहिती संकलीत करून अहवालरुपाने छापण्यात आली आहे.

प्रामुख्यानें याच माहितीचें आधारे डॉ. केतकरानी अनेक जातीची माहिती त्यांचे ज्ञानकोशात मराठीमधून प्रसिद्ध केली व प्रथमच अनेक जाती जमातीचा इतिहास समाजातील सर्व थरापर्यंत नेऊन पोचविला. यामुळे सर्व मराठी समाज खडबडून जागा झाला. याच सन १९२० ते १९३० च्या काळात सत्यशोधक चळवळीमुळे महाराष्ट्रातील सर्व ब्राह्मणेतर समाजात सुधारणेंचे वारे वाहू लागले व अनेक समाजाच्या परिषदा घेतल्या जाऊन त्यानी आपापल्या समाजाची संघटना महाराष्ट्र पातळीवर स्थापन केली. प्रत्येक जातीची संकलीत माहिती नव्याने उपलब्ध झाल्यामुळे प्रत्येक समाजाला आपले व्यापक नांव घेऊन समाज संघटीत करण्यास मदत झाली. प्रस्तूत विषयक समाजाचे दुर्दैव असे की व्यवसाय व प्रादेशीक भेदानुसार या एकाच 'हिंदू खाटीक' समाजात निरनिराळ्या पोटशाखा सरकारी गॅझेटियर्स जातीविषयक अहवाल यामधून दाखविण्यात आल्या आहेत. त्या प्रामुख्याने अशा आहेत.
१) मराठा खाटीक २) लाड खाटीक ३) लाड कलाल
४) मराठा धनगर.

यामुळे या एकाच समाजात ऐक्य भावना वाढीस लागण्या ऐवजी निरनिराळे सवते सुभे निर्माण झाले. याच पार्श्वभूमीवर या समाजाची इ. स. न. १९३१ साली पुण्यात एक परिषद झाली. या परिषदेस कोल्हापूरखेरीज पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील मंडळी उपस्थित होती. या परिषदेत प्रामुख्याने नगर गॅझेटियरचे माहितीचे आधारे 'क्षत्रिय मराठा धनगर' हे नांव समाजाने महाराष्ट्रपातळीवर धारण करावे, असे ठरले. या नांवास कोल्हापूरचे समाजाने विरोध दर्शविला व त्यानी त्यांचे 'मराठा खाटकी समाज' असे वेगळे नांव कायम केले. यामुळे या समाजात आपण मूळचे मराठा की धनगर ? असा निष्कारण वाद निर्माण झाला. या वादात मराठवाडा व सीमा भागातील लाड खाटीक तथा कलाल समाज पूर्णपणे दुर्लक्षिला गेला व त्यांचा कसलाही विचार आजपावेतो घेतला गेला नाही. वास्तविक या अल्पसंख्य समाजात मराठा वा धनगर अशाप्रकारे भेद मानणे सर्वस्वी चुकीचे आहे. या संदर्भात राजर्षी शाहू महाराजांचे कार्य सर्वांनी लक्षात घेण्यासारखे आहे. त्यानी कोल्हापूर संस्थानात १९१८ च्या फेब्रुवारीत जाती जातीत विवाह करण्याचा कायदा केला व उपरोक्त कायद्यान्वये धनगर-मराठा विवाहही घडवून आणले, असो.

वरील प्रकारे या समाजात असलेले मराठा, लाड व धनगर असे मुख्यभेद व या समाजाची अनेक जुनी व नवीन नांवे यामुळे हा समाज विस्कळीत झालेला आहे. जोपर्यंत भेद आहेत तो पर्यंत ऐक्य शक्य नाही. अशा अवस्थेत हा मद्य-मांस विक्री करणारा हिंदू समाज मूळचा एकच आहे, हे पटवून दिल्यास यांच्यात खरी जागृती होईल व ते आपापसातील मतभेद मिटवून एकत्र येतील या एकाच भावनेतून हा सर्व प्रपंच येथे करीत आहे. वास्तविक भाषा, व्यवसाय मूळवंश, वर्ण, लग्नातील रितीभाती, सण, दागिने, आहार, कुलदेवता, वसतीस्थाने व आपलेपणाची भावना इतक्या गोष्टी ज्यांच्या एक आहेत, त्या जाती कोणत्या तरी मूळच्या एका जातीच्या पोट जाती आहेत, हे सर्वमान्य आहे. प्रस्तूत समाजाचे एकीकरणासाठी हाच तो स्पष्ट पुरावा आहे. परंतु या विषयाचा एकत्रितपणे कोणीही विचार

वा अभ्यास आजपर्यंत केलेला नाही, हेच मोठे दुर्दैव आहे.

जगातील मानव समाजाचा अभ्यास करता, आजच्या मानवाचा पूर्वज प्रथमचा शिकारी, नंतर पशूपाल तथा धनगर व आज नागर झालेला आढळतो. वर्तमान जातिभेदाची निर्मीती ही अगदी अलीकडच्या काळातील आहे व तिच्या मूळाशी विविध कारणे आहेत. याचप्रमाणे भारतातील प्रत्येक प्रांतातील जातीरचना व तिच्या निर्मीतीचा काळ वेगवेगळा आहे. महाराष्ट्राची अत्रूटित परंपरा देवगिरीचे यादवकाळी निर्माण झाली आहे व यादव हे इतिहासात मराठे म्हणून ओळखले जाणारे पाहिलेच राजे होत. तेव्हा महाराष्ट्रातील सांप्रत जाती रचनेचा अभ्यास करावयाचा झाल्यास या यादव काळापासूनच प्रामुख्याने विचार करावा लागेल, असे लेखकाचे मत आहे.

महाराष्ट्रातील जातीरचनेच्या अभ्यासासाठी या भूमिची भौगोलिक सामाजिक व ऐतिहासीक ओळख असणे आवश्यक आहे. तसेच येथील भाषा, ग्रामसंस्था, राज्यसंस्था, राजे, शिल्पकला, दैवते, परकीय आक्रमणे व सर्वच समाजात प्रचंड उलथापालथ करणारे दुष्काळ यांची माहिती या विषयासाठीं आवश्यक आहे. ही सर्व माहितीं थोडक्यात या ठिकाणी दिलेलीं आहे. या ठिकाणी मूळवंश व संस्कृति यांचा संबंध व महाराष्ट्रातील इतर अनेक जाती यांचो माहिती जाती निर्मीतिचे स्वरुप समजण्यासाठी येथे दिली आहे. या ग्रंथाचे स्वरुप एकीकरणाचे मूळ विषयाबरोबर कांहीसे समाज व मानववंशशास्त्रीय असे झाले आहे. या ग्रंथात कांही जागी त्याच-त्या-माहितीची व विचाराची पुनरावृत्तीं झालेलीं आढळेल. ती सहेतुक असून त्या त्या जागी तो तो मुद्दा विनासायास स्पष्ट व्हावा हा उद्देश त्या मागे आहे.

लेखकाचे सर्व विचार उपलब्ध माहितीच्या आधारे स्वतःचे दृष्टीकोनातून व्यक्त केले असल्यामुळे व लेखक कांही सर्वज्ञ नसल्यामुळे ते शंभरटक्के बरोबर आहेत असाही त्याचा दावा नाही. या समाजातील गैरसमज घालविण्यासाठी व त्याचे भरीव एकीकरणासाठी या समाजाच्या निर्मीतीचा शोध घेण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न आहे. या लिखाणावर

कोणाचाहि अभिप्राय न घेता या समाजाच्या या पूर्वीच्या अनेक परिषदामधून समाज ऐक्यासाठी या समाजाच्या इतिहासाचे अभ्यास करण्याची जी आवाहने समाजधुरिणानी केली आहेत, तीच येथे या विषयाचे सुरुवातीस दिली आहेत. तसेच श्री. अरविंद हरी राऊत यांचे एकीकरणाचे महत्व सांगणारा लेख येथे दिला आहे. वाचक या लहानशा ग्रंथाचे स्वागत करतील अशी आशा आहे. या विषयाच्या अभ्यासासाठी माननीय कृष्णरावजी जगताप ऑनररी मॅजीस्ट्रेट व कार्याध्यक्ष विजय वाचनालय तुळजापूर यानी अतिव सहाय्य केले. त्यांनी विजय वाचनालयातील ग्रंथ भांडार माझ्यासाठी सदैव खुले ठेवले व या विषयाच्या अभ्यासाची श्रीगणेशा त्यानीच करून दिली. त्याचप्रमाणे मराठवाड्यातील लोकप्रीय माजी आमदार व सध्याचे भूविकास बँकेचे चेअरमन माननीय साहेबराव हंगरगेकर यांनी माझ्या या समाज एकीकरणाचे कार्यास आशिर्वाद देऊन माझा उत्साह द्विगुणीत केला.

तुळजापूर येथील दि ३-१०-१९७१ चे महाराष्ट्र पातळीवरील या समाजाच्या परिषदेचे उद्घाटन त्यांचे हस्ते झाले. सर्व समाज बांधवानी आपापसातील मतभेद मिटवून एक व्हावे असे तळमळीचे आवाहन त्यांनी सदर परिषदेत केले व पोटशाखेच्या सामाजिक एकीकरणाचे महत्व समजावून सांगितले. यामुळे एकीकरणाचे या विषयास भरीव चालना मिळाली. तसेच श्री. डी. एन्. पैलवान, माजी नगराध्यक्ष व अध्यक्ष धनगर समाज तुळजापूर यानी त्यांचे जवळील अमोल असे ग्रंथ अभ्यासण्यासाठी दिले व उदार अंतःकरणाने सतत सहकार्याचा हात पुढे केला. या सर्व मंडळींचा मी अत्यंत आभारी आहे.

डेक्कन कॉलेज पुणे येथील धनगर प्रोजेक्टचे डायरेक्टर व समाज शास्त्रज्ञ डॉ. के. सी मल्होत्रा यांनी मला वेळात वेळ काढून योग्य ते मार्गदर्शन केले. त्यांच्याशी वेळोवेळी केलेल्या चर्चेमुळे मला या विषयाचा अभ्यास करणे सोपे गेले. केवळ त्यांचे मार्गदर्शनामुळेच डेक्कन कॉलेजमधील बहुमोल ग्रंथांचा अभ्यास करता आला. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

माझें सहकारी श्री. रा. दे. कांबळें यांनी अगदी सुरवातीपासून अखेरपर्यंत मला बहुमोल सहाय्य केले. महाराष्ट्रातील व सीमा भागातील अनेक ठिकाणी समाज बांधवांची माहिती घेण्यासाठी ते सतत माझ्या बरोबर होते. बहामनी राज्याच्या प्राचीन राजधान्या विजापूर, नगर व गुलबर्गा तसेच विदर्भातील नागपूर व अकोला आणि सीमा भागातील बेळगांव इत्यादि ठिकाणी या समाजाविषयीची माहिती मिळविण्यासाठी जावे लागले. महाराष्ट्रातील व सीमाभागातील अनेक लोकांनी मला माहिती देऊन बहुमोल सहकार्य केल्यामुळे या समाजाची जडण घडण व बहुरंगी स्वरुप याचे लेखकास आकलन होण्यास मदत झाली. या सर्व लोकांचे याठिकाणी आभार मानणे हे मी माझें आद्यकर्तव्य समजतो. सन १९७१ पासून जरी या विषयाचे अभ्यासाची सुरूवात लेखकाने केली असली तरी इ स. १९५५ पासूनच या विषयावर लेखकाने समाजातील अनेक मान्यवर व्यक्तींशी चर्चा करण्यास सुरवात केली होती. लेखकाने ज्या मान्यवर व्यक्तींशी या विषयाबाबत प्रत्यक्ष संदर्भ साधला, त्यांची नांवे येथे देत आहे.

१) कै. मनाजी गायकवाड, सोलापूर. २) कै. रावसाहेब कांबळे वार्शी. ३) कै. रामचंद्र हरिभाऊ जवाहिरे, सातारा. ४) कै. शंकरराव गणपतराव कांबळें, मुंबई. ५) सरदार बलवंतसिह एललकार, अकोला. ६) श्री. शंकरराव टोणपे, उदगीर. ७) श्री. रामचंद्र निकुडे पाटील पुणे ८) श्री. उद्धवराव इंगोले, बारामती. ९) श्री. बाबुराव कृष्णाथ थोरात, बार्शी. १०) श्री. रामचंद्र भगवंतराव कांबळे, बार्शी. ११) कै. श्रीरंग क्षीरसागर, सोलापूर. १२) श्री. एन्. डी. क्षीरसागर सोलापूर. १३) श्री. सोपान मास्तर पलंगे, सोलापूर. १४) श्री. मधुकर कनकधर, सोलापूर. १५) श्री. विठ्ठल रामजी गायकवाड, बेळगांव. १६) कै. अप्पासाहेब कलाल, विजापूर. १७) श्री. रामण्णा चौधरी ( अध्यक्ष ) विजापूर. १८) प्रो. श्री. अंबरखाने, विजापूर. १९) श्री. चदप्पा गणेशकर, गुलबर्गा. २०) श्री. आण्णाराव पलंगे मास्तर, गुलबर्गा. २१) श्री. डी. एस्. खडके, गुलबर्गा. २२) श्री. बाबुराव पलंगे, बी. ए. एल्‌एल्. बी., गुलबर्गा. २३) श्री. लाड बंधू ( भिगार ), नगर. २४) श्री. अनिलकुमार तुमाने, नागपूर.

२५) ॲडव्होकेट श्री. देविदासराव जमदाडे, लातूर. २६) श्री. तुकाराम इंगळे, लातूर. २७) श्री. बाबूराव डोंगरे, लातूर. २८) श्री. शिवलाल गायकवाड, करमाळा. २९) श्री. जनार्धन गायकवाड, करमाळा. ३०) श्री. सदाशिव लिंबाजी कनकधर, सोलापूर. ३१) श्री. बभ्रुवाहन हातागळे, तुळजापूर. ३२) श्री. वसंतराव कांबळे, तुळजापूर. ३३) श्री. भिमराव जमदाडे, तुळजापूर. ३४) श्री. रमेश बाबूराव कांबळे, पुणे. ३५) श्री. गोविंद कृष्णाजी घोलप, पुणे. ३६) श्री. गोविंदराव गोपाळराव घोणे, पुणे. ३६) श्री. दगडोबा घोडके, तुळजापूर

तुळजापुर येथे दि. ३-१०-१९७१ रोजी झालेली परिषद या विषयासाठी अत्यंत उपयुक्त ठरली. या परिषदेनिमित्त अनेक विचारवंत समाजबांधवाचे या विषयावरील विचार ऐकावयास मिळाले. या परिषदेस उपस्थित असलेल्या ज्या समाज बांधवाकडून अत्यंत उपयुक्त माहिती मिळाली. त्यांची नांवे अशी- १) कै. सौ. शकुंतला वि. घोटणे कोल्हापूर, २) जगन्नाथ परशुराम जांभळे लोणावळा, ३] श्री. वि. द. घोटणे, कोल्हापूर ४] श्री. जयंत दत्तात्रय घोटणे कोल्हापूर, ५) श्री. तुकाराम नथुजी घोडके मुंबई, ६) श्री. वसंतराव पांडूरंग घोणे मुंबई, ७) श्री. चंद्रकांत सदाशिव बेंद्रे मुंबई, ८) श्री. जगन्नाथ नथुजी घोडके मुंबई, ९) श्री. पांडूरंग मनाजी जाधव मुंबई, १०) श्री. किसन एकनाथ घोणे मुंबई, ११) श्री. पंढरीनाथ दामोधर खडके पंढरपूर, १२) कै. डॉ. रुपचंद गंगाधर ताडे श्रीगोंदा, १३) डॉ. अर्जून रामचंद्र साबणे उदगीर, १४) श्री. गणपत रामचंद्र सौदागर लातूर, १५) श्री. शामराव मलकण्णा कांबळे सांगली, १६) श्री. दिगांवर नरहरी इंगळे पढरपूर, १७) श्री. महादेव भगवान थोरात बार्शी, १८) श्री. उत्तम तुळजाराम जमदाडे बार्शी, १९) श्री. तानाजी गोविंद कांबळे बार्शी, २०) श्री. संतराम माधवराव हातागळे निलंगा, २१) श्री. रघुनाथ सिद्रामजी कांबळे निलंगा, २२) श्री मोतीराम विठ्ठल सौदागर निलंगा, २३) श्री. राणूजी अंबाजी चौधरी सांगली, २४) श्री. चिमण मारुती पवार पुणे, २५) श्री. भीमराव घोलप बार्शी व २६) श्री. काशीनाथ बापू कोथिंबीरे अकलूज.

या शिवाय पत्रद्वारे ज्या समाज बांधवाशी संपर्क साधण्यात आला, त्यांची नांवें अशी–

१) थोर समाजसेवक कै. गणपतराव वामनराव खराटे मुंबई, २) श्री. विश्वनाथ मारुती गालिंदे बारामती, ३) श्री. बाबूराव नानासाहेब इंगुले बारामती, ४] श्री. भालचंद्र पांडूरंग गायकवाड मुंबई ५] श्री. रघुनाथराव जाधव नाशीक.

अत्यंत आनंदाची व योगायोगाची गोष्ट म्हणजें दि २७-६-७८ रोजी या ग्रंथाचे छपाईचा मुहूर्त बार्शी येथे झाला व त्याच दिवशी अखिल क्षत्रिय धनगर समाजाचे अध्यक्ष श्री. रघुनाथराव जाधव, नाशीक यांची बार्शी मुक्कामी भेट झाली त्यांचेशी या विषयावर मनमोकळी चर्चा झाली व त्यांच्याकडून कांही महत्वाची माहिती मिळाली.

या शिवाय धनगर समाजाचे ज्येष्ट कार्यकर्ते कै. शंकरराव बाबूराव लांडें गुरुजी, माजी आमदार इंदोर यानी पत्रद्वारे अत्यंत उपयुक्त अशा सूचना या विषयाचे अभ्यासासाठीं दिल्या व उपयुक्त ग्रंथांची माहिती दिली. तसेच कै. हरी पिराजी धायगुडे मास्तर, बारामती यांनी त्यांचे संग्रहातील अत्यंत मोलाची व दुर्मीळ अशी माहिती दिली. या दोघांचाही मी अत्यंत ऋणी आहे. मराठवाड्यातील व सीमा भागातील समाजबांधवानी माझ्या या कार्याविषयीं अतीव आस्था दाखवून मला हे कार्य तडीस नेण्यास प्रभावीत केले. त्यांचा व इतर सर्व सहकारी समाज बांधवांचा मी अत्यत आभारी आहे समाजातील थोर समाज सेवक व सत्यशोधक समाजाचे अग्रदूत कै. डॉ. संतूजी रामजी लाड यांचे स्मृतीस हा ग्रंथ अर्पण करीत आहे. शेवटी सर्व समाजबांधवास अभिवादन करून हे निवेदन पूर्ण करीत आहे.

एकता कार्यालय,<br>
२२१ शुक्रवार पेठ, तुळजापूर.<br>
दि. २७ जून १९७८.

मुक्तेश्वर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22822
निबंध 2079

श्री. अरविंद हरी राऊत यांच्या

# पोट जातींच्या एकीकरणाची आवश्यकता आणि शक्यता

**या पुस्तकातील मार्गदर्शक व चिंतनीय विचार. ( इ. स. १९५३ )**

जातीभेद नाशाची पहिली व्यवहार्य व परिणामकारक पायरी म्हणून व पोट जातींच्या सामाजीक गरजा भागविण्यासाठी पोटजातींच्या एकीकरणाची आवश्यकता आहे आणि त्यासाठी पद्धतशीर चळवळ केली पाहिजे. 'आता हे सर्व होणारच आहे' अशी आरोळी ठोकून पळून जाण्याने हे कार्य होणार नाही किंवा 'हे कार्य अशक्य आहे. उगाच आपली शक्ती खर्च केली जाते' असे म्हणणेही योग्य नाही.

जातीभेद नष्ट करणे हा जर राष्ट्रीय प्रश्न आहे तर तो सोडविण्याचा व्यवहार्य, परिणामकारक व पहिला मार्ग म्हणून पोटजातीचे एकीकरण झालेच पाहिजे. पोटजातीच्या पुढाऱ्यांनी या बाबतींत कुचराई केली, आपल्या जातीला अनिष्ट सल्ला दिला अगर अशा कार्यात अडथळे आणले तर तो एक राष्ट्रद्रोह असल्याचे इतिहास नमूद करील.

सामाजिक दृष्टीनेही पोटजातींच्या एकीकरणाची जरुरी आहे. पोट जातीतील लोक संख्येने अल्प असतात. केवळ पंचाहत्तर पासून वीस हजारापर्यंत निरनिराळी लोकसंख्या असलेल्या पोटजाती आहेत. एक जमात या दृष्टीने ही संख्या अपुरी आहे. अशाच जातीतील लोकांची सर्व दृष्टीने कुचंबणा होते. सर्वच्या सर्व जमात सारख्या पातळीची नसते. त्यामुळे तर अधिकच कुचंबणा होते विशेषत: वैवाहिक

बाबतीत ती जास्त होते. कोणी कांहीही म्हटले तरी विवाह विषयक प्रश्न सुटणे ही एकीकरणाची आज मुख्य गरज आहे अल्पसंख्य जातीत निवडीचे क्षेत्र कमी असल्यामुळे अनुरुप विवाह होत नाहीत. शिवाय शिक्षण, सौंदर्य व अर्थ यांची विषमता अशा जातीत अधिक असते, त्यामुळेही विवाहाचा प्रश्न बिकट झाला आहे. पूर्वी हा शहरापुरताच होता, परंतु आता खेडेगावातसुद्धा तो निर्माण झाला आहे. आपल्या स्वतःच्या जातीतच लग्न झाले पाहिजे असे शेकडो वर्षांचे संस्कार मनावर असलेमुळे व पालकांची मतेही तशीच असल्यामुळे पुष्कळ मुलांना इतर जातीत संबंध घडवून आणण्याचे धैर्य होत नाही. क्वचित एखादा मुलगा-मुलगी बंड करून जातींबंधन झुगारुन देते व समाजाच्या रोषाला बळी पडते आणि हे सुद्धा बहुधा शहरात घडते. अलिकडे कांहीं खेड्यातहि अशी उदाहरणे घडू लागली आहेत. परंतु जातीला धरून राहाणाऱ्या बहुसंख्य मुलामुलींचा प्रश्न कसा सुटेल ? अर्थात ज्या जातीला ते मानतात, तीच मोठी करण्याने म्हणजेच पोटजातींचे एकीकरण करण्याने हा प्रश्न सुटण्याचा संभव आहे.

जातीभेद नष्ट करणे हे आपले राष्ट्रीय उद्दीष्ट आहे. परंतु बहुजन समाज हा जातिनिष्ठ असतो; म्हणून त्यांच्या जातिनिष्ठेला हळूहळु धक्का लावून जातीभेद नाहीसे करण्याकरिता त्यास तयार करणे हा पोटजाती एकीकरणाचा एक हेतु आहे. म्हणून पोट जातीच्या एकीकरणाला कांही काल निश्चित मर्यादा पाहिजे. अशी मर्यादा असणे हे संकुचितपणाचे आहे असे कोणी म्हटले तरी एकीकरणाची चळवळ यशस्वी करण्याच्या दृष्टीने ते इष्ट आहे. नाहीतर "एक धड ना भाराभर चिंध्या" अशी अवस्था होईल. आज चार पोटजाती एकीकरणाची चळवळ करावयाची, या चार जाती संघटीत होत नाहीत तोच आणखी चार पोट जाती त्यांत आणून सोडण्याचा प्रयत्न करावयाचा असे होऊ नये. बहुजन समाजाचा विश्वास अशाने संपादन होणार नाही. शिवाय विरोधक त्याचा अधिक फायदा घेतात. **करिता एका विशिष्ट भूभागात राहणाऱ्या आचार, आहार यांनी पुष्कळ जवळ असणाऱ्या, पोटजाती निवडून त्यांच्या एकीकरणाची चळवळ चिकाटीने चालविली पाहिजे.**

## एकीकरणास कुणाचा व कां विरोध होतो ?

कोणत्याही लहान मोठ्या नवीन सामाजिक सुधारणास कांही लोकांचा विरोध असतो. स्वतःच्या ज्ञातीच्या अगर गांवच्या उन्नतीसाठीं एखादी संस्था निघाली तर तीस विरोध करणारी मंडळी पुढे येतात. मग पोटजातीच्या एकीकरणासारख्या क्रांतीकारक सामाजिक सुधारणेस विरोध करणारी मंडळी पुढे येतील, यात नवल काय ? अशा चळवळीस विरोध असणे चांगले. जितका अधिक विरोध तितका त्या चळवळीचा परिणाम व सामर्थ्य अधिक. मात्र विरोधाकडें दुर्लक्ष करून कार्यभाग होणार नाही. विरोधकांच्या कार्याचा, पद्धतीचा व प्रकाराचाही समाज सुधारकानी अभ्यास केला पाहिजें.

सध्या निरनिराळ्या जाती आपापल्या पोटजातीच्या एकीकरणाची चळवळ करित आहेत. त्यांच्या चळवळीना विरोध होत आहे. विरोधकाचे निरीक्षण केले तर सर्वत्र एकच साचा दिसतो. कोणतीही चळवळ प्रथम एखादाच समाजसेवक सुरू करतो अगर मूठभर लोक एकत्र येवून ती सुरू करतात. नंतर निरनिराळे लोक त्यात सामील होतात व ती चळवळ फोफावते. चळवळीचा भार वाहाणारे जसे थोडे लोक असतात तसेच विरोध करणारेहि थोडें लोक असतात. हा पुढारी लोकांचा वर्ग असतो. दोन्ही पक्ष आपापली बाजू मांडून समाजाकडून पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करतात. जेथे समाजातील बहुसंख्य वर्ग जागृत व समजूतदार आहे, तेथे मात्र खरे मत प्रगट होते. परंतु जेथे ह्याच्या उलट स्थिती आहे तेथे लोकांचा पाठिंबा आहे, व विरोध आहे ह्या दोन्ही गोष्टी खोट्या आहेत. या बाबतीत एक प्रत्यक्ष उदाहरण मी पाहिले. एका समाजाच्या पोट जातींच्या एकीकरणास पाठिंबा देण्यासाठी एका गावी मोठी परिषद भरली होती. आजूबाजूच्या भागातून दीड-दोन हजार लोक जमले होते. एकीकरण चळवळीचे पुढारी उपस्थित होते. एकीकरणास ज्यांचा विरोध आहे, असे ऐकले होतें ती मंडळीहि उपस्थित होती. सभेंत एकमताने एकीकरणास पाठिंबा देणारा ठराव पास झाला. जमलेल्या मंडळीच्या विश्वासातील पुढाऱ्यांनीही पाठिंबा

देणारी भाषणे केली. परिषद यशस्वी झाली. सभेवर कसलेहि दडपण नव्हते. पुढे कांही दिवसांनी त्यातील कांही पुढाऱ्यानी आणखी एक परिषद घेतली. पहिल्या सभेंत पाठिंबा देणारे लोक येथेहि जमले व त्यांनी एकीकरणास विरोध करणारा ठराव पास केला. यावरून काय समजावे? शिवाय जसे लोक तसे त्यांचे पुढारी. एकीकरण चळवळीच्या पुढाऱ्यात बसले कीं, तोंड भरून पाठिंबा देतात, पत्रद्वारे उत्तेजन देतात किंबहुना आर्थिक मदतही देतात आणि विरोधी पुढाऱ्यांत बसल्यावर त्यांनाही पाठिंबा देतात. अर्थात अशा लोकांचा पाठिंबा आहे असे समजू नये व विरोध आहे असे समजू नये. काळ पुढे जात आहे. अगं अगं म्हशी करीत हे लोक आपोआपच ओढले जातील.

कांही लोक (अर्थात् पुढारी म्हणवणारे) चळवळीच्या अग्रपूजेचा मान मिळाला नाही म्हणून विरोध करणारे असतात. कांहीकांचा आपापल्या पोटजातीच्या संस्थात जें स्थान असते ते जाईल, आपले पुढारीपण टीकणार नाही अशा भितीने एकीकरणास विरोध असतो. कांहीकाना या गोष्टी आपल्या शक्ती बाहेरच्या वाटतात म्हणून विरोध असतो. नवीन चळवळ चालविणाऱ्या पुढाऱ्यास स्वाभाविकच थोडी प्रसिद्धी मिळते, लोकांच्या डोळ्यापुढे ते दिसतात अर्थात त्यांचा हेवा वाटून विरोध करणारेही कांही असतात. कांहीकांचा पिंडच विरोधी असतो. दुसरा जे करील त्यास विरोध करणे हाच त्यांचा धर्म. कांही लोक एकीकरण चळवळीच्या हेतुविषयी अंदाज बांधतात आणि त्या हेतुशी आपला संबंध पोहोचणार नाही म्हणून विरोध करतात.

एकीकरण चळवळीचा प्रश्न आमच्या सामाजिक संस्थेकडे का सोपविला नाही, असाहि कांही लोकांचा प्रश्न असतो. परंतु एकीकरणाचा ठराव पास होण्याची खात्री नसेल अशा संस्थाकडे हा प्रश्न सोपवून "आपुले मरण पाहिले म्या डोळा" अशी स्थिती होऊ देऊ नये. कारण अशा संस्थात विशिष्ठ मंडळीचे वजन असते. तेथे एकदा ठराव नापास झाला म्हणजे समाजावर त्याचा अनिष्ठ परिणाम होतो. एकीकरणाची चळवळ चालविणाऱ्या मंडळीना अगर त्यांच्या

संस्थेला त्यामुळे प्रचाराचे अधिक श्रम पडतात.

विरोधकांची अशा तऱ्हेची छाननी केल्यानंतर हे दिसून येईल कीं, असे विरोधक सर्व काळी असतात व राहाणार "सत्य संकल्पाचा दाता भगवान" या न्यायानें आपली चळवळ अखंड चालू ठेवावी, किती लोकांचा विरोध आहे या गोष्टींची शाहानिशा अनावश्यक आहे.



# अखिल क्षत्रिय मराठा धनगर समाजोन्नति परिषद

## अधिवेशन २ रे, पुणे

( ता. २७, २८, २९ व ३० माहे डिसेंबर सन १९३१ )

**अध्यक्ष : श्री. भगवंतराव उर्फ रावसाहेब कांबळे यांचे भाषण :–**

अहवाल पृष्ठ क्र. ४२

उन्नतीचे यशोमंदिर गांठण्याकरितां आपणापुढे आदर्श म्हणून काहीतरी असल्याशिवाय चालणार नाही. प्रयत्नांती परमेश्वरसुद्धा प्राप्त होतो, इतकेच काय पण, नर करणी करे तो नरका नारायण हों जाय हे जरी खरे आहे, तरी आपल्या प्रयत्नास, निश्चयास व अंगीकृत कार्यास निश्चित यश मिळण्यास आपणालाही आदर्श म्हणून आपल्या उज्वल अशा पूर्वेतिहासाची अत्यंत जरुरी आहे. मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे कीं, पूर्वी ज्या ज्या क्षत्रिय समाजानी दिग्वीजय गाजवून आपले प्रभुत्व जगाला पटविले, त्या क्षत्रिय समाजापैकीच आपणही आहोत. या दृष्टीने विचार करता आपणाला आपल्या समाजाचा पूर्वेतिहास अवगत असणे किती जरुरीचे आहे हे दिसून येईल, व असे झाल्यास आपणाला आपल्या विधायक कार्यात अधिकस्य अधिकं फलम् याची सत्यता पटल्याशिवाय राहणार नाही. आपल्या समाजाचा पूर्वीचा उज्ज्वल इतिहास सर्वास अवगत असणे अत्यंत आवश्यक असून तो लोकापुढे आदर्श म्हणून ठेवला जाणे ही फार महत्वाची गोष्ट आहे. इतिहास संशोधनाचे कार्य तज्ञ लोकाकडून चालू आहे. त्या गोष्टीचाही फायदा घेऊन आमच्या समाजातील **सुशिक्षित व विद्वान लोकांनी पूर्वेतिहासाचे यथार्थज्ञान लोकांस करून दिले असता समाज सुधारणेच्या कामी मोठीच मदत होणार आहे.**

++++++

व्यक्ति तितक्या प्रकृति या असावयाच्याच व वादे वादे जायते तत्वबोधः या न्यायाने निरनिराळ्या मतांचे मंथन करून शेवटी निर्णयरुपी जे नवनीत निघतें तेच ग्राह्य असते. एकी कशाला म्हणतात हे पुष्कळांना नीट समजलेले नसते. एकी म्हणजें मतभेद नसणे असे कित्येकास वाटते, पण ही चुकीची समजूत आहे. एकी असणे म्हणजे धंद्यात अगर व्यापारात अगर इतर कोणत्याही कामात चढाओढ नसणे असा अर्थ नाही. मात्र ही चढाओढ दुसऱ्याला खाली ओढण्याकरिता असता कामा नये. ती फक्त स्वतःला वर नेण्याकरितां असली पाहिजे.

हल्लीच्या काळीं ज्या धंद्यात ज्याची बुद्धि चालेल त्यांत त्याने तीं चालवावी. त्यास जन्मामुळे अगर इतर कृत्रिम भेदांनी आडकाठी होण्याचा काळ हल्ली राहिलेला नाही. या दृष्टीने आपण धंद्यात सुधारणा करून सुसंघटितरीतीने उद्योधंद्याची वाढ होईल असा प्रयत्न केला पाहिजें. विहिरीतील बेडकाची आकुंचित दृष्टी सोडून ज्या धंद्यात, उद्योगांत अगर व्यापारात आपली बुद्धि चालण्यासारखी असेल ते ते धंदे आपण आपल्या सामर्थ्यानुसार हस्तगत करण्यात कंबर कसली पाहिजें.

## स्वागताध्यक्ष : श्री. कोंडीबा राजाराम थोरात यांचे भाषण

अहवाल पृष्ठ क्र. २३ व २४

आपल्या समाजाचे नावाबद्दल मतभेद उत्पन्न होऊन दुही होण्याची चिन्हे दिसत आहेत. वस्तुतः जें समाज एक आहेत, त्यांच्या मध्ये नावाविषयी मतभेद होऊ देता कामा नयें. असले क्षुल्लक मतभेद बाजूला टाकून जें मुळात एक आहेत, त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी एकत्र होऊन झटले पाहिजे.

प्रत्येक पोटभेदाने इतर पोटभेदाकडें बंधुत्वाच्या दृष्टीनें पहावे. उच्चनीचत्वाच्या कल्पनेला बिलकूल थारा देऊ नयें. निरनिराळ्या पोटभेदांतील समंजस पुढाऱ्यांनी तरी निदान अशी विचारसरणी पत्करून कार्य करावे अशी माझी विनंती आहे.

# प्रथम अखिल भारतीय सूर्यवंशी – महासम्मेलन
# हैदराबाद [ आंध्र प्रदेश ]

(शुक्रवार, २२ डिसेंबर १९६१ हैदराबाद – आंध्र प्रदेश )

स्वागताध्यक्ष : **श्री. सी. बालाजी का स्वागत भाषण**

मै अेक विहंगदृष्टी सूर्यवंशी जाती के अितिहास पर डाल देना चाहता हूँ। किन्तु यह कोअी पूर्ण नाही। हमें अिसके पूर्ण करने कीं ओर ध्यान देनी होगी। आर्योंने अपनी सभ्यता और संस्कृति से भारत की प्राचीन द्राविड जातियों को प्रभावित किया और अेक सुसंस्कृति की नीव डाल दीं। आर्योंके कबिले भारत के विभिन्न प्रान्तो में अपनी सभ्यता अेवं संस्कृति का प्रचार करनेके लियें भिन्न-भिन्न प्रान्तो कीं यात्रा करने लगें। गुजरात प्रान्त से अधिक संख्या में आर्य जब महाराष्ट्र प्रान्त में आये तब उन्हें महाराष्ट्र के नागरिक अिनकी "सूर्य पूजा" की प्रसिद्धी और गुजरात का प्राचीन नाम "लाड" अिन दोनों को दृष्टिगत रखकर, अिन्हे "सूर्याचे लाड" से संम्बोधित किया। यहीं कारण है **हमारी जातिपर महाराष्ट्र की सभ्यता, संस्कृति अेवं रितिरिवाज का गहरा प्रभाव पडा।**

महाराष्ट्र से निकल कर जो लोक दुसरे प्रान्तों मे जा कर बसे अुनपर वहाँ की सभ्यता और संस्कृति का प्रभाव पडा। परन्तु हमारे साथ गुजरात का प्राचीन नाम "लाट" हमेशा संलग्न रहा है। अिससे हमारी जाति की प्राचीनता का परिचय मिल जाता है। अब जब कि सम्मेलन में विभिन्न प्रान्तोमें रहनेवाले भाई अेक स्थानपर एकत्रित हुअे है तो, हमारा परमकर्तव्य हो जाता है कि सूर्यवंशी जाति का अितिहास प्रकाशित करने की ओर ध्यान देना आवश्यक हो जाता है। अितिहास से जाति का अभिमान बढता है। अितिहास ही आनेवाली सन्तान को मार्ग प्रदर्शन, श्रेष्ठ नागरिक, देशभक्त और राष्ट्रहितैषी बनानें में सहायक सिद्ध होता है।

++++ ++++ ++++ ++++ ++++ ++++ ++++ ++++

टीप : हैद्राबाद (आंध्र प्रदेश) भागातील हिंदू खाटिक महाराष्ट्राचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून स्वतःस "सूर्यवंशी" समजतात हे महाराष्ट्रातील समाजाने लक्षात ठेवण्यासारखे आहे.

दि. ३-१०-१९७१ रोजी तुळजापूर येथें

एकीकरणासाठी आयोजित केलेल्या सभेस समाजशास्त्रज्ञ

## डॉ. मल्होत्रा यांचा शुभ संदेश —

# DECCAN COLLEGE

Postgraduate & Research Institute. Poona-6 (INDIA)

No.: 730/7732
25th September, 1971.

Shri. **M. B. Gaikwad,**
Shukarwar Peth, Tuljapur.

Dear Shri. Gaikwad :

This is to acknowlege with grateful thanks reciept of your very kind letter of 23-9-71 and the invitation to attend the meeting. We are indeed extremly grateful to you.

I note with great pleasure that with your untiring efforts you have succeded in calling this important meeting at Tuljapur on 3rd October, 1971.

On behalf of my colleague and my self, we send you all the best wishes for the success of this important meeting which is a great step towards bringiny your people tagether.

I feel sorry that I shall not be in a position to attend the meeting. I would however like to be informed about the deliberations at the meeting.

I am also sorry to learn that Shri. Jadav has as yet not responded to your letter, and invitation. Seperately I am writing a letter to him to attend this meeting.

With best ragards from all of us.

Yours sincerely,
**Dr. K. C. Malhotra,**
Director, Dhangar Project.

# मराठी लोकांची संस्कृति –

( लेखिका : डॉ. इरावती कर्वे )

## वंश व संस्कृति यांचा संबंध :

माणसा माणसामध्ये कितीहि भेद असले तरी त्यांच्यात एवढे साधर्म्य आहे कीं, त्यांची सर्वांची मिळून एक जिवजाती होते. त्याचप्रमाणे जातीचे असे गुणधर्म (उदा. विशिष्ट शरीररचना) सोडले तर इतर गुणधर्मात माणसा माणसात फरक आढळतो, व त्या फरकावरून माणसाचे गट करून त्यांना पोटजाती किंवा मानव वंश असे नांव देतात.

संस्कृति व वंश यांचा कांही संबंध आहे का ह्या प्रश्नाला 'आहे' व 'नाही' अशी दोन्ही उत्तरे द्यावी लागतील. मनुष्याच्या व्यवहाराला व आत्मियत्वाच्या जाणीवेला एका वंशा पेक्षा सांस्कृति साहचर्यच जास्त उपयोगी पडते.

'रक्ताने हिंदू, हा वाक्प्रचार अर्थहीन आहे. मनुष्य अंगातील अनुवंशिक गुणामुळे हिंदू, मुसलमान वा खिस्ती होत नसून ज्या समाजात तो वाढतो व ज्या कुटुंबात जन्मतो त्यांच्या संगतीने व शिकवणीने तसा होतो. जन्मजात जात विभागणी ज्या हिंदू समाजात आहे त्यातील लोकांना हे तत्व पुन्हा पुन्हा सांगितले पाहिजे, कारण त्याचे सर्व साहित्य संस्कारांच्या अनुवांशीकत्वाच्या कल्पनेने भारलेले आहे. ब्राह्मणाचे पोर मनुष्य – भक्षक – जमातीत वाढते तर तो जमात ज्या रुचीने नर-मांस खाईल त्याच रुचीने तेही खाईल. जर संस्कृतिचा

आणि वंशाचा सबंध यदृच्छेने निर्माण झाला आहे तर मग वंश शोधनाचे कार्य तरी काय आपल्याला? असे वाटणे सहाजिकच आहे. पण जरी हा शोध संस्कृतिच्या अभ्यासासाठी अत्यावश्यक नाही तरी पुष्कळच उपयोगी आहे. वंश व संस्कृति यांचा संबंध ऐतिहासिक आहे. संस्कृतिचा अभ्यास हा एक ऐतिहासिक अभ्यास आहे.

## मराठी लोकांचा पिंड :

सध्या आपली जी संस्कृति आहे ती गेल्या कित्येक शतकांत हळू हळू आजचे रुप धारण करीत होती. तिची निर्मीती निरनिराळ्या मानव समाजाच्या संगमाने, कांही विशेष भौगोलिक पणिस्थितीत झालेली आहे. मराठी भाषा, मराठी पोषाख, मराठी कुटुंब, मराठी लोकांची शेती वगैरे जी कांही संस्कृतिची अंगे आहेत, ती कांही एका स्वतत्र, इतराशी संबंध न आलेल्या मनुष्यांच्या गटाने बनविलेली नाहीत तर निरनिराळ्या समाजाच्या एकत्र येण्यान, परस्पर व्यवहाराने व संघर्षाने ती बनलेली आहेत.

संस्कृति माणसानी बनविलेली असते. ती बदलते पुष्कळ वेळा मानव समाजाच्या संगमामुळे वा संघर्षामुळे. ती जगभर प्रवास करते तेही माणसांच्या दोन पायांच्या सहाय्यानेच. मराठी लोक उत्तरेच्या संस्कृतोद्‌भव भाषापैकी एक (मराठी) भाषा बोलतात ह्याचे कारण ते उत्तरेकडून आले हे आहे का? तसे असेल तर वंशाने वा पिंडाचे उत्तरेकडच्या लोकासारखे असतील. उत्तरेच्या थोड्या लोकांनी येऊन दक्षिणेकडच्या लोकांनाहि भाषा दिली असेल तर पिंडाने ते द्रविडासारखे असणार. जी, गोष्ट भाषेची तीच संस्कृतीच्या इतर अंगाची. ही संस्कृतिची अंगे महाराष्ट्रांत कशी आली हे समजण्यासाठी कदाचित वंशशास्त्राचा आपल्याला उपयोग होईल.

## भारतीय संस्कृति खंडीत की अखंडीत?

भारतात वेदकाळी जी भाषा बोलत होते ती आज कोणाच्याही बोलण्यात नाही. त्यावेळचे लोक ज्या दैवतांची पूजा करीत त्यापैकी

# मराठी लोकांची संस्कृति —

( लेखिका : डॉ. इरावती कर्वे )

## वंश व संस्कृति यांचा संबंध :

माणसा माणसामध्ये कितीहि भेद असले तरी त्यांच्यात एवढे साधर्म्य आहे कीं, त्यांची सर्वांची मिळून एक जिवजाती होते. त्याचप्रमाणे जातीचे असे गुणधर्म (उदा. विशिष्ट शरीररचना) सोडले तर इतर गुणधर्मात माणसा माणसात फरक आढळतो, व त्या फरकावरून माणसाचे गट करून त्यांना पोटजाती किंवा मानव वंश असे नांव देतात.

संस्कृति व वंश यांचा कांही संबंध आहे का ह्या प्रश्नाला 'आहे' व 'नाही' अशी दोन्ही उत्तरे द्यावी लागतील. मनुष्याच्या व्यवहाराला व आत्मियत्वाच्या जाणीवेला एका वंशा पेक्षा सांस्कृति साहचर्यच जास्त उपयोगी पडते.

'रक्ताने हिंदू, हा वाक्प्रचार अर्थहीन आहे. मनुष्य अंगातील अनुवंशिक गुणामुळे हिंदू, मुसलमान वा ख्रिस्ती होत नसून ज्या समाजात तो वाढतो व ज्या कुटुंबात जन्मतो त्यांच्या संगतीने व शिकवणीने तसा होतो. जन्मजात जात विभागणी ज्या हिंदू समाजात आहे त्यातील लोकांना हे तत्व पुन्हा पुन्हा सांगितले पाहिजे, कारण त्याचे सर्व साहित्य संस्कारांच्या अनुवांशीकत्वाच्या कल्पनेने भारलेले आहे. ब्राह्मणाचे पोर मनुष्य – भक्षक – जमातीत वाढते तर ती जमात ज्या रुचीने नर- मांस खाईल त्याच रुचीने तेही खाईल. जर संस्कृतिचा

आणि वंशाचा सबंध यदृच्छेने निर्माण झाला आहे तर मग वंश शोधनाचे कार्य तरी काय आपल्याला? असे वाटणे सहाजिकच आहे. पण जरी हा शोध संस्कृतिच्या अभ्यासासाठी अत्यावश्यक नाही तरी पुष्कळच उपयोगी आहे. वंश व संस्कृति यांचा संबंध ऐतिहासिक आहे. संस्कृतिचा अभ्यास हा एक ऐतिहासिक अभ्यास आहे.

## मराठी लोकांचा पिंड :

सध्या आपली जी संस्कृति आहे ती गेल्या कित्येक शतकांत हळू हळू आजचे रुप धारण करीत होती. तिची निर्मीती निरनिराळ्या मानव समाजाच्या संगमाने, कांही विशेष भौगोलिक पणिस्थितीत झालेली आहे. मराठी भाषा, मराठी पोषाख, मराठी कुटुंब, मराठी लोकांची शेती वगैरे जी कांही संस्कृतिची अंगे आहेत, ती कांही एका स्वतत्र, इतराशी संबंध न आलेल्या मनुष्यांच्या गटाने बनविलेली नाहीत तर निरनिराळ्या समाजाच्या एकत्र येण्यान, परस्पर व्यवहाराने व संघर्षाने ती बनलेली आहेत.

संस्कृति माणसानी बनविलेली असते. ती बदलते पुष्कळ वेळा मानव समाजाच्या संगमामुळे वा संघर्षामुळे. ती जगभर प्रवास करते तेंही माणसांच्या दोन पायांच्या सहाय्यानेच. मराठी लोक उत्तरेच्या संस्कृतोद्भव भाषापैकी एक (मराठी) भाषा बोलतात ह्याचे कारण ते उत्तरेकडून आले हे आहे का? तसे असेल तर वंशाने वा पिंडाचे उत्तरेकडच्या लोकासारखे असतील. उत्तरेच्या थोडया लोकांनी येऊन दक्षिणेकडच्या लोकांनाहि भाषा दिली असेल तर पिंडाने ते द्रविडासारखे असणार. जी,गोष्ट भाषेची तीच संस्कृतीच्या इतर अंगाची. ही संस्कृतिची अंगे महाराष्ट्रांत कशी आली हे समजण्यासाठी कदाचित वंशशास्त्राचा आपल्याला उपयोग होईल.

## भारतीय संस्कृति खंडीत की अखंडीत ?

भारतात वेदकाळी जी भाषा बोलत होते ती आज कोणाच्याही बोलण्यात नाही. त्यावेळचे लोक ज्या दैवतांची पूजा करीत त्यापैकी

दाक्षिणात्याना जिंकून आपले वर्चस्व स्थापले. अशा तऱ्हेने महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीमुळे महाराष्ट्रांत उत्तरेकडील व दक्षिणेकडील संस्कृतिचा संघर्ष व संगम झालेला दिसतो.

नुसत्या भाषेने व संस्कृतिनेंच महाराष्ट्र एक आहे असे नव्हे तर भूस्तर शास्त्राचे दृष्टीनेही तो एक-संघ आहे, ही एक आश्चर्यकारक घटना आहे. भूस्तर शास्त्रांत ज्याला ट्रॅप असे इंग्रजी नांव आहे, अशा दगडांचा प्रदेश तो महाराष्ट्र (दक्षिणचा-कातळ) अशी महाराष्ट्राची व्याख्या फारशी चूक होणार नाही. ट्रॅपच्या काळया दगडाला मराठयांच्या लढाऊ व स्वातंत्र्यप्रिय वृत्तीनें किल्ल्यांचे रुप दिले. भोळया दिगंबर शंकराची व इतर वन्य देवतांची स्थाने स्थापून आपल्या हृदयांतील भोळया वन्य वृत्तीचा अविष्कार केला. आणि दगडांच्या उभ्या भिंतीत लेणी खोदून आपल्या चिकाटीची, असामान्य कलात्मकतेची व कणखर सौंदर्य दृष्टीची जगाला ओळख पटविली. महाराष्ट्राच्या पठारावरील काळयाभोर जमिनीत पावसाळी, मुख्यत: हिवाळी शेती होते. पाऊस बेताचा पडतो म्हणून मुख्य पिक बाजरी--जोंधळयाचे व गहू हरभऱ्याचे. कोकणांत पाऊस खूप पण जमिन निकस. म्हणून त्रावणकोर, बंगाल व गंगा खोरे ह्याप्रमाणे वर्षाचे तिन्ही ऋतूंना पुरेल इतके काम शेतात नाही. महाराष्ट्रातील माणसे शेती व लढाई अशी दोन्ही कामे संभाळून आहेत.

खुद्द महाराष्ट्राची अंतर्गत रचनाही विचार करण्यासारखी आहे. भौगोलिकदृष्टया महाराष्ट्राचे तीन मुख्य विभाग पडतात.

१) सगळयांत पश्चिमेकडचा विभाग म्हणजे कोकणपट्टी. पश्चिम समुद्र व सह्याद्री ह्यामध्ये असलेली हीं अरुंदपट्टी उत्तरेला दमण व दक्षिणेला वेंगुर्ल्यापर्यंत पसरली आहे. वेंगुर्ल्यापासून मंगळूरपर्यंतच्या भागालाही कोंकण म्हणतात उत्तर कोकणांत मराठी लोक राहातात. दक्षिण कोंकणात कोकणी बोलणारे सारस्वत व कानडी आणि तुळू बोलणारे लोक राहातात. भाषेच्या दृष्टीने उत्तर कोंकण एकसंघ आहे. कोंकणालाच पूर्वी अपरांत असे नांव आढळते. अपरांताच्या सीमा ठरवणे कठीण आहे. भृगकच्छ ते गोकर्ण एवढा प्रदेश अपरांतात येत

असे. ह्या अपरांताचेच पुढें लाट व कोंकण असे दोन भाग पडले, पैकी लाट प्रदेश म्हणजे हल्लीचा दक्षिण गुजरात (सुरत जिल्हा) होय. दक्षिण गुजरात व सध्याचे उत्तर कोंकण ह्यामध्ये भौगोलिक, वंशिक व वाक्प्रचारदृष्टया पुष्कळच साम्य आहे. महाराष्ट्राची संस्कृती नीट समजण्यासाठी लाट प्रदेशातील संस्कृतिचा अभ्यास होणे फार जरुर आहे. कोंकण व घाट यात जरी जुन्या काळापासून संबंध होता तरी दळणवळण कष्टाचे होते. घाटावरच्या मुली कोकणात भाताच्या मुलूखात जावयास तयार नसत व म्हणून महाराष्ट्राचीच पण भौगोलिक परिस्थितीमुळे जरा वेगळीच अशी एक उपसंस्कृती कोंकणात आढळते.

२) घाट चढून आले म्हणजे महाराष्ट्राचे प्रचंड पठार लागते. ह्या महाराष्ट्राचें वर्णन करावयाचे म्हणजें त्यातील नद्यांच्या व डोंगरांच्याच अनुषंगाने करावे लागेल. नासिक जिल्ह्याच्या उत्तर सीमेपर्यंत सह्याद्रीच्या रांगा दक्षिणोत्तर पसरलेल्या आहेत. दक्षिणेकडे नासिक ते नांदेड हा भाग गोदावरीच्या खोऱ्यात येतो. पुणे, सातारा, कोल्हापूर, मिरज व सांगली आणि सोलापूर हा विभाग गोदावरीच्या दक्षिणेस कृष्णेच्या खोऱ्यात मोडतो. दोन खोऱ्यातील फरक हा कीं, गोदा महाराष्ट्राची मध्य रेषा व संस्कृतिचा गाथा आहें. तर कृष्णा संस्कृति सीमेवरची नदी आहें. गोदावरी व कृष्णा ह्यांच्या खोऱ्यांना सर्व साधारण 'देश' असे नांव आहे व तो कोंकण शब्दाला विरोध अर्थी वापरतात. गोदाकाठी मराठी संस्कृती भरभराटली तर कृष्णा व तिच्या उपनद्या व दऱ्या-खोरी ह्यांनी तिला आक्रमकापासून रक्षिले.

३) अंजठ्याचा घाट उतरला कीं, तापीं पूर्णेचे खोरे लागते दक्षिणेच्या अंगाला सह्याद्री व उत्तरेला सातपुडा अशा दोन समांतर पर्वत रांगामध्ये ह्या नद्यांचे अरुद खोरे आहे. पूर्णेचे खोरे तो विदभ किंवा वऱ्हाड आणि तापीचे खोरे खानदेश व वऱ्हाडचा कांही भाग होतो. ह्या दोन्ही खोऱ्यातील जमीन काळीभोर व अत्यंत सुपिक अशी आहे. सह्याद्री व सातपुड्याच्या रांगातील वन्य जाती आजही भरपूर प्रमाणात राहातात. उत्तर-दक्षिण जोडणारा मोठा मार्ग ह्याच खोऱ्यात

वऱ्हाणपुरास तापी ओलांडून उतरतो, म्हणून उत्तरेकडचें लोक ह्या दोन्ही भागात स्थाईक होऊन राहीलेले आहेत. बऱ्याच गांवचे पाटील रजपूत, लेवा, गुजर, पोवार वगैरे आहेत. भाषाही देशावरच्या भाषेपेक्षा पुष्कळ निराळी वाटते व तेथील देश भाषांना खानदेशी व वऱ्हाडी असे मराठीचे पोट भेद मानतात.

४) अमरावतीच्या पूर्वेला सखल टेंकड्या ओलांडल्या की, मनुष्य पूर्व महाराष्ट्रात जाऊन पोहचतो. वर्धा नदीच्या तिराशी ट्रॅपचा खडक संपतो व ट्रॅप आणि पुराण खडक ह्यांच्या संधी प्रदेशांत महाराष्ट्रांतील सर्व खाणी सांपडतात. येथे वर्धा व वैनगंगा नद्या उत्तरेकडून दक्षिणेकडे जाऊन एकत्र होऊन गोदावरीला मिळतात. येथेही वस्ती मिश्र स्वरुपाची आहे. गोंड, गोवारी, हळबी, कोलाम वगैरे वन्य जाती कोहाळी, पोवार ह्या सारख्या उत्तरेकडील जातीं, तेलंगणातील जाती आणि मराठा - कुणबी येथे एकत्र येऊन त्यांचे मराठीकरण होत आहे. हा प्रदेश महाराष्ट्रांची सांस्कृतिक सरहद्द आहे. ह्याला आज स्वतंत्र नांव नाही. पण तो पूर्वीपासून विदर्भातच मोडतो.

कोंकणपट्टी, गोदा व कृष्णा ह्यांचे खोरे तापी व पूर्णेचे खोरें आणि वर्धा - वैनगंगेचे खोरे असे महाराष्ट्राचे चार स्वाभाविक विभाग आहेत व त्या प्रत्येकांत मराठी संस्कृतीचे थोड थोडया फरकाने स्वरुप पहावयास सांपडते.

महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागांना निरनिराळी नांवे प्राचीन वाङमयात सापडतात. अपरांत, विदर्भ, अश्मक, मूलक, कुन्तल अशी ती नांवे आहेत. **अपरांतासच कोंकण व लाट असेही म्हणतात. त्यापैकी कोंकण सर्व अपरांताचे देशी नांव व लाट हे उत्तर कोंकणाला प्राचीन ऐतिहासिक काळांत पडलेले नांव असावे असे दिसते.**

## मानव वंश शास्त्र :

जगातील सर्व माणसे दिसावयाला सारखी नसतात. एवढेच काय तर कोणतेही दोन जीव सर्वस्वी एकासारखे एक कधीच नसतात.

असा जीवशास्त्राचा सिद्धांत सांगता येईल. मनुष्य जातीचे असे गुणधर्म (उदा. विशिष्ट शरिररचना) सोडले तर इतर गुणधर्मात माणसा माणसात फरक आढळतो व त्या फरकावरून माणसाचे गट करून त्यांना पोट जाती किंवा मानववंश असे नांव देतात.

माणसाचे वर्गीकरणासाठी खालील गुणधर्म व शरीरप्रमाणें परिक्षणार्थ घेतात. मनुष्याचा रंग, उंची, अवयदाचें प्रमाण, केसांची आकृती, डोक्याची आकृती व परिमाण, चेंहऱ्याचा आकार, नाकाचा आकार आणि डोळ्यांचा रंग व आकार हे गुण माणव-वंश शास्त्रज्ञ मोजतात अथवा तपासतात. ही सगळी प्रमाणे लावून मनुष्य जातीचे वर्गीकरण केले तर मुख्य तीन वंश दिसतात. १) निग्रो सदृश २) मोंगोल सदृश व ३) युरोपिय सदृश असे ते तीन वर्ग आहेत.

वर्गीकरणासाठी सर्व गुण न घेता एकाच गुणावरून वर्ग पाडावेत म्हणजे वर्गीकरण समजण्यास सोपे पडेल अशी कल्पना असल्यामुळे कित्येक केसांचा आकार किंवा डोक्यांचा आकार आणि तोंडाचा आकार असा एकाद दुसराच गुण घेऊन त्याच्या भेदावरून सर्व मानव जातीचे वर्गीकरण करतात.

## महाराष्ट्रांतील वंश व जाति :

महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींची एकमेकांशी तुलना करण्याआधी महाराष्ट्रातील व हिंदुस्थानातील इतर प्रांतातील जातींची तुलना करणे महत्वाचे आहे.

उत्तर प्रदेशातील सर्व जातींची डोक्यांची लांबी रुंदी अनुक्रमे १८६ ते १९२ मिली–मिटर व १३५ ते १४४ मिली-मिटर आहे. महाराष्ट्रात तीच मापे १७७ ते १८८ आणि १३८ ते १४८ आहेत. म्हणजे उत्तर प्रदेशातील लोकांचे डोके लांब व अरुंद आहे, आणि मराठी लोकांचे आखूड व रुंद आहे. हा फरक कपाळाच्या सापेक्ष प्रमाणावरून जास्त स्पष्ट होईल. उत्तर प्रदेशात हा आंकडा ७२ ते ७५

आहे. म्हणजे ते लोक दीर्घ व अतिदीर्घ कपाल आहेत. ह्या उलट महाराष्ट्रांत हा आंकडा ७५ ते ८० आहे. म्हणजे महाराष्ट्रांतील बहुसंख्य लोक मध्य कपाल आहेत.

गुजरातेत डोक्यांची लांबी व रुंदी अनुक्रमे १८० तें १८५ व १३५ ते १५० मिली-मिटर आहे व सापेक्षक कपालप्रमाणें ७५ तें ८३ भरते. सर्वच मापे महाराष्ट्राच्या जवळ आहेत हे स्पष्ट आहे. त्यातही विशेष गोष्ट म्हणजे एक पारशी वगळून दक्षिण गुजरातचें कपाल प्रमाण ८० च्या वर नाही. म्हणजे महाराष्ट्राच्या फारच जवळ आहे व जस-जसे उत्तर गुजरातेत जावे तस-तशी डोक्याची रुंदी वाढत जाते. तरीही महाराष्ट्राच्या मानाने गुजरातमध्ये रुंद डोक्याचे प्रमाण एकंदरीने जास्त दिसते.

डोक्याचा आकार व चेहऱ्याचा आकार ह्या बाबतीत महाराष्ट्र व उत्तर प्रदेश इतके भिन्न आहेत कीं, त्यांना युरोपिय वंशाच्या दोन निरनिराळ्या उपशाखांत घालावे लागेल. **महाराष्ट्र व गुजरात विशेषत: दक्षिण गुजरात एकमेकांना इतके जवळ आहेत कीं, कदाचित त्यांना एकाच शाखेत घालावे लागेल.**

महाराष्ट्र व गुजरातमध्ये एक फरक म्हणजे महाराष्ट्रांत डोके व चेहरा ह्यांच्या मापात निरनिराळ्या जातीत फार आंतर आहे. गुजरातेत ते तसे नाही. गुजरातेतील मानवता जास्त एकसंध आहे व महाराष्ट्रात निरनिराळ्या वंशाचे मिश्रण झालेले आहे. महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान व इतिहास लक्षात घेता यात नवल वाटण्याचे कांहीच कारण नाही. उलट इतके निरनिराळे मानव प्रकार एकत्र आणण्याचे कार्य ज्या संस्कृतीने केले तिच्या लोकसंग्रहाचे नवल वाटते.

दक्षिण हिंदुस्थानातही विशेषत: तामीळनाड, केरळ व तेंलंगण येथील लोक दीर्घ कपाल आहेत. कर्नाटकात महाराष्ट्राप्रमाणेंच मध्यम कपाल लोक बऱ्याच जमातीत आढळतात. आता महाराष्ट्रांतल्या

जमातींची एकमेकांशी तुलना करुन आतल्याआत कांही फरक आहे कां ते पहाणें सोईचे होईल.

पृ. क्र. १३६ ते १४२ वर निरनिराळ्या मराठी जातींची मुख्य मापे दिली आहेत. पहिले माप डोक्याच्या घेराचे आहे. त्यावरून मस्तकाचा लहान मोठेपणा आपणांस कळतो. ह्या मापावरुन मराठी समाजाची तीन गट पडतात. लहान डोक्याच्या जाती, मध्यम डोक्याच्या जाती व मोठ्या डोक्याच्या जाती.

१) अतिलहान डोकी :

घेर ५१८ – ५२५ मिलीमिटर.

भिल्ल, बावनें, महार, आंध्र, माना, ठाकूर, खुटेकर धनगर, मल्हार कोळी, परीट, वारली.

२) लहान डोकी :

घेर ५२६ – ५३२ मिलीमिटर.

आगरी, खैरे कुणबी, कोलाम, कोळी, कोरकू, कोहाळी, हाळबी, गोंड, गोवारी, तेली, ढीवर, चांभार, मांग, गुरव, बारी, न्हावी, इतर सोनार, शिंपी, साळी, वंजारी, हाटकर धनगर, भावसार व कांही मराठे.

३) मध्यम डोकी :

घेर ५३२ – ५३९ मिलीमिटर.

तिरोळे, बहुसंख्य मराठे, गुजर, धनोजे, पोवार, कायस्थप्रभू, पाठारे क्षत्रीय, वाडवळ, लेवा, फुलमाळी, चरक ब्राह्मण, बुरुड, देशस्थ, ऋग्वेद्री ब्राह्मण.

४) मोठी डोकी :

घेर ५३९ – ५४६ मिलीमिटर.

भंडारी, वैश्यवाणी, दैवज्ञ सोनार, सोनकोळी, हळवी कोष्टी, खत्री, त्वष्टाकासार, पाठारे, प्रभू, कऱ्हाडे, चित्पावन, सारस्वत.

वंशाने मराठी लोक मिश्र युरोपिय वंशाचे असून, मूळ दीर्घ मस्तक लोकांच्या वसतीस मध्यम रुंद डोक्याचे कोणी लोक येऊन हे मिश्रण झालेले आहे. मध्यम रुंद डोक्याचे लोक युरोपिय वंशाचेच असावेत असे दिसते. पण ते जर मध्य आशियाच्या पठारावरचे लोक असले तर त्यांत मोंगोल मिश्रण असण्याचा संभव आहे. रुंद तोंड, रुंद डोके व रक्ताच्या वर्गापैकी बऱ्याच प्रमाणात असलेले 'बी' जातीचे रक्त ह्या तीन गोष्टी मराठी जातीतही दिसून येतात. त्यावरून मोंगोल मिश्रणाची शंका येते. पण ह्या तीनही गोष्टी मोंगोल मिश्रणाशिवायही कांही मानववंशात आहेत. त्यावरून एवढेच म्हणता येईल कीं, वंशाचा प्रश्न सध्या मोंगोल मिश्रणापुरता अनिर्णीतच ठेवावा लागेल.

## भारतीय संस्कृतीचे तीन निर्माते :

१) भारतात संस्कृतोद्भव भाषा बोलणारे लोक ( आर्य )

२) द्रविड भाषा बोलणारे लोक ( द्रविड ) व

३) मुंडारी भाषा बोलणारे लोक (नागवंशी अथवा वन्य जाती)

हे भारतीय संस्कृतीचे मुख्य तीन निर्माते आहेत.

### द्रविड :

फार प्राचीन काळापासून मध्य आशियातील कॉकेशस पर्वताच्या आसपासच्या प्रदेशातून अनेक लोकांच्या टोळ्या हिंदुस्थानात आल्या आहेत. सुमारे ४००० वर्षापूर्वी आर्य या देशात आले, परंतु आर्यांच्याहि पूर्वी भारतात रानटी व वन्य लोकांची वस्ती होती. आर्यांच्या आगमनानंतर तत्कालीन भारतात आर्य, आर्य संस्कृतीचा स्विकार

करणारे आर्येतर, द्रविड व अनार्य असे चार ठळक समाज वास करीत असले पाहिजे. यापैकी रानटी लोकांच्या समाजास अनार्य हे नांव दिले जाते. अनार्यांना कुटुंबव्यवस्था माहित होती की नाही हे सांगणे कठीण आहे. द्रविड व आर्य लोकांच्या प्रसाराबरोबर त्यांनी दरी डोंगराचा आश्रय केला, एवढे मात्र खरे.

द्रविड लोक मात्र सुसंस्कृत होते. पूर्वकालिन द्रविड हे शिकारी वृत्तीचे असून त्यांच्यात मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती.

## आर्य :

आर्यांत पितृसत्ताक कुटुंबपद्धती रुढ होती. जमीन व गुरेढोरे ज्यांच्या त्यांच्या खाजगी मालकीची असत. आर्यांच्या शासनसंस्था, निर्वाहाची साधने व धर्मकल्पना द्रविडपेक्षा प्रगत होत्या.

आर्य हिंदुस्थानात आले तेव्हा देखील हिंदुस्थान हा सर्वस्वी रानटी लोकांचा देश नव्हता. आर्यांना आर्येतरावर आपले वर्चस्व प्रस्थापित करता आले हे मात्र निर्विवाद होय. आर्य मुख्यतः पशुपाल होते व त्यांचे प्रजाजन नांगराचे सहाय्याने शेती करीत.

**आर्य व द्रविड यांच्या कमी–अधिक संमिश्रणाने उत्पन्न झालेल्या राहणीस, विचारसरणीस, धर्मकल्पनास व संस्कृतीस 'हिंदू' हे नांव मिळालेले आहे.**

## नागलोक [ वन्य जाती ] :

आर्य आणि द्रविड यांचा उल्लेख आपण नेहमी करतो पण पूर्वेकडून आलेल्या ह्या तिसऱ्या भागीदाराला विसरून चालणार नाही. तो अतिप्राचिन काळात हिंदुस्थानात स्थायिक झाला असावा व आपल्या नकळत पूर्वेकडील दाराने हळहळू आंत शिरकत राहिला असावा, कारण त्याची भाषा आज महाराष्ट्राच्या मध्यावर जिवंत आहे.

पश्चिम-विंध्य व सातपुडा प्रदेशात भील्ल, गोंड, बैगा, कोळी वगैरे लोक हे जुन्या नागवंशाचे असावेत कारण त्यातील बरेच लोक आपला नागांशी संबंध सांगतात. तसेच छोटा नागपुरच्या प्रदेशातील मुंड लोक आपल्यास नागवंशी म्हणवतात.

द्रविडांचा जो प्राचीन इतिहास उपलब्ध आहे तो पराजितांचा नसून जेत्यांचा आहे. भारताच्या आग्नेय कोपऱ्यातील तामिळनाड हा विभाग पराभूत द्रविडांचा शेवटचा आसरा नसून त्यांचे भारतातील मूलस्थान असण्याचा संभव आहे. तेथून द्रविडांनी उत्तरेकडे व पश्चिमेकडे पाय पसरले. त्याच सुमारास आर्य वायव्येकडून दक्षिणेकडें व पूर्वेकडे सरकत होते. दोघांनीही परस्परांना न रेटता मधल्या नागमुंड खोडादी लोकांना रेटले व दोन वडया जमातीच्या कात्रीत सापडलेले हे वन्यलोक आज मध्य व दक्षिण भारतातील डोंगराळपट्टीचा आसरा करुन राहीलेले आढळतात.

# महाराष्ट्रांतील वसाहती :

महाराष्ट्राची वसाहत पूर्वेकडून पश्चिमेकडें किंवा पश्चिमेकडून पूर्वेकडे अशी एका दिशेनेच झाली नसून कमीत कमी दोन स्वतंत्र विभागात झाली असावी असे दिसते. ते विभाग म्हणजें अपरांत उर्फ कोंकण व विदर्भ हे पश्चिम व पूर्व सरहद्दीवरील प्रांत. महाराष्ट्राचा सांस्कृतिक गाभा जो गोदातीर तो पहिल्याने उत्तर महाराष्ट्रातूनच वसविलेला असला पाहिजें व तेथूनच सांस्कृतोद्भव भाषा येथे रुजली असली पाहिजे

अपरान्त ह्या नांवाशी निरनिराळ्या पौराणिक घटना व कथा निगडीत आहेत. अतिप्राचीन काळी पार्गिटरच्या कालगणनेप्रमाणे आयोध्येला राजा हरिश्चंद्र राज्य करीत होता त्यावेळी म्हणजें ख्रि. पू १६०० – १७०० च्या सुमारास अपरान्तांत संस्कृत बोलणाऱ्या आर्यांनी वस्ती केली असावी.

जसा अपरान्त त्याच प्रमाणें विदर्भही अतिप्राचीन आर्य (संस्कृत बोलणाऱ्यांची) वसाहत होती. विदर्भही आर्य आणि नाग किंवा मुंड लोकाच्या संस्कृती संगमाची भूमी होती. दोन्हीही वसाहती वन्यांच्या प्रदेशांत झाल्या. सुसंस्कृत द्रविडांशी लढा करुन नव्हे.

अपरान्त व विदर्भ असे महाराष्ट्राचे दोन पंख पहिल्यापासून संस्कृतोद्भव भाषा बोलणाऱ्याचे प्रदेश आहेत. (मराठी लोकांची संस्कृति)

## राष्ट्रीक आर्य :

दण्डकारण्य व महाराष्ट्र ही दोन्ही नावे एकाच प्रदेशाची आहेत, कांही काळ एकच प्रदेश दोन्ही नांवानी ओळखला जात असे.

आंध्र शातवाहनाचे राज्य इतिहासात निश्चित माहित असलेले महाराष्ट्रांतील पहिले एतद्देशीय राज्य होय. त्याचा अंमल इ. पू. ७३ ते इ. स. २१८ पर्यंत होता. या शातवाहन राज्यांच्या पदरी "महारठिनो गणकअिरो" (महाराष्ट्रीय विरांचा संघ) आपले कार्य करीत होता. त्याच काळी (इ. पू. १००) जुन्या मूर्तीवर खोदलेला शिलालेख पुण्याहून कोंकणकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या नाणे घाटातील एका लेण्यात "महाराथा ग्रणी-कोविरो" असा केलेला आहे. जवळच असलेल्या बेडसा येथील लेण्यांत एका राणीचा उल्लेख "महाराथिनो" असा आहे. भाजे कार्ले येथील लेण्यांतही वरीलप्रमाणें नांवे आढळतात.

शातवाहन काळी ही भूमी महाराष्ट्र या नांवाने ओळखली जात नव्हती व शातवाहन राजे स्वतःला महाराष्ट्रीय म्हणवीत नसत. प्रदेश व लोक याना अजून वेगळेपण या काळात प्राप्त झाले नव्हते. त्या नंतर राष्ट्रकुटांचे राज्य महाराष्ट्रांवर सव्वादोनशे वर्षे (इ. स. ७५० – ९७३) चालले होते. राष्ट्रकूट हे स्वतः रट्ट किंवा रठ्ठ म्हणवित. त्या नंतर (इ. स. १२६०) आलेले देवगिरीचे यादव हे इतिहासांत मराठे म्हणून ओळखले जातात, स्वतः मराठे या नावाने म्हणविणारे हे राज घराणें पहिलेच.

(राष्ट्रीक आर्यांची एक शाखा उत्तरेकडून येऊन गुजरात येथून महाराष्ट्रांत शिरली असावी. ते एका लहानशा कालखंडात आले नसून त्यांचे आक्रमण कित्येक शतके चाललेले असण्याचा संभव आहे. ह्या रट्टचापैकीच अगोदर आलेल्या शातवाहन राजे असावेत असे प्रस्तुतः विषय लेखकास वाटते.) ते सर्वांच्या आधी येऊन त्यांनी राज्य स्थापिले व मागाहून येणाऱ्याना टक्कर दिली. रठी महारठी लोक हे आर्वाचीन रेड्डी व मराठे ह्यांचे पूर्वज असावे असे वाटते. त्यांच्या मुख्य लढाया पश्चिमेकडील क्षत्रीयांशी व पूर्व-उत्तरेकडील कलिंग देशातील खारवेल ह्या राजांशी झाल्या. त्यांचे संबंधी राठ आणि महारठ अशी नांवे शिलालेखात येतात. ह्या राजांचे राज्य जरी प्रतिष्ठानी (पैठण) होतें तरी सर्व महत्वाचे शिलालेख पश्चिम पट्टीत आहेत, हे लक्षात

ठेवण्यासारखे आहे. शातवाहन हे राजाचे नांव ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून ते थेट सप्तशती हालापर्यंत आढळते. त्या काळचे शिलालेखावरून, ते राजे स्वत: यज्ञयाग करणारे वैदीक संस्कृतिचे अभिमानी होते असे दिसते. त्यांनी प्राकृत भाषेला उत्तेजन दिले व पर्यायाने मराठीच्या जन्माला मदत केली.

राष्ट्रीकांनी दक्षिणेत दण्डकारण्यांत येऊन वसाहत केली, हे अनुमान राजवाडे यांनी ग्राम नामांच्या व्युत्पत्तीवरून काढले आहे. दण्डकारण्य वसाहत तेथें जंगल असल्याने सर्वात शेवटी झाली. त्याच्या आधी आजूबाजूस सुपिक, सपाट व प्रवेश सुलभ प्रदेशांत ( अपरान्त व विदर्भ ) वसाहतीं झाल्या. (मराठी लोकांची संस्कृति)

राष्ट्रीक आर्यांनी दक्षिणेत वसाहत केली. त्यांच्या देशांतराचे कारण लोकसंख्येंची दाटी, दुष्काळ किंवा शत्रूचा रेटा हे नसून वैदिक धर्माविषयी बौद्धाचे व जैनांचे पाखंड हे होय. या पाखंडयांना उत्तरेत राजाश्रय होता.

उपयुक्त समालोचनांतून पुढील ढोबळ निष्कर्ष निघतात. [१]

१. बौद्ध व जैन धर्माच्या उदयामुळे होणारा वर्णसंकर टाळण्यासाठी उत्तरेतील हिंदूनी रट्टांच्या नेतृत्वाखाली दक्षिणेत येऊन वसाहत केली.

२. **रट्ट किंवा राष्ट्रीक हे आपणांस महारट्ट किंवा महाराष्ट्रीक म्हणवीत.**

३. ते महाराष्ट्रीय भाषा बोलू लागले व त्यांतूनच मराठीचा उदय झाला.

४. मराठी भाषेचा उदय शकोत्तर कालातील असला तरी ते वसाहत काळापासून आपली वेगळी महाराष्ट्रीय भाषा बोलत व राष्ट्रीकांचा वसाहतकाळ हा सामान्यत: शकपूर्व ४००–५०० वर्षातील असला पाहिजे. हा समाज चातुर्वर्ण्याधिष्ठीत असे.

महाराष्ट्रीय समाज हा इतर समाजाहून वेगळा असा वसाहतकाळी निर्माण झाला असावा. मराठे लोकांचे वैशिष्ठ्य वर्णन करणारा उल्लेख इ. सनाच्या सातव्या शतकांत युवानच्वांगच्या लेखांत आढळून आला, हे खरे असले तरी **महाराष्ट्राची अत्रुटित परंपरा यादव काळी निर्माण झाली.** बहामणी कालांत तिला ग्रहण लागले. शिवकालांत पुन्हा ती आपल्या तेजाने चमकली.

( महाराष्ट्र जीवन खंड १. – गं. बा. सरदार )


उत्तरे कडून महाराष्ट्रात आलेले निरनिराळे मार्ग व दक्षिणेतील महत्त्वाची शहरे.
रावळपिंडी
दिल्ली
कोटा
अयोध्या
अलाहाबाद
मारवाड
गुजराथ
जबलपूर
कलकत्ता
बिलासपूर
तापी नदी
गोंदीया
संबळपूर
दमण
नाशिक
नागपूर
कटक
औरंगाबाद
मुंबई
जुन्नर
लातूर
उस्मानाबाद
पुणे
सोलापूर
सातारा
वरंगळ
सांगली
बिदर
कोल्हापूर
हैदराबाद
गुलबर्गा
विजापूर
होसपेठ
गोवा
बेळगाव
बल्लारी
धारवाड
कारवार
चित्रदुर्ग
सिमोगा
मद्रास
बंगलोर
म्हैसूर
सालेम
त्रिचनापल्ली
तंजावर
त्रिवेंद्रम
सिलोन
हिंदी महासागर
बंगालचा उपसागर
आंध्र प्रदेश
अरबी समुद्र
सूची
नदी
महत्त्वाची शहरे
मार्ग

# दक्षिणेतील राजे –

शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट व यादव ह्या घराण्यानी महाराष्ट्रांवर एकामागून एक राज्य केले.

शातवाहन हे सर्व महाराष्ट्राचे पहिले राजे. दक्षिणेंत सहाव्या शतकात चालुक्यांचा उदय झाला. आठव्या शतकात राष्ट्रकूट पुढें आले. दहाव्या शतकात चालुक्यानी आपले राज्य स्थापन केले. बाराव्या शतकात यादव, होयसळ हे उदयास आले व चौदाव्या शतकाच्या प्रारंभापासून जी मुसलमानी अंमलास सुरूवात झाली त्याचा आठराव्या शतकात शेवट झाला.

## शातवाहन राजे :

शातवाहन राजाच्या जवळ जवळ पांचशे वर्षाच्या अंमलामध्ये ( इ. स. पू. ७३ ते इ. स. ४२५ ) त्यांची सर्वात मोठी युद्धें उत्तरेककडून पश्चिम किनाऱ्याने खाली सरकणाऱ्या क्षहरात व क्षत्रप ह्यांशी झाली.

खारवेलच्या हाथीगुंफा येथील शिलालेखात शातवाहन राजांना अपरांताधिपती असे विशेषण लावलेले आढळते. शातवाहनचे राज्य पूर्व किनाऱ्यावरील अमरावतीपासून अपरान्तापर्यंत पसरलेले होतें. ते सर्वाच्या आधी येऊन त्यांनी राज्य स्थापिले व मागाहून येणाऱ्यांना टक्कर दिली. शातवाहन काल महाराष्ट्राच्या एकीकरणाचा व सीमा निश्चितीचा काळ होता आणि त्यांच्या उत्तरेकडच्या लढायामुळे आजच्या महाराष्ट्राचे स्वरुप कायम झाले.

शातवाहनामागून त्यांचे मांडलीक शक, अभीर व इश्वाकू ह्यांचे ताब्यात पश्चिम व उत्तर महाराष्ट्र गेला. इ. स. ३०० च्या पुढे पश्चिम महाराष्ट्रातील त्रिकूट ह्या स्थानापासून त्रैकूटक नांव घेतलेल्या राजवंशानें आपले राज्य उत्तर कोंकण व लाट या प्रदेशांत स्थापिले. त्रिकूट हे जुन्नरच्या आसपास असावे असा तर्क आहे.

## राष्ट्रकूट राज घराणी :

राष्ट्रकूट हा शब्द राष्ट्रीक उर्फ रट्ट यांचा कूट म्हणजे संघ या अर्थाने उत्पन्न झाला असावा. कारण महाराष्ट्रात या रट्टांची लहान लहान राज्ये पूर्वीपासून होती तीच पुढे एकत्र येऊन एक मोठे राज्य झाले असावे.

राष्ट्रकूटांचे राज्य महाराष्ट्रांवर सव्वादोनशें वर्षे (इ. स. ७५० – ९८२) चालले होते. राष्ट्रकूट हे यादव कुळातील होत, असे मानतात. **ते स्वतःस रठ्ठ किंवा रट्ट म्हणवित.** या घराण्याचा मूळ पुरुष दंतीवर्मा पहिला हा होय. दंतीदुर्ग उर्फ दंतीवर्मा दुसरा फार शूर होता. त्यावेळेचा पश्चिम चालुक्य राजा किर्तीवर्मा यास जिंकून त्याने चालुक्य साम्राज्य शेवटास नेले (इ. स. ७५०) व सर्व महाराष्ट्र आपल्या अमलाखाली आणला. याने **नाशिककडे मयूरखंडी ही आपली राजधानी** केली.

दंतीदुर्गानंतर कृष्ण पहिला "हा अकालवर्षे वल्लभ शुभतुंग" हे बिरुद धारण करून गादीवर बसला (इ. स. ७५६) याने चालुक्यांना अगदी नामशेष केले. वेरुळ येथील कैलास नांवाचे अप्रतिम लेणे यानेच कोरविले.

गोविंद तिसरा हा राष्ट्रकूट वंशात सर्वांत शूर व प्रख्यात राजा झाला (८०३) याने गुजरातच्या राष्ट्रकूट घराण्याकडून गुजराथ घेऊन वल्लभी राजाच्या गोध्रा प्रांतापर्यंत आपली हद्द सरकवली. त्याचा धाकटा भाऊ इंद्र तिसरा याने अनहिलवाडच्या चावडापासून **लाट देश**

जिकून तेथे राष्ट्रकूट घराण्याची एक स्वतंत्र शाखा स्थापन केली. ( इ. स. ८१० ) हा लाट देश म्हणजे महि व तापी – दुआब होय.

पहिला अमोघ वर्ष इ. स. ८१५ मध्ये गादीवर आला. त्याने मयूरखंडी ऐवजी मान्यखेट (निजाम राज्यातील मलखेड जी. गुलबर्गा) ही नवीन राजधानी स्थापीली. तो फार मोठा राजा होऊन गेला. अमोघवर्ष याचेवर जिनसेन नांवाच्या जैन साधूची छाप पडून त्याने जैनधर्माचा स्विकार केला. जैनधर्मास त्याने पाठिंबा दिल्याने त्या धर्माचा महाराष्ट्रांत प्रसार झाला. अमोघवर्माची कारकिर्द ६२ वर्षाची झाली (इ.स. ८१५-८७७).

अमोघवर्ष याचा पुत्र कृष्ण दुसरा उर्फ अकालवर्ष हा राजा असता धारवाड व सौदन्ती वगैरे भागात जैनानी मंदिरे बांधली ( इ. स. ९११ ). राष्ट्रकूट राजे त्यावेळच्या राजात अतिप्रभावशाली राजे होते. त्यांच्या आश्रयाने जैन धर्माची चांगलीच भरभराट झाली. अमोघवर्ष हा राजा दिगंबर जैन धर्माचा भक्त होता. याने जैन मंदिरास खूप दान दिले व जैन साहित्याचेही याच वेळी चांगली भरभराट झाली. याने स्वत: "प्रश्नोत्तर रत्नमालीका" या ग्रंथाची रचना केली. राष्ट्रकूट राजांची सुसंरक्षीत राजधानी प्रसिद्ध मान्यखेट नगर हे जैनाचे एक चांगले केंद्रस्थान बनले होते. राष्ट्रकूटा नंतर राज्यकारभार पश्चिमीय चालुक्यांचा हातात गेला. त्यावेळी जैन धर्माचा प्रभाव नष्ट झालेला होता.

राष्ट्रकुटांचा इ स. ९८२ पाडाव झाल्यावर महाराष्ट्राची शकले झाली. कोंकण प्रांतात शिलाहारांची दोन राज्ये स्वतंत्र झाली. एक उत्तर कोंकणचे ठाणे (स्थानक) मुक्कामी व दुसरे दक्षिण कोंकणचे रत्नागिरी येथे. या खेरीज शिलाहाराची तिसरी शाखा कऱ्हाड [ कऱ्हाटक ] येथे स्थापन झाली.

# इतर राष्ट्रकूट घराणी :

## मूलताईकडील राष्ट्रकूट :

या भागात दुर्गराज, गोविंदराज, स्वामीकराज व नंदराज युद्धासूर (७०९) या राजांची नांवे आढळतात. यांचा संबंध मान्यखेडच्या मूळ घराण्याशी कितपत होता हे समजत नाही.

## लाटचे राष्ट्रकूट :

लाट देशात तिसऱ्या इंद्राने राज्य स्थापिले. त्याला कर्क दुसरा उर्फ सुवर्णवर्ष ( ८१२ ) आणि गोविंद चौथा उर्फ प्रभूतवर्ष दुसरा (८२७) ही दोन मुले होती. त्यांनी त्यांच्या मागे अनुक्रमे राज्य केले.

## गुजरातचे राष्ट्रकूट :

इ. स. ९७३ च्या एका अंकीत लेखावरून हस्तीकुंडी येथे एक लहानसे राष्ट्रकूट घराणे होते व त्यांत हरीवर्मण विद्ग्ध ( ९१६ ), मम्मट ( ९३९ ), दावल (९९७) व वालप्रसाद हे राजे झाले असे आढळते.

या खेरीज राजपुताण्यांत जी राठोडवंशी राजघराणी आहेत ती या महाराष्ट्रांतील राष्ट्रकूट वंशापैकीच होत असे म्हणतात. चालुक्यानी मान्यखेडचे साम्राज्य बुडविल्यावर त्या राजघराण्यातील पुरुषांनी राजपुताण्यात लहान लहान राज्य स्थापिली.

## रट्ट घराणी :

मुंबई इलाख्यातील कानडी जिल्ह्यातील शिलालेखामध्ये रट्ट महामंडलेश्वर यांचा उल्लेख फार वेळा येतो. यांची राजधानी प्रथम बेळगांव जिल्ह्यातील सौदत्ती ही होती या शहरास त्यावेळी सुगंधरवार्ते

असे नांव होते. नंतर हल्लीचें बेळगाव येथेच राजधानी वसून त्यांस वेणूग्राम अथवा वेलूग्राम असे म्हणत. ते चालूक्य राष्ट्रकूट राजांचे मांडलिक असून नंतर स्वतंत्र झाले. त्यांचे राज्य "तीन हजार कहुंडी" या प्रांतावर पसरले होते व ते सांप्रदच्या बेळगांव व कलादगी भागात होतें. त्यांनी साडेतीन शतके राज्य केले. या घराण्याचा संस्थापक मेरडचा पुत्र पृथ्वीराम हा मैळापतिर्थ साधूच्या करीम पंथाचा एक उपदेशक होता. बाराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास चालुक्य राज्य नष्ट झाल्यावर यांनी कांही काळ स्वातंत्र्य धारण केले. पुढे देवगिरीकर यादवांनी यांना मांडलिक केले. हे जैन धर्मी होते. यांच्या कालचे दानलेख (८७५) ते (१२२८) यामधील काळातले सांपडतात. या रट्टांची सौदन्ती येथें दुसरी शाखा होती. (९०८).

( महाराष्ट्रीय ज्ञानकोष (र) १२ )

## यादव घराणी :

यादव मुळचे मथुरेचे राहाणारे असून, त्यांची कित्येक घराणी प्राचीन काळी केंव्हा तरी गुजराथेत व महाराष्ट्रांत आली. हेमाद्रीच्या व्रतखंडात ह्या घराण्याची हकीकत दिलेली आहे. यादवांचेच वंशज जाधव होत.

यादवांचे दोन वंश प्रसिद्ध आहेत. **एक नासिकजवळ चंद्रादित्य पूर उर्फ चांदवड येथे राज्य करीत होता** आणि **दुसरा देवगिरी उर्फ दौलताबाद** येथे होऊन गेला.

पहिल्या वंशाची राजधानी श्रीनगर (सिन्नर) ही सेउण देशांत होती. सुवाहु नांवाचा एक पराक्रमी यादव राजा उत्तर हिंदूस्थानात झाला त्याचा मुलगा दृढप्रहार ( सुमारे इ. स. ७९५ ) ह्याने प्रथम महाराष्ट्रांत प्रवेश करून आपले राज्यें स्थापिले. दृढप्रहाराचा मुलगा सेउणचंद्र ह्याने सेउणपूर शहर स्थापून देशातेहि नांव सेउण देश असे ठेवले. हे खानदेशाचे मुसलमान येण्याच्या पूर्वीचे नांव होय. यादवांच्या ह्या पहिल्या वंशाने ७९५ सालापासून ११९१ पर्यंत ३९६ वर्षे राज्य

केले. यांच्यात दृढप्रहारापासून पांचव्या भिल्लमापर्यंत तेवीस राजांचे नांवे आढळतात.

पांचव्या भिल्लमाने सोमेश्वर चालुक्याचे मांडलिकत्व झुगारून दिले व द्वारसमुद्राच्या वीर बल्लाळ यादवाचाही पराभव करून देवगिरी येथें स्वतंत्र्य सत्ता स्थापन केली. ( इ. स. ११८७-९१ ). देवगिरी शहरही त्यानेच स्थापिले. याच भिल्लमाचा वंश महाराष्ट्रांत पुढे साम्राज्य सत्ताधारी झाला. इतिहासात मराठे म्हणून ओळखले जाणारे देवगिरीचे यादव हे पहिलेच राजे होत.

इ. स. ( १२६०-७१ ) कृष्णदेव राजाचा धाकटा भाऊ याने तेलंगण, गुजराथ व कोंकणात स्वाऱ्या केल्या. याने ठाणे येथील सोमेश्वर शिलाहार राजास मारून उत्तर कोंकण आपल्या राज्यास जोडले. या वेळची लढाई दर्यावर झाली.

रामदेव (१२७१-१३०९) हा कृष्णाचा मुलगा व शंकरदेव ( १३०९-१२ ) हा रामदेव रायाचा पुत्र. हे दोन शेवटचे राजे. रामदेवरावांच्या कारकिर्दीत इ. स. १२९४ साली दिल्लीचा सुलतान आल्लाउद्दीन खिलजी याने देवगिरीवर स्वारी केली व त्या नंतर त्याचा सेनापति मलिकफूर याने इ. स. १३०७ व १३०९ साली आणखी दोन स्वाऱ्या करून रामदेवरावाचा पराभव केला. इ. स. १३१८ त आल्लाउद्दीनचा मुलगा मुबारक याने देवगिरीच्या राजाचा शेवट केला.

## यादवकाळी - महाराष्ट्राची अत्रुटित परंपरा :

यादव पूर्व काळातील महाराष्ट्रीय संस्कृतिचा विकास अत्रुटित असा सांपडत नाही. येथून पुढील काळात मराठीं भाषेचा विकास सातत्याने सांपडतो व मराठे हे उत्तरेस वऱ्हाडपासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत व पश्चिमेस कोंकणपासून पूर्वेस गोदावरीकांठच्या आंध्र देशापर्यंतच्या प्रदेशांत सांस्कृतिक व एकसंघी राहिलेले असे

आढळून येतात. त्यांचे सणवार, चालीरीती, संतपरंपरा ही सर्व वऱ्हंशी एकच आहेत, असे पहावयास मिळते. म्हणून यादव काळापासून महाराष्ट्राच्या इतिहासाचा नवा कालखंड सुरू होतो. अस्पष्ट व त्रुटित हकीकतींचा शेवट होऊन एकसंधी समाजाची स्थित्यंतरे येथून पुढे अधिक तपशिलानें पहावयास मिळतात.

( श्री. रा. वि. ओतुरकर – महाराष्ट्र जीवन खंड- १. पृष्ट- ७९ )

++++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++

## अल्लाउद्दीन खिलजीची दक्षिणेत स्वारी :

मुसलमान लोक हिंदुस्थानात येऊन तीनशे वर्षे झाली होती. या अवधीत त्यांनी उत्तर हिंदुस्थान काबीज केले. दक्षिण हिंदुस्थानाकडे त्यांची दृष्टी ह्यावेळेंपर्यंत गेली नाही. त्याकाळी दक्षिणेत जाण्याचे काम मोठे दुर्घट होते. यादवाच्या देवगडांस जाण्याचा रस्ता बिकट जंगलातून व अपरिचित मुलखातून होता. नाना प्रकारच्या रानटी लोकांची रस्त्यात वस्ती होती. अशा परिस्थितीमध्यें अल्लाउद्दीने दक्षिणेत (सन १२९३) प्रथम प्रवेश केला व देवगिरीवर स्वारी केलीं. यादवाचा पराभव करून त्यांना आपल्या अंकीत केले. या वेळेपासूनच मुसलमान आक्रमणाची दक्षिणेत सुरूवात झाली.

## बहामनी राज्य :

यादवाच्या राज्याचा अंत झाल्यावर थोडयाच वर्षांनी दिल्लीच्या बादशहाचे दक्षिणेतील अधिकारी बंडखोरीने स्वतंत्र राज्य करू लागले. बादशहा तुघलुकाच्या वेळी त्याच्याच एका सरदाराने हसनगंगू बहामनी याने गुलबर्गा येथे नविन राज्याची स्थापना केली. (इ. स. १३४७).

यादवाच्या मागून महाराष्ट्रात प्रबळ राज्य हेच झाले. विजयनगरचे हिंदुराज्य मात्र ह्याच्या जोडीचे होते. या राज्याचा विस्तार मुख्यत: सर्व महाराष्ट्र देश व्यापून होता. उत्तरेस नर्मदा नदी, पश्चिमेस सह्याद्री पर्वत, दक्षिणेस कृष्णा नदी व पूर्वेस तेलंगणचे राज्य व गोंडवणाचे रान अशा त्याच्या मर्यादा होत्या.

माळवा व खानदेश हे बहामनी राज्याच्या सरहद्दीवर असून या राज्याला प्रथम समुद्र किनारा नव्हता. परंतु पुढे दुसऱ्या महंमुद शहाच्या काळांत (इ. स. १४६२–१४८२) दाभोळ-चौलचे कोंकण बहामनी सत्तेखाली आले. तसेच जुन्नर, चाकण, कोल्हापूर, वाई वगैरे प्रांतही त्यांच्या राज्यात समावले गेले. इ. स. १४५३ पासून १४८० पर्यंत बहामनी राज्याचे लष्करी ठाणे वाईस होते.

प्रसिद्ध वजीर महमदगवान मरण पावल्यावर बहामनी सत्ता कमकुवत होऊन खिळखिळे झालेल्या राज्याचे पांच तुकडें पडले. (इ. स. १४८५). ते असे १) वऱ्हाडची इमादशाही २) विजापूरची आदींलशाही ३) अहमदनगरची निजामशाही ४) गोवळकोंडयाची कुत्बूशाही ५) बेदरची बरीदशाही. या पैकी वऱ्हाडची इमादशाही, अहमदनगरची निजामशाही व विजापूरची आदीलशाही यांचा महाराष्ट्राच्या इतिहासाशी घनिष्ठ संबंध होता आणि बेदरच्या बरीदशाहीच्या ताब्यात महाराष्ट्राचा मराठवाडयातील कांही भाग होता.

## मुसलमानी आक्रमणाचे परिणाम :

मुस्लीम आक्रमण प्रारंभी वरवरचे असल्यामुळे त्याचे परिणाम पहिल्या एकदीड शतकांत फारसे झाले नाहीत. पुढे मात्र मुसलमानी अंमल अधिकाअधिक दृढ होत गेला आणि त्याचे परिणाम सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रांत भासमान होऊ लागले.

हाणामारी, लुटालूट, जाळपोळ, देवस्थान – मठाधिकांचा व पोथ्यापुस्तकांचा विध्वंस इत्यादी अत्याचाराचे प्रकार इ. स. च्या पंधराव्या शतकात व सोळाव्याच्या पूर्वार्धात विशेष करून झाले. मराठी प्रदेशात इ. स. १४५० पूर्वीचे बांधकाम व शिल्प थोडेसे शिल्लक आहे, पोथ्यापुस्तकेही याच्या पूर्वीच्या काळातील आढळत नाहीत.

मुसलमानी सवगोलंकाराचा प्रतिकार करावयाचा तर आपल्या धर्मातले कार्यकांड आणि वर्णजाती निर्बंध अधिक कडक केले पाहिजेत

अशी विचारसरणी समाजात निर्माण झाली. या सनातन विचारसरणीं मुळे हिंदू समाजात जाती भेद निर्माण होण्यास खतपाणी मिळाले.

या मुसलमानी आक्रमणाचा परिपाक म्हणजे पश्चिम महाराष्ट्रांत सतराव्या शतकात स्वराज्याची स्थापना झाली, हा होय. या स्वराज्य स्थापनेमुळेच पश्चिम महाराष्ट्रांत मुसल्मानाचे आक्रमणास पायबंद बसला. यामुळे पश्चिम महाराष्ट्रांत महाराष्ट्र धर्माची जोपासना झाली व हिंदु संस्कृतिचे संरक्षण झाले. मुसलमानी संस्कृतिचा प्रभाव विशेष करून मराठवाड्यांत व दक्षिणेतील इतर भागात दिसतो तसा पश्चिम महाराष्ट्रांत दिसत नाही याचे प्रमुख कारण म्हणजे तेथील मराठ्यांचे स्वराज्य हे होय. या स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्याविषयी कविभूषण यांचे 'शिवबावन्नी' मधील एक-दोहा-सर्व कांही सांगून जातो. तो असा –

काशी जी की कला जाती<br>
मथुरा मसीत होती<br>
एक शिवाजी ना होता<br>
तो सुन्ता होती सबकी

औरंगजेब, हैदरअल्ली व टिपू सूलतान या तीन मुसलमान राज्यकर्त्यांनी अनेक हिंदूना जुलूम जबरदस्तीने मुसलमान धर्म स्विकारावयास भाग पाडले. यांच्या अंमलाखाली जो मराठी मूलूख होता. तेथील बहुसंख्य हिंदू खाटिकांना धर्मांतर करण्यास त्यांनी सक्तीने भाग पाडले हा कटू इतिहास आहे.

# महाराष्ट्रातील भाषा, ग्रामसंस्था, दैवते व दुष्काळ –

## महाराष्ट्रातील भाषा :

मानवी संस्कृतीचा साकल्याने विचार केल्यास भाषेइतके प्राचीनतम दुसरे कांहीही नाही, असे आढळून येईल. मानवाने संपादन केलेली पहिली कला वाणीची. पाषाण युगातील गारगोटयांची दगडी हत्यारेही मागाहूनची. मानवेतीहासाची सुरूवात भाषेपासून होते. बाकी सर्व मागाहूनचे.

अपरान्ताची वसाहत संस्कृत भाषिकांनी जरी प्राचीन काळी केली व तिथें महाराष्ट्राचे महत्वाचे शिलालेख सांपडले तरी मराठी भाषेच्या दृष्टीनें हा प्रदेश मागासलेला राहीला. कोंकणी भाषेत ग्रंथ निष्पत्ती झाली नाही, त्याचे कारण म्हणजे कोंकणातील वस्ती उत्तरेकडील घडामोडीचे दृष्टीने जरा आडमार्गावर पडली. कोंकणीतील मुख्य महत्व म्हणजे भारतातील संस्कृतोद्भव भाषापैकी ती सर्वात दक्षिणेकडची भाषा आहे. मराठीपेक्षा ती गुजरातीला जास्त जवळची आहे. असे डॉ. कुर्वे यांचे मत आहे.

संबंध कोंकणपट्टीत खालील भाषा आढळतात. **लाट देशांत (सुरत जिल्हा) गुजराती व मराठी**, कोंकणात मराठी कोंकणी, मालवण ते मंगळूर सारस्वत कोंकणी, मंगळूर ते कालीकत तुळू व पुढे जवळ

जवळ कन्याकुमारीपर्यंत मल्याळी आणि कन्याकुमारीच्या टोकांशी तामीळ. तुळू भाषा कानडीच्या जवळची पण कानडी इतकी प्रगल्भ नाही. व त्यामध्यें वाङ्मयही नाही. ( मराठी लोकांची संस्कृति )

प्राचीन काळी लाट देशात लाठी नांवाची भाषा होती[१]

तीचे पुढे गुजराथीत रुपांतर झाले. लाठी भाषा गुजराती, मराठी तसेच मराठी कोंकणीच्या अगदीं जवळची असावी. आजही लाट देशात गुजराती व मराठी भाषा अस्तित्वात आहेत व गुजराती, मराठी व मराठो कोंकणी या संस्कृतोद्भव भाषा असून त्या एकमेकाच्या अगदी जवळच्या आहेत. आजही मराठवाडा व कर्नाटक येथील सावजी लाट जी भाषा बोलतात, तीस 'लाडाळू' भाषा म्हणतात व तीत हिंदी, मराठी व गुजराथी शब्दाचे मिश्रण असतें. या भाषेस "चौरासी" भाषा असे ही म्हणतात. ( १ महाराष्ट्रीय ज्ञानकोष - ल)

मराठी भाषेचा उदय शकोत्तर काळातील असला तरी रट्ट किंवा राष्ट्रीक हे वसाहत काळापासून आपली वेगळी महाराष्ट्री भाषा बोलत, पुढे यादवांच्या राज्यात मराठी राजभाषा म्हणून मिरवली व संताची भाषा म्हणून ती सर्व लोकांच्या तोंडात खेळली. आज ती संपूर्ण महाराष्ट्राची राजभाषा आहे.

## महाराष्ट्रातील जुनी ग्राम संस्था व राज्य संस्था :

पूर्वी गाव हा एक स्वतंत्रच राष्ट्राचा घटक असे. त्याचा अंतर्गत कारभार गांवकऱ्याकडेंच सर्व असे. त्याचा वरच्या देशव्यवस्थेशी फारच थोडा संबंध येई. त्यामुळे वर कांहीही उलथा-पालथ होवो, ग्राम संस्थेंला तिची विशेष झळ लागत नसे. तिचा कारभार अवाधित चालूच राही. राज्यकर्त्यांना ठराविक सारा पोंचविला म्हणजे झाले.

सामान्यत: प्रत्येक गांवाला बारा बलुतेदार, व बारा आलुतेदार गांवाच्या एकंदर योगक्षेमासाठी असत. यांच्या विशिष्ट हक्कांना आलुती, बलुती म्हणत. वलुतेदार हा आलुतेदारापेक्षा वरच्या दर्जाचा कामगार असे.

१) लोहार, २) सुतार, ३) महार, ४) मांग, ५) कुंभार, ६) चांभार, ७) परीट, ८) न्हावी, ९) भट, १०) गुरव, ११) मुलाणा व कोळी असे बारा बलुतेदार असत.

बारा आलुतेदारांत : १) तेली, २) तांबोळी, ३) साळी, ४) माळी. ५) जंगम, ६) कळवंत, ७) डोऱ्या, ८) ठाकर, ९) घडशी १०) तराळ, ११) सोनार व १२) चौगला हे येत.

या आलुतेदारांना व बलुतेदारांनाही त्यांच्या हक्काबद्दल धान्य देण्याची वहिवाट असे.

प्रत्येक गांव आपल्या हद्दीत लहानसे प्रजासत्ताक राज्यच असे. अशा प्रकारची ही ग्रामसंस्था कधी व कोणी अंमलांत आणली हे सांगणे कठीण आहे. आर्य राज्यकर्त्यांची ही ग्रामसंस्था पुष्कळच महत्वाची समजली पाहिजे.

ग्राम संस्था नीट चालण्यासाठी धंदेवाईक लोकांना प्रथम वतनें देण्याची वहिवाट पडली. आपला धंदा व त्याचे उत्पन्न आपल्या मुलांकडे, नातवाकड चालेल अशी शाश्वती कामगाराला वाटेल तर त्याचे लक्ष कामात नीट लागेल व कामगार नीट व्यवस्थीत काम करीत राहीला तर शासन संस्थेलाही ते हिताचे होते. वडिलापासून मुलाला घरच्या घरीच धद्याचे ज्ञान मिळून तो धंदा एका घराण्यात वंशपरंपरा चाले. एकाच धंद्याच्या अनेक कुटुंबाचे मिळून कालांतराने जात बनली गेली व वर्णव्यवस्था उत्पन्न झाली. **व्यवसाय जातीबद्ध झाल्यावर जातीधर्म पाळण्यावर लोकांचा कटाक्ष सुरू झाला व जाती-जातीतून भेद पडत गेले.** रोटीबटी व्यवहार अन्य जातीशी होईनात, व्यावसायीक जातीत पुन्हा पोट जात पडल्या.

गांवगाड्याचे (ग्रामसंस्थेचे) पूर्णत्वास गेलेले स्वरुप मध्यमहाराष्ट्रात जसे सांपडते तसे उत्तर महाराष्ट्रात किंवा पश्चिम महाराष्ट्रात सांपडत नाही. कोंकणात तर ग्राम सस्थचे स्वरुप देशापेक्षा निराळे आहे. एवढेच काय तर गावडे उर्फ गांवठाण म्हणून निराळी वास्तू सर्वत्र आढळत नाही. (मराठी लोकांची संस्कृति)

## मराठी दैवते :

जाती संस्थेमुळे समाजाला जरी विस्कळीतपणा आला असला तरी महाराष्ट्राच्या सुदैवाने अजून मराठी वाङमय, मराठी संत व मराठी दैवते सर्वांची आहेत. महाराष्ट्राची कुलदैवते नासीकचा रामराया, पंढरीचा विठोबा, तुळजापूरची भवानीदेवी व जेजूरीचा खंडोबा ही सर्व मध्य महाराष्ट्रात आहेत. कोंकण, खानदेश आणि वऱ्हाड येथील हजारो यात्रेकरुंनी मध्य महाराष्ट्रांतील संताची वाङमय निर्मिती आपापल्या गांवापर्यंत नेऊन भिडविली आहे.

मुख्यत्वे शिव व देवी ही महाराष्ट्राची मूळपासूनची व रंका पासून ते रावा पर्यंतची दैवते आहेत. त्यांच्याच पोटी कार्तिकेय–स्कंदाचे स्वरुप खंडोबा ह्याचा व गणपतीचा उदय झाला. महाराष्ट्रातील सर्व जातीचे लोक खंडोबाची उपासना करतात तसेच गणपतीची पूजा करतात. ( मराठी लोकांची संकृति )

## खंडोबा :

एक आर्वाचीन ज्ञाती विशिष्ठ देवता, खंडोबा उर्फ मल्हारी मार्तंड किंवा मार्तंड भैरव हा बहुदा सर्व देशस्थांचा कुलस्वामी असतो.

दक्षिणेत जेजुरीस याचे प्रसिद्ध स्थान आहे. याचे महात्म्य जयाद्री महात्म्यात वर्णीले आहे. देशस्थाप्रमाणे रामोशी, धनगर हे खंडोबाचे उपासक असतात.

खंडोबा देवरुपास येण्यापूर्वी लिंगायत वाणी होता असे रामोशी समजतात. त्याला दोन बायका होत्या. एक वाणी व दुसरी धनगर जातीची असून, ह्या समवेत तो घोड्यावर बसलेला असतो. हातात तलवार असते. वनस्पती वर्गात भंडारात खंडोबाचे अस्तित्व आहे असे समजून भंडार पवित्र मानण्यात येतो. रामोशी तर भंडाराची शपथ वहातात. प्राणी वर्गात कुत्र्याच्या रुपात खंडोबा वास करीतो असें मानतात. घरातून खंडोबाच्या धातूच्या मूर्ती असतात.

हेमचंद्र हरस्कंदो या संस्कृत द्विवचनाचे हरखंडा असे प्राकृत रुप होते. खंडा हे अनेक वचन आहे. प्राकृतात प्रायः द्विवचन नाही. तात्पर्य स्कंद या संस्कृत शब्दाचे प्राकृतरुप खंड असे होते. त्याचे ममता दर्शक रुप खंडू व प्राशस्त्यदर्शक मराठी रुप खंडोबा. म्हणजे महाराष्ट्रांत जेंजूरी, पाली वगैरे ठिकाणचे जे खंडोबा आहेत ते मुळचे स्कंद होय. स्कंद म्हणजे कार्तिक स्वामी. स्कंद ही देवता विरांची व योध्याची फार पूर्वीपासून आहे. स्कंदाला सेनानी हे अपरनाम आहे. त्याची उपासना वीर करतात.

**महाराष्ट्रातील सर्व जातीचे मराठे** ( ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, रामोशी वगैरे ) **खंडोबा हे आपले कुलदैवत कां समजतात हे वरील विवेचनांवरून समजणार आहे.** खंडोबा शिवदैवत आहे, असे कित्येक समजतात, ते अर्थात निराधार आहे. स्कंद पुराणात स्कंदोपासकांची म्हणजे खंडोबाच्या उपासकांची माहिती सांपडते.

( भारत इ. संशोधक मंडळ - १८३२ )

खंडोबास 'मल्हारी मार्तंड' म्हणतात. मल्हारी म्हणजे मलह (राक्षस) रुपी आरी ( क्षूत्रू ) चा नाश करणारा मार्तंड म्हणज 'सूर्य' होय.

## पंढरीचा विठोबा :

भीमेच्या तिरावर पंढरपूर नि पंढरपूरात विठोबाचे देऊळ आहे. महाराष्ट्राच्या अध्यात्माची ही सर्वश्रेष्ठ पेठ आहे. भिमा उर्फ भीमरथी नदी ही महाभारताच्या काळापासून एक पवित्र नदी म्हणून गणली गेली आहे. पण पंढरपूर नि तिथला पांडूरंग मात्र पुष्कळच नंतरचा आहे. पण नंतरचा आहे म्हणूनच आधिच्या दैवताच्या संप्रदयातला सारा गोडावा, सारे वैराग्य नि सारा भोळा भक्तीभाव इथल्या वारकरी संप्रदयात भरलेला आहे. इतका की, जे जे कुठल्याही संप्रदायात आहे ते सारे कांही पंढरीच्या संप्रदायात आहे. पण पंढरीत आहे ते मात्र इतर कुठे आढळेंलच असा संभव नाही. मुख्य म्हणजे पंढरीच्या पूजे–अर्चेत बडिवार नाही. राजा-रंक असा भेद नाही.

जात नाही, पात नाही, स्त्री-पुरुष असा भेदभाव नाही. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक एकीकरणाची उत्कृष्ट प्रथा जर कुठें अध्यापही उत्स्फूर्तपणें टिकून असेल, तर ती या पंढरीतच. ज्ञानेश्वरानें म्हटले आहे कीं, "जळो वरचिल झळाळ" त्याचा प्रत्यय या ठिकाणी डोळस माणसाला आल्यावाचून रहात नाही. भवताला पूर्णपणे जखडलेंला देव कुठें असेल तर हा पुंडलिकाच्या विटेवर, कंबरेवर हात ठेऊन युगानुयुगे भक्तांचीं वाट पहाणारा विठ्ठलच, अशी भाविकांची श्रद्धा आहे. म्हणून विठ्ठल विठाबाई झाला, पांडूरंग झाला. दुसऱ्या पुरुष देवाला सहसा कुठेंही माऊलीच्या रुपाने हाक मारातांना आढळत नाही.

विठ्ठलाला कृष्णाचे कलियुगातले स्वरुप मानले जाते. विठ्ठल हा बुद्धावतार देखील आहे. पण हा गौतम बुद्ध नव्हे. परंतु तत्वज्ञानाचा मिलाफ अद्वैत वादाच्या अनुषंगाने विठ्ठल संप्रदयात झालेला आढळतो. नामदेवाच्या अभंगात याचा प्रत्यय येतो. आणि ज्ञानेश्वरीत नाथ संप्रदाय आणि अद्वैत वेदांत यांच्या अनुषंगाने बौद्ध मतातला प्रज्ञावाद उर्फ मायावाद अतिशय समर्पकपणे हाताळून आपलासा केलेला आढळतो. कर्नाटक आणि आंध्र या भागांत लिंगायत संप्रदायामुळे वैष्णव आणि शैव या दोन संप्रदायात कडवे वैर निर्माण झालेले आढळते. विठ्ठलाच्या संप्रदायात तसे नाही. याचे कारण काय ? कारण असे कीं, विठ्ठल हा विष्णूरुप त्याप्रमाणे शिवरुप देखील आहे. नाथ संप्रदायाशी वारकरी पंथाची सांगड पडली तिच्यामुळें हे ऐक्य प्रस्थापित झाले.

कर्नाटक आणि महाराष्ट्र त्याप्रमाणेच आंध्र यांच्या एकात्म संस्कृतीचे पूर्ण प्रतिक म्हणजेच पंढरीचा विठोबा. या तीन प्रांतात भाषा भिन्नता असूनही त्यांची संस्कृती एक आहे. संस्कृतीच्या जगातील हे एक मोठे नवल आहे. हे संस्कृतीचे एकात्म या तिन्ही भागातल्या डोंगराळ ग्राम विभागातल्या गोप संस्कृतीतून स्फूरलेले आहे. विठ्ठल कानडा आहे. तो गवळी आहे. तो काळी घोंगडी पांघरतो.

तो मूळचा दक्षिणेकडचा, पण पंढरपूरांत येऊन जो विटेवर उभा राहीला तो कायमचाच. कां आला तो पंढरपुरांत ? परंपरा म्हणते, पुंडलीकामुळे, पण धनगर म्हणतात कीं, तो आला पदुबाईमुळें. कोन ही पदुबाई ? पदुबाई हीं विठोबाची मूळची राणी आणि रुक्मिणी ही तिची छाया अशी त्यांची समज. पद्माला उर्फ पद्माळे हें तळे देखील पंढरपूरांत आहे, नि पद्मावतीचे देऊळसुद्धा आहे.

नामदेवाच्या अभंगात असे म्हटले आहे कीं, --

कार्तिकाचे आदित्य वारीं । जो पद्माला स्नान करी ।
त्यासी नाही येर झारी । नयें पुढती संसारी ॥

पद्मावतीच्या स्मृतिचा हा पुसटता उल्लेख आहे. पद्मावतीची कथा धनगरांनीच काय ती जतन करून ठेवली आहे. ही कथा अत्यंत करुणमय अशी आहे. एवढी करुणमय कथा क्वचितच कुठे ऐकायला मिळते.

( पैस – दुर्गा भागवत )

## तुळजाभवानी देवी :

भारत खंडातील ६५ प्रसिद्ध देवीस्थानात तुळजापूर क्षेत्राचा तिसरा क्रमांक लागतो. तुळजापूर क्षेत्र साडेतीन शक्तीपिठापैकी एक आहे. स्कंद पुराणांतील सह्याद्री खंडात तुळजामहात्म्याचे वर्णन सविस्तर आलेले आहे. ती कथा अशी –

पूर्वी कृत युगात कर्दम नांवाचा सात्विक ब्राह्मणऋषीं होऊन गेला. त्याच्या पत्नीचे नांव अनुभूती. ही अनुभूती रुपवती व गुणवती होती. कर्दमाचे प्राणोत्करण झाल्यावर तिने सतीं जाण्याची तयारी चालविली. तितक्यात "अल्पवयी मूल असलेल्या पुत्रवतीने सहगमन करू नयें. असें शास्त्रवचन आहे." ही आकाशवाणी झाली. तेव्हा तिनें सती जाण्याचा निर्णय बदलला. पतिच्या मरणानंतर तिने मेरु पर्वतावर उग्र तपश्चर्या आरंभिली. अनुभूती ही महासाध्वी प्रतिव्रता स्त्री होती. ती समाधी

आवस्थेत असतानांच दानवांचा राजा कुकर याच्या दृष्टीस पडली. अनुभूतीचे मनोरम लावण्य पाहून त्याच्या मनात पापी भावना निर्माण झाली. त्याने तिची तपश्चर्या भंग केली व तो तिच्या पतिव्रत्याचा भंग करण्यासाठी पुढे सरसावला. तेंव्हा अनुभूतीने आपल्या शील रक्षणासाठी श्री जगदंबेंचा धावा केला. तुळजाभवानी देवी अनुभूतीच्या हाकेस ओ देऊन त्वरित तिच्या तपस्थानी आली. आपल्या सर्व शक्तीनिशी ती कुकरा बरोबर लढू लागली. त्या कुकराने महिषरुप धारण केले. आता महिषासूर रणांगणांत थैमान घालू लागला. कुकर हा महिषरुपात असतानाच देवीने त्याचा आश्विन शुद्ध दशमीस वध केला. भक्तांच्या रक्षणासाठी त्वरित धाऊन येणारी देवता म्हणून जगदंबेस "त्वरिता" व "तुरजा" ही नावे मिळाली. तुळजा हे तुरजाचे आध्य मराठी रुप होय. तुळजाभवानीचे वास्तव्य तेंव्हा पासून यमुनाचळावर आहे. हा यमुनाचळ म्हणजे तुळजापूरापासून सुरू होणारा बालघाटचा डोंगर होय. स्कंद पुराणात याच बालाघाटास "यमुनाचळ" असें म्हटले आहे. देवी विजयी झाल्यामुळें आनंद प्रदर्शनार्थ स्वर्गातील देवांनी व पृथ्वीवरील मानवानी देवी भवानीचा उदो–उदो केला. तुळजापूरचीं विजया-दशमी म्हणजे पुराणकालीन स्मृतीची स्फूर्तीप्रद परंपराच.

भवानी मंदीराची घाटणी हेमाड पंथी आहे. कांहींच्या मते हे मंदीर राष्ट्रकूट कालीन असावे. महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध संशोधक श्री. ग. ह. खरे यांच्या मते तुळजाभवानीच्या मंदीराचा जुन्यात जुना पुरावा म्हणजें १५ नोव्हेंवर १३१८ या काळाचा काटीचा शिलालेख होय. स्कंद पुराणाचा काळ चौथ्या शतकातला धरल्यास तुळजाभवानीची अवतार कथा सोळाशे वर्षापूर्वीची सिद्ध होईल.

पंढरीच्या विठोबाप्रमाणे तुळजाभवानी देवी ही महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र यांच्या एकात्म संस्कृतीचे पूर्ण प्रतीक आहे. तुळजापूर यात्रेकरुत अधिक भरणा महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रांतातील लोकांचा असतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२६२२
निबंध २५५

## महाराष्ट्रांतील दुष्काळ :

महाराष्ट्रांत सुमारे वीस वर्षांनी एकादा दुष्काळ पडतो. पूर्वी अशा दुष्काळाचे स्वरुप अतिशय उग्र असे. या दुष्काळामुळे महाराष्ट्राच्या समाज रचनेत प्रचंड उलथा-पालथ झालेली आहे. हल्ली एके ठिकाणी पडलेला दुष्काळ दुसरीकडून धान्य आणून निभावला जातो. महाराष्ट्रातील उग्र स्वरुपाचे दुष्काळ पुढील होत.

१) इ. स. १३९६ ते १४०८ **दुर्गादेवीचा दुष्काळ**- या दुष्काळांत सतत ११ वर्षे पाऊस नव्हता. लाखो माणसे या वेळी मृत्युमुखी पडली. चौदाव्या शतकातील या दुष्काळात लाटदेश उजाड पडला असे दिसते.

२) इ. स. १४६८ ते १४७५ **दुर्गादेवीचा दुष्काळ** - इ.स. १४६८ मध्ये महाराष्ट्रांत जो सात वर्षाचा दुष्काळ पडला होता, त्यास "दुर्गादेवी" या नांवाने संबोधण्यात येत असे. सात वर्षानंतर [१४७५] पुन्हा पाऊस वेळच्या वेळी पडू लागला. परंतु या दुष्काळात सर्व देश उजाड झाला असल्यामुळे, गोदावरी व कृष्णा या दोन नद्याच्या दरम्यानच्या प्रदेशातून तीसाहून अधिक वर्षे पर्यंत फारच थोडा वसूल केला जाई. याचा नक्की काळ राजवाडे यांनी एका पत्राद्वारे "सरस्वती मदीर" प्रसिद्ध केला आहे.

**या दुष्काळांत मोगलाईतील गोदावरीकडील पुष्कळ घराणी वरघाटी** आली. त्यावेळच्या कागदांतून त्यांस दुर्गाडी म्हणत. त्यात सर्व देश उजाड झाला. सरकारी वसुल थकला, पैठण, पुणतांबे येथें असलेली प्राचीन संस्कृत विद्यापिठे बंद पडली. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेंक पंडीत घराणी काशीस गेली. हल्ली काशी येथील महाराष्ट्रीय पंडीत घराण्यांचा पूर्व इतिहास असा आहे. वतने बंद पडल्यामुळे जुनी देवस्थाने लयास गेली. सारांश महाराष्ट्राची फार हालाखी झाली. **हल्लीच्या महाराष्ट्रातील पाटीलक्या, देशमुख्या वगैरे अधिकार दुर्गाडी नंतरच्या आहेत असे राजवाडे म्हणतात.** ( महाराष्ट्रीय ज्ञानकोष-द- १३१ ) या दुष्काळांत दामाजीपंथानी धान्याचे कोठार उघडे करून गरिबाना धान्य वाटले.

३) इ. स. १५७८ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. या साली पावसाचा एक थेंबही पडला नाही.

४) इ. स. १६२९ मध्ये भयंकर दुष्काळ पडला. एक शेर द्रव्यास एक शेर कुळीथासारखे हलके धान्य याच दुष्काळात विकले गेले. याच दुष्काळात तुकाराम महाराज दरीद्री बनले.

५) इ. स. १८०३, १३, २५, ३२, ६५ मध्यम प्रतीचा दुष्काळ या दुष्काळात फुटाणें खाऊन लोकांना अर्धपोटी दिवस काढावे लागले.

६) इ. स. १८९६-९७ अतिशय मोठा दुष्काळ पडला. आजही जुन्या लोकांच्या तो लक्षांत आहे.

७) इ. स. १९५२-५३ मध्ये दुष्काळ पडला. या दुष्काळात भूकबळी नाहीत. परंतु अनेक जनावरे मेली. परदेशातून कमी प्रतिच्या धान्याची आयात करावी लागली. सुधारलेली दळणवळणाची साधने यामुळे या दुष्काळाचा जोर कमी होता.

८) इ. स. १९७२-७४ मधील दुष्काळ- या दुष्काळात सतत चार वर्षे महाराष्ट्रात पाऊस नव्हता. शेतकऱ्याना खडी फोडण्याचे काम करून सुकडी व बरबडा खाऊन दिवस कंठावे लागले. या दुष्काळात अनेक जनावरे मेली.

शिवाजी महाराजाचे काळी दुष्काळ नव्हता.

++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++++

टीप : चौदाव्या शतकातील वरील मोठ्या दुष्काळामुळे महाराष्ट्रातील समाज रचनेत प्रचंड उलथापालथ झालेली आहे व याच काळात मुसलमानो आक्रमणाची भर पडलेली आहे. यामुळे महाराष्ट्रातील अर्वाचीन जातीरचनेचा विचार या दुष्काळानंतरचे काळापासून करावा लागेल, असे लेखकास वाटते.

# वर्ण संघर्ष व जाती भेद –

## वर्ण संघर्ष :

वेदकालीन हिंदुसमाजामध्ये ज्या आर्यांनी भरतखंड पादाक्रांत केला, त्यांच्या वंशजानी अग्रस्थान पटकाविले होते. त्यांच्या खालोखाल याज्ञिकांचे वंशज असलेल्या ब्राह्मणांचा दर्जा होता, असे ऱ्हीस डेव्हिस यांचे मत आहे. परंतु क्षत्रिय व ब्राह्मण यांच्यामधील हा लढा पुढे पेटत गेला. क्षत्रियांचा प्रभाव युद्धात कमी करणे अशक्य असल्यामुळे त्यांनी क्षत्रियांचे वैदिक कर्म हिरावून घेऊन त्यांना नीचतर अवस्थेस पोचविण्यास आरंभ केला. वैदिक धर्माप्रमाणे ब्राह्मणांस अध्ययन, यजन, दान, अध्यापन, याजन व प्रतिग्रह ह्या सर्व कर्माचा अधिकार असून क्षत्रियांना मात्र पहिल्या तीन कर्माचाच अधिकार होता. यास्तव क्षत्रियांचे सर्व संस्कार ब्राह्मण उपाध्यायांच्या हातून व्हावे लागत. ते क्षत्रिय वा वैश्यांच्या हातून होऊ शकत नसत. अर्थात ब्राह्मणांना क्षत्रियांची गृहकृत्ये वाटेल तेव्हा बंद पाडता येत. ह्याचा परिणाम असा झाला कीं, ज्या क्षत्रियांनी ब्राह्मण प्रभुत्वास मान तुकविली नाही, त्यांची मुंज करण्याचे नाकारुन त्यांना ब्राह्मणांनी नवीन अशा शूद्र वर्णास पोचविले, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शूद्र कोण होते ? ह्या ग्रंथात म्हटले आहे.[1]

प्राध्यापक ऱ्हीस डेव्हिस यांचे म्हणणे असे होते की, पहिले तीन वर्ण हे मूळचे एकच होत. वेदांच्या सूत्रात जातीभेद, ब्राह्मणांची अन्यायी आत्मप्रौढी व शूद्रांची अवनत स्थिती इत्यादि गोष्टीबद्दल

1 – Dr Ambedkar B. R., Who were the Shudras P-177

मुळीच आधार सापडत नाही, असे मॅक्समूल्लर म्हणतात. ब्राह्मणांच्या जातीभेदाच्या सिद्धांताचा पहिला खुलासा पुरुष सुक्तात सांपडतो. (ब्राह्मणोस्य मुखमासीद् बाहू राजन्य: कृत: । उरु तदस्य यद्वैश्य: पदभ्यो शूद्रो अजायत ।। )

नंदाचा नि:पात करून ब्राम्हण राजकारणपटू चाणक्य तथा विष्णुगुप्त ह्याने मौर्य घराण्याची स्थापना करून आपले प्रभुत्व स्थापले. चंद्रगुप्त मौर्य हा नंदराजाचा दासीपुत्र असल्यामुळे 'नंदात क्षत्रियकुलम्' नंदानंतर क्षत्रिय नाहीत ही उन्मत्त घोषणा करून ब्राम्हण स्वस्थ बसले नाहीत; त्यांनी दुसरी घोषणा केली कीं. कला वाद्यंतयो: स्थिति: ।[१] कलियुगात फक्त ब्राम्हण आणि शूद्र हें दोनच वर्ण. मोगल कालखंडातील कृष्ण नृसिंह शेष ह्याने 'शूद्राचार शिरोमणि' सारखे कांही ग्रंथ लिहून हाच पक्ष उचलून धरला. तथापि रजपूत राजांच्या घराण्यात धर्म–संस्कार वेदोक्त पद्धतीनेच होत.

'परशुरामाने नि:क्षत्रिय पृथ्वी केली,' 'सुंदोपसुंदानी निर्ब्राह्मण पृथ्वी केली,' 'कला-वाद्यंतयो: स्थिति:' आणि 'नंदातं क्षत्रिय-कुलम्' ह्या चार वचनापैकी पहिली दोन अतिरंजित असून, शेवटची दोन अवास्तव आहेत. ( धनंजय कीर – राजर्षी शाहू महाराज - वेदोक्ताधिकार प्रकरण )

शिवाजी महाराज क्षत्रिय नाहीत असे कारण सांगून महाराष्ट्रातील ब्राह्मणानी त्यांना राज्याभिषेक करण्यास विरोध दर्शविला. तेव्हां काशीच्या पंडीत गागाभट्टाने शिवाजीस विधीपूर्वक राज्याभिषेक करून महाराष्ट्रातील ब्राह्मणाना निरुत्तर केले. शके पंधराशें शहाण्णव ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशिला अगदी पहाटे ब्राह्म मुहूर्तावर श्री शिवरायांचा वैदिक मंत्र घोषामध्ये राज्यभिषेक विधी झाला. त्याच्या आधीच्या चारशे वर्षांच्या फार मोठ्या कालखंडामध्ये महाराष्ट्रात कोणालाच राज्याभिषेक झाला नव्हता. तेराव्या शतकांच्या अखेरीस यवनांच्या आक्रमणानी यादव साम्राज्य मोडले. राज्याभिषेकाची परंपरा संपली,

१ – कमलाकर भट्टाने आपल्या 'शूद्र कमलाकर' ह्या ग्रंथात ही घोषणा केली आहे.

ती सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात श्री शिवाजी महाराजानी स्वतःच्या राज्याभिषेकामुळें पुन्हा निर्माण केली.

शिवाजीला वेदोक्त अभिषेक करणाऱ्या गागाभट्टावर महाराष्ट्रातील ब्राम्हणांनी बहिष्कार टाकला तेव्हां शिवाजीने पुरोहित वर्गाखेरीज सर्व ब्राम्हणांना नोकरीतून काढून टाकले.[1] जर शिवाजीने वेदोक्त पूजा करणें धर्मबाह्य होते. तर ब्राम्हणांनी पुरोहितगिरीविना कोणतेच काम करू नये असे शिवाजीने फर्मान काढले ते योग्यच होते.

पुढे छत्रपती थोरले शाहू महाराज ह्यानी अष्ट प्रधान मंडळ मोडून ब्राम्हण पेशव्यास पेशवेपद वंशपरंपरेने बहाल केल्यामुळें आणि पेशव्यास सातारा राजधानीत राहण्यास भाग न पाडता त्याला पुण्यास राहू दिल्यामुळें, पेशवाईत म्हणजे ब्राम्हणी राज्यात ब्राम्हणांनी वेदोक्त प्रकरणें गाजवून ब्राम्हणेतरांचा धार्मिक व सामाजिक छळ केला. नाना फडणविसानें तर कारस्थान करून दुसऱ्या शाहूची मुंज पुराणोक्त पद्धतीने करवून घेतली. याहीपुढे वेदोक्त प्रकरणातील वादात राजश्री शाहू महाराजास त्यांच्याच नारायण भटजीने बजावले, "सर्व शक्तीमान ब्राम्हण समाज तुम्ही क्षत्रिय आहा असे जाहीर करितोपर्यंत मी तुमची किंमत शुद्रापेक्षा अधिक समजणार नाही" आपल्या भटजीने आपल्यास शूद्र म्हणावे, आपल्याशी तिरस्कार बुद्धीने वागावे व आपल्या वंशजांची विटंबना करावी, हे त्या मानी-पुरुषास असह्य झाले. ( तेव्हां त्यांनी जन्मजात पुरोहितगिरीची पद्धतच बंद करण्याचे धोरण ठरविले.) ६ जुलै १९२० रोजी त्यांनी 'शिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाळा' सुरू केली. त्यांत भोई जातीचाही एक विद्यार्थी होता. इतर जातींचेही विद्यार्थी होतें. राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी हेच विद्यार्थी करू लागले. राज्यात त्यांच्या हस्तें वैदिक पद्धतीने विवाह होऊ लागले.

(वेदोक्तधिकार प्रकरण)

* ++ ++ ++ ++ ++ ++ ++ *

१ – सरदेसाई, 'हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास,' भाग २, मराठी रियासत पूर्वार्ध पृ. ४९४.

'नंदान्तं क्षत्रिय कुलम्' ह्या उन्मत्त घोषणेला प्रत्युत्तर म्हणून 'जन्मजात पौरोहित्यातम्-' अशी घोषणा करणारा, शेकडो वर्षांनी कां होईना, एक धीर वीर पुरुष निर्माण झाला आणि तोही सामाजिक क्रांतीसाठी बंड करणाऱ्या महाराष्ट्रात झाला, अशी इतिहास ग्वाही देईल.

(वेदोक्ताधिकार प्रकरण)

## जातीभेद :

हिंदु समाजात वर्णसंघर्ष निर्माण होण्यास ब्राह्मणवर्ग कसा जबाबदार आहे हे आपण पाहिले. जातीभेदाच्या मुळाशी एवढे एकच कारण नाही, तर जाती भेद निर्माण होण्यास जी अनेक कारणे आहेत, त्यापैकी ते एक कारण आहे. स्थायीक झालेल्या समाजात उशीरात उशिरा समावल्या गेलेल्या शिकारी टोळचापासून अनेक शूद्रजाती निर्माण झाल्या असाव्यात असे कांही विद्वानांचे मत आहे. अस्पृश्यांच्या जीवनांचा आणि इतिहासाचा महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनीं सखोल अभ्यास करून "भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न" या ग्रंथात आपले विचार मांडले आहेत. अस्पृश्यतेची जी पांच प्रमुख कारणे महर्षि शिंदे यांनी सांगितली आहेत ती अशी –

१) जित–जेत्यांच्या प्रश्नातून अस्पृश्यतेचा उगम - **जे जिंकले गेले त्यांना जिंकलेल्यानी हलक्या कामाला जुपून कायमचे निर्बल केले.**

२) धंद्याच्या हीनपणामुळे - कांहीना घाणीच्या स्वरुपाचे धंदे पत्करावे लागले व अस्वच्छता हीच अस्पृश्यता या लोक समजुतीमुळे हे लोक समाजापासून बहिष्कृत ठरवले गेले.

३) बौद्ध आणि इतर पाखंड मानलेल्या धर्मातून हिंदू धर्माच्या अंमलाखाली बिनशर्त न आल्यामुळे अस्पृश्य.

४) जंगली अवस्थेत नागर वस्तीपासून दूर राहिल्यामुळे.

५) मनुस्मृतीत वर्णिलेल्या प्रतिलोभामुळें.

हिंदु समाजातील जातीभेदाच्या मुळाशी प्रो. पुणतांबेकर यांच्या मते मुख्यतः चार प्रकार आहेत ते असे –

१) वंश भेद उदा. आर्य, द्रविड वगैरे किंवा त्यांची कमी अधिक मिश्रणे.

२) धर्म किंवा पंथ भेद- उदा. लिंगायत, शैव, वैष्णव इ.

३) वृत्ती किंवा व्यवसाय भेद - उदा. ब्राम्हण, शिंपी, सोनार इ.

४) स्थानभेद- उदा. कोंकणी, गुजराथी, परदेशी, बंगाली इ.

या चार प्रकारातून विविध मिश्रणांनी हिंदु समाजात चार हजार जाती उत्पन्न झाल्या आहेत. त्या पैकी १४४७ जाती तर बेटीबंद आहेत.

महाराष्ट्रांत कमीत कमी २५० जाती आहेत व त्या एकेका जातीच्या पोटजाती मिळून झाल्या आहेत. उदा. शेतकरी म्हटले म्हणजे त्यांत मराठा, माळी, कुणबी अशा जाती आहेत.

# पशूहत्या व मांसभक्षणाचा इतिहास

## मनुस्मृतिः [ अध्याय पाचवा ]

प्राणस्यान्नमिदं सर्व प्रजापतिरकल्पयत् ।
स्थावरं जङ्गमं चैव सर्वं प्राणस्य भोजनम् ।। २८

चाराणामन्नमचरा दंष्ट्रिणांमप्यदंष्ट्रिणः ।
अहस्ताश्च सहस्तानां शूराणां चैव भीरवः ।। २९

नात्ता दुष्यत्यदन्नाद्यान्प्राणिनोऽहन्यहन्यपि ।
धात्रैव सृष्टा ह्याद्याश्च प्राणिनोऽत्तार एवच ।। ३०

क्रीत्वा स्वयं वाप्युत्पाद्य परोपकृतमेव वा ।
देवान्पितृंश्चार्चयित्वाखादन्मांसं न दुष्यति ।। ३२

रुद्रयज्ञार्थं ब्राह्मणैर्वध्याः प्रशस्ता मृगपक्षिणः ।
भृत्यानां चैव वृत्यर्थमगस्त्यो ह्यचरत्पुरा ।। २२

एष्वर्थेषु पशुंन्हिस॰वेदतस्वार्थविद्द्विजः ।
आत्मानं च पशुं चैव गमयत्युत्तमां गतिम् ।। ४२

अनुमन्ता विशसिता निहन्ता क्रियविक्रयी ।
संस्कर्ता चोपहर्ता च खादकश्चेति घातकाः ।। ५१

या वेदविहिता हिंसा नियतास्मिश्चराचरे ।
अहिंसामेव तां विद्याद्वेदाद्धर्मा हि निर्बभौ । ४४

शरीरात ब्रम्हाने आत्मा निर्माण केला असता त्याच्या पोषणाकरिता हालचाल करणारे प्राणी व स्थाईक असे धान्य निर्माण केले. ( २८ )

चाऱ्यावर जगणारे (प्राणी) हे क्रूर पशूंचे अन्न आहे. चारा हे अचराचे अन्न आहे. हस्तयुक्त प्राण्याचे अन्न हस्तरहित असे प्राणी आहेत. शूर प्राण्याचे अन्न भित्रे प्राणी आहेत (२९)

ह्या करिता भक्ष्य प्राण्यास भक्षकाने दररोज एकवेळ खाण्यास हरकत नाही. कारण ब्रम्हदेवाने त्यांना त्याकरिताच जन्म दिला आहे. (३०)

स्वतः पशू मारून किंवा कुणी आणून दिल्यावर ते पितृदेव इत्यादिकांना समर्पण केल्या नंतर शिल्लक मांस खाण्यास हरकत नाही. (३२)

शास्त्रवाह्य पशूस, ब्राम्हणाने यज्ञ, म्हातारे आई–वडील इत्यादिकांच्या निर्वाहाकरिता मारण्यांस हरकत नाही, असे अगस्ती मुनींनीही म्हटले आहे. (२२)

यज्ञादि निमित्तानें पशुहत्या करणारा ब्राम्हण पशुसह उत्तम गतीस जातो. (४२)

प्राण्यांची हिंसा करण्यास सांगणारा, हिंसा करणारा, शिजविणारा, भक्षण करणारा, आणून देणारा हे सर्व प्राणीहन्तकच आहेत. (५१)

श्रृतीबाह्य नसणारी व (रुढीनुसार) चालणारी पशुहत्या ही देशात अहिंसेप्रमाणें आहे म्हणून इतर पुरावे नसतांना मूर्त स्थितीत असणारा धर्म वेदापासून निर्माण झाला आहे. (४४)

हिंसा ही विश्व चक्राच्या अनेक आऱ्यापैकी एक आऱ्या होय. या आऱ्यामुळेच हे विश्वचक्र अनंत अनादि काळापासून अखंड फिरत आहे. भारतात ब्रम्हा, विष्णु व महेश या तीन देवतांची पूजा होते. ते

वेगवेगळी कार्ये करीत असल्याचें सांगितले आहे. ब्रम्हाचें कार्य निर्मितीचें, विष्णूचे पोषणाचे तर महेशाचे संहाराचे. महेश संहारक म्हणून तो अपूजनीय आपण मानीत नाही. तर तो देखील इतर दोन देवता इतकाच पूजनीय आहे. इतकेच नव्हे तर तो महादेव आहे. कारण त्याने संहार केल्याशिवाय नवनिर्मीती आणि तिच्या पोषणाचे कार्य होऊच शकणार नाही. संहार ही विश्वाची गरज आहे. यामुळेंच श्रृतिबाह्य नसणारी व रुढीनुसार चालणारी पशुहत्या ही अहिंसेप्रमाणे आहे असे मनुने म्हटले आहे. एवढेच नव्हे तर या चिरंतन तत्वाचें आधारावर इतर पुरावे नसतांना वेदापासून मूर्त स्थितीत असणारा (हिंदु) धर्म निर्माण झाला असे मनु म्हणतो.

सर्व जगात शिकारी व पशुपालन वृत्तीनंतर मनुष्य कृषी कर्मात पडलेला दिसतो व हे स्वाभाविकच आहे. आर्य देखील प्रथम पशुपालक होते नंतर ते कृषी कर्मात पडले. आर्य भारतात आले तेव्हा त्यांचे जवळ गाय, बैले व शेंळ्या, मेंढ्या यांचे कळप होते व त्या प्राण्यांचे दूध, मांस व कातडें यांचा उपयोग ते सर्रास करीत असत.

उष्ण प्रदेशात मांस लवकर नासते व म्हणून जनावर मारले कीं, शक्य तितक्या लवकर ते खाऊन संपवावे लागते. शेळी, मेंढी सारखे जनावर ५–१० जणांना सहज संपवता येते. पण गाय बैलाचे मांस संपवायला चांगली ५० माणसे लागतात. त्याच प्रमाणे शेळ्या, मेंढ्या एका एका मालकाजवळ खंडोगणती असतात तर गुरे दहानीच मोजावी लागतात. युरोपातील थंड प्रदेशात, विशेषत: हिवाळ्यांत मांस आठवडेंच्या आठवडे टिकू शकते. एखादे गुरु मारून ठेवले तर एक कुटुंब कित्येक दिवस त्यावर जगू शकेल. भारतातील उष्ण हवेत ते शक्य नव्हतें. त्यामुळे गुरु मारणे म्हणजे एक येथे मोठा मेजवाणीचा प्रसंग समजला जाई. कोणी थोर ऋषी आले तरच गाईचे कोवळे मांस शिजवले जाई. ब्राम्हणाचा सर्वांत मोठा सन्मान करणे किंवा पाहुण्याचा सन्मान करणे म्हणा- ह्या विधीला "मधुपर्क" असे नांव

आहे व त्यांत गोमांस आवश्यक म्हणून उल्लेख आहे.[1] अतिथी आला तर गाय वगैरे मारावी व मधून मधून शूलगव करावा असे विधीधर्म म्हणून आश्वालायनाने सांगितले आहे. शूलगव करावयाचा तो गांवाबाहेर जाऊन करावा असे सूत्र आश्वालायन स्मरतो.[2] त्यावरून पशुवध गांवाबाहेर करण्यास प्रारंभ फार प्राचीन काळापासून झाला असावा असे दिसते.

एकंदरीनेच आर्यांना मांस वर्ज नव्हते. मुंज झाल्यापासून ब्रह्मचर्याची दीक्षा सुटेपर्यंत आयुष्य अतिशय साधेपणें व कष्टाने घालवावे असा नियम होता. तेवढ्या वेळात ज्या गोष्टीं वर्ज्य होत्या त्यात मद्य, मांस वगैरे खायला रुचीकर लागणारे पदार्थ होते. लक्षात ठेवण्यासारखीं गोष्ट अशी कीं, ह्या ब्रह्मचर्याच्या काळात सर्व तऱ्हेचे मांस वर्ज्य होते, फक्त गोमांस वर्ज्य असे नव्हते.[3]

आर्य पादत्राणे वापरीत व ती गाई - बैलांच्याच कातड्यांची असत. म्हैस बाळगणे जुन्या आर्यांना ठाऊक नव्हते. प्राचीन आर्यांचे पंचगव्य ( गाईपासून झालेले पांच पदार्थ ) म्हणजें दूध, दही, तूप, लोणी व मांस असे होते.

बुद्ध जन्म जरी इ. स. पू. ५०० चे सुमारास झाला होता तरी बुद्धधर्म व हिंदूधर्म ह्यांचा खरा संघर्ष इ. स. ४०० चे सुमारास अत्यंत उत्कटतेला पोचला होता. ह्या गुप्त कालाचेवेळी सर्व हिंदूंनी आपणांस बुद्ध धर्मीयापासून निराळे करण्याची युक्ती म्हणून गोमांस खाण्याचे सोडून दिले असावे.[4] त्याच प्रमाणे दक्षिणेत जैनधर्म व हिंदू धर्म यांचा मोठा संघर्ष इ. स. १००० ते १२०० दरम्यान झाला तेव्हा आपले श्रेष्ठत्व राखण्याकरिता दक्षिणेतील ब्राह्मणांनी मांस खाण्याचे सर्वस्वी सोडून दिले असावे व अशा तऱ्हेने निवृत्त मांस

१, ३– आमची संस्कृति – डॉ. इरावती कर्वे

२ महाराष्ट्रीय ज्ञानकोष ( क )     ४ वर्ण व जाती- डॉ. मो वि. पटवर्धन

असलेल्या जैन धर्मापेक्षा आपलें श्रेष्ठत्व कायम केले. एकंदरीने मांस भक्षण ब्राह्मणांना निषिद्ध झाले, ते जैन व बौद्ध तत्वज्ञानाचा पाडाव करता करता सनातन्यांनी "अहिंसा" तत्व स्विकारले म्हणून असे दिसते. एवढे मात्र खरे की, यज्ञयागात प्राणिहत्या करून मोक्ष मिळतो या भ्रामक समजूतीस गौतमबुद्ध व महावीर यानी धक्का दिला व यज्ञात पशूहत्या करण्याचे खूळ त्यानी निर्धाराने उपटून काढले.

## मांस विक्रीच्या व्यवसायात हिंदूंचे पदार्पण :

मनुच्या काळात ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य व शूद्र या चारीही वर्णाचे लोक पशू हत्या करीत व मांस भक्षण करीत, हे मनुस्मृतीवरून स्पष्ट होते. दक्षिणेत हीच प्रथा मध्ययुगात (इ. स. १००० ते १२००) जैन मताचा प्रसार झाला तोपर्यंत होती असे दिसते, त्या वेळे पावेतो चारी वर्णाचे लोक ग्राम्य पशूंची हत्या करून मांस भक्षण करीत. या काळापर्यंत ग्राम्य पशूंचे मांस विक्री करणारी एक विशिष्ट अशी वेगळी जात अस्तीत्वात होती असे आढळत नाही. मात्र वन्यपशूंची शिकार करून कांही वन्य व शिकारी जाती वन्यपशू अथवा त्यांचे मांस शहरवासीयांना विकत असावेत. परंतु यांची वस्ती सार्वत्रीक नव्हती. त्याकाळी प्रत्येकांना पशूहत्या करण्यास मोकळीक असल्यामुळे जो तो स्वत: पशू हत्या करून मांसाहार करीत असे. समाजातील श्रीमंत वर्ग तेवढा मोर, हरिण, ससा इत्यादी वन्यपशूंचे मांस रुचकर असतें म्हणून वन्याकडून विकत घेत असावा.

रामदेवराव यादवांचे कारकिर्दीत इ. स. १२९४ साली दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने देवगिरीवर स्वारी केली व त्यानंतरच दक्षिणेत मुसलमानी आक्रमणांस सुरुवात झाली. सुरवातीचे काळांत मुस्लीम आक्रमण हे वरवरचे होते. दिल्लीच्या सुलतानाची सत्ता कमकुवत झाल्यानंतर, दक्षिणेंत हसनगंगू बहामनी याने गुलबर्गा येथे बहामनी राज्याची स्थापना [इ. स. १३४७] केली. या राज्याचा

विस्तार मुख्यत: सर्व महाराष्ट्र देश व्यापून होता. इ. स. १४८५ मध्ये या राज्याचे पांच तुकडे पडले.

मांस हे मुसलमानाचे मुख्य अन्न असल्यामुळे त्यांचे आक्रमणा-बरोबरच मांसाची मागणी वाढत गेली व त्यामुळें ही मागणी पुरविण्यासाठी दक्षिणेंतील हिंदू या व्यवसायात पडले असे आर. ई. एन्थावेन यांनी आपल्या जातीविषयक रिपोर्टमध्यें म्हटले आहे. त्यांचें हे म्हणणें तर्कसुंगत व वास्तव आहे.

यज्ञयागादी निमित्तासाठी व निर्वाहासाठी ब्राह्मण हे पशूहत्या करीत याचा स्पष्ट पुरावा मनुस्मृतिमध्यें आहे. परंतु कालांतराने पशूहत्या व मांस भक्षण ब्राह्मणवर्ग निषीद्ध मानु लागला. कांही विद्वान मंडळीनी ग्राम्य पशू मारणारी "खाटिक" ही जात वेद काळापासून आस्तित्वात आहे असे भासविण्याचा खोटा प्रयत्न केला आहे, ते केवळ यज्ञयागादी निमित्ताने ब्राह्मण स्वत: पशूहत्या करीत नव्हते असे भासविण्यासाठी होय. वेदकाळापासून शस्त्रृ व गोघात असे खाटिक वर्गाचे वाचक शब्द आढळतात असे डॉ. श्रीधर केतकर यांनी त्यांच्या ज्ञानकोषात म्हटले आहे. त्यांना शस्त्रृ हा शब्द ऋगवेदांत एक वेळ सांपडला आहे. तसेंच गोघाताला पुरुषमेधांत बळी म्हणून उभा करण्याचा प्रसंग आहे, असे ते म्हणतात. पण त्यावरून या धंद्याची विशष माहिती मिळत नाही; असेही ते म्हणतात. वरील शब्द धंदेवाचक असले पाहिजे कां की, सामान्यपणें पशु मारणे हे प्रत्येक गृहस्थाचे कर्तव्य होतें, असा संभ्रमही त्यांनी व्यवत केला आहे. या ठिकाणी स्पष्ट करावेसे वाटते कीं, त्या काळी उपजिविकेसाठी सामान्यपणे पशू मारणे हे प्रत्येक गृहस्थाचे कर्तव्य होते. यज्ञयागादि निमित्ताने मात्र प्रामुख्यानें ब्राह्मण स्वत: पशूहत्या करीत असे मनुस्मृतिवरून स्पष्ट दिसते. (इ. स. पू. २०० ते इ. स. २०० हा मनुचा काळ असावा.) तेव्हां वरील शब्द यज्ञयागाचे वेळी केवळ पशूहत्या करणारांस उद्देशून असले पाहिजेत असे वाटते. गोमेध केल्याशिवाय पूर्ण गृहस्थाश्रमी होत नाही व गृहस्थाश्रमाचे सुख लाभत नाही, या समजूतीने ब्राह्मण समाजात आजही लग्नाचेवेळी होमात कनकेची गाय करून तिचीं आहुती

देण्याची प्रथा आहे. आजही अनेक ठिकाणी बळीची प्रथा आहें. या बळीचे वेळी कोठेहि खाटिक हा पशूहत्या करीत नसून त्या ठिकाणचे प्रमुख पुजारी अथवा एखाद्या प्रतिष्ठीत घराण्याकडे बळी घेण्याचा मान आहे हे नमूद करण्यासारखे आहे. एवढेच नव्हेतर आजही खाटीक हे केवळ मांस विक्रय करतात पण ते स्वतः पशूहत्या करीत नाहीत, हे लक्षात घेण्यासारखे आहे. वेदकाळी चार्तुवर्ण व्यवस्था अत्यंत लवचिक होती व ती श्रमविभागाच्या तत्वावर रुढ होती. तेव्हां वेदकाळी पशुहत्या करणारा "खाटिक" हा एक स्वतंत्र वर्ग अथवा समाज होता असे म्हणणे संपूर्णपणे चूकीचें आहे. मुसलमानी आक्रमणांनंतरच दक्षिणेत हिंदू मोठ्या संख्येने मांस विक्रीच्या व्यवसायात पडले व त्यांचा व्यवसायानुसार 'खाटिक' हा एक वेगळा समाज निर्माण झाला हेच खरे.

टीप : शस्त्र या शद्बांचाच अपभ्रंश सत्तूर (मोठी सुरी) असावा.

अगदी अलिकडे मोगलकाळी रे. टेरी हा प्रवासी भारतात आला होता. त्यांनें नमूद केलेलीं त्यावेळची समाजस्थिती पाहता, देशातील पशुहत्येविषयी सर्वसाधारण कल्पना येते.

रे. टेरी – हा सर टॉमस रो च्या वकिलातीबरोबरचा पाद्री असून सन १६१५ पासून १६१८ पर्यंत इकडे होता. तो म्हणतो.

बहुतेकांच्या घरी गाई, मेंढ्या, बकऱ्या वगैरे दुभती जनावरे असून हरीण, ससे वगैरे अनेक जनावरांचे मांस विपुल मिळते. अशा खाद्य जनावरांस पाळीव अरण्यात राखण्याचे कारण पडत नाही. सर्व देशभर जंगलातून त्यांची वस्ती विपूल आहे. पाहिजे त्यास शिकार करण्याचे सामर्थ्य व मोकळीक आहे. यामुळे ह्या जंगली जनावरांचा शेता भातास उपद्रव लागत नाही.

एकंदरीने आर्यांना गोमांस वर्ज्य नव्हते. प्राचीनकाळीं आर्यांना गोमांस वर्ज्य नव्हते हे जरी खरे असले तरी आजच्या मूर्त स्वरुपातील

हिंदू धर्मातील सर्व सवर्णांनी ते वर्ज्य मानले आहे. हिंदूधर्मांत आज जी कांहीं सर्वमान्य तत्वे आहेत. त्यापैकी हिंदूना गोमांस वर्ज्य असणे हे एक आहे. या तत्वास गेल्या सुमारे दीड हजार वर्षांची अखंडीत परंपरा आहे. या परंपरेस आर्यांचे गोमांस भक्षणाचे प्राचीन इतिहासामुळे बाध येण्याचे किंवा अवघड वाटण्याचे कांहीच कारण नाहीं. प्राचीन काळी मांस हेच मुख्य अन्न असल्यामुळे रुचकर व सहजासहजी मिळणारे गोमांस आर्य भक्षण करीत व त्यासाठी त्यांना गोहत्याही करावी लागे. हा गोमांस भक्षणाचा इतिहास येथे कथन करण्याचे कारण एवढेच कीं, प्राचीन काळीं गाईची हत्या करणारा खाटीकाचा एखादा आर्येतर विशिष्ट वर्ग असावा अशा प्रकारची शंका कांही विद्वानांना वाटते, ती खरी नसून आर्य समाजाचे चारी वर्णांचे लोक केवळ गरज म्हणून गोहत्या व गोमांस भक्षण करीत, हे या ठिकाणी सुस्पष्ट करावयाचे होते. तत्कालीन परिस्थितीत अहिंसा धर्माचे पालन करण्याचें उद्देशाने मांस भक्षण टाळणे केवळ अशक्य होते व तसेच नित्य मांस भक्षणांसाठी परावलंबी राहणेही अशक्य होते.

इ. स. ४०० चें दरम्यान बौद्ध धर्माशीं संघर्ष झाल्याने हिंदूनी गोमांस खाण्याचे सोडून दिले. त्या वेळेंपासून गोहत्या करणारे व खाणारे अस्पृश्य समजले जाऊन हे लोक सवर्ण हिंदूपासून वेगळे पडले असावेत व यांची वस्ती गांवाबाहेर गेली असावी असे प्रामुख्याने लेखकास वाटते. गोहत्या करण्याची गृहे ही गांवाबाहेर असण्याची दुसरे एक शास्त्रीय कारण संभवते ते असें –

शूलगव म्हणजे पशू वध गांवाबाहेर जाऊन करावा असे आश्वलायनाने सांगितले आहे. त्यावरून पशु वध म्हणजे मुख्यत: गोवध गांवाबाहेर करण्यास प्रारंभ फार प्राचीन काळापासून झाला असावा असे दिसते. आजही प्राचीन उत्खनन्नांत जुन्या शहराच्या रचनेत पशू हत्या करण्याची गृहे गांवाबाहेर आढळतात.

मुसलमानांचे आक्रमणापूर्वीच्या काळातच हिंदुनी गोमांस निषीद्ध मानल्यामुळे ते गोहत्या करीत नव्हते. यामुळें मुसलमानाचे

आक्रमणानंतर गोहत्या करणाऱ्या गाय कसाबात परदेशी मुसलमानांचा प्रामुख्याने भरणा झाला. दक्षिणेत औरंगजेब, हैदरअल्ली व टिपू सुलतान यांनी अनेक हिंदूना बाटविले असले तरी हे लोक गोमांस विक्रीच्या व्यवसायात पडलेले नाहीत हे महत्वाचे आहे. या मुसलमान राज्यकर्त्यांनी मुसलमानाखेरीज अनेक गुलामानांही हा व्यवसाय करण्यास भाग पाडले असे दिसते. हैदरअल्लींने अबॅशिनियन गुलामाना गाय कसाब बनविले असा उल्लेख पुणा गॅझेटीयरमध्यें (पृ. क्र. ५००, इ. स. १८८२-८४) आलेला आहे.

एकंदरीनें पाहता पशू हत्या व मांस विक्री करणाऱ्याचे हिंदुमध्यें दोन वर्ग दिसतात, ते असे –

१) वन्य व शिकारी जाती पूर्वपार वन्य पशूंची शिकार करीत. त्यांचेपैकीच शहराजवळ राहाणारे वन्यलोक हे वन्य पशूंचे मांस विकत. यांचे संबंधी 'व्याध' असा उल्लेख कांही ठिकाणी आढळतो.

२) ग्राम्य पशूंचे ( शेळ्या-मेंढयाचें ) मांस विकणारा हिंदूचा दुसरा एक नागर वर्ग आहे.

## खाटीक :

**खट्टिक या संस्कृत शद्वांवरून खाटिक हा शद्व झालेला आहे.[1] व खट्टिक या संस्कृत शद्वाचा अर्थ 'सैनिक' असा आहे.** यावरून सैनिकी पेशातील लोक मुख्यत: या व्यवसायांत पूर्वी आले असावेत असे दिसते. कदाचित् पराभूत तसेच दैवी आपत्तीत सांपडलेल्या सैनिकांचा मांस विक्रीचा व्यवसाय हा शेवटचा आसरा असावा, असा तर्क करता येतो. याच संदर्भात 'खेटक' या संस्कृत शब्दाचा अर्थही महत्वाचा वाटतो. खेटक या शब्दाचा अर्थ तलवार अथवा तलवारी सारखे एखादे शस्त्र अथवा ढाल असाही आहे. यावरून प्राचीन काळापासून

* ++ ++ ++ ++ ++ ++ ++ *

१ महाराष्ट्रीय ज्ञानकोष ( ख )

आर्य समाजात सैनिक हेच प्रामुख्यानें लढाई व्यतिरिक्तचे काळांत त्यांचें शस्त्राचा उपयोग शिकार तथा पशुहत्येसाठी करीत असावेत.

आज जे हिंदु लोक मांस विक्रीचा व्यवसाय करतात त्यांना खाटिक म्हणतात व जे मुसलमान लोक ह्या व्यवसाय करतात त्यांना कसाई अथवा कसाब म्हणतात. हिंदु खाटिक हे फक्त शेळ्या-मेंढ्यांचें मांस विकतात, तर मुसलमानांत गायकसाब व बक्करकसाब असे दोन वर्ग आहेत. १९११च्या खानेसुमारीत, दक्षिणेत एकंदर ३, ६०, ९०९ मुसलमान कसाई व २, २२३ हिंदु खाटिक गणले गेले.[1]

## मुलाणा :

मुसलमान धर्मात मुसलमान मुलाण्यानेंच पशूहत्या करणे अत्यावश्यक आहे. त्यांच्या या प्रथेमुळेच त्यांनी आपल्याबरोबर आणलेले कसाई व एत्तद्देशीय मुसलमान यांची मुलाणी म्हणून त्यांनी सगळीकडे पेरणी केली असावी असे दिसते. यामुळेच महाराष्ट्राच्या बारा बलुतेदारांत मुलाण्यांचा समावेश सार्वत्रिक झालेला दिसतो. **बारा बलुतेदारात 'खाटिक' नाहीत हे नमूद करण्यासारखे आहे.** आजही ग्रामीण भागात अनेक लहान लहान खेड्यामध्ये 'खाटिक' आढळत नाहीत. अशा खेड्यामध्ये तेथील नागरिक एकत्रीतपणें एखादे बकरें विकत घेतात व मुलाण्यांकडून त्याची हत्या करवितात. त्यांचेंकडूनच मांसाचें लहान लहान तुकडे करून सारखें 'वाटे' घालतात. प्रत्येकजण आपआपला वाटा उचलतो. मुलाण्याला या कामाबद्दल अर्धा वाटा (एका वाटयाचा अर्धा हिस्सा) देण्यात येतो. यांस वाटे घालण्याची पद्धत असे म्हणतात. आजही महाराष्ट्रातील ग्रामीण भागात वाटे घालण्याची पद्धत सार्वत्रिक आहे व महाराष्ट्रातील ही पूर्वपार चालत आलेली पद्धत होय.

मुलाणो हा लोकांचे लग्न कार्यात तसेच देवधर्माचे वेळीही बकरे कापतो. त्याचे शिवाय पशूहत्याच अपवित्र समजली जाते. यामुळेच

* -++- -++- -++- -++- -++- -++- *

१ महाराष्ट्राती ज्ञानकोष - (क)

मुलाण्याचे बारा बलुतेदारामधील स्थान महत्वाचे आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात एखादे दुसरे अपवादात्मक गांव सोडल्यास प्रत्येक गांवी मुलाणीच बकऱ्याची हत्या करतो. प्रत्येक बकऱ्यामागे त्यांस लोकाकडून व खाटिकाकडून (पंचवीस ते पन्नास पैसे) मोबदला मिळतो. तसेच प्रत्येक गांवा त्यांस गावकऱ्याकडून धान्य रुपाने बलुतेही मिळते. शहरी भागातही मुलाणींच बकऱ्याची हत्या करीतो व खाटिक फक्त मांस विक्रय करतात.

## हलाल, झटका व मुडदाड :

मांस हे मुसलमानांचे मुख्य अन्न आहे व मांस विक्रीच्या व्यवसायात बहुसंख्य मुसलमान लोकच आहेत. मुसलमान धर्माप्रमाणे बकऱ्याची हत्या मुसलमान मुलाण्यानेच कुराणातील मंत्र उच्चारुन करावी लागते. मुलाणी बकऱ्याची गर्दन कुराणांतील शब्द उच्चारुन शस्त्रानें संथपणे कापतो व त्याने केलेल्या या हत्येस 'हलाल' असे म्हणतात. या उलट शिख धर्मात बकऱ्याची गर्दन तलवारीसारख्या शस्त्राने एकाच झटक्यात छाटतात. या हत्येस 'झटका' असे म्हणतात.

एखादे बकरे नैसर्गीकरित्या मरण पावल्यास त्या मृत बकऱ्यास हिंदु खाटिक 'मुडदाड' असे म्हणतात व त्याचा स्पर्श देखील अपवित्र समजतात. एवढेच नव्हे तर बकऱ्याची हत्या मुसलमान मुलाण्याऐवजी दुसऱ्याने केल्यास मुसलमानाप्रमाणे हिंदु खाटिकही ही हत्या अशास्त्रीय समजतात व त्या मृत बकऱ्यास 'मुडदाड' असे म्हणतात.

नैसर्गीकरित्या मृत्यु आलेल्या बकऱ्यास 'मुडदाड' असे समजून हिंदू खाटीक त्यांस शिवत नाहीत व त्याचे मांसही विकत नाहीत. ही प्रथा मात्र चांगली दिसते. कारण नैसर्गीकरित्या मेलेले जनावर हे आजार अथवा रोगराईने मेलेले असते व त्यांचे मांस जनतेच्या आरोग्याला अपायकारक ठरण्याचे संभव असतो.

# दक्षिणेतील जाती व जमाती :

महाराष्ट्रातील समाजशास्त्राच्या संशोधनाची सुरवात कधी व कुणी केली हा मुद्दा वादग्रस्त होऊ शकेल. समाजविषयक शास्त्रे म्हणजें राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास ह्यावर विचार करणारे व लिहिणारे. त्याचप्रमाणे समाजसुधारकापैकी कांही लोक ह्यांच्या लिखाणांत समाजातील निरनिराळ्या संस्थाचे किंवा चालीरितीचे विवेचन नेहमी येत असते. कांही तुलनात्मक असते, कांही वर्णनात्मक असते व बरेचसे टिकात्मक किंवा विशेष दृष्टींकोणाचे प्रतिपादन करणारे असते. अशा तऱ्हेचे लिखाण न्या. रानडे, लोकमान्य टिळक, नामदार गोखले, श्री. वि. का. राजवाडें, श्री. मा. शि. गोळे वगैरे लोकांनी पूर्वी केले व सध्याही होत आहे. हे लिखाण जरी वाचनीय असले, अभ्यासकाला जरी त्याचा पुष्कळ उपयोग होण्यासारखा असला, तरीं ते समाजशास्त्र विषयक आहे असे म्हणता येंणार नाही.

सन १९०१ पासून दर दहा वर्षानी भारताची शिरगणती होते. त्यावेळी सरकारने निरनिराळ्या प्रांतातील भाषा, जाती, देव, दैवते, विशिष्ट रितीरिवाज ह्याबद्दल पुष्कळ माहिती गोळा करून छापलेली आहे. तसेच १८९३–१९३९ च्या काळात निरनिराळ्या प्रांताच्या जाती जमातीबद्दल पुस्तके लिहिली गेली. जाती जमातींचा अकारविल्हे क्रम लावून त्यांत माहिती दिलेली आहे. ही पुस्तके व दशवार्षिक शिरगणतीचे अहवाल ह्यामध्ये आलेली माहिती अभ्यासकाच्यादृष्टीने खरी समाजशास्त्रीय व अमोल अशी आहे.

( महाराष्ट्र जीवन खंड २ – डॉ. इरावती कर्वे )

दक्षिणेतील जाती जमातींची माहिती मुंवई, मध्यप्रांत, हैद्राबाद ह्या विभागाचे जातिविषयक रिपोर्टमध्ये प्रामुख्याने आलेली आहे. तसेच 'मराठी लोकांची संस्कृति' व 'महाराष्ट्रीय ज्ञानकोष' या ग्रंथात बरीच माहिती उपलब्ध आहे. याठिकाणी ही सर्व महत्वाची माहिती संकलीत करून कांही जाती जमातींची माहिती देण्यात आली आहे. प्रस्तूत विषयक समाजातील लोकांचा या जाती जमातींशी सांस्कृतिक व वांशिक संबंध कितपत पोचतो याचें आकलन होण्यास अभ्यासकाला पुढील माहिती अत्यंत उपयुक्त अशी आहे.

## वन्य व शिकारी जाती :

१९५१ साली भारतातील लोकसंख्येत शेकडा पांच लोक आदिवासी किंवा वन्य म्हणून गणले गेले. महाराष्ट्रांत भिल्ल, वारली, ठाकूर, मल्हार कोळी, कोरकू, कोलाम व गोंड इत्यादी वन्य जाती आहेत. ह्यातील बहुतेक लोक थोडी शेती करतात व त्याच्या जोडीला शिकार, रानातील माल म्हणजे मध, भात, गवत, लाकूड वगैरे गोळा करून विकून पोट भरतात. **हे जरी अरण्यात असले तरी गांवढयांशी त्यांचे शतकानुशतके साहचर्य आहे. "गांवावर अवलंबून असलेले शिकारी" असे ह्यांचे वर्णन एका समाजशास्त्रज्ञाने केले** आहे. वन्य - वन्येतरांचे संबंध गेल्या तीन हजार वर्षाचे तरी निदान आहेत.

हिंदु संस्कृतिची दाट छाया, त्यांची भाषा, संस्कार व चालीरिती ह्यावर पसरलेली आहे. इतकेच नव्हे तर त्यांच्या संस्कारांची व आचार-विचाराची छाया हिंदु संस्कृतिवर पसरलेली आहे.

निरनिराळ्या प्रांतातील आदिवासींची वस्ती सार्वत्रिक नसून प्रांताच्या कांही विशिष्ट विभागात आढळते. बहुतेक करून डोंगराळ जगली विभागात यांची वस्ती आढळते. हिंदुस्थानच्या पश्चिम भागापासून ते थेट पूर्व भागापर्यंत मधली डोंगराळपट्टी भिल्ल, कोरकू, गोंड, खोंड, मुंड, उराव वगैरे लोकांनी व्यापलेली आहे. हे सर्व वन्य लोक एकाच मानव वंशाचे की, मिश्र आहेत? सर्व एकाच वेळी हिंदुस्थानात आले कीं भिन्न मार्गे? हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास

कळण्यास अशा कितीतरी आवश्यक गोष्टी ह्या वन्य जमातीबद्दल अजून न कळलेल्या अशा आहेत. आदिमोंगोल, ऑस्ट्रेलीय व वेद्द् अशा तीन वंशाचे मिश्रण त्यांच्यात असावे असे वाटते.[1] वंश कोणताही असो, आदिवासी हे भारतातील आद्य रहिवाशी होत. या मूळ रहिवाशांचा शूरपणा हा प्रामाणिक व पारंपारिक जीवन पद्धतीमुळें आर्यांपुढें व इतर आक्रमकापुढे कमी पडला व हार पत्करून आदिवासींना मागे मागे हटावे लागले. त्यांना डोंगराच्या पायथ्याशी, पहाडावर किंवा दऱ्या खोऱ्यातून आश्रय घ्यावा लागला. आज भारतातील बहुतेक सर्व आदिवासी डोंगराळ भागात असण्याचे हेच कारण आहे.

पश्चिम विंध्य व सातपुडा प्रदेशांत भिल्ल, गोंड, बैगा, कोळी वगैरे लोक हे नाग वंशाचे वंशज तर नव्हेत ना अशी शंका येते. कारण यातील बरेच लोक आपला नागांशी संबंध सांगतात. महाभारतात बऱ्याच नागकुळांची नांवे आलेली आहेत. मनुस्मृतिमध्ये आंध्र (आंध), मेद (मृतजनावराचे मांस खाणारे), चुञ्चु (चेंचू) व मद्गु इत्यादी वन्य जातींचा उल्लेख आलेला आहे. अरण्यांतील प्राण्यांची शिकार करणे हे यांचें कर्तव्य आहे, असे मनुने प्रतिपादन केले आहे.

आपला पूर्वज आदिमानव आर्य नव्हता की अनार्य नव्हता. तो ब्राह्मण नव्हता, क्षत्रीय नव्हता की शूद्र नव्हता. तो होता केवळ शिकारी. भूक, भय, निद्रा आणि मैथुन या त्याच्या मूळ प्रवृत्ती होय. यातील पहिल्या प्रवृत्तीला अनुसरून तो शिकार करीत होता आणि त्या शिकारीवर आपली उपजिवीका करीत होता. या शिकारीवरच त्याचा वेल विस्तार वाढत होता. आजही कांही वन्य जमाती अशा प्रकारेच आपला जीवनक्रम व्यतीत करतांना दिसतात. आदिवासी म्हणजे संस्कृतिहीन रानटी लोक नसून त्यांचे स्वतःचे असे एक समाज जीवन आहे. भारतीय निर्मितीचा एक वाटा या लोकांकडे आहे. **मराठी संस्कृतीत व पिंडातही त्यांचा वाटा आहेच आहे.**[2]

* ++ ++ ++ ++ ++ ++ ++ *

१ – आमची संस्कृति – डॉ. इरावती कर्वे

२ – मराठी लोकांची संस्कृति – डॉ. इरावती कर्वे

स्ट्राऊस हा एक बंडखोर फ्रेंच मानववंश शास्त्रज्ञ आहे. त्याचा ठळक सिद्धांत असा कीं, "आदिवासी जनता हीच खरी सुसंस्कृत जनता. त्यांनी ( Civilization ) सिव्हीलायझेशनचा पाया घातला. आपण तथाकथित लोक त्यांच्या कार्याचा विध्वंस करीत आहोत. आपण म्हणतो कीं, माणूस लिहा-वाचायला लागला तिथून संस्कृतिचा उदय झाला. स्ट्राऊस म्हणतो कीं, मानवी जीवनांत क्रांती फक्त एकदाच आणि तीही पाषाणयुगात झाली. जेंव्हा माणसाने हत्यारे बनविली तेंव्हाच त्या नंतर आज जो मानवी व्यवहारांचा पसारा दिसतो, ते केवळ ( Expansion ) एक्सपान्शन आहे. क्रांती नाही."

## भिल्ल :

ही एक वन्य जात राजपूतांना, माळवा, गुजराथ व वायव्य महाराष्ट्रभर पसरली आहे. कांही भिल्ल थेट औरंगाबाद जिल्ह्यापर्यंत व महाराष्ट्राच्या मध्यापर्यंत पोंचलेले आहेत. अबू आणि आशिरगड ह्यामधील डोंगरी प्रदेशांत भिल्ल मूळ राहात असावेत व तेथून ते राजपूताना, मध्य भारत, गुजराथ व महाराष्ट्रांत पसरलेले असावेत. भिल्लानांच गुणाढच दश्यू असेही म्हणतो आणि दश्यू तर आर्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून ऋग्वेद काळापासून हिंदुस्थानच्या इतिहासात माहित आहेत.

भिल्ल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चोद्रा, धनका, धोडिया, कातकरीं, कोकणी व वारली इत्यादी अनेक वन्य जमाती आहेत. यामुळें शिरगणती अहवालामध्यें त्यांचे संख्येविषयी निश्चित कल्पना करता येत नाही. **दक्षिणेत गुजराथ भिल्ल व खानदेश भिल्ल असे दोन विभाग पडतात.** खानदेशातील भिल्ल मामाच्या मुलीशी लग्न करतात तर गुजराथेत ही प्रथा दिसत नाही. भिल्लामध्ये घोडा पवित्र मानतात. भिल्लांची वैवाहिक नीती शिथील असल्याचे म्हटले जाते.[१] भिल्ल

१ - सुलभ विश्व कोष - दाते कर्वे

लोक आपणास वाल्मीकीचे वंशज म्हणवून घेतात. भिल्लांचे संबंध नृपनामांशी असून शूरत्वाचा इतिहासही त्यांच्या नांवाशी निगडीत आहे.

## गोंड :

ही हिंदुस्थानातील एक महत्वाची, संख्येने मातब्बर व मोठ्या प्रदेशात पसरलेलीं वन्य जमात आहे. १९११ च्या खानेसुमारीत त्यांची संख्या ३०,००००० (तीस लाख) दिलेली आहे. मध्य प्रदेश व मध्य हिंदुस्थानात असलेल्या एका पट्ट्याला गोंडवन नांव आहे. येथे वस्तीस असलेल्या लोकांना गोंड हे नांव पडले आहे. ते स्वत:स कोयी अथवा कुयीं म्हणवतात. ते कोलाम व खोंड लोकांशी वंशानें व भाषेने सल्लग्न आहेत असे समाजशास्त्रज्ञाचे मत आहे. ते बाराव्या शतकात दक्षिणेंकडून पूर्व महाराष्ट्रांत आले व त्यांनी मोठालीं राज्ये स्थापिली पण मोगल आणि मराठ्यापुढे त्यांचा टिकाव लागला नाही.

या लोकात कांही धंद्यामुळेही जाती पडल्या आहेत. उच्च वर्गात मुख्य दोन वर्ग आहेत. राजगोंड हे वरिष्ठ व सत्ताधारी आणि धूरगोंड हे प्रजाजन अथवा सामान्य लोक होत.

यांच्या कांही सामाजिक चालीरिती ऑस्ट्रेलियन जमातीसारख्या आहेत, असे समाजशास्त्रज्ञाचे म्हणणें आहे. उदा. यांच्यात आजोबाचे नातीशी लग्न होते, असे संशोधक सांगतात. पण ह्याबाबतीत अधिक संशोधन झाले पाहिजे. कारण अशा तऱ्हेचे लग्न द्रविडातही होते.

यांचे सर्व आचार अलिकडें हिंदु लोकाप्रमाणेच झाले आहेत. यांची मुख्य देवता देवी आहे. वाघाचीही तें पूजा करतात. तसेच पूर्वजांची व दूल्हा देवाची पूजा करतात. कोलाम जमातीप्रमाणें हे लोक रानडुकरांच्या मागें पळून शिकार करण्यांत पटाईत आहेत. कोलाम नंतर गोंडाचा क्रम रानडुकरामागे पळण्यात दुसरा लागतो.

गोंड लोकातला अंत्यविधीही चमत्कारीक आहे. दक्षिणेकडे पायकरुन ते प्रेत पुरतात. राजगोंड प्रेत जाळतात.

(मराठी लोकांची संस्कृति, महाराष्ट्रीय ज्ञानकोष)'

**धनगर :**

ही शेळ्या मेंढ्या राखणारी जात सर्व महाराष्ट्रभर पण त्यातूनहीं विशेषत: दक्षिण महाराष्ट्रात पसरली आहे. दन (धन) हा कानडी शब्द गुरु या अर्थी आहे. उत्तर कर्नाटक व तेलंगण येथे असलेल्या कुरुबा जातीशी ह्यांचे साम्य आहे.[१]

इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लोकगीतांची सुरूवात "मेघराय पिता व धरतरी माता" ह्यांच्या नमनापासून झाली आहे. धनगर तसेच गवळी यांच्यापाशी समृद्ध लोकसाहित्य आढळते. आदिवासी व नागरवासी अभिरुचीच्या एकत्रीकरणाचे कार्य यांचेच. महाराष्ट्रांत विठोबा, मल्हारी वगैरे प्रमुख देवतांच्या कथागीतांची मालकी धनगराकडेंच आहे. तेलंगणातही धनगरांची पुराणे असून अवैदिक दैवते व प्रथा यांना वैदिक परंपरेला पुराण परंपरेला आणून जोडण्याचे कार्य यांचेच.[२]

यांचे कुलदैवते खंडोबा व विरोबा आहेत. मेंढ्या बाळगणे, लोकर कापणें, कातणे व घोंगड्या विणणे आणि बुरणुसाचे गालिचे बनविणे ही कामे हे लोक करतात. हे लोक शेळ्या मेंढ्या ही देवाची देण व धनरुपीं लक्ष्मी समजतात. ते जिवापार मेहनत घेऊन त्यांचे पालन व संवर्धन करतात. ते स्वत: त्यांची कधीही हत्या करीत नाहीत. मात्र एखादे मेंढरू मृत झाल्यास लक्ष्मी टाकून द्यावयाची नसते या भावनेतून कांही लोक त्याचा खाण्यासाठी उपयोग करतात.

* ✢ ✢✢ ✢✢ ✢ ✢✢ ✢✢ ✢✢ ✢✢ ✢✢ *

१ मराठी लोकांची संस्कृति – डॉ. इरावती कर्वे

२ लोकसाहित्याची रुपरेखा – दुर्गा भागवत

धनगरात एकंदर (२१) पोट जाती आढळतात व त्यांचे एकमेकांत लग्ने होत नाहीत. यांच्यात विधवा विवाह सर्व संम्मत आहे.

पोट जातींची नांवे : १) खुटेकर, २) हाटकर, ३) शेगर ४) अहीर, ५) परदेशी किंवा गडारी व ढेंग ६) खिलारी [झिलारी] ७) डंगे, ८) बांडगर, मेटकरी, ९) झेंडे, १०) मेंढे, मेंडके ११) हांडे १२) झाडे, १३) वऱ्हाडे, १४) तेलंगी, १५) सणगर १६) माकडवाले १७) हत्तीकंकण, १८) उनी कंकण, १९) हालमत, २०) गडवी २१) निखार.

१) खुटेकर धनगर : **यांचा मुख्य व्यवसाय घोंगडे विणणे हा होय.** यांचे कुलदैवत खंडोबा व बिरोबा आहे. यांचे लग्नात देवक असते. ते प्रेताचे दहन करतात. सुभेदार मल्हारराव होळकर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी या दोन ऐतिहासिक व्यक्ती याच शाखेत जन्मल्या. होळकर घराण्याची मराठ्यांच्या इतिहासातील कामगिरी सर्वज्ञात आहे. खुटेकर धनगर महाराष्ट्रात सर्वत्र पसरले आहेत.

२) हाटकर धनगर : हे फक्त मराठवाडा व वऱ्हाड यांच्या सरहद्दीवर नांदेड व परभणी जिल्ह्यात विपुल आढळतात. ते स्वतःला नाईक अथवा राव म्हणवतात. ह्यांना बारगी धनगर असे म्हणतात. मराठ्यांच्या राज्यात हे चांगले लढवय्ये म्हणून नावारुपास आले. वरील प्रदेशात किल्ल्यांच्या व गढ्यांच्या आश्रयाने राहून इंग्रजी राज्यातही त्यांनी इंग्रजाविरुद्ध बंडखोरी केली होती. ती सैन्याच्या मदतीने मोडून काढली गेली. पूर्वी ते दाढ्या राखीत. मामे बहिणीशी यांच्यात लग्न होते. यांचे कुलदैवत बिरोबा व खंडोबा आहे. यांच्यात कुलभाऊची चाल आहे. एकाच कुलभाऊत लग्ने होत नाहीत.

## लाडशे धनगर :

यांची वस्ती मुख्यतः विदर्भामध्ये अमरावती व भंडारा या जिल्ह्यामध्ये आहे. हे लोक शेळ्यामेंढ्या पाळतात व घोंगडी विणतात. सध्या बहुतेकजण शेती करतात. यांचे उपाध्याय "शेटे महाजन" म्हणून

पूर्वी असत. यांचें लग्नात देवक असते. यांच्यात विधवा विवाह संमत आहे. यांच्या स्त्रीया मासिक विटाळ एखादा दिवस पाळतात किंवा पाळतहि नाहीत. यांच्यात प्रेते दहन करतात.

यांचीं आडनांवे : मोरे, पेरे, खऊळ, पडोळें, घटारे, मसाने, गुटरे, पाडाळे, मुकुणे, कौल, मट्टें, मगाने, मसुने, मटके, मुकुने, मर्टे, हाटेल, काडतळे, अहीर, डोकरे, करतडे, पडारे, खौर, पोवारे, पडारे, खोड, कडतुळे, गडारे.

## कुरुबा :

कुरुंबा, कुरुबा, कुरमा : मद्रास, म्हैसूर, हैद्राबाद व कुर्ग या भागातून यांची वस्ती आहे. एकंदर लोकसंख्या [१९११] - ९, ४७, ६१९. जंगलात राहाणारे कुरुंबा आणि धनगराचा व कोष्टयाचा धंदा करणारे कुरुबा लोक यामध्ये असलेल्या संबंधाविषयी वाद असला तरी खानेसुमारीच्या रिपोर्टवरून कुरुंबा, कुरुबा व कुरुमा ही सर्व थोडयाफार फरकाने बहुदा एकच होत. वनवासी कदंब लोक हेच कुरुबा होय, असे कांही लोक म्हणतात. दक्षिणेतील धनगर, बंगाल मधील सोंथल व अहीर जातीशी कुरुबांचा संबंध होता. हरगर लोकांची एक शाखा धनगरांत आढळते, तीत कांही कुरुबा सांपडत असून, खिल्लारी नांवाची दुसरी एक जात नजरेस येते. ही खिल्लारी जात आपले बकऱ्याचे कळप घेऊन एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी अशी फिरत असते.

मुंबई इलाख्यातील कुरुबाचे मुख्य दोन वर्ग आहेत. ते हत्ती कंकण व उनी कंकण हे होत. हत्ती कंकण लोक सुती माल व उनी कंकण लोक लोकरी माल करणारे असतात. तिसरा एक वर्ग यांचा आढळतो. त्याला हंडे कुरुबा किंवा हंडे वजीर असे नांव असून ते लिंगायत पंथाचे असतात व ते मांस खातात. हत्ती कंकण धनगरांच्या मुलीशी त्यांचे लग्न होऊ शकते. परंतु लग्न झाल्यावर मुलीला पुनरपी आपल्या आईबापाच्या घरी कधीच पाठवित नाहीत. हत्तीकंकण धनगरांत खिल्लारी, संगर व हाटकर अशा जाती असून त्यात रोटी-बेटी व्यवहार चालतात.

कुरुबा धनगर गाईचे व डुकराचें खेरीज करून बाकीचे मांस खातात. यांच्या देवाचे नांव बिराप्पा असून त्यांचे पूजारी जरी कुरबन धनगरपैकी असतात तरी त्यांना वडेर म्हणतात व हे कुरबन धनगराचे पिढीजात गुरु होय.

म्हैसूरच्या रानटी कुरुंबा लोकांचे दोन वर्ग आढळतात.

१) बेट्टा अथवा डोंगरावर राहाणारे कुरुंबा : हे लोक माहुताच्या धंद्यात प्रविण असतात.

२) जेनू अथवा मध काढणारी कुरुंबा : कांही ठिकाणीं जेनांचा धंदा टोपल्या तयार करणे हा आहे.

औषधी मुळ्या व वनस्पती याचे ज्ञान कुरुबन लोकांना चांगले असते. कुरुबन जातीचा दुसरा नाद म्हणजे पोळी जमा करून मध काढणे हा आहे. ( महाराष्ट्रीय ज्ञानकोष - (क) ५८२ – भाग - ११ )

**भारवाड :**

यांची मुख्य वस्ती गुजराथेंत आहें. हे मेहेर जातीचें आहेत असे म्हणतात. ते आपण कृष्णाचा धर्मपिता जो नंद याचे वंशज आहोत असे सांगतात. हे मूळचें मथुरेजवळील गोकूळवृंदावनातील असावेत असे म्हणतात. गोकूळवृंदावनांतून त्यांनी मेवाडला स्थलांतर केले व मेवाडमधून ते गुजराथ, काठेवाडा व कच्छ या भागात पसरले असे दिसते. हे बहुतेक मेंढपाळ किंवा गुराखी आहेत. कांही शेतकरी व मजूरही आहेत. शेळ्यामेंढ्या ऐवजी बहुतेकजण गाई म्हशी पाळतात व त्याचे दूध-तूप विकून आपली उपजिवीका करतात. त्यांच्या बायकावर लोण्याचा मोठा उद्दीपक परिणाम होतो असे म्हणतात.

भारवाड हे बळकट व मध्यम बांध्याचें असतात. त्यांचा चेहरा चौकोणी असून व एकंदर बांधा बेढब असतो. त्यांचे डोळे पिंगट असतात. क्वचितच काळे असतात. यांची मातृभाषा गुजराती आहे. पंचमहाल येथील भारवाड मात्र मालवी भाषा बोलतात.

काडवा कुणब्याप्रमाणे भारवाड लोकांची लग्ने बारा, पंधरा किंवा पंचविस वर्षातून एकदा वैशाख मासात होतात व त्या दिवशी आसपासची लग्न एकाच ठिकाणीं होतात. विधवेशी लग्नें करण्याचा पहिला हक्क दिराला असतो. उत्तर गुजरात खेरीज सर्व प्रांतभर काडीमोड करण्याची चाल आहे. भारवाड लोकांचे अन्न म्हणजे दूध व मक्याची भाकरी हे आहे. सामाजिक तंटयाच्या निकालाकरिता काठेवाडमधील भारवाड लोकात १०–१२ खेडयांचा एक असे भाग केले असून प्रत्येक भागावर एक पाटील निवडलेला असतो, व तो जातीतील इतर ५–१० लोकांची सम्मती घेऊन जाती संबंधी प्रश्नाचा निकाल देतो. भारवाड लोकामध्ये बरीच आडनांवे आहेत. त्यापैकी सेन्सस रिपोर्टमध्ये आलेले आडनांवे (४६) खाली दिली आहेत.

बाबरीया, बाजुवा, बाभवा, बोसारीया, बोटारींया, बुडीया, चुचरा, दमका, दमकेर, डांगा, धनगीया, दुपडा, फनगालीया, फतारिया, गलिया, गमरिया, हडकरी, जडाब, झापडा, जूठल, कसीर, कठोडीया, रवंत, खर्गीया, खोडा, लंबारिया, लम्पका, मानगा, मनकुडा, मटीयाड, मेवाडा, मुधवा, मुंजवा, राका, रानवा, राटाडिया, रेगिया, सावसीस, शियार, सीधंत, सुरसा, तारीया, थृगा, वारू, वेरिया व वेश्रा.

( एन्थोव्हेन सेन्सन रिपोर्ट, महाराष्ट्रीय ज्ञानकोष )

## रजपूत :

मूळचे नांव राजपूत (राजपूत्र) असे आहे. हे ज्ञातीनाम एका लढवय्ये लोकांच्या समूहाला लावण्यांत येत असून त्यातही अनेक वर्ग दिसून येतात. १९११ सालच्या खानेसुमारीवरून पहाता एकंदर रजपूतांची संख्या ९४, ३०, ०९५ असून पंजाब, संयुक्त प्रांत व बंगाल या इलाख्यात त्याची वस्ती सर्वात जास्त आहे. रजपूत जातीचे केंद्रस्थान जें राजपूताना त्यांत सुमारे सात लाख रजपूत आहेत.

**रजपूत आपणाला अस्सल क्षत्रीय म्हणवितात व स्वतःला सूर्यवंशी किंवा चंद्रवंशी म्हणवितात.** नुकत्याच कांही वर्षापूर्वी लागलेल्या मानव-वंश शास्त्रीय शोधामुळे यांच्या पुरातन क्षत्रिय वर्णाला

बाध येऊ पहात आहे. आजची बहुतेक रजपूत राजघराणी इसवीसन सहाव्या शतकापुढील आहेत. मध्यें अशियातील टोळ्याची धाड हिंदुस्थानावर येऊन प्राचीन क्षत्रिय बीजाचा नाश झाला असावा असे उत्तर व पश्चिम हिंदुस्थानच्या इतिहास संशोधनावरून नक्की वाटते. तेव्हां आजचे क्षत्रिय हे शक, कुशाण, हूण इत्यादी लोकांचे वंशज असावेत. गुजराथचा इतिहासही हेच सांगतो.

वरील परकीय लोक हिंदू संस्कृतित पूर्णपणे मिळून जाऊन गुजर वगैरे नवीन हिंदू ज्ञाती नामाखालीं वावरू लागले. या हिंदुकरणाला अग्निदिव्याचे स्वरुप येऊन अग्निकुलाची कथा बनली.

रजपूतात २६ कुळी किंवा नांवे आहेत. विवाह संबंधात ब्राह्मणातील गोत्राप्रमाणे या नांवाचा उपयोग होतो. एकाच कुळीत परस्पर शरीर संबंध होत नाहीत. पण एकाच सूर्य किंवा चंद्र वंशातील माणसांत विवाह होतात. ( महाराष्ट्रीय ज्ञानकोष –र )

## आभीर किंवा अहीर :

आभीर या देशाचा उल्लेख महाभारतामध्ये व बृहत्संहितेमध्यें दक्षिणेतील एक देश म्हणून आला आहे. मत्स्य पुराणामध्ये आंध्र राजानंतर सात अभीर राजे होऊन गेले असा उल्लेख आहे. अभीरांची सत्ता नाशीक व खानदेश या भागात होती, तर अपरांत म्हणजे कोंकण क्षत्रियांच्या अंमलाखाली होता. अहीर वंशाच्या कारकीर्दीची व युधिष्ठर शकाची समाप्ती बरोबर होऊन पुढें विक्रम संवत सुरू झाला.

आज अहीरांची स्वतंत्र जात राहीली नसून लाडाप्रमाणे अनेक जातीत यांचा पोटवर्ग म्हणून समावेश झालेला दिसतो.

## मराठा व कुणबी :

मराठा नांव पडण्याची तीन कारणें संभवतात. अशी–

१) दक्षिणेतील पठरास उत्तर हिंदुस्थानातील संस्कृत लेखकांनी महाराष्ट्र असे नांव दिले.

२) महा रथात बसणारे. उत्तरेकडे आर्यांच्या समाजात रथकाराला मानाचें स्थान असे.

३) महा + राष्ट्रींक. राष्ट्रीक हा शब्द रट्ट या संस्कृत शब्दापासून निघाला असून त्याचा अर्थ जागिरदार असा आहे. **रट्ट या शद्बापासून मराठा हे नांव पडले असे सर्वसाधारणपणे समजले जाते.**

आपण प्राचीन क्षत्रियांचे वंशज आह्मो असे मराठे समजतात. त्यांच्या रीतीभाती रजपूताप्रमाणे वाटतात. उदा. पुनर्विवाह न करणे, जाणवे घालणे, पडदा पद्धती इ. लग्नविधी चाललेला असताना सुरवातीपासून अखेरपर्यंत नवऱ्याच्या हातात कटचार असते. हिंदूमधील उच्च जातीत जो लग्नविधींचा संप्रदाय तोच मराठ्यात आहे. सप्तपदी झाले की लग्नविधी संपून लग्न कायमचे बंधक झाले असे समजतात. त्यांचे उपाध्याय ब्राह्मण व ब्राह्मणेतरही असतात. एक देवक असलेल्या घराण्यात परस्पर लग्नें होत नाहीत. मामेबहिण लग्नाला योग्य व समत समजतात व क्वचित आते बहिणीशी लग्न करतात, पण ते गौण समजतात.

समस्त कुणबी व मराठे मिळून महाराष्ट्रांतील जवळ जवळ निम्मी लोकसंख्या होते. हे सर्व शेतकरी आहेत. वऱ्हाड व मध्यप्रदेश येथील शेतकरी अजूनही आपणास कुणबी म्हणवतात. क्वचित क्षत्रिय म्हणवतात. खानदेश, मराठवाडा, देश व कोंकण येथील शेतकरीं लोक स्वतःस मराठा म्हणवतात. मराठा व मराठा कुणबी यांत फारसा भेद नाही व असला तरीं तो सांगता येत नाही, इतका सूक्ष्म आहे. यांच्या देवकावरून व रितीरिवाजावरून कुणबी हे मराठा जातीचेच आहेत असे समाजशास्त्रज्ञानाचे मत आहे. यांच्यातही एकाच कुळांत व

देवकवाल्यात सोयरिक होत नाही. पुनर्विवाहाची चाल हालकी मानतात. हे भैरवाला कौल लाऊन बरे वाईट पहातात. वर्षातून दोनदा पेरणी कापणीच्या वेळी भैरवाची पूजा करतात व कोंबडें अगर बकरे मारीतात. खंडोबा हे यांचें एक प्रमुख दैवत आहे. भाताच्या पेरणीच्या वेळी भैरोवाची पूजा करून जातीभोजन घालतात.

जोतिबा, नरसोबाची वाडी, पंढरपूर वगैरे ठिकाणी हे यात्रेस जातात. महाराष्ट्राचे कांही समाजसुधारक पुढारीं झाले व त्यांनी कुळीच्या उच्च-निचतेंवर उभारलेल्या समाजरचनेविरुद्ध जोराची चळवळ करून सर्वच मराठा शेतकरी समाजाने आपणास मराठा म्हणवावे व कुणबी हे नांव टाकून द्यावे असा आदेश दिला. त्याचा परिणाम म्हणून खानेसुमारीतून कुणबी हे सदरच नाहीसे झाले व आता ते सरसकट आपणांस मराठा म्हणवतात. शेती व लढाई अशी दोन्ही कामे सभाळून शेतकरी क्षत्रिय असा असामान्य लौकीक मराठे मिळवून आहेत.

( महाराष्ट्रीय ज्ञानकोष - मराठी लोकांची संस्कृति, वर्ण व जाती.)

**लाड :**

१९०१ च्या खानेसुमारीत यांची संख्या ३, १७५ भरली. त्यापैकी १, ५४१ पुरुष होते व १६४३ स्त्रीया होत्या आणि ९७ मुसलमान होते.

लाड हे दक्षिण गुजरातच्या एखाद्या जमातीपैकी आहेत. हे लोक दक्षिण महाराष्ट्र व म्हैसूरमध्ये १४ व्या शतकातील दुर्गादेवीच्या मोठ्या दुष्काळात भटकत आले असावेत. हे लोक मुंबई राज्यातील बेळगांव, विजापूर व धारवाड या जिल्ह्यात विपुल आढळतात. यांची मातृभाषा "चौरासी" आहे. बॉम्बे गॅझेटीयरच्या संपादकाचे मत हे लोक सुरत जिल्ह्यातील "चौरासी" मधून इकडे आले असावेत. लाडांच्या मुख्यत: नऊ शाखा आहेत. त्या अशा – १) गुजर, २) मारवाडी, ३) कायीत, ४) सूर्यवंशी, ५) सुगंधी (क्षत्रिय), ६) शेरोगर ( कलाल ), ७) साव-सावजी ( जैन ),

८) खाटीक, ९) हलवेकरी. यांच्यात आपापसात रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. सूर्यवंशी या शाखेचे लोक संख्येने विपुल आहेत.

( दि ट्राइब्ज अँड कास्टस् ऑफ बॉम्बे प्रेसिडेंसी - आर. इ. एन्थॉव्हेन १९२० )

**लडार :**

हे लोक म्हैसूर, कडूर, तामकूर व चित्रदुर्ग या जिल्ह्यात आढळतात. यांच्यात सात प्रमुख शाखा आहेत, त्या अशा—

१) तेली लडार, २) अंबली लडार, ३) कालो लडार, ४) क्षत्री लडार, ५) कसाई लडार, ६) ब्राह्मण लडार किंवा (बंगलोर मधील) साहूजी, ७) साकू लडार.

म्हैसूर प्रांताचे १९०१ च्या खानेसुमारीचें अहवालात, असे म्हटले आहे कीं, लडार हे सामान्यतः व्यापारी वर्गापैकी आहेत. ते मुख्यतः शहरात आढळतात व तेथे कांचेची भांडी व सर्व प्रकारच्या साहित्याचे स्टोअर्स इत्यादींचा व्यापार करतात. हे लोक दक्षिण गुजरातच्या एखाद्या जमातीपैकीं आहेत. हे लोक दक्षिण महाराष्ट्र व म्हैसूरमध्ये चौदाव्या शतकांतील दुर्गादेवीच्या मोठ्या दुष्काळांत भटकत आले असावेत.

**व्यवसाय :** यांचे नांवाप्रमाणेच हे लोक पूर्वी घोडदळातील सैनिक व घोड्याचा व्यापार (Cavalary) करणारे होते. सध्या बहुतेकजण व्यापारी आहेत. कांहींच्या शेती-जमिनी आहेत. कसाई लडार हे मांस विक्रीचा व्यवसाय करतात.

**पोषाख व स्वरुप :** लडार हे रंगा-रुपाने सर्व प्रकारचे आढळतात. त्यांचा पोषाख इतर जातीतील लोकापेक्षा भिन्न असत नाही. क्षत्री लडार हे निरपवादपणे गळ्यात जान्हवे घालतात व बाकीचे लडार घालतात किंवा घालतही नाहीत.

( दि म्हैसूर ट्राईब्स ॲन्ड कास्टस् - भाग ४ )

## कलाल :

कलाल यांस संस्कृत कल्यापाल, कलवार, कलार, कलान अशी नांवे आढळतात.

१) संस्कृत : कल्या - दे. प्रा. कल्ला = दारू, मद्य
संस्कृत - कल्यापाल, प्राकृत - कल्लाल - कलाल

२) द्राविड : कळ = ताडी, कल्य = दारू (कानडी तद्‌भव)

३) अर् : कलवार - दारू गाळणारा, संस्कृतिकरण नंतरचे

ही कलालाची जात हिंदुस्थानातील सर्व भागांत विशेषत: बिहार, ओरीसा, संयुक्त प्रांत व मध्य प्रांत यातून आढळते. १९११ च्या खानेसुमारीत यांची संख्या ९, ५४, २४१ भरली, त्यापैकी ८,७६,०९५ हिंदु, ६४,२८३ मुसलमान, १२,६९५ शीख, व ९६३ जैन होते.

मध्यप्रांत व वऱ्हाड या भागात यांची संख्या २,००,००० (दोन लाख) आहे. त्यांना कलार म्हणतात. यांच्या पुष्कळ उपजाती असून, त्या बऱ्याच स्थानिक भेदामुळे झाल्या आहेत. मालवी, लाड, उहारिया, जेसवार, कनोजिया इत्यादी वर्गाचीं नांवे स्थानिक आहेत. यापैकी राय कलार मात्र फार निवडक आहेत.

चौसके कलार एका पूर्वजाच्या चार पिढ्यानंतर लग्न संबंध करतात. शिवहारे, आगरवाल्यास एकाच पूर्वजाच्या दोन मुलाची संतती समजतात. जैसवार, शिवहारे, कनोजिया हे उत्तर हिंदुस्थानात आहेत व ब्याहूत मध्यप्रांतात आढतात. छत्तीस गडांत दंडसेन कलार नांवाचा एक वर्ग आहे. वऱ्हाडात मठीया कलार म्हणून एक जात आहे. ते आपणास क्षत्रीय म्हणवितात. त्यांच्यात जाती पंचायतपद्धती फार व्यवस्थेशीर चाललेली दिसते.

१९११ चे खानेसुमारीत मुंबई इलाख्यात कलालांची संख्या ७८६० भरली. मुंबई इलाख्याचा मध्य भाग व गुजरात यातून कलालाची

वस्ती आहे. ठाणे जिल्ह्यात कांहीं कलार अथवा कलाल आढळतात. देवी कालिकेच्या आनुज्ञेवरून आम्हीं दारू गाळण्याचा व विकण्याचा धंदा पत्कारला आहे, असे हे लोक म्हणतात. उत्तर हिंदुस्थानांतून हे इकडे आले असावेत. यांची भाषा मराठी असते. धंद्यात चलती नसल्यामुळें बरेचसे लोक मोल मजूरी करूं लागले आहेत. हे हिंदु देव मानतात, विशेषत: खंडोबा, भैरोबा, देवी ही यांची उपास्य दैवते आहेत.

( महाराष्ट्रीय ज्ञानकोष - ( क ) – १६९-७१ )

## झाडीतील व वऱ्हाडी खाटीक :

विदर्भामधील मराठी जिल्ह्यात हिंदु खाटिकामध्ये दोन शाखा आहेत. एका शाखेस वऱ्हाडी व दुसऱ्या शाखेस झाडी किंवा झाडीतील असे म्हणतात. झाडीतील म्हणजे वैणगंगेच्या खोऱ्यातील जंगली प्रदेशातील लोक होत. यांच्यात रोटी व्यवहार चालतो पण बेटी व्यवहार होत नाहीत. दि ट्राईब्स अ‍ॅन्ड कास्टस् ऑफ दि सेंट्रल प्रॉव्हिन्सिस ऑफ इंडिया

– आर. व्ही. रसेळे

बिदर्भातील सर्वच हिंदु खाटिकांना 'मागास वर्गाच्या' सवलती पूर्वपार उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील इतर भागातील हिंदु खाटिकांचा मात्र अनुसूचित जमातीत समावेश नुकताच करण्यात आलेला आहे.

विदर्भात वऱ्हाडी व झाडीतील असे खाटिकात दोन भेद असले तरी सध्या त्यांच्यात एकीकरणाचे प्रयत्न जोमाने सुरू झाले आहेत व ते यशस्वीही झाले आहेत.

लेखकांस यांची मिळालेली कांही आडनांवे खालीलप्रमाणें आहेत.

१) तुमानें, २) माकोडे, ३) पारवे, ४) बावनें, ५) फुलसुंगें, ६) पारधी, ७) दुर्गे, ८) मदनें, ९) कटारे, १०) बिहार, ११) लारोका, १२) वानखेडें, १३) एललकार,

१४) ढोके, १५) आदिक, १६) घनोळे, १७) डोईफोडे, १८) खीरडकर, १९) मंडवे, २०) माहोरे, २१) लोहटे, २२) ढोळ,

२३) घन, २४) हिवराळे, २५) लसनकार, २६) राळोकार, २७) सदाफळे, २८) मसनकार, २९) शेंडे, ३०) गोगकार, ३१) कुऱ्हेकर, ३२) गंगतीरे, ३३) कवळकार, ३४) गुजर, ३५) पवार, ३६) कल्याणकर, ३७) चौहाण, ३८) शेलार, ३९) गायगोडे इत्यादि.

## खाटीक (आलीतकर):

ही कातडे कमावणारी जात. सुमारे दोनशे वर्षापूर्वी मारवाडातील नगरमधून इकडे आलो असे दिसते. पांच पांडवापैकी सर्वात जेष्ठ असलेल्या धर्म राजाचे आपण वंशज आहोत अशी यांच्यात परंपरागत समजूत आहे. या जातीचे लोक उंच, बळकट व चपळ असे आहेत. हे लोक मारवाडी मिश्रीत हिंदी बोलतात. यांच्यात पोटशाखा नाहीत. यांच्यात एकंदर ८४ कुळनामे आहेत, असे हे लोक सांगतात. त्यापैकी जीं कांही थोडी माहिती आहेत, ती खाली दिली आहेत.

सामरे, परेवाल, नवरे, चंडल, भुरसे, पडेलवाल, नागोरे, तेपण, पिलवाल, अशावाल, चावल, खोची, खस, सकुन्य, बुटेले, चावडे, चव्हाण, पोहाडे, साबरे.

हे लोक धर्माने सनातनी हिंदू आहेत व ते स्वतःची धार्मीक व इतर मंगल कार्ये महाराष्ट्रीय ब्राह्मणाकडून करवून घेतात. यांची मुख्य दैवते मारवाडमधील नगरचा **भैरोबा** व तुळजापूरची अंबा भवानी ही आहेत व यांची पूजा ते लग्न कार्यात करतात.

धंदा : कातडे कमावणें हा या जातीचा मुख्य धंदा आहे. हे लोक जवळपासच्या खेड्यातून (शेळ्या-मेंढ्याचे) कातडे विकत घेतात व त्यास **मसाला** लावून ते चांभार व बोहरा लोकांना विकतात. कातडें कमावण्यासाठी हे लोक लाल लाख, रंग, **मथ** [एक प्रकारचें कडदन], मीठ व एक प्रकारच्या (तरवटाच्या) झाडाचीं साल यांचा उपयोग करतात.

हे लोक मासे व कोंवडे खातात. तसेच ससा, हरीण वबकऱ्याचें मांस खातात. मात्र गाय व डुक्कर यांचे मांस खात नाहीत. हे लोक मद्य पितात. हैद्राबाद संस्थानातील जाती जमाती – पृ. क्र ३२६-२७)

ले. सय्यद सिराज उल हसन. ( इ. स. १९२० )

## पुना गॅझिटियर : ( १८८२-८४ ) पृ. क्र. ३६७.

हे लोक उत्तरेकडील तथा परदेशी लोकासारखे दिसतात. हे लोक प्रेतें दहन करतात. यांच्यात बालविवाह, विधवा विवाह व बहुपत्नीकत्वाची चाल रुढ आहे. यांच्यातील जाती प्रमुखास **'चौधरी'** असे म्हणतात. तो जातीमधील तंटे आपसात मिटवतो.

## महाराष्ट्रातील व्यावसायीक जाती :

महाराष्ट्रातील एकाच व्यावसायीक जातींमध्ये केवळ (धर्म) पंथभेद आणि स्थामभेदामुळे पांच तें पंचवीस पोटजाती आढळतात. या अनेक व्यावसायीक जातीमध्येंच उपेक्षीत लाड समाज विखुरला गेला आहे. महाराष्ट्रातील व्यावसायीक जातीरचनेची वास्तव कल्पना पुढील जातींच्या माहितीवरून येणार आहे.

**वंजारी** : हीं एक अती दूरवर पसरलेली जमात आहे. गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र या ठिकाणी त्याच प्रमाणे मध्यभारत व राजपूताना येथेही आढळते. यांचा वंशपरंपरागत धंदा म्हणजे माल (मुख्यत्वे धान्य, नारळ, खजूर वगैरे) लादून देशोदेशी तो नेऊन पोचवायचा हा होय. मोगल राजांच्या काळांत निरनिराळ्या फौजाना धान्य पुरविणारे मक्तेदार ते होते व मोगल राजानी त्यांना वंशपरंपरा किताब व जहागिरीही दिल्या आहेत. ब्रिटीश आमदानीत त्यांचा हा धंदा अजिबात बसला व हल्ली ती पशूपालन करणारी, थोडी शेती करणारी (वंजारी) व कांही ठिकाणी भटकी जमात (लमाण) तथा बंजारा म्हणून ओळखली जाते. पूर्वी एकेकाळी हजार-हजार बैलांचा तांडा घेऊन ते व्यापार करीत व स्वत:च्या बाहूनी तांड्याचे संरक्षण करीत. यांच्यात हिंदु, शीख, जैन व मुसलमान धर्मांचे लोक आहेत.

महाराष्ट्रांत यांच्या मुख्यतः खालील जाती आहेत.

१) चारण, २) गवार, ३) माथूर, ४) लाड, ५) खदाने, ६) लामधे, ७) मेदूरान, ८) भूसारे, ९) असाकर, १०) रावजीन

लमाण यांची देवी हिंगलाजमाता आहे. त्यांच्या बायका कपड्यावर सुरेख भरतकाम करतात. पूर्वी पुरुष मंडळी दारू गाळीत व मद्यपान फार प्रमाणांवर करीत. लमाण लोक कोठून तरी बाहेरून हिंदुस्थानात आले असावेत असे वाटते. त्यांची नांवे रजपूत असून, लग्नाचे वगैरे विधीही थोडेबहुत रजपूतासारखे आहेत. मध्ययुगाच्या आरंभी रजपूत, गुर्जर वगैरे ज्या जमाती हिंदुस्थानात आल्या, त्यापैकीच ही असावी असे दिसते. मामाच्या मुलींशी यांच्यात लग्न होत नाहीं. विधवेचें दिराशो लग्न होते.

**लाड वंजारी यांचे लग्नात धोबिणीचा फार मान असतो. यांचे लग्नात वाडी दैवत म्हणून विधी असतो.**

( महाराष्ट्रीय ज्ञानकोष, मराठी लोकांची संस्कृति )

**वाणी** : यांना वाणी, बनिया, लाडसके, महाजन, सावकार वगैरे नांवे असून यांच्यामध्ये बऱ्याच पोटजाती आहेत. त्या अशा–

१) खंडेलवाल, २) लाड, ३) मोड, ४) नागर, ५) कांठी, ६) अव्दास, ७) मिसरी, ८) कसेर, ९) उमरा, १०) बागरीया, ११) धुसार, १२) आगरवाल, १३) ओस्वाल, १४) मोहेश्वरी, १५) गहोई, १६) श्रीमाळी, १७) सैतवाल, १८) जैस्वाल, १९) परवार, २०) लिंगायत, २१) मराठे.

यांची एकंदर लोकसंख्या (१९११) ११, ३६, ५०० आहे. तीत मुसलमान धर्माचे ५९, ७१७ आहेत. यांचा मुख्य धंदा व्याजबट्टयाची सावसावकारी, किराण्याचा व धान्याचा व्यापार, कापडाचे दुकान चालविणे वगैरे असतो.

हिंदू वाणी मद्य-मांस निवृत्त असून खाण्यापिण्याचे नियम हे फार कडक रितीने पाळतात. सध्या थोडेच लोक प्रत्यक्ष व्यापार करतात. बरेचजण धंदा व नौकरी करतात.

खानदेशातील **लाडसंख्यात** १०८ आडनांवे आहेत. हे मुळचें गुजरातचे [लाटदेश]. यांचा कुलदेव गिरीचा व्यंकोबा आहे. **यांनाच खरोटे किंवा लाडवाणी असेही म्हणतात**. यांच्यात विधवा विवाह व घटस्फोट सर्व संमत आहे. **यांचे देवक पंच पल्लवी असून, त्यात हारळी व कडूनींब असतात**. हे लोक मांस-मच्छर खातात.

( महाराष्ट्रीय ज्ञानकोष - मराठी लोकांची संस्कृति, वर्ण व जाती.)

## सोनार :

सोनार हे नांव धंदेवाचक असल्यामुळे, या नांवाखाली विविध वर्णाचे व धर्माचे लोक येतात. उदा. यात दैवज्ञासारखे ब्राम्हण व **लाड सोनारासारखे क्षत्रीय येतात**. कांही मुसलमान, जैन व शिखही आपल्याला सोनार जातीचे म्हणवतात.

सोनारांत पुढील तेरा जाती आहे.

१) अहीर किंवा खानदेशी, २) अज्ञर, ३) देवांग अथवा दैवज्ञ अथवा पंचाळ सोनार, ४) देशी अथवा मराठे सोनार, ५) विदुर सोनार, ६) कन्नड, ७) कोकणी अथवा दैवज्ञ, ८) लाड, ९) माळवी, १०) परदेशी, ११) साड, १२) शिलवंत, १३) वैश्य अथवा जैन. या वर्गात आपसांत रोटी बेटी व्यवहार होत नाहीत.

वरील माहितीवरून असें दिसून येते कीं, ज्याला सोनारकीचा धंदा करण्यापुरते चातुर्य असते तो आपला सोनारकीचा धंदा सुरू करतो, मग जात कोणतीही असो. **अहीर व लाड सोनारांच्या लग्नप्रसंगी देवक पंचपल्लविचे असते**. लाड सोनार मांसाहारी आहेत.

( महाराष्ट्रीय ज्ञानकोष, मराठी लोकांची संस्कृति )

## कासार :

कासार यांचा परंपरागत धंदा तांबे, पितळ व कासे या धातुंची भांडी घडवणे व विकणे हा आहे. तसेच ते बांगडयाची विक्रीही करतात. ह्यांच्या कामात कसब आणि शक्ती दोन्हीचीही जरूरी लागते. पूर्वी काशांची भांडी व बांगडया करीत त्यामुळें कासार हे नांव पडले असावे.

भांडयाचे धंद्याला जातीवाचक दोन शब्द आहेत.

१) कासार, २) तांबट.

कासारामध्ये मुख्य तीन भेद आहेत.

१) त्वष्टा कासार, २) गोगार, ३) पांचाल कासार बोगार कासार जातीचा धंदा भांडी विकणे हा होय, करणे नव्हे. कासारामध्ये जैनधर्मीय बरेच आहेत. त्यांच्यातच लाड कासार एक शाखा आहे.

## गवळी :

दूध-दुभत्याच्या धंद्यावरून "गवळी" हे नांव पडलेली जात महाराष्ट्रात आहे. दक्षिण हिंदुस्थान, कोंकण व कर्नाटक या प्रांतभर हे लोक आहेत.

धनगर, कुरुबा, मराठा, कुणबी इत्यादी लोकांचा भरणा या जातीत बराच असून त्यांच्या धंद्यावरूनहि एक स्वतंत्र जात झालेली आहे. यांच्यामध्ये आठ पोटप्रकार असून त्यांच्यात परस्पर बेटी व्यवहार होत नाहीत. यांच्यात अहीर गवळी व लाड गवळी अशा दोन जाती आहेत.

## हलवाई :

ही केवळ एक जात नाही. मिठाई तयार करणे व विकणे हा व्यवसाय करणाऱ्या अनेक जाती आहेत. अहीर, जैन, लिंगायत, मराठे,

मारवाडी, परदेशी, शिंपी, लाड, तेली यासारखे हलवायांचे प्रकार आहेत. यांना उत्तर हिंदुस्थानात मिठाइया किंवा मुरिया म्हणतात. त्यांना हिंदु समाजात कांही मान आहे. त्यांची हातची मिठाई सर्व लोक खातात.

( महाराष्ट्रीय ज्ञानकोष, मराठी लोकांची संस्कृति )

## कुंभार :

मातीची भांडी घडविणारी ही धंदेवाईक जात. वेदकाळपासून कुंभार कामाची माहिती आर्यांना होती हे प्रसिद्ध आहे. ऋग्वेदात मातीच्या भांड्यांचा उल्लेख आहे.

संस्कृत कुंभकार शब्दापासून कुंभार, कोहार व कोनहार असे शब्द बनले आहेत. कुंभारात सर्व धर्मांचे लोक सांपडतात. त्यांच्यात हिंदु, मुसलमान, शीख व जैन धर्मीय लोक आहेत. हिंदु कुंभारात पुढील बावीस वर्ग आहेत.

अहीर किंवा लहान चाके, बळदे, भांडू, चागभंस, गरेते, गुजर, गोरे मराठे, हातघडे किंवा भोंडे किंवा भोंडकर, हातोडे, कन्नड, कर्नाटके अथवा पंचम किंवा लिंगायत, खंगाटी, कोकणी, लाड किंवा थोरचाके किंवा लाडभुजे, माळवी, मराठा, परदेशो, रजपूत, सोरठिया, वरिया आणि वाटलिय.

कुंभार हे मुख्यत: मराठा, कोकणी, गुजराथी व परदेशी या चार प्रकारात समावतात. यांच्यात आपापसात बेटी व्यवहार होत नाहीत. यांचा मुख्य धंदा म्हणजे मातीची भांडी, कौले, विटा व मातीची खेळणी इत्यादीं तयार करणे हा होय.

## कोष्टी :

ही एक विणकरांचा धंदा करणारी जात आहे. यांच्यात पुढीलप्रमाणें पोट प्रकार आहेत.

१) हळबी, २) लाड, ३) कोष्टी, ४) गधेवाल, ५) देशकर
६) देवांग, ७) पटवीं.

तेलगू कोष्टचास साळेवार म्हणतात. साळेवारांत सूतसाळे व पद्मसाळे असे दोन वर्ग आहेत. हळबा कोष्टी हे नागपूरच्या भागात आहेत. हे फार चांगले कपडे विणतात. धोत्रे व लुगडी यांचीं नागपूरांस प्रसिद्धी आहे. कोष्टचात कांही लोक मांस खातात व कांही खात नाहीत.

## तेली :

ही जात सर्व महाराष्ट्रभर पसरलेली आहे. यांच्यात प्रादेशिक व इतर पोट विभाग पुष्कळ आहेत व त्यात एकमेकात लग्ने होत नाहीत. तेली जातीत खालीलप्रमाणे शाखा आहेत.

१) पंचम किंवा लिंगायत, २) कानडे, ३) लाड, ४) गुजर' ५) आयार, ६) कंडी, ७) शनवार, ८)शुक्रवार, ९) राठोड, १०) परदेशी, ११) निळवण, सोमवार अथवा मराठें.

( महाराष्ट्रीय ज्ञानकोष, मराठी लोकांची संस्कृति )



# लाड समाजाचा शोध

लाड समाज महाराष्ट्रात सर्वत्र विखुरलेला आहे. दुष्काळाचे खाईत हे लोक सांपडले व त्यांना लाटदेश सोडून परांगदा व्हावे लागले. उपजिविकेसाठी अनेक व्यवसाय पत्करावे लागले. यामुळे या समाजाच्या अनेक पोटशाखा आढळतात. हा समाज विस्कळीत असल्यामुळें व या समाजाचा सखोल अभ्यास यापूर्वी झाला नसल्यामुळें या समाजातील लोकांनाहि त्यांचे समाजाविषयी कसलीही माहिती नाही. हे लोक मुळचे दक्षिण गुजरातचे ( लाटदेश ) असून, चौदाव्या शतकातील दुर्गादेवीचे दुष्काळात इकडें आले एवढीच माहिती ज्ञानकोष व इतर मराठी ग्रंथात उपलब्ध आहे. या समाजाची अधिकात अधिक माहिती मिळविण्यासाठी लेखकाने हिस्टरी ऑफ गुजरात, कर्नाटकातील व महाराष्ट्रातील जातीविषयक रिपोर्ट यातील उपलब्ध माहिती संकलीत केली आहे. यामुळे या समाजाची ओळख होण्यास बरीच मदत झाली आहे.

लाड लोक हे चौदाव्या शतकातील दुर्गादेवीच्या दुष्काळात दक्षिण महाराष्ट्रात व कर्नाटकात आले असले तरी सर्वच जातीमध्यें त्यांना आजही परकेपणाची वागणूक मिळते, असे दिसतें. आगगाडीमध्यें आधी आलेले प्रवासी नंतर येणाऱ्याच्या विरुद्ध एकत्र येतात. तसाच हा प्रकार आहे. ललाट अथा लाडब्राह्मण ही ब्राह्मण समाजाची एक शाखा आहे. तथापि सुमारे चाळीस वर्षापूर्वी लाडब्राह्मण हे खरे ब्राह्मणच नाहीत असे ब्राह्मण समाजाचे इतर लोक समजत व त्यांचेंशी ज्ञातिसंबंध ठेवीत नसत. या लाड ब्राह्मणाना जान्हवे घालण्याचा आधिकार त्यांचे नाशिकचे पुरोहित कै. पराशर यांनी मिळवून दिला व हे लोक ब्राह्मण शाखेचे आहेत असे त्यांनी सिद्ध केले, असे पराशर यांचे चिरंजीवानी प्रत्यक्षात नाशिक मुक्कामी लेखकास सांगितले. पुढारलेल्या ब्राह्मण समाजात ही उपेक्षा तर सोनार, कासार, कुंभार, वाणी इत्यादी जातीमध्यें काय प्रकार असेल हे वेगळे सांगावयास नको. तेव्हां महाराष्ट्रात पांचशे वर्षापूर्वी आलेल्या समाजाची ओळख करून देण्याचा लेखकाचा या ठिकाणी एक प्रामाणिक प्रयत्न आहे. या समाजाची खरी माहिती झाल्यानंतर परकेपणाची भावना जाऊन ही मंडळी आपल्यापैकींच आहेत असे सर्वांना वाटेल अशी लेखकास आशा व खात्री आहे.

## लाट :

( हिस्टरी ऑफ गुजरात – गॅझेटियर, कोषखंड - १.
भाग - १ पा. नं. ७ – सन १८९६ )

मही ते तापी नदीपर्यंतचा (दुआब) दक्षिण गुजरातचा प्रदेश हा 'लाटदेश' होय. लाट हे नांव संस्कृत भाषेतील दिसत नाही. तरीपण हे नांव प्राचीन आहे. लटाका या संस्कृत शब्दाचे रुप असलेला लारीके[1] हा शब्द टॉलेमी (इ. स. १५०) वापरतो. तिसऱ्या शतकातील वात्सायन, त्याच्या 'कामसूत्र' या ग्रंथात, या प्रदेशास 'लाट' या नांवानेच

१ - बर्टिअस टॉलेमी, खंड ७ - प्रकरण १ ले.

संबोधितो. माळवा प्रांताच्या पश्चिमेस 'लाटदेश' आहे असे त्याचें वर्णन करून वात्सायन तेथील लोकांच्या[2] विविध चालीरितींचीं माहिती देतो. 'लाट' हे नांव तिसऱ्या शतकानंतरच्या अनेक ग्रंथात, लेण्यामध्ये व शिलालेखात नेहमीच आढळून येतें. सहाव्या शतकातील महान ज्योतिषशास्त्रविशारद वराहमिहिर हा लाटदेशाचा उल्लेख करतो. तसेच हे नांव पांचव्या शतकातील[3] अजंठा व मंडोसोर येथील लेण्यामध्ये कोरलेले आढळून येतें. या नंतरच्या काळातील [ इ. स. ८५१ ते ८७९ ] चालुक्य-गुर्जर व राष्ट्रकुटराजे[4] यांच्या लेण्या व शिलालेखात आणि आठ ते बाराव्या शतकातील[5] अरब प्रवाशांच्या व इतिहासकारांच्या ग्रंथात 'लाट' या नांवाचा उल्लेख सर्रास आढळतो.

**लाट या स्थानिक जमातीचे लोकावरून 'लाट' हे त्या प्रदेशाचे नांव पडले असावे व 'लाट' हे सुपरिचित राष्ट्रकूटच असावेत. कारण** 'र' व 'ल' ही अक्षरे सर्रास परस्पराऐवजी वापरण्याची प्रथा आहे. ( सारांश, 'र' चा अपभ्रंश 'ल' असा होतो. ) तसेच राष्ट्रकूटांचा महान राजा अमोघवर्षा ( इ. स. ८५१-८७९ ) हा स्वतःस 'रट्ट' राज घराण्यातील म्हणवितो.

++ ++

२ - वात्सायन सूत्र - प्रकरण २ रे.

३ - पश्चिम भारताची पुराण वस्तु पहाणी - प्रकरण ४ थे-१२७
मंडोसोर लेण्यामध्ये (इ.स. ४३७-३८) रेशीम विणकऱ्यांचा 'लाटवैश्य' असा उल्लेख आहे. फ्लिटस्-कॉर्पस अिन्स - इंडिया प्रकरण -३. -पान ६० लेखक ( डिटो इ. स. ८४ ) याने लाटदेशाचे वर्णन केले आहे, तो म्हणतो. हा देश हिरव्यागार डोंगरानी सजलेला आहे. चोहोकडे सुगधीत पुष्पाची झाडी असून मंदीरे, विहार व प्रार्थनागृहे यामुळे वातावरण अतिशय प्रसन्न आहे.

४ - प्राचिन भारत - १४, पान १५७, १५८, १६३, १८०, १८८, १९६, १९९, २०४.

५ - अिलिवट इतिहास - १, पान ३८८.

सौंदत्ती व बेळगांव येथील रट्टांचे मूळ गांव 'लत्तातूरा' हें लाटदेशात असावे व त्यानीच हे नांव त्यांच्या राज्याला व घराण्याला दिले असावे.[६] याबाबतीत लक्षात ठेवण्यासारखी महत्वाची गोष्ट म्हणजे माळवा प्रांतातील भडोच व धार या शहरांच्यामधील 'बाघ' व 'तांडा' ही गांवे आजही 'राटा प्रदेश' या नांवाने ओळखली जातात.

++++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++

६ – तुलनेसाठी - प्राचिन भारत प्रकरण - १४ पान - ३२५.

प्रस्तुतविषयक लेखकाची टीप :

१) लत्तातूरा, म्हणजे हल्लीचे लातूर हे गांव लाटदेशातील नसून ते मराठवाड्यात आहे.

२) वात्सायानाचे कामसूत्रामध्ये, वर सांगितल्याप्रमाणें, लाटदेशातील लोकांच्या चालीरितीविषयी कसलीहि माहिती दिलेली नाही· या कामसूत्रात (प्रकरण २) लाट नारीचा स्वभाव व तिच्या सौंदर्याचे वर्णन फक्त कामसूत्राचे संदर्भात करण्यात आले आहे.

## लाड :

लाड ही मूळची एक राष्ट्रजात असावी असा पुष्कळांचा तर्क आहे. लाटदेश (दक्षिण गुजरात) हे तिचे वस्तीस्थान असून लाट या नांवाचा लाड हा अपभ्रंश असावा. आज लाडांची स्वतंत्र जात राहाली नसून अहिराप्रमाणे वाणी, कुंभार, सोनार, वंजारी वगैरे जातीत यांचा पोटवर्ग म्हणून समावेश झालेला दिसतो. गुजराथेत दुर्गादेवीचा दुष्काळ पडला तेव्हा लाड लोक खाली दक्षिणेत येऊन निरनिराळें धंदे करून राहीले, अशी कथा सांगतात. लाट देशांत लाडी (लाठी) नांवाची भाषाही होतीं, तिचे पुढे गुजराथीत रुपांतर झाले.

(महाराष्ट्रीय ज्ञानकोष - (ल))

लाट देश म्हणजे महि व तापी या नद्याचा दुआब होय. लाट देश हे प्राचीन नांव असून त्या ठिकाणी सध्याच्या सूरत जिल्ह्याचा भाग येतो.लाटदेशात इ. स. पू. १६००–१७०० च्या सुमारास संस्कृत

भाषिक आर्यांनी वस्ती केली, असे अनुमान काढले जातें. इ. स. ८४ मधील लाट देशाचें अतिशय सुंदर वर्णन केलेले आढळते. इ.स. ८४ मध्ये लाटदेशाविषयी श्री. डिटो यांने लिहीले आहे कीं, "हा देश हिरव्यागार डोंगरानीं सजलेला आहे. चोहोकडे सुगंधीत पुष्पांनी झाडी अच्छादित असून मंदीरे, विहार व प्रार्थनागृहे यामुळे येथील वातावरण अतिशय प्रसन्न आहे." या वर्णनावरून लाटदेशाची प्राचीन संपन्नता लक्षात येते. ही माहिती हिस्ट्री ऑफ गुजरात - गॅझेटीयर भाग १ (पृ. क्र. ७) यामध्यें मागे आलेली आहे. याच गॅझेटीयरमध्ये (इ.स. १८९६) 'लाट' या नावाचे उत्पत्तीबद्दल विवेचन दिले आहे. ते असे. "लाट या स्थानिक लोकांच्या नांवावरून 'लाटदेश' असे नांव पडले असावे. लाट म्हणजेच सुपरिचित असलेले 'राष्ट्रकूट' असावेत. कारण राष्ट्रकूटांचा अमोघवर्ष (इ. स. ८५१) हा थोर राजा स्वतःस 'रट्ट' राज–घराण्यापैकी समजत असे आणि 'ल' व 'र' ही अक्षरे सर्वसाधारणपणे परस्परा ऐवजी वापरण्याचा प्रघात असल्यामुळे लाट हा राट अथवा रट्ट चा अपभ्रंश असावा."

लाट अथवा लाड यांचे विषयीं एवढे संयुक्तीक विवेचन वरील एकाच ठिकाणी सांपडते व ते अत्यंत महत्वाचे आहे. सदरील विवेचनाचा स्पष्ट अर्थ असा कीं, लाड म्हणजे राष्ट्रीक आर्य अथवा रट्टे आहेत. मराठे देखील स्वतःस राष्ट्रीक आर्य अथवा रट्ट म्हणवितात. लाड व मराठे यांच्या वसाहती दक्षिणेकडे कशा झाल्या हे पाहिल्यास यांच्यातील साम्य लक्षांत येईल. लाट देश हे दक्षिण गुजरातचे प्राचीन नांव आहे. दक्षिण गुजरात व महाराष्ट्रातील लोकामध्ये मानववंश शास्त्रदृष्टचा किती जवळचे साम्य आहे, हे डॉ. इरावती कर्वे यांनी त्यांचे 'मराठीं लोकांची संस्कृति' या ग्रंथात स्पष्ट केले आहे. त्यांचा जो लेख या ग्रंथात सुरुवातीस दिला आहे, त्यातील ठळक अक्षरातील मजकूर वाचकानी परत डोळ्याखालून घालावा म्हणजे लाट प्रदेशातील 'लाड' व मराठीं माणूस यामध्ये वांशिकदृष्टचा किती जवळचे साम्य आहे हे लक्षात येईल.

## लाड व मराठे :

रट्टे अथवा राष्ट्रीक आर्यांच्या महाराष्ट्रांतील वसाहती पूर्व व पश्चिम या दोन्ही दिशांनी कशा झाल्या हें लक्षात घेतल्यास असे दिसून येईल कीं, 'लाटदेश' हें पश्चिमेकडून दक्षिणेंत येणाऱ्यांचें **प्रमुख प्रवेशद्वार** होते. संस्कृत भाषिक आर्यांनी इ. स. पू. १६०० - १७००च्या सुमारांस या प्रदेशात वस्ती केली. त्यावेळी लाट देश असे नांव रुढ नव्हते. पश्चिमेकडील याच मार्गाने राष्ट्रीकआर्य महाराष्ट्रात आले. त्यांचे आक्रमण एका कालखंडात झाले नसून ते अनेक शतके चालू असण्याचा संभव आहे. या रट्टचांच्या वसाहतकालापूर्वीच हा प्रदेश (लाटदेश) संस्कृत भाषिक आर्यांनी संमृद्ध व संपन्न बनविला होता. अशा या संमृद्ध देशांत पश्चिमेकडून खाली सरकणाऱ्या रट्टचांनी अनेक शतके वस्ती केली व तेथे आपला सामाजिक व सांस्कृतिक ठसा उठविला असला पाहिजे. या राष्ट्रीकांचा या प्रदेशातील वसाहतकाल हा सामान्यत: शक पूर्वी चारशें ते पांचशें वर्षे असावा व त्यांचे वसाहत कालापासून (इ. स. पू. ५०० ) लाटदेश असे नामाभिधान या प्रदेशांस प्राप्त झाले असावे. याच वेळी महाराष्ट्र दंडकारण्य या नांवाने ओळखला जात होता. या दंडकारण्यात राष्ट्रीकांची वसाहत तेथे जंगले असल्याने सर्वांत शेंवटी झाली. राष्ट्रीकांनी ज्याप्रमाणे लाट देशात वसाहती केली तशीच पूर्वेकडे उत्तरेतून येऊन विदर्भात आपली वसाहत केली असे दिसते. दोन्ही प्रदेशातील त्यांचा वसाहत काल सारखाच असावा. लाट देशात वस्ती करून पश्चिमेकडून खाली सरकरणारे रट्टे म्हणजेच वरील माहितीप्रमाणे लाड आहेत. तर पूर्व व पश्चिम या दोन्ही दिशांनी उत्तरेतून खाली येऊन संपूर्ण महाराष्ट्रांत वस्ती करणारे रट्टे म्हणजे मराठे आहेत, असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल. महाराष्ट्रांत पूर्व व पश्चिम या दोन्ही दिशांनी आलेले रट्टे मुळचे कोण आहेत, याचा अजून सखोल अभ्यास झालेला नाही. हा एक स्वतंत्र मानवंशशास्त्राच्या कक्षेतील विषय आहे. या रट्टचांना 'राष्ट्रीक आर्य' असे सर्वसाधारणपणें संबोधण्याचा प्रघात आहे या लोकाविषयी इतिहासकार राजवाडे यांचा सिद्धांत पुढे दिला. आहे, तो महत्वाचा आहे.

## महाराष्ट्रीक लोकाविषयी इतिहासकार राजवाड्यांचा सिद्धांत :

गोतमबद्धाच्या वेळी झालेली क्रांती ही केवळ धर्मक्रांती नव्हे, किंवा मतक्रांती नव्हे, ही सर्वव्यापी भयंकर समाजक्रांती होती. या प्रचंड क्रांतीने वैदीक समाजाचे पाय उखडून चातुर्वर्णिक समाज सुलटाचा उलटा होऊन गेला. त्यांत महानंदी शैशुनाग या क्षत्रियाला शूद्र स्त्री पासून झालेला जो महापद्म तो सम्राट झाला व तो सत् क्षत्रियाचा संहार करण्यास उद्युक्त झाला. अशा अधार्मिक, अराजक, असत्य राज्यात राहण्यांत अर्थ नाही असे उत्कटत्वाने ज्यांच्या प्रत्ययास आले, अशा नर्मदोत्तर प्रदेशांतील अनेक चातुवर्णीकांनी दक्षिणारण्यांत वसाहती करणाच्या निमित्ताने देशांतर केले. महारट्ट उर्फ महाराष्ट्रीक लोक याच वेळेस महाराष्ट्रांत आलेले आहेत, असे राजवाड्यांचें मत आहे. अशोकाच्या शिलालेखांत उल्लेख असलेले राष्ट्रीक आणि हे महाराष्ट्रीक एक नसून राष्ट्रीक हे कुरू **पांचालातून** आलेले, तर महाराष्ट्रीक हे मगधांतून आलेले असावेत..

शेवटी राष्ट्रीक, वैराष्ट्रिक व महाराष्ट्रीक या सर्वांचा समावेश एका महाराष्ट्रीकांत होऊन हल्लींच्या मराठ्यांचें पूर्वज बनले असा राजवाड्यानी सिद्धांत केला आहे.

( धनगर समाजाचे ऐतिहासिक दिग्दर्शन - पृ. क्र. ७९
लेखक : शंकर नानाजी बुचडे )

## लाड लोक व राष्ट्रकूट राजे :

चौदाव्या शतकातील दुर्गादेवीच्या मोठ्या दुष्काळांत लाटदेश उजाड झाला. या दुष्काळांचे सुमारे दोन शतकापूर्वी, यादवकाळी महाराष्ट्राची अत्रुटित परंपरा निर्माण झाली होती, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे यादव हे इतिहासात 'मराठे' म्हणून ओळखले जाणारे पहिले राजे आहेत. त्यांचे पूर्वीचे राष्ट्रकूट राजे हे स्वतःस 'रट्ट' या राज घराण्याचे म्हणवीत. यामुळेच राष्ट्रकूटाचे इतिहासाशी रट्टे अथवा लाड यांचा जवळचा संबंध असावा असे दिसते.

मान्यखेट (हल्लीचे मलखेड - जि. गुलबर्गा), लाढ (दक्षिण गुजरात), सौदंत्ती (बेळगांव जिल्हा) व हस्तीकुंडी (जोधपूर संस्थान) वगैरे अनेक ठिकाणीं राष्ट्रकूटांनी राज्य केले. राष्ट्रकुटांनी ज्या ज्या ठिकाणी राज्य केले त्यापैकी बहुतेक ठिकाणी लाड समाज आजही बहुसंख्येने आढळतो.

दुर्गादेवीचे दुष्काळापूर्वी अनेक शतके रट्टांची एक शाखा लाटदेशांतून खाली दक्षिणेत येऊन मराठवाड्यातील लत्तातूरा म्हणजे हल्लीचे लातूर येथे स्थाईक झाली असावी. यामुळेच राष्ट्रकूट हे मूळचे लातूरचे असे म्हणण्याचा प्रघात पडला असावा. लातूरचे राष्ट्रकुटांनी मान्यखेट येथे राज्य केले. आजही मराठवाड्यांत लाड समाज बहुसंख्येने आढळतो व 'सूर्यवंशी लाड' या नांवाचे प्रखर अभिमानी (प्रस्तूत विषयक समाजातील) लोक लातूर भागात आढळतात. लातूर हे नांवच मुळी लाट या नांवाशी संबधीत वाटते. (लाट + ऊर, या ठिकाणी ऊर हा कानडी शब्द 'गांव' या अर्थी आहे.)

सौदंत्ती (बेळगांव जिल्हा) येथे राष्ट्रकुटांनी अनेक वर्षे राज्य केले. या भागातील बेळगांव, विजापूर व कारवार या जिल्ह्यांत आजही लाट समाज बहुसंख्येने आढळतो. राष्ट्रकुटांचे राज्य व लाड समाजाची वस्ती यांचा वरीलप्रमाणे संबंध दिसतो. वरील ठिकाणचा सर्व लाड समाज दुर्गादेवीच्या दुष्काळात तसेच त्यापूर्वीही अनेक शतके लाट देशांतून येऊन स्थाईक झाला असावा असे दिसते. राष्ट्रकुटांचे राज्य महाराष्ट्रांवर सव्वादोनशें वर्षे [इ.स. ७५०-९८२] चालले होते. राष्ट्रकुटांचा इ. स ९८२ त पाडाव झाल्यातर या राज्याची अनेक शकले झालीं. तेव्हांपासूनच लाड समाज विस्कळीत झाला असावा.

## लाड समाज व बहामनी राजे :

चौदाव्या शतकांतील दुर्गादेवीच्या दुष्काळांत बहुसंख्य लाड लोक हे लाटदेशांतून दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटक या भागात भटकत आले. महाराष्ट्रातील बऱ्याच भागातहि हा दुष्काळ पडला होता. या

वेळी बहामनी सुलतानाचे महाराष्ट्रांवर राज्य होते व त्यांची राजधानी गुलबर्गा येथे होती. त्याकाळी निर्वासित लाडापैकी जे लोक दक्षिणेत आले, त्यांनी अनेक व्यवसाय उपजिवेसाठी पत्करले. त्यांचेपैकीच गुलबर्गा भागात कांहीनी मद्य – मांस विक्रीचा व्यवसाय पत्करला असे दिसते. हा व्यवसाय करणारे 'सूर्यवंशी लाड' आजही बहुसंख्येने गुलबर्गा येथे विपुल आढळतात.

बहामनी राज्यामुळें दक्षिणेंत मुसलमानांची आवक मोठया प्रमाणांत झाली होती. यामुळें मद्य-मांस विक्रीच्या व्यवसायास प्रथम गुलबर्गा भागात चालना मिळाली असावी असे वाटते. बहामनी राज्याचे प्रसाराबरोबरच या व्यवसायाचा फैलाव महाराष्ट्रांत कांही ठिकाणी झाला असावा. दुसऱ्या महमूद शाहच्या काळात (इ. स. १४६२–८२) दाभोळ - चौलचे कोंकण बहामनी सत्तेखाली आले. तसेच जुन्नर, चाकण, कोल्हापूर, वाई वगैरे प्रांतही त्यांच्या राज्यांत समावले गेले. इ. स. १४५३ पासून ते इ. स. १४८० पर्यंत बहामनी राज्याचें लष्करी ठाणें वाईस होते. प्रसिद्ध वजीर महमंद गवान मरण पावल्यावर बहामनी सत्ता कमकूवत होऊन या राज्याचें पांच तुकडे पडले. (इ. स. १४८५). ते असे–

१) वऱ्हाडची इमादशाही, २) विजापूरची आदीलशाही, ३) अहमदनगरची निजामशाही, ४) गोवळकोंडयाची कुतूबशाही व ५) बिदरची बरीदशाही.

बहामनी राज्याचें वरील प्रकारे पांच तुकडे पडल्यामुळे, सहाजिकच मद्य-मांस विक्री करणारी लाड मंडळी वरील पांच ठिकाणी विखुरली गेली असे दिसते. विजापूर, अहमदनगर, बिदर व हैद्राबाद येथे आजही हा समाज विपुल आढळतो.

### लाडांची समाज रचना :

राष्ट्रीक आर्यांनी दक्षिणेत वसाहत केली, ती मुख्यत: वैदिक धर्माचे रक्षणासाठी असे समजले जाते. वैदिक धर्मानुसार हा लाड

२२८२२ निबंध २८/७/८५

समाजही सुरुवातीचे काळांत चातुर्वर्ण्याधिष्ठीत असावा. या राष्ट्रीक आर्यांनी लाट देशात वसाहत केली, तेव्हां त्यांचा, त्यांचेहि पूर्वी आलेलें संस्कृत भाषिक आर्य व तेथील मूळ रहिवाशी (वन्यलोक) यांचेशी संबंध आला असावा. अशा परिस्थितीत, १) लाटदेशातील मूळचे रहिवाशा लोक, २) संस्कृत भाषिक आर्य, ३) राष्ट्रीक आर्य व ४) इतर जमाती, यांच्या एकत्रीत समाज जीवनात श्रम विभागाचे तत्वावर १) ब्राह्मण. २) क्षत्रीय, ३) वैश्य व ४) क्षुद्र या चारी वर्णाचे लोक असावेत असे वाटते. आजही लाड समाजात या चारही वर्णाचें लोक आढळतात. ते असे– १) ललाट अथवा लाड ब्राह्मण, २) 'सूर्यवंशी लाड' म्हणविणारे वहुसंख्य लोक आहेत. हे स्वतःस क्षत्रीय समजतात. यांनाच दक्षिण कर्नाटकांत क्षत्रीय लाड म्हणतात. ३) निरनिराळे उद्योग व व्यापार करणारे वैश्य लाड सार्वत्रीक आहेत, व ४) लाढन अथवा लाडवत हे हरिजनापैकी आहेत.

प्राचीन लाटदेशांत वरीलप्रमाणे चातुर्वर्ण्याधिष्ठीत समाज व्यवस्था रुढ असावी व या समाज व्यवस्थेवर अनेक प्रहार झाले व त्यामुळेच ती नष्ट होऊन तिच्या अनेक जाती व पोटजाती निर्माण झाल्या असाव्यात. या समाजव्यवस्थेवर मुख्यतः खालील प्रहार झाले आहेत.

१) या समाज व्यवस्थेवर पहिला प्रहार झाला तो जैन धर्माचे प्रसारामुळे. अमोघवर्षानंतरचे राष्ट्रकूट राजे जैनधर्मिय निघाले. यामुळे लाटदेश, सौदन्ती, मान्यखेट येथील राष्ट्रकुटांच्या अंमलाखालील प्रदेशांत जैन धर्माचा प्रसार झाला. या भागात आजही लाड-जैन विपुल आढळतात.

२) दुसरा मोठा प्रहार चौदाव्या शतकातील दुर्गादेवीचा दुष्काळ हा आहे. या दुष्काळात संपूर्ण लाटदेश उजाड झाला व लाट समाजात व्यवसायानुसार अनेक पोटशाखा निर्माण झाल्या.

३) दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटक येथें लिंगायत धर्माचा प्रसार झाला, तेव्हां अनेक लाड लोकांनी त्या धर्माचा स्विकार केला असे दिसते.

४) सर्वात कहर केला, तो मुसलमानांचे जुलूम जबरदस्तीचे धर्मप्रसाराने. या शेवटच्या प्रहारामुळें मद्य-मांस विकणाऱ्या लाड समाजाचे अनेक लोक धर्मांतरास बळी पडले.

वरीलप्रमाणे धर्मांतरामुळें व प्रादेशिक इत्यादी भेदामुळे आज लाड समाजाच्या खालीलप्रमाणे अनेक शाखा पडलेल्या दिसतात.

१) सूर्यवंशी अथवा क्षत्रीं, २) ब्राह्मण [ललाट], ३) कायीत [कायस्थ], ४) लाढवन (हरिजनापैकी), ५) जैन, ६) लिंगायत, ७) गुजर, ८) मारवाडी, ९) उदांबर व १०) साव, इत्यादी.

केवळ व्यवसायानुसार क्षत्रिय व वैश्य लाडांच्याही अनेक पोटजाती निर्माण झालेल्या आढळतात. त्या अशा-

१) कलाल अथवा शेरोगर, २) खाटीक, ३) तेंली
४) कासार, ५) कोष्टी, ६) वंजारी-लाडजीन,
७) वाणी-लाड सक्का, ८) सोनार, ९) कुंभार-लाडभुजें
१०) हलवेकरी ११) गवळी, १२) सुगंधी.

आर. ई. एन्थॉव्हेन यांचे जाती विषयक रिपोर्टमध्ये लाडांचे विषयी त्रोटक माहिता उपलब्ध आहे. त्यातील महत्वाचो माहिती येथे देत आहे-

एकोणीसाव्या शतकाचे सुरूवातीस म्हैसूरमधील लाडाविषयी लिहितांना इंग्रज गॅझेटीयरकार बुचानन याने म्हटले आहे कीं, "लाड हे घोडदळातील सैनिक व घोड्याचा व्यापार करणारे (Cavalary) आहेत. तसेच त्यांच्या मालकीच्या शेती - जमिनी आहेत. ते स्वतःस क्षत्रिय म्हणवितात व गळ्यात जानवे घालतात. ते गळ्यात जानवे घालीत असल्यामुळें व घोडदळात सैनिक असल्यामुळे हे लोक मुळचे राजपूत असावे, असे दिसतें.

मुंबई प्रदेशात (दक्षिण महाराष्ट्र व सीमा भाग) या लोकांची वरील स्थानावरून अधोगती झाली आहे, असे दिसते व हे लोक निरनिराळ्या व्यवसायात पडलेले आहेत. कांहीजण शेळ्या-मेंढ्याचे मांस विकतात. परंतु बहुतेकजण गळ्यात जानवे घालतात व स्वतःस क्षत्रिय म्हणवितात. मांस विक्री करणारे लाड लोक विजापूरांत विपुल सांपडतात व ते स्वतःस सूर्यवंशी लाड असे म्हणवितात. यावरून त्यांचा लाडांचें सूर्यवंशी या मूळ शाखेशी संबंध दिसून येतो. **हे लोक मांस विक्रीचा व्यवसायांत कां पडले, याचे निश्चित कारण देता येत नाही.**"

(दि ट्राइब्स अँड कास्टस् ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी - पृ. क्र. ३३४ - १९२०)

# महाराष्ट्र व सीमाभागातील हिंदु खाटीक समाज

या ठिकाणी प्रथम आपणास मराठवाडा व सीमाभागातील 'सूर्यवंशी लाड खाटीक तथा कलाल' यांच्या माहितीचा विचार करावयाचा आहे. हे लोक मद्यमांस विक्रीच्या व्यवसायात कां पडले याची कारणमिमांसा प्रथम पाहणे अथवा शोधने आवश्यक आहे. लेखकाचे मते तो पुढीलप्रमाणे आहे –

सूर्यवंशी लाड हे मांस विक्रीचा हलका व्यवसाय करूं लागले याची कारणमिमांसा अशी कीं, या क्षत्रिय लाडांना वैश्याप्रमाणे व्यापार व्यवसाय अवगत नव्हता, हे एक त्याचे कारण असावे. तसेच आपत्तीत सांपडलेल्या या सैनिकी पेशाचें लोकांना मुसलमान राज्यकर्त्यांनी मांस विक्रीच्या व्यावसायाकरितां राबविले असले पाहिजे. यावेळी दक्षिणेत मुसलमानांचे बहामनी राज्य होते. मुसलमानांची मांसाची आवड व मागणी पुरविण्यासाठी सूर्यवंशीलाडापैकी अनेकांनीं हा व्यवसाय पत्करलेला दिसतो. त्या वेळी उपजिवीकेसाठी त्यांना दुसरे साधन नव्हते. या लोकांनी प्रथम मांस विक्रीचा व्यवसाय पत्करला असावा व नंतर त्यांचेपैकी काहींनी मद्य विक्रीचा जोड व्यवसाय स्विकारला असावा. आजही बहुसंख्य सूर्यवंशी लाड मराठवाडा व सीमा भागात मांस विक्रीचा व्यवसाय करतात. मात्र मराठवाड्यात हे लोक केवळ "कलाल" या नांवाने ओळखले जातात. याच नांवाने ओळखले जाण्याचें खालीलप्रमाणें एक प्रमुख ऐतिहासिक कारण संभवते तें असे-

प्रारंभी मुसलमानी आक्रमण हे वरवरचे होते. बहामनी राजांनी हिंदु प्रजेवर विशेष जुलूम केला नाही. मात्र त्यांचे नंतर आलेल्या मुसलमान राज्यकर्त्यांत औरंगजेब, हैदरअल्ली, व टिपूसुलतान यांनी दक्षिणेंत धुमाकूळ घातला व अनेक हिंदूना बाटविण्याचा सपाटा चालविला. त्यांचा हिंदू खाटीकांना बाटविण्यावरही विशेष भर होता. मुसलमान धर्माप्रमाणें बकऱ्याची हत्या ही मुसलमान मुलाण्यानेच करावी असा दंडक आहे. यामुळेच या मुसलमान राज्यकर्त्यांनी मांस विक्री करणाऱ्या हिंदुना मुसलमान करण्याचा सपाटा चालविला होता असे दिसते. या धर्मसंकटामुळे मराठवाडा व सीमाभागातील अनेक हिंदु खाटीक पश्चिम महाराष्ट्रांत निघून गेले असे दिसते. ज्यांनी स्थलांतर केले नाही त्यापैकी बहुतेकांनी मांस विक्रींचा व्यवसाय सोडून दिला असला पाहिजे, व केवळ मद्य विक्रीच्या व्यवसाचा त्यानी आधार घेतला असला पाहिजे. तेव्हांपासूनच हे लोक केवळ 'कलाल' या नांवाने ओळखले जात असावेत. आज हे लोक कलाल या नांवाने ओळखले जात असले तरी बहुसंख्य लोक मांस विक्रीचा व्यवसायहि

करतांना आढळतात. धर्मांतर केलेल्या लाड कसाई (मुसलमान) यांचे पासून वेगळे दर्शविण्यासाठीहि केवळ 'कलाल' हे नांव धारण करण्यात आले असावे व हेच महत्वाचे कारण वाटते.

पश्चिच महाराष्ट्रम व मराठवाडा या भागातील मद्य मांस विक्री करणाऱ्या हिंदु समाजात सुक्ष्मही भेद आढळत नाही. या दोन्हीही भागातील लोकांची आडनांवे, दैवते व चालीरिती या अनेक बाबतीत यांच्यात साम्य दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे पश्चिम महाराष्ट्रातील या समाजाची अनेक घराणी मराठवाड्यातूनच तिकडे गेली असे दिसते. त्यांचे स्थलांतरास पंधराव्या शतकापासून सुरूवात झाली असे दिसते.

दक्षिणेतून पश्चिम महाराष्ट्रांत या लोकांनी स्थलांतर करण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत. –

१) पंधराव्या शतकातील दुर्गादेवीचे दुष्काळांत मोगलाईतील गोदावरीकडील पुष्कळ घराणी वरघाटी आली, असे इतिहासकार कै. राजवाडे म्हणतात. याचवेळीं प्रस्तूत समाजातील अनेक लोकांनी मराठवाड्यांतून स्थलांतर केले असावे.

२) बहामनी राज्याचे काळांत सूर्यवंशी लाडानीं मांसविक्रीचा व्यवसाय पत्करला व या राज्याची राजधानी त्यावेळी गुलबर्गा येथे होती. या राज्याचे अंमलाखाली संपूर्ण महाराष्ट्र होता. या राज्याचे भरभराटी बरोबरच मांस विक्री करणारे हे लोक सार्वत्रीक पांगले गेले असावेत.

३) या बहामनी राज्याची पुढे पांच शकले पडली (इ. स. १४८५) सहाजिकच हा समाज त्या पांच ठिकाणी विभागला गेला असावा. त्यापैकीच पश्चिम महाराष्ट्रांतील अहमदनगर व सीमेवरील विजापूर ही दोन प्रमुख ठिकाणे आहेत.

४) सर्वात महत्वाचे कारण म्हणजे दक्षिणेकडे औरंगजेब, हैदरअल्ली व टिपू सुलतान या मुसलमान राज्यकर्त्यांनीं सुरू केलेली बाटवाबाटवीं हे होय.

पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा येथील लोकांच्या संस्कृतीत विलक्षण साम्य आढळते. एवढेच नव्हे तर मराठवाडयाच्या प्राचीन संस्कृतिची छाप महाराष्ट्रभर पडलेली दिसतें. याची कल्पना पुढील लेखावरून वाचकाना येईल.

## मराठवाडयाचा सांस्कृतिक इतिहास :

सातवाहन, राष्ट्रकूट व यादव यांच्या कारकीर्दीमध्यें मराठवाडयाने भौतिक क्षेत्राप्रमाणेंच सांस्कृतिक क्षेत्रांतही भरघोस प्रगती पाहिली आहे. सकल-कला, विद्या आणि प्रतिभा त्यांच्या राजधान्यांच्या कडेकोटात आश्रयाला आल्या होत्या तेथून त्या महाराष्ट्राच्या अन्य भागात संक्रमित झाल्या होत्या. मराठवाडा नेहमीच सांस्कृतिक विकसनाला प्रेरक ठरल्याचे दिसून येते. पैठण, तेर व देवगिरी या सारख्या व्यापारीं केंद्रावर परदेशीं व्यापाऱ्यांचीं ये-जा होई. व्यापाराबरोबरच येथील संस्कृती ही त्या त्या देशापर्यंत पोंचविण्याचे कार्य अभावितपणे होत असे. कला शिल्पाच्या क्षेत्रांत तर मराठवाडयाचे स्थान अनन्य साधारण आहे. "पाषाणातील चैतन्यमय महाकाव्य" असे ज्याला संबोधिता येईल ते कैलास लेणें, या भूमीच्या आधारानेच उभें आहे. अजिंठयाच्या रंगरेखा काळाने अस्पष्ट केल्या तरी, अजूनही खूपच बोलक्या आहेत. तत्कालीन संस्कृतिच्या व समाजजीवनाच्या पदचिन्हांना जोपासून आहेत. साहित्याच्या क्षेत्रांत अजरामर होण्याचा मान मिळविलेल्या अनेक साहित्यकृतींचे जनक मराठवाडयातीलच होत. प्राकृतातील पहिले काव्य "गाथासप्तशती"चे जनक इथले, मराठीचे आद्य साहित्यिक मुकुंदराजही इथलेच. अतींद्रीय ते इंद्रीयाकरवी भोगविण्याची प्रतिज्ञा करणारे श्री ज्ञानेश्वर इथले. त्यांच्या पाठोपाठच वारकरी पंथाची पताका मिरविणारे संत नामदेव, गोरा-कुंभार हेही याच मातीतले. (छत्रपती शिवरायांचे पूर्वज इथले. मालोजी

राजे भोसले यांचें वेरुळ हे पाटीलकीचें गांव. ) मराठवाड्यानें महाराष्ट्राला इतके दिले आहे कीं, तेराव्या शतकापर्यंतची मराठी संस्कृती हीं "मराठवाडी" संस्कृती होती, हे डॉ. देगलूरकरांचे 'प्राचीन अवशेषाधारे मराठवाड्याचा सांस्कृतिक इतिहास' या प्रबंधातील विधान अतिशयोक्त ठरूं नये. हीच कल्पना दुसऱ्या शब्दात मांडताना ते म्हणतात कीं, तत्कालीन महाराष्ट्र हा खरे तर 'बृहन्मराठवाडा' होता. त्यांच्या मते 'मराठवाडी' हे अभिदान १८६४ साली हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषीक जिल्ह्यांच्या संदर्भात अगदी पहिल्यांदा वापरलेले आढळते. त्याचेच पुढे 'मराठवाडा' झाले.

सातवाहनांच्या काळांत प्रतिष्ठान ( पैठण ), राष्ट्रकूटांच्या काळांत लातूर व कंधार, कलचुरी व चालुक्याच्या काळात (आज म्हैसूर-कर्नाटक राज्यात असलेले) कल्याणी, शिलाहारांच्या काळांत तगर (तेर) व यादव काळांत देवगिरी ही मराठवाड्यातील ठिकाणे अत्यंत महत्वाची होती. इतकेच नव्हे तर या ठिकाणाहून उभ्या महाराष्ट्रावर राज्य केले आहे. याचबरोबर मराठवाड्याच्या प्राक्तनातील उपेक्षा अतिसनातन आहे. याचा प्रत्यय खिलजी, तुघलक, मोगल ( औरंगजेब ) व नंतरच्या निझामी राजवटीत प्रकर्षाने जाणवतो.

( दैनिक मराठवाडा दि. २३-८-७२ )

## लाड [ कलाल, खाटीक ] :

हे लोक मराठवाडा व सीमाभागात विपुल आढळतात. यांच्यात तीन पोट भेद आहेत, ते असे – १) क्षत्रीलाड, २) चाकनावाला तथा कौन्दी लाड, ३) सूर्यवंशी लाड.

### क्षत्री लाड :

क्षत्री लाड हे प्रामुख्याने मद्य विक्रीचा व्यवसाय करतात व 'कलाल' या नांवानें ओळखले जातात. हे लोक मुख्यतः कर्नाटकामध्यें आहेत. यांची मातृभाषा कानडी आहे.

### चाकनावाला तथा कौन्दी लाड :

चाकनावाला तथा कौन्दी लाड हे कर्नाटकातील रायचूर, बल्लारी व वस्पेट या भागात विपुल आढळतात. यांची वस्ती आंध्र प्रदेशातही आहे. हे लोक हिंदी भाषा बोलतात. हे लोक भाजलेले व शिजविलेले मांस (चाकना) विकतात. यामुळे याना चाकनावाला असे म्हणतात. हे स्वतःस 'कौदन्य गोत्री' समजतात. यामुळे याना 'कौन्दीलाड' या नांवाने संबोधण्याचा प्रघात पडला आहे.

### सूर्यवंशी लाड :

यांचेपैकी कांही लोक मद्य विक्रीचा व्यवसाय करतात, तर बहुसंख्य लोक मांस विक्रीचा व्यवसाय करतात. मद्य विक्री करणाराना 'कलाल' व मांस विक्री करणाना 'खाटीक' या नांवाने ओळखलें जातें. सूर्यवंशी लाड कलाल व सूर्यवंशी लाड खाटीक यांच्यात कसलेही पोटभेद दिसत नाहीत. दोघेही मूळचे सूर्यवंशी लाड तथा हिंदू खाटीक आहेत व यांच्यात मांस विक्रीचा व्यवसाय पूर्वपार चालत आलेला आहे. जाती विषयक रिपोर्टमध्ये मराठवाड्यात यांचा उल्लेख

'सूर्यलाड कलाल' असा केला आहे तर कर्नाटकात सूर्यवंशीलाड खाटीक असा केलेला आढळतो. मराठवाड्यात यांचा उल्लेख खाटीक ऐवजी केवळ कलाल या नांवाने कां केला जातो याची कारणामिमांसा मागे आली आहे.

## कलाल :

( सय्यद सीराज व. इसन - कास्टस् अॅन्ड ट्राईब्स ऑफ दि निझाम डोमिनियन्स - भाग १ - १९२० )

मद्य तयार करणारी व विकणारी 'कलाल' ही जात हैद्राबाद संस्थानात सर्व भागात आढळते. यांच्यात मुख्यतः दोन भेद आहेत, ते असे. १) लाड कलाल व २) परदेशी कलाल.

## लाड कलाल :

लाड कलाल हे गुलबर्गा जिल्ह्यात विपुल आढळतात. हे लोक दक्षिण गुजराथमधून इकडें आले असावेत. हा दक्षिण गुजराथ म्हणजेच प्राचिन 'लाटदेश' होय. यांच्यात तीन पोटभेद आढळतात, ते असे – १) सूर्य लाड, २) क्षत्री लाड, ३) कौन्दी लाड. यांच्यात परस्परात बेटी व्यवहार होत नाहीत. 'सूर्यलाड' असे यांना संबोधण्याचे कारण म्हणजे यांच्या घरातील स्त्री व पुरुष आपली दिनचर्या सुरू करताना प्रथम सूर्याची पूजा करतात व सूर्य पूजेपूर्वी कांहीही खावयाचे नाही, असा दंडक पाळतात.

लाड कलाल, यांच्यातील आडनांवे वैचित्र्यपूर्ण आहेत, तीं अशी –

* टोणपे, काथवटे, साबणें, गंगणे, सदानंदे, खडके, कांबळे, सांडवें तपासे, डोंगरे, पलंगतोंडे (पलंगे).

कोल, पिंजरे, जमालपुरे, गणागने, हाघलदिवटे.

टीप : * ही सर्व आडनांवे मराठवाड्यातील सूर्यवंशी लाड कलाल समाजात आजहि सार्वत्रिक आढळतात. या शिवाय मराठवाड्यातील संपूर्ण आडनांवाची सूची या ग्रंथाचे शेवटी देण्यात आली आहे.

## सूर्यवंशी लाड खाटीक :

यांची वस्ती मुख्यत: महाराष्ट्राचे सीमेवरील १) बेळगांव, २) कारवार ३) विजापूर ४) धारवाड या कर्नाटकामधील जिल्ह्यामध्ये आढळते. हे जिल्हे पूर्वी जुन्या मुंबई राज्यात होते. त्यामुळे यांचे विषयी माहिती मुंबई प्रदेशाचे जिल्हावार गँझेटीयर्स व एन्थाँव्हेनचे जाती विषयक रिपोर्टमध्यें आलेली आहे. विजापूर, बेळगांव व धारवाड येथील सूर्यवंशी लाड खाटीक यांचे विषयी एकत्रीत माहितीचा लाड जातीचे माहितीत समावेश करण्यात आलेला आहे. तसेच कारवार येथील सूर्यवंशी लाड खाटीक यांचा मुंबई राज्यातील 'खाटीक' वर्गात समावेश केलेला आहे. यामुळे कारवार येथील या लोकाविषयी एन्थाँव्हेनला सुसंगतपणे प्रतिपादन करता आलेले नाही.

सूर्यवंशी लाड खाटील हे मुख्यत: **कर्नाटकामध्ये असले तरी यांची मातृभाषा मराठी आहे** असा स्पष्ट उल्लेख प्रत्येक जिल्ह्याचे गॅझेटीयरमध्ये करण्यात आलेला आहे. **कर्नाटकामध्ये आडनांवाची चाल रुढ नसल्यामुळे बहुतेक लोकांची आडनांवे गांवावरून व व्यवसायावरून पडलेली दिसतात**. यांच्यात व महाराष्ट्रांतील मद्य मांस विक्री करणाऱ्या समाजात चालीरितीबाबत बरेच साम्य आढळते. हैदरअल्ली व टिपू या दोन धर्मवेड्या सुलतानांनी कर्नाटकांत हिंदूचा अतिशय छळ केला व त्यांना जुलूम जबरदस्तीने बाटविले. या समाजातील अनेकांना त्यांनी सक्तींनी धर्मांतर करण्यास भाग पाडले. आज या बाटविलेल्या लोकांची संख्याही या भागात विपूल आढळते. यामुळे मुस्लीम सवगोलंकाराचा प्रतिकार करण्यासाठी व हिंदूत्वाचे संरक्षण करण्यासाठी कर्नाटकातील सूर्यवंशी लाड खाटीक गळयात जानवे घालणे व विधवा विवाह न करणे इत्यादि कडक जाती बंधने पाळतांना दिसतात.

विजापूर व धारवाड येथील सूर्यवंशी लाड खाटीक समाजाचे आज कानडीकरण झालेले दिसते. त्यांचें कर्नाटकातील क्षत्री लाड कलाल यांचेशी एकीकरण झालेले आहे. हे सर्व लोक स्वत:स

"सूर्यवंशी क्षत्री समाज" असे म्हणवितात. एकीकरणाचे कार्यामुळे यांच्यातील मतभेदांना आपोआप मूठमाती मिळाली आहे.

बेळगांव व कारवार भागातील मराठी भाषीक सूर्यवंशी लाड-खाटीक समाज आज अलग पडलेला दिसतो. दूरचे पल्ल्यामुळें त्यांचे महाराष्ट्रातील लोकांशी लग्न संबंध क्वचीतच होतात. सीमाभागातील या समाजातील मराठी भाषीक लोकांची ही सार्वत्रीक अडचण झालेली आहे. यांचे विषयी कांही गैरसमजही महाराष्ट्रातील लोकांत आहेत. वास्तविक प्रस्तूत समाजाची खरी संस्कृती सीमा भागातच टिकून आहे याची प्रचिती त्यांचे संबंधीचे पुढील माहितीवरून वाचकांना येईल.

## सूर्यवंशी लाड खाटीक : ( विजापूर गॅझेटीयर इ. स. १८८४ )

सूर्यवंशी लाड हें मूळचे दक्षिण गुजरातचे असून, त्यांना खाटीक असेही म्हणतात. ते विजापूर जिल्ह्यात सर्वत्र असून त्यांची एकंदर संख्या १०१३ आहे. त्यांची सर्वसाधारण ( Commonest ) आडनांवे पुढीलप्रमाणे– १) बिलगीकर, २) बुजरकर, ३) चेंडूलकर, ४) धर्म-कांबळे, ५) गोविंदकर, ६) प्रभाकर व ७) राजापूरी.

**यांची मातृ-भाषा मराठी असून ते कानडी व हिंदी भाषा जाणतात.** त्यांची राहणी स्वच्छ व ठाकठिक असून ते अत्यंत विनयशिल व काटकसरी आहेत. ते मध्यम उंचीचे असून त्यांचा बांधा बळकट असा आहे. त्यांच्यापैकीं बहुतेकजण मांस विक्रीचा व्यवसाय करतात व कांही जण दारूचे गुत्तेदार तसेच जमिनदार आहेत. **ते स्वतःस सूर्यवंशी लाड असे म्हणवितात व लोक त्यांना खाटीक म्हणून ओळखतात.** शिवरात्रीला व एकादशिला बहुतेकजण आपली दुकाने बंद ठेवतात. त्यांच्या स्त्रीया फक्त घरकाम सांभाळतात. त्या कधीही मांस विक्रीच्या दुकानात बसत नाहीत.

यांची दैवते दुर्गाव्वा, घ्यामव्वा, मारुती, शीद्रय्या व यल्लव्वा आहेत. ते तुलसीगिरी येथे मारुतीच्या, परसगड येथे यल्लवाच्या व विजापूर येथें सीद्रय्याच्या यात्रेस जातात. मानवाच्या रुपातील देवतांच्या प्रतिमा पूजतात. तसेच ते पिंडीची पूजा करतात. **ते जरी या देवतांची पूजा करीत असले तरी ते सूर्याचे पूजेला प्राधान्य देतात व स्वतःला सूर्याचे वंशज समजतात.** गणेशचतुर्थीला ते गणपतीच्या मूर्तीची पूजा करतात. दरवर्षी नवरात्रीला भवानी मातेचा उत्सव साजरा करतात. तसेच मोर नवमीला ते भवानीदेवीस बकरे बळी देतात.

यांच्यात बहुपत्नीकत्वाची चाल रुढ आहे.परंतु विधवा विवाहास बंदी आहे. मुलगी वयात आल्यानंतर वटभरणाच्या समारंभाचे यांच्यात विशेष महत्व नाही. कांहीजण विधी करतात, कांही करत नाहीत. मुलीला पांच दिवस विटाळ पाळावा लागतो. गरोदरपणांतील पांचव्या किंवा सातव्या महिन्यांत मुलीची आई मुलीस हिरवी चोळी घालते

यांच्या पैकी विजापूरात मराठा वस्तीत जे लोक राहातात ते प्रेते जाळतात. परंतु लिंगायताचे दडपणामुळें बहुतेकजण प्रेते पुरतात. अंत्यविधीनंतर सर्व मंडळी स्नान करतात. परत येतांना बरोबर दुर्वा घेऊन सूतकाचे घरी येतात. या दुर्वा पाण्याने भरलेल्या पात्रांत टाकतात व हे पात्र ज्या ठिकाणी जीव गेलेला असतो त्या ठिकाणी ठेवतात. तिसऱ्या दिवशी स्मशनात मयताचें ठिकाणी निवडलेला तांदुळ, दाळ, सुपारी, खोबऱ्याची वाटी, गुळ, शिजवलेला भात व गव्हाच्या लहान पोळ्या इत्यादी ठेवतात. त्यावर प्रत्येकजण दुधाचा थेंब घालतो. नंतर सर्वजण लांब जाऊन थांवतात. कावळ्याने घास शिवेपर्यंत ते तेथेंच थांबतात. कावळ्याने घास शिवला नाही तर मृताची याचना करतात व त्याचे मागें त्याच्या सर्व इच्छा पूर्ण करूं असे वचन देतात. अशा तऱ्हेने वचने दिल्यानंतरही कावळा आला नाही तर ते अन्न गाईला देतात. चार खांदेकऱ्याचें खांदे दही लाऊन चोळतात व ताटी उचलल्यामुळे आलेली अस्वच्छता (विटाळ) घालवून टाकतात. एकाच थाळीत त्यांना भरपूर अन्न जेवावयास देतात. ते जर

सर्व अन्न खाऊ शकलें नाही तर राहीलेले अन्न गाईला देतात. त्यांचें अन्नात शिजवलेले भात, गव्हाच्या चपात्या, पिटले, तूप, तिखट आमटी इत्यादी असते. रात्री मांसाहारी जेवण दिले जाते. त्यावेळी जातीमधील प्रत्येक घरातील एका माणसास बोलावतात. अकराव्या दिवशी पित्राची चांदीची नवीन प्रतिमा तयार करतात व तिची घरातील इतर पित्राचे प्रतिमेबरोबर पूजा करतात. पूजा नदीचे किनाऱ्यावर झाडाखाली करतात व सर्व पित्रांच्या प्रतिमा आंथरलेल्या चादरीवर ठेऊन पूजतात. मृत स्त्री अथवा पुरुष असेल त्याप्रमाणे नवीन प्रतिमेस कपडे घालतात. या समारंभास जे येतात त्या सर्वांना जेंवण्याचे निमंत्रण असते. कांहीजण प्रतिवर्षी वैशाख शुद्ध तृतियेस श्राद्ध घालतात. या दिवसास अक्षयतृतिया असेही म्हणतात. त्या दिवशी पित्रासाठी आठ ते पंधरा रुपये खर्च करतात.

यांचें जमातीत एकी असून यांच्यात जातीय भावना तीव्र स्वरुपाची आहे. समाजातील वाद ज्ञातीचे सभेत चौकशी करून मिटविले जातात. या सभेस ज्ञातीतील प्रतिष्ठीत लोक हजर असतात. त्यांच्या निर्णयाची अंमलबजावणी दोषी असलेल्या व्यक्तीस जातीबाहेर घालवून केली जाते.

हे लोक चांगले संपन्न आहेत. परंतु एकंदर समाज प्रगतीचे अथवा उन्नतीचे मार्गावर नाही.

टीप : महाराष्ट्रातील मद्यमांस विक्री करणाऱ्या समाजाच्या चालीरिती व विजापूरच्या सूर्यवंशी लाड खाटीक यांच्या वरील चालीरिती या मध्ये बहुतेक बाबतीत साम्य आढळते. स्थान भेदामुळें थोडासा फरक दिसतो. कर्नाटकांत आडनांवाची चाल रूढ नाही. वर आलेल्या आठ आडनांवापैकी धर्म-कांबळे व प्रभाकर या आडनांवाखेरीज बाकीची गांवावरून पडलेली दिसतात. धर्म-कांबळे व प्रभाकर या आडनांवासारखीच महाराष्ट्रांत कांबळे व प्रभावळकर अशी आडनांवे आहेत. विजापूरांतही धर्म-कांबळे ऐवजी कांबळे असेच आडनांव सध्या रुढ आहे. वरील आठ आडनांवा खेरीज गॅझेटियरमध्ये न आलेली महाराष्ट्रांतील कांही आडनांवे विजापूरांत आहेत. ती अशी – १) घोडके, २) इंगळे, ३) थोरपे, ४) सातारकर, ५) नगरकर, ६) हुंडेकर, ७) पन्हाळकर, ८) जान्हवेकर, इत्यादी.

## खाटीक : ( कारवार गॅझेटीयर १८८४)

यांची वस्ती संथाली व बेलनकरी ता. शिरसी येथे असून एकंदर संख्या ५० आहे. हे लोक शहरांत तसेच खेडयांतही आहेत. निझामाचे राज्यातून आलो आहोत असे ते सांगतात. हे लोक हेल काढून बोलतात. **त्यांची मातृ-भाषा मराठी** असून त्यांचे भाषेत कानडी व हिंदी शब्दांचे मिश्रण आढळते. ते स्वतःस सूर्यवंशी समजतात. त्यांची कश्यप व कौदन्य अशी दोन गोत्रे आहेत. त्यांची कुलदेवता यल्लमादेवी असून **तिचे स्थान निझामाचे राज्यातील गुलबर्गा** येथे आहे.

हे लोक गव्हाळ वर्णाचे असून उंच व बळकट बांध्याचे आहेत. त्यांची चेहरापट्टी रुबाबदार आहे. हे लोक हिंदी व कानडी भाषा बोलू शकतात, परंतु **त्यांची मातृ-भाषा मराठी आहे**. हे लोक वर्षभर कामात मग्न असतात. शिवरात्र व रामनवमी व इतर धार्मीक दिवसाशिवाय क्वचीतच विश्रांती घेतात. हे लोक धार्मीक असून ते सर्व ब्राह्मणांची व ग्राम देवताची पूजा करतात. हे लोक यात्रेसाठी दक्षिण कर्नाटकमधील धर्मस्थल येथे व म्हैसूरमधील चंद्रगुट्टी येथे जातात.

यांच्यात बहुपत्नीकत्वाची चाल रुढ आहे. परंतु विधवा विवाहास बंदी आहे.

## लाड खाटीक : ( बेळगांव गॅझेटीयर १८८४ )

बेळगांव शहरात व अथनी येथे लाड लोक मांसविक्रीचा व्यवसाय करतात. शेळी किंवा बकऱ्याची हत्या मुसलमान मुलाणी करतो. हे लोक मांस विक्री हा त्यांचा एक वंशपरंपरागत व्यवसाय आहे असे समजतात. लाड हे काळया सावळया रंगाचे असून ते जाकीट वापरतात व मिशा ठेवतात. ते मराठयासारखेच दिसतात. यांचा पोशाख मराठयाप्रमाणे आहे. परंतु चालीरितीमध्ये थोडासा फरक दिसतो. यांचे मुख्य दैवत 'सूर्य' आहे. परंतु हे लोक व्यंकोबा, खंडोबा व तुळजाभवानी देवी यांचीही पूजा करतात.

## खाटीक :

### गॅझेटीयर्स ऑफ दी बॉम्बे प्रेसेडेन्सी-

### कोल्हापूर जिल्हा गॅझेटीयर इ. स. १८८४

खाटीकांची संख्या खेड्यात व शहरात मिळून एकंदर १९८५ एवढी आहे. यांची आडनांवे अशी आहेत. १) घोडके २) प्रभावळकर ३) भोपळे व ४) शेर्के इत्यादी.

हे लोक चपळ व हुषार आहेत. पूर्वी मुसलमान (मुलाणी) बकऱ्याची हत्या करीत व हे लोक फक्त शेळचा मेंढ्याच्या मांसाची विक्री करीत. सध्या मराठा - खाटीक बकऱ्याचीं हत्याही करतात व मांसही विकतात.

खाटीक हे कांहीं वेळा मद्य विक्रीचा व्यवसाय करतात परंतु ते 'कलाल' म्हणून ओळखले जात नाहीत.

टीप : गॅझेटीयरमधील वरील आडनांवे चुकीची छापली गेली आहेत. वरील आडनावाऐवजी छापलेली आडनांवे अशी आहेत १) घाडगे २) पूरवलकर ३) भापटे ४) शेळके

### ठाणा जिल्हा गॅझेटीयर १८८२ :

माहिम, डहाणू, सालसेट्टें व कल्याण सोडून 'खाटीक' हे सर्व जिल्ह्यांत आहेंत. यांची एकंदर संख्या २८९ एवढी आहे.

हे लोक हिंदू आहेत व फक्त मांस विक्रीचा व्यवसाय करतात. अन्न, पोषाख, धर्म व चालीरिती याबाबत यांचे मराठ्यांशी सम्य आहे.

### सोलापूर जिल्हा गॅझेटीयर १८८४ :

शहरात व खेड्यात मिळून खाटिकांची संख्या एकंदर ७४६ एवढी आहे. पांच-सहा पिढ्यापूर्वी यांचे पूर्वज या जिल्ह्यामध्ये आले

असे हे लोक म्हणतात. हे मराठ्यासारखे आहेत व ते घरात व बाहेर मराठी बोलतात. हे लोक जाकीट वापरतात. यांची घरे दगडा मातीचा असतात. घरावरील छप्पर उतरते किंवा सपाट असते. त्यांचे घरात तांब्याची पितळेची व मातीची भांडी असतात. हे लोक नौकर चाकर ठेवीत नाहीत. त्यांचे घरात शेळ्यामेंढ्या व गाई-म्हशी असतात. हे लोक मासे व शेळ्या मेंढ्याचे मांस खातात. मद्यपान करतात. त्यांचे नेहमीचे अन्नात १) ज्वारीची भाकरी २) मांस ३) भाजीपाला व ४) दाळी असतात.

यांची राहाणी थोडीशी अस्वच्छ असली तरी, एकंदर पोषाखात व बायकांचे दागिन्यात यांच्यात व मराठ्यात कांही एक फरक नाही हे लोक अतिशय कष्टाळू आहेत हिंदूमधील खालच्या वर्गातील लोकांपेक्षा हे लोक अधिक चपळ व सतत उद्योगी आहेत. यांना नाटक-तमाशाचा शौक आहे व ते थोडेसे खर्चीक आहेत. बहुतेकजण मांस विक्रीचा व्यवसाय करतात कांहीजण निझामाचे राज्यातून शेळ्या-मेंढ्या खरेदी करतात व मुंबईस पाठवितात. कांहीजण गरीब आहेत व मजूर म्हणून काम करतात. एकदर समाज सुखात आहे. यांचा व्यापार जोरात चालतो व त्यांना भरपूर फायदाही मिळतो. स्वतःचे भांडवलातील कांही भाग ते दान करतात. त्यांच्या स्त्रीया घरकाम करतात, धान्य दळतात व नवऱ्यास धंद्यात मदत करतात. यांची मुले जनावरांना गांवाबाहेरील रानांत चारावयास नेतात.

यांची उपास्य दैवते मराठ्याप्रमाणेच आहेत. यांचे उपाध्याय देशस्थ ब्राह्मण असतात. त्याना ते विशेष मान देत नाहीत. **यांच्यातील लग्न विधी इतर चालीरिती मराठ्याप्रमाणेच** आहेत. सण व उपास देखील त्यांचे प्रमाणेच पाळतात.

हे लोक भानामती व चेटूक यावर विश्वास ठेवतात. यांच्या जातीचे मंडळ असते व त्याचा प्रमुख 'म्हेत्रें' म्हणून ओळखला जातो. हे लोक मुलांना शाळेत पाठवीत नाहीत. एकंदरीत यांची स्थिती चांगली आहे.

## ट्राईब्स् ॲन्ड कास्टस् ऑफ बॉम्बे प्रेसेडेन्सी-एन्थॉव्हेन

## खाटीक : (भाग २ - पृ. क्र. १६३ इ.स. १९२२)

१९०१ च्या खानेसुमारीत एकंदर ८,८६० खाटीक गणले गेले, त्यापैकी ४,५०० पुरुष व ४३६० स्त्रीया आहेत. ते मुंबई राज्याच्या सर्व भागात लहान लहान संख्यने पसरलेले आहेत. ते मांस विक्रीचा व्यवसाय करतात.

अहमदनगर जिल्ह्यातील लोक धनगर जातीचे असून त्यांचा कुणबी व माळी यांच्याशी रोटी व्यवहार चालतो. परंतु बेटी व्यवहार होत नाही.

कारवार जिल्ह्यातील लोक स्वतःस सूर्यवंशी समजतात. त्यांचीं कश्यप व कौंदन्य अशी दोन गोत्रें आहेत व एकाच गोत्रात लग्नसंबंध होत नाहीत.

**दक्षिणेत मुसलमान आक्रमाणास सुरूवात झाल्यानंतर खाण्यासाठी मांसाची मागणी वाढली व तेव्हांपासून धनगर, मराठे व कुणबी या लोकांचा भरणा शेळ्या-मेंढ्यांचे मांस विक्री करण्याच्या व्यवसायात झालेला दिसतो.**

या लोकांचे जन्मविधी, लग्न विधी व अंत्यविधी कुणब्याप्रमाणे असतात. बहुपत्नीकत्वाची चाल यांच्यात रुढ आहे. कारवार जिल्ह्यातील लोकामध्यें विधवा विवाहास बंदी आहे.

हे लोक हिंदू देवातांची पूजा करतात व सर्व हिंदूचे सण व उपास पाळतात. निझामाचे राज्यातील तुळजाभवानी देवी यांची कुलदेवता आहे. पुणे जिल्ह्यामधील जेजुरीचा खंडोबा यांचें कुलदैवत आहे. त्यांचा स्वतःचा असा धर्मगुरु नाही व ते कोणत्या पंथाचे आहेत हे त्यांना सांगता येत नाही.

कारवारमधील लोकांचीं कुलदेवता यल्लमा असून, तिचे स्थान निझामाचे राज्यातील गुलबर्गा येथें आहे. हे लोक दक्षिण कारवारमधील धर्मस्थळ व म्हैसूरमधील चंद्रगुट्टी येथें यात्रेस जातात.

हे लोक फक्त मांस विक्रीचा व्यवसाय करीतात व बकऱ्याची हत्या मुसलमान करीतात. यांच्यापैकी कांहेंजण शेतकरी व मजूर

आहेत. यांच्या स्त्रीया घरकाम करतात, धान्य दळतात व नवऱ्यास धंद्यात मदत करतात. यांची मुले जनावरांना गांवाबाहेरील रानात चारावयास नेतात. हे लोक मासे व शेळ्या-मेंढ्याचें मांस खातात, तसेच मद्यपान करतात.

++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++++

एन्थाव्हेन यानी जुन्या मुंबई प्रदेशातील हिंदु खाटिकांचा जो रिपोर्ट लिहिला आहे, तो आपण मागे पाहिला. सदर रिपोर्ट सोलापूर, कोल्हापूर, ठाणें, कारवार व नगर इत्यादि जिल्ह्याच्या गॅझेटियरमधील माहितीच्या आधारावर संकलन करून लिहिला आहे, हे स्पष्ट दिसते. कोल्हापूर, सोलापूर व ठाणा या जिल्ह्याचे गॅझेटियरमधील माहितीवरून तें म्हणतात, 'दक्षिणेत मांस विक्रीच्या व्यवसायात मराठे व कुणबी यांचा भरणा आहे.' तसेंच कारवार जिल्ह्यातील हे लोक स्वतःस 'सूर्यवंशी' समजतात, असे ते म्हणतात. याठिकाणी 'सूर्यवंशी' म्हणजें 'सूर्यवंशी लाड' होत, हे वेगळें सांगावयास नको.

नगर जिल्ह्याचे गॅझेटियरमधील माहितीच्या आधारावर ते म्हणतात– अहमदनगर जिल्ह्यातील खाटीक हे 'मराठा धनगर' जातींचें आहेत.

यावरून त्यांनी निष्कर्ष काढला आहे व तें म्हणतात, 'दक्षिणेतील मांस विक्रीच्या व्यवसायात मराठा, कुणबी व धनगर यांचा भरणा आहे.' महाराष्ट्रातील हिंदू खाटीक समाजाचा एकत्रीत विचार केल्यास नगर गॅझेटियरमधील माहिती कांहीशी भिन्न वाटते. तेव्हां आपण नगर गॅझेटियरमधील पुढे दिलेली माहिती काळजीपूर्वक अभ्यासणे आवश्यक आहे.

## मेंढपाळ : अहमदनगर जिल्हा गॅझेटीयर इ.स. १८८१

मेंढपाळामध्ये तीन शाखा असून, त्यांची एकंदर संख्या ४०,५३९ आहे. ही संख्या हिंदू लोक संख्येच्या ५.७५ टक्के आहे. यांची शाखावार संख्या खाली नमूद केल्याप्रमाणे आहे.

| शाखा | पुरुष | स्त्रिया | एकंदर |
|---|---|---|---|
| १) धनगर | १९,८०२ | १९,७२५ | ३९,५२७ |
| २) गवळी | ४६० | ४१२ | ८७२ |
| ३) खाटीक | ७० | ७० | १४० |
| एकंदर – | २०,३३२ | २०,२०७ | ४०,५३९ |

१) धनगर किंवा गुराखी यांची एकंदर संख्या ३९,५२७ असून ते अहमदनगर जिल्ह्यात सर्वत्र सांपडतात. कमाठी किंवा तेलंगी-धनगर व यांच्यातील फरक ओळखण्यासाठी, मराठा धनगराची नऊ शाखेत विभागाणी केली आहे. ती अशी– १) अहीर, २) वंजारी, ३) गडगे, ४) हाटकर, ५) खुटेकर, ६) मराठा, ७) सनगर, ८) शेगर, ९) वैदु.

मराठा धनगरांची खालीलप्रमाणे वैशिष्ठचे आहेत.

यांच्यातील स्त्री-पुरुषांची नांवे स्थानिक कुणब्याप्रमाणे आहेत. यांची आडनांवे खालीप्रमाणे आहेत.

१) आगासे, २) भागवत, ३) भंड, ४) भिटे, ५) भोंडे, ६) भुसारी, ७) बुचडे, ८) बुळे, ९) चित्रे, १०) दाफळ, ११, गवते, १२) घोडगे, १३) घुमे, १४) हजारी, १५) होळकर, १६) जाधव, १७) केटके, १८) कपाडी, १९) कापरी, २०) कसणे, २१) कासीद,

२२) खाटेकर, २३) खिल्लारी, २४) लंभाटे, २५) मारवार, २६) मंडलीक, २७) माग, २८) मारले, २९) मटकर, ३०) मिटगे, ३१) नगारे, ३२) पंडीत, ३३) फणस, ३४) पिंगळे, ३५) राहींज, ३६) राशिनकर, ३७) रोडगे, ३८) सर्वोदे, ३९) सावळे, ४०) सालटे, ४१) सोनवल, ४२) सुडके, ४३) तगाड, ४४) टोंग, ४५) वाघमारे, ४६) वीरकर.

**बिरोबा** किंवा अहमदनगर जिल्ह्यातील सोनारीचा भैरोबा, तुळजापूरची देवी व जेजुरीचा खंडोबा ही यांची उपास्य दैवते आहेत.

भाषा, घरे, अन्न व पोषाख याबाबत यांचे स्थानिक कुणब्याशी साम्य आहे. हे लोक स्वभावाने भोळे, भावडे आहेत.

टीप : वरील मराठा धनगर लोकांचें आडनांवामधील प्रस्तुत विषयक समाजामध्ये जाधव या आडनांवाखेरीज एकही आडनांव नाही. जाधव हे आडनांव महाराष्टातील बहुजन समाजामध्ये सार्वत्रिक आहे.

**गवळी धनगर –** यांचें विषयी माहिती येथे विस्तार भयासाठी दिलेली नाही व या माहितीची प्रस्तूत विषयासाठी आवश्यकता नाही.

## खाटीक :

कर्जत व संगमनेर सोडून जिल्ह्यात सर्वत्र हे लोक आहेत. त्यांची एकंदर लोकसंख्या १४० आहे. हे लोक **मराठा धनगर** या जातीचे आहेत. त्यांचा कुणबी व माळी यांच्याशी रोटी व्यवहार चालतो परंतु बेटी व्यवहार चालत नाही. स्थानिक धनगरापेक्षा ते वेगळे दिसत नाहीत. त्यांची घरातील व बाहेरील भाषा कुणब्याच्या मराठी बोलीप्रमाणे आहे. ते एकमजली किंवा दुमजली घरात राहतात. त्यांच्या घराच्या भिंती न भाजलेल्या विटांच्या व मातीच्या असतात. घराचे छप्पर सपाट किंवा उतरते असते. ते शेळ्या मेंढ्या बाळगतात

व कुत्रा त्यांचा आवडता प्राणी आहे. त्यांच्या जेवणांत मुख्यत: ज्वारीची भाकरी, भाजीपाला, तिखट आमटी व कुटलेली चटणी असते. ते गाई व डुक्कर सोडून इतर प्राण्याचें मांस खातात व दारु पितात. त्यांचा पोषाख धनगरासारखा असतो. राहाणीं थोडीशी अस्वच्छ असली तरी एकंदरीने हे लोक कष्टाळू व पाहुण्यांचा आदरातिथ्य करणारे आहेत, ते शेळ्या-मेंढ्या पाळतात व त्यांचा (खरेदी-विक्रीचा) धंदा करतात. तसेच लोकरीचाहीं व्यापार करतात. त्यांच्यापैकीच **कांहीजण जाडे भरडे ब्लँकेट किंवा चावळ विणतात.**

त्यांच्या स्त्रिया घरकाम करतात व लोकर पिंजतात. दहा वर्षाच्या पुढील मुले शेळ्या-मेंढ्याची राखण करतात. हे लोक हिंदू देवतांची पूजा करतात व कुणब्याप्रमाणें सर्व हिंदूचे सण व उपास पाळतात. निझामाचे राज्यातील तुळजाभवानी देवी यांची कुलदेवता आहे व पुणें जिल्ह्यातील जेजुरीचा खंडोबा यांचे कुलदैवत आहे. देवतांच्या प्रतिमा घरात ठेवतात व त्यांची फुले व उदकापूर ठेऊन पूजा करतात. प्रत्येक सोमवारी, पौर्णिमेस व आमावस्यास नैवेद्य दाखवून पूजा करतात. यांचे उपाध्याय स्थानिक ब्राह्मण असतात. तेच यांचे लग्नविधी करतात. यांचा स्वत:चा असा धर्मगुरु नाही व ते कोणत्या पंथाचें आहेत हे त्यांना सांगता येत नाही. हे लोक फक्त जन्म विधी व अंत्य विधी करतात व स्थानिक कुणब्याप्रमाणे यांच्या चालिरिती आहेत. यांच्यात बालविवाह, विधवा विवाह व बहुपत्नीकत्वाची चाल रुढ आहे. यांची जातीय भावना तीव्र असून ते संघटीत आहेत. समाजातील वाद जातीमधील प्रौढ लोकांचे सभेत सोडविले जातात. हे लोक मुलांना शाळेत पाठवीत नाहीत. यांचेपैकी कांहीजण शेतकरी झाले आहेत व **कांहीजण जाडें भरडे ब्लँकेट किंवा घोंगडे व चावळ विणतात** यांना धंद्यात उत्पन्न चांगले मिळते व त्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे.

* -+- -+- -+- -+- -+- -+- *

नगर जिल्ह्यात लेखकास मिळालेली यांची आडनांवे- लाड, थोरात, घोडके, घोणे, पलगें, कोयीमिरे, कांबळे, जांभळे, काथवटे, ताडें, भोके इत्यादि.

नगर गॅझेटियरमध्ये हिंदू खाटिकांचा उल्लेख 'मराठा धनगर असा केला आहे, तर उर्वरीत महाराष्ट्र व सीमा भागातील हिंदू खाटिकांचा उल्लेख 'मराठा खाटिक व लाड खाटिक तथा कलाल' असा गॅझेटियर्स व जातीविषयक रिपोर्टमध्ये आढळतो. यावरून नगर जिल्ह्यातील हिंदू खाटिक हे महाराष्ट्रातील इतर भागातील हिंदू खाटिकापेक्षा सर्वस्वी वेगळे असावेत, अशी शंका वाटणे साहजीक आहे. प्रत्यक्षात मात्र नगर जिल्हयातील हिंदू खाटीक व इतर भागातील हिंदू खाटीक यांच्यातील आडनांवे व चालीरिती याबाबतीत बहुतांश साम्य आढळते. एवढेच नव्हे तर आज खुद्द नगरमध्ये हिंदु खाटीकांची जी फक्त दोन घराणी आहेत, त्यापैकी एक लाडाचे असून दुसरे 'थोरात' यांचे आहे. तेव्हां प्रथम आपण या लोकांचा गॅझेटियरकारानी 'मराठा-धनगर' असा उल्लेख का केला असावा याची कारणे शोधू. लेखकाचे मते ती अशी आहेत –

१) त्यावेळी नगर जिल्ह्यात या लोकांची स्त्री व पुरुष मिळून एकंदर सख्या १४० आढळली आहे. यावरून त्याकाळी या समाजाची सुमारे पंचवीस-तीस कुटुंबे नगर जिल्ह्यात असावीत असे दिसते. त्यापैकी कांही लोक घोंगडें व चावळ विणण्याचा व्यवसाय करीत होते, असा गॅझेटियरमध्ये उल्लेख आहे. या पंचवीस-तीस पैकी कांही याचा अर्थ साधारण दहा-बारा कुटुंबें या व्यवसायात असावीत. या कांही लोकांच्या घोंगडें विणण्याचे व्यवसायामुळेच नगर जिल्ह्यातील सर्व हिंदु खाटिकांचा उल्लेख 'मराठा धनगर' असा केला असावा.

२) जे लोक घोंगडे विणण्याचा व्यवसाय करीत त्यांच्याच घरातील स्त्रिया लोकर पिंजण्याचे काम पर्यायानें करीत. यामुळेच यांच्या स्त्रिया घरकाम करतात व लोकर पिंजतात असा उल्लेख आलेला आहे. यामुळेहीं या लोकांचा 'मराठा धनगर' असा उल्लेख करण्यात आला असावा.

३) मांस-विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांना पर्यायाने शेळ्या-मेंढ्या पाळाव्या लागतात व त्यांच्या खरेदी-विक्रीचा व्यापारही करावा लागतो. हे लोक शेळ्या-मेंढ्या पाळतात व त्यांचा व्यापार करतात, असा उल्लेख गॅझेटियरमध्यें आलेला आहे, हे ही एक कारण दिसते.

नगर जिल्ह्याप्रमाणेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा व सोलापूर या जिल्ह्यामध्येंही कांही तुरळक ठिकाणी हिंदु खाटीक हे पूर्वी घोंगडे विणण्याचा व्यवसाय करीत होते असे समजते. ही घोंगडीं विणकाम करणारी सर्व मंडळी खुटीकर धनगरापैकीं असावीत असे लेखकास वाटते. घोंगडी विणकामाच्या व्यवसायात विशेष प्राप्ती मिळत नसल्यामुळें ही मंडळी साधारण दोन-तीन शतकापूर्वी मांस विक्रीच्या व्यवसायात पडली असावीत. नगर जिल्ह्यातील तसेच इतर भागातील घोंगडी विणकाम करणारीं ही मंडळी सोडून बाकीचे बहुसंख्य हिंदू खाटीक हे मूळचे 'धनगर' नसून लाड अथवा मराठा खाटीक असावेत असे दिसते व याची कारण मिमांसा लेखकाचे मते पुढील प्रमाणे आहे.

१) हिंदू खाटिकांची एकूण अकरा आडनांवे नगर जिल्ह्यात आज आढळतात. या अकरा आडनांवापैकी एकही आडनांव नगर गॅझेटियरमधील धनगर समाजाच्या ४७ आडनांवामध्ये आढळत नाही. या उलट ही सर्व आडनांवे महाराष्ट्र व सीमा भागातील हिंदू खाटीक समाजात आढळतात व यांचा इतरत्र उल्लेख मराठा-खाटीक तथा लाड खाटीक असा आढळतो.

२) नगर गॅझेटियर खेरीज हिंदू खाटिकांचा 'मराठा धनगर' असा उल्लेख कोठेही आढळत नाही.

३) बहुसंख्य धनगरांचे 'बिरोबा' हे कुलदैवत आहे. महाराष्ट्र व सीमा भागातील हिंदू खाटिकापैकी एकाही घराण्याचे 'बिरोबा' हे कुलदैवत आढळत नाही.

४) नगर गॅझेटियरमध्ये घोंगडे विणकाम करण्याचा व्यवसाय कांही लोकांचा होता असा उल्लेख आलेला असला तरी आज नगर जिल्हयात तसेच संपूर्ण महाराष्ट्रात हिंदू खाटीक समाजातील एकही कुटुंब घोंगडी विणकामाचा धंदा करताना दिसत नाही याचाच अर्थ घोंगडे विणकाम करण्याचा बहुसंख्य हिंदु खाटिकांचा व्यवसाय नव्हता व नाही.

५) इ. स. १९२० च्या पूर्वी या हिंदु खाटीक समाजापैकी एकाही घराण्याचा कागदोपत्री 'धनगर' असा जातीवाचक उल्लेख आढळत नाही.

तेंव्हा नगर जिल्हयातील बहुसंख्य हिंदू खाटीक मूळचे कोण होते, हें समजण्यासाठी पुढील माहिती अत्यंत उपयुक्त व महत्वाची अशी आहे.

## अहमदनगर चा पूर्व इतिहास :

गुलबर्गा येथील बहामणी राज्याचा विस्तार सर्व महाराष्ट्र देश व्यापून होता. इ. स. १४८५ मध्ये या राज्याचे पांच शकले झाली. त्या पकीच अहमदनगरची निजामशाही ही एक होय. एकंदरीने बहामणी राजानी हिंदूवर जुलूम जबरदस्ती फारशी केली नाही असे दिसते. दक्षिणेत हिंदूवर जुलूम करणारा प्रमुख मुसलमान बादशहा 'औरंगजेब' हा आहे. या धर्मवेडया बादशहाने अनेक हिंदूना जुलूम जबरदस्तीने बाटविले. औरंगजेबाने आपल्या आयुष्याची शेवटची वीस वर्षे या दक्षिणेत घालविली. त्याचे वास्तव्य औरंगाबाद व अहमदनगर येथे असे. अहमदनगरच्या उपनगरांतील 'भिंगार' या गांवी त्याचा राहाण्याचा महाल आजही सुस्थीतीत उभा आहे. इ. स. १७०७ मध्ये याच ठिकाणी औरंगजेब मरण पावला. बहामणी राज्याचे काळापासून अहमदनगर येथे मांस विक्री करणाऱ्या हिंदू लोकांचा भरणा होता असे दिसते. यांचे पैकीच बहुसंख्य लोकांना औरंगजेबाने सक्तीने बाटविले. यामुळें आज नगर शहरांत मांस विक्री करणाऱ्या पैकी

एकही हिंदूच घर अस्तित्वात नाही. या सक्तीने बाटविलेल्या लोकांची माहिती नगर गॅझेटीयर मध्ये आलेली आहे. सत्य कटु असले तरी एकीकरणाचे या विषयासाठी ही माहिती अत्यंत मोलाची व उपयुक्त अशी आहे. ती येथें देत आहे.

## बकर कसाब ( नगर गॅझेटीयर, भाग १७ इ.स. १८८१ )

बकर कसाब हे नगर जिल्हयात सर्वत्र आढळतात. **हे लोक पूर्वी ' लाड ' जातीचे होते व त्यांना औरंगजेब बादशहानें बाटविले,** असे ते सांगतात. ( They are said to represent Lad converts made by Emperor Aurangjeb ) दक्षिणेतील निरनिराळ्या भागातून हे लोक येथें आलेले आहेत.

हे लोक डोक्यावरील केस काढतात. आखूड किंवा भरपूर दाढी ठेवतात. डोक्यावर मराठमोळा पटका नेसतात. त्यांच्या पोषाखात विजार, शर्ट व जाकीट असते. स्त्रिया देखील हिंदू स्त्री प्रमाणें लुगडे व चोळी नेसतात. यांची वेगळी अशी स्वतंत्र जात आहे व ते आपापसांतच लग्न संबंध करतात. ते हिंदू रितीभाती कडक तऱ्हेने पाळतात. गोमांस खात नाहीत. गायकसाबापासून अलिप्त रहातात व त्यांचेशी कसलाही संबंध ठेवीत नाहीत. हे लोक हिंदूचे सण साजरे करतात व हिंदू देवतांची पूजा करतात.

टीप : लेखकांस यांची मिळालेली आडनांवे :
कांबळे, कोथमिरे, ताडे, धोडके, धोणे, धाकपाडे, घोलप इत्यादी

## खाटीक ( नाशीक, पुणा व सातारा जिल्हा )

या भागातील हिंदू खाटिकांची आडनांवे व चालीरिती याबाबतीत महाराष्ट्रातील इतर भागातील हिंदु खाटीक यांच्याशी बहुतांशपणे साम्य आढळते व यांच्यात परस्परात रोटीबेटी व्यवहारही होतात. पुणें व सातारा जिल्हयांचे गॅझेटियरसमध्ये हिंदू खाटीक यांचे विषयी माहिती दिलेली नाही. बहुतेक करून अल्पसंख्याक समाज

म्हणून गॅझेटियरकरानी दुर्लक्ष केले असावे. नाशिक जिल्ह्याचे गॅझेटियरमध्ये यांचें विषयी अतिशय त्रोटक स्वरुपाची माहिती दिलेली आहे. ती पुढील प्रमाणे आहे.

## खाटीक :

येथे हिंदू व मुसलमान खाटीक आहेत. हिंदू फक्त शेळ्या-मेंढ्याचे मांस विकतात. मुसलमान हे गाईचे व बकऱ्याचे मांस विकतात. ( नाशिक जिल्हा गॅझेटियर - १८८३ )

या वरील माहितीवरून नाशिक जिल्ह्यातील हिंदू खाटीक समाजाविषयी निश्चित माहिती मिळत नाही. नाशिक जिल्हा हा नगर जिल्ह्यास लागून आहे व पूर्वी नाशिक जिल्ह्याचा बराचसा भाग नगर सुभ्यात होता. या दोन्ही जिल्ह्यातील लोकांचे सर्व बाबतीत विलक्षण साम्य आढळते. नाशिक जिल्ह्यातील कांही हिंदू खाटीक पूर्वी घोंगडें विणण्याचा व्यवसाय करीत होते, असे दिसते. आजही यांचेंपैकी कांहीं लोकांच्या घरापुढें घोंगडी विणकामासाठीं रोवलेला खुट्टा व विणकरास बसण्यासाठी केलेला खड्डा आढळतो. विशेष म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रात फक्त नाशिक भागातच 'धनगर' या आडनांवाचे एक घराणें आढळते. त्याचप्रमाणे 'लाड' या आडनांवाचीही कांही घराणी येथे आहेत.

## बक्कर कसाब : ( पुणे जिल्हा गॅझेटियर - १८८२-८४ )

बक्कर कसाब हे या जिल्ह्यामध्ये सर्वत्र मोठ संख्येने आढळतात व ते 'लाड सुलतानी' या नांवाने ओळखले जातात. हे लोक स्थानिक हिंदु खाटिकापैकी असून याना म्हैसूरच्या हैदरअल्लीने इ. स. १७६३-८२ मध्यें बाटविले असे म्हणतात. यांचा इतर मुसलमानांशी कांही एक संबध नाही. ते गोमांस खात नाहीत. हे लोक गायकसाबापासून सर्वस्वीं अलिप्त राहतात व त्यांचेशी कसलाही संबंध ठेवीत नाहीत. ते स्थानिक हिंदु देवतांना नवस करतात व उपास पाळतात.

टीप : यांची आडनांवे स्थानिक हिंदू खाटिकाप्रमाणेच आहेत.

## बक्कर कसाई :

दक्षिणेतील बक्कर कसाई तथा लाड सुलतानी हे लोक हिंदू खाटिकांचे लाड शाखेपैकीच आहेत. यांना टिपू सूलतानाने बाटविले असून 'लाड सुलतानी' असे नांव त्याना टिपूमुळेच मिळाले आहे. हे लोक इकडे इ.स. १८०३मध्ये जनरल वेलस्लीचें सैन्याबरोबर दक्षिणेंतून आले असे म्हणतात. (ठाणे जिल्हा गॅझेटियर – १८८२.)

बक्कर कसाब यांचे वरील माहितीवरून पश्चिम महाराष्ट्रातील हिंदू खाटीकवर्गातही लाड शाखेतील लोकांचा भरणा मोठ्या प्रमाणात आहे, असे स्पष्ट दिसते. पश्चिम महाराष्ट्रातील या समाजात 'लाड' आडनांवाची बरीच घराणी आहेत. एकंदरीत विचार करता, पश्चिम महाराष्ट्रातील हिंदू खाटीक समाजात मराठा, लाड व धनगर या लोकांचा भरणा झालेला आहे, असे दिसते. अशा प्रकारे तीन भेद असले तरी ते सर्वजण एकाच 'हिंदू खाटीक' समाजात मोडतात. या संपूर्ण समाजात कांही विशीष्ट चालीरिती सार्वत्रिक आढळतात. या समाजातील लोकांना आपण सर्व एक आहोत याची जाणीव व्हावी यासाठी या चालीरितीची माहिती येथे देत आहे.

१) हे लोक स्वतः पशूहत्या करीत नाहीत. मुलाण्याकडून बकऱ्याची हत्या करण्याची पूर्वपार प्रथा आहे.

२) रोगराई अथवा नैसर्गिकरित्या मृत्यू पावलेल्या बकऱ्याचे मांस हे लोक विकत नाहीत, खात नाहीत व त्याचा स्पर्श देखील अपवित्र समजतात.

३) मराठवाडा व सीमाभागातील या समाजातील लोक आपले मुख्य दैवत 'सूर्य' मानतात व सूर्यपूजेला प्राधान्य देतात. तसेच पश्चिम महाराष्ट्रातील याच समाजातील बहुसंख्य लोकांचे कुलदैवत 'खंडोबा' आहे. या खंडोबास "मल्हारी मार्तंड" असेही म्हणतात व मार्तंड हे सूर्याचेच दुसरे नांव आहे. अशा प्रकारे खंडोबा हा देखील

सूर्याचेच एक रुप आहे. तेव्हां या समाजातील बहुसंख्याचे कुलदैवत 'सूर्य' आहे असे म्हणणें वावगें ठरत नाही.

४) हे लोक वाकळ वापरीत नाहीत व तिचा स्पर्श देखील अपवित्र समजतात. दक्षिणेत ही प्रथा फार कडकपणे पाळतात. वाकळ वापरणारे व न वापरणारे असे दोन भेद पूर्वी कर्नाटक व सीमाभागातील या समाजात पडले होते. कर्नाटकात वाकळ वापरणाराना 'कौंदी' लाड' असे म्हणण्याचा प्रघात आहे. 'कौंदी' या कानडी शब्दाचा अर्थ वाकळ असा आहे. आज मात्र कोणीहि या समाजात वाकळ वापरीत नाहीत. गॅझेटियरकरानी कांही ठिकाणी या प्रथेविषयी चुकीचीं व विपर्यस्थ माहितीं दिलेली आहे. वाकळ हीं जुन्या-पुराण्या चिंध्यापासून केलेलीं असते व त्यामुळे वाकळेस शिवले तर विटाळ (अमंगल) होतो व देविचा कोप होतो, अशीं भावना हिंदू खाटीक समाजात आहे. दुर्गादेविच्या कोपामुळे मोठा दुष्काळ पडून यांचे जे हाल झाले, तेव्हापासून हीं भावना यांच्या मनात वसत असावी असे लेखकास वाटते.

## कुलनाम अथवा आडनांव आणि देवक :

कुटुंबातील जवळच्या व दूरच्या माणसांची नामावली आपण पाहिली तर त्यात एक गोष्ट लक्षात येते, ती ही कीं, मराठी व द्राविड भाषामधून लग्नाचे संबंधी व रक्ताचे संबंधी यांच्या नांवात सरमिसळ आहे, तर उत्तरेकडच्या भाषातून लग्नाने नात्याचे झालेले कुटुंबीय व रक्ताच्या नात्याचे कुटुंबीय ह्यांचे सर्वस्वी भिन्न गट पडतात. कानडीमध्यें तर लग्नाच्या नात्याचे सर्व शब्द रक्ताच्या नातेवाईकाला लावलेलें

आढळतात. आपल्या नात्यांतील मुलगी करावयाची नाही असा उत्तरेकडचा कटाक्ष दिसतो. उत्तरेत कुलनामाची चाल दिसून येत नाही.

महाराष्ट्रांत ब्राह्मणांत कुलनामे पूर्वी नव्हतीसे दिसतें. पण लग्न गोत्रावरून ठरवीत. त्यांच्यात सगोत्रीयांशी लग्न होत नाही. अब्राह्मणात कुलनामे व देवक असे दोन्ही प्रकार आढळतात. देवक हे कांही कुळांशी सलग्न असे एक चिन्ह आहे. ते पशु, पक्षी, वनस्पती किंवा निर्जीव वस्तुही असू शकते. ज्या कुळाचे एक देवक आहे त्यांचें लग्न होत नाही. एका आडनांवाच्या (किंवा कुलनामाच्या) लोकांचे साधारणपणें एक देवक असते. पानकणीस, पांच-पालवी, कटचार अशी निरनिराळ्या तऱ्हेची देवके असतात.

महाराष्ट्रातील ब्राह्मणांची व अब्राह्मणांची कुलनामे

१. निरनिराळ्या वस्तूंवरून घेतलेली : कुऱ्हाडे, कुदळे वगैरे
२. निरनिराळ्या वनस्पतीवरून घेतलेली : झाडें, जोंधळे वगैरे
३. निरनिराळ्या प्राण्यावरून घेतलेली : वाघ, मोरे, लांडगे वगैरे
४. शारिरीक गुणावरून घेतलेली : काळे, गोरे, तिरवे वगैरे
५. हुद्यावरून व वतनावरून : जोशी, कुलकर्णी, पाटील, देशमुख इ.

अब्राह्मणात बरीच आडनांवे रजपूत वंशाची ( पवार, चव्हाण वगैरे ) दिसतात, तर कित्येक जुन्या राजवंशाचीं आहेत.

| | |
|---|---|
| शिंदे = सिंद | शेलार = शिलाहार |
| कदम = कदंब | चाळके = चालुक्य वगैरे |

महाराष्ट्रातील कुटुंबें उत्तरे प्रमाणेच पितृ पारंपारिक असल्यामुळे कुळात लग्न न करणे ह्याचा अर्थ पितृ कुळांत लग्न न करणे असाच होतो. कर्नाटकातही देवक "बेडगु अथवा बळी" ह्या नांवाखाली असते. कर्नाटकात आडनांवे नाहीत पण एकाच देवकांत लग्न होत नाही.

आडनांवे किंवा कुलनामे कधी उत्पन्न झाली ते समजत नाही. आडनांवाचा खरा प्रसार रजपूतात मुख्यत्वे दिसतो. पूर्वीच्या राज घराण्याना चालुक्य,राष्ट्रकूट, शातकर्णी, शातवाहन, सिंद अशी कुलनामे होतीसे दिसते. ही कोठून आलीं कळत नाही. कुळनाव किंवा वशनांवे मध्य भारतातील गोंड, मुंड वगैरे जातीत आहेत व ती देवकासारखी वाटतात. मराठे, मराठे-कुणबी व इतर जाती ह्यामध्ये सापडणाऱ्या देवकापैकी कांही पुढे दिले आहेत- आघाडा, अंबा, अंजन, बोर, गरुडाचा पंख, हरीण, जांभूळ, ज्वारी, नारळ, कट्यार, कुऱ्हाड, पांचपालवीं वगैरे. ( मराठी लोकांची संस्कृति - डॉ. इरावती कर्वे )

प्रस्तूत विषयक समाजातील निरनिराळ्या भागातील लोकांचीं आडनांवे व पडनांवे सरकारी गॅझेटियर व प्रत्यक्ष भेटी देऊन लेखकानें मिळवली आहेत. ती येणें प्रमाणे.

## गुलबर्गा :

१) कांबळे, २) कोथिमीरे, ३) टोणपे, ४) खडके, ५) तपासे, ६) पलंगे, ७) गंगणे, ८) डोंगरे, ९) घोणे, १०) बेंद्रे, ११) इंगोले, १२) साबणे, १३) नागभूजंगे, १४) गणेशकर, १५) चौधरी १६) सदानंदे, १७) वंजारे व १८) हागलदिवटे (हागल हा कानडी शब्द दिवस या अर्थी आहे. )

## मराठवाडा :

१) थोरात, २) कांबळे, ३) खडके, ४) बेंद्रे, ५) चौधरीं, ६) कोथिमीरे, ७) डोंगरे, ८) घोणे, ९) घोडके, १०) फिसके, ११)काथवटे, १२) जवाहिरे, १३) पलंगे, १४) सूर्यवंशी, १५) सांडवे १६)अदमाने, १७)तपासे, १८)गंगणे, १९)कनकधर, २०) सौदागर, २१) इंगळे, २२) जमदाडें, २३) निचळे, २४) हातागळे, २५) मुळे, २६) साबणें, २७) सदानंदे, २८) टोणपे, २९) रांजणकर, ३०) धाकपाडे, ३१)गव्हाणें, ३२)कलाल, ३३)जठार, ३४)वाडकर.

## नगर जिल्हा :

१) लाड, २) थोरात, ३) घोडके, ४) घोणें, ५) पलंगें, ६) कोथिमीरे, ७) कांबळे, ८) जांभळें, ९) काथवटे, १०) ताडे, ११) भोके.

## कोल्हापूर जिल्हा :

१) क्षिरसागर, २) जाधव, ३) गायकवाड, ४) मोरे, ५] काळे, ६] शेळके, ७] शेंर्के, ८] घोटणे, ९) कांबळें, १०) घोडके, ११) प्रभावळकर, १२] बेंद्रे, १३] भोपळें, १४) कोथिमीरे, १५] पलंगें, १६) लांडगें, १७) घोलपे, १८) घोलप, १९) इंगवले, २०) प्रभावळें २१) प्रभाळें, २२) वाडकर.

## पश्चिम महाराष्ट्रातील इतर जिल्हे :

१) जाधव, २) थोरात, ३) पवार, ४) क्षिरसागर, ५) साळुंके, ६) नकाते, ७) गायकवाड, ८) पलंगें, ९) ताडे, १०) जमदाडे, ११) लाड, १२) कांबळे, १३) घोडके, १४) निकोडे, १५) घोणें, १६) खराटे, १७) खांगटे, १८) वंजारे, १९) गालिंदे, २०) लासुरे, २१) मंडाले, २२) बागुल, २३) इंगोले किंवा इंगवले, २४) कोथिमीरे, २५) खडके, २६) मेहंदळे, २७) जठार, २८) कनकधर, २९) जांभळे, ३०) गाढवे, ३१) घोलप, ३२) बेंद्रे, ३३) प्रभाळें, ३४) टोणपे, ३५) कलाल, ३६) जवाहिरे, ३७) मानकर, ३८) चौधरी, ३९) आदमाणें, ४०) घोटणे, ४१) शेंटगें, ४२) धनगर [नाशिक जिल्हा] ४३) पेंढारी (पाटील), ४४) धाकपाडें, ४५) रत्नपारखे.

**सीमा भाग :** बेळगांव - निपाणी, बिदर - भालकी इत्यादी.

१) भोपळे, २) शेटके, ३) कांबळे, ४) घोडके, ५) शारबीद्रे, ६) बीद्रे, ७] पलंगें, ८) प्रभावळे, ९) ताडे, १०) गायकवाड,

११) जिवरापुरे, १२) घोलपे, १३) काळगे, १४) कोथिमीरे, १५) शेरगार (कलाल), १६) गाजरे, १७) मुळे, १८) सूर्यवंशी, १९) चौधरी, २०) कनकधर.

++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++++

प्रस्तुत समाजातील बहुतेक सर्व आडनांवे वर दिली आहेत. माहिती अभावी कांही आडनांवाचा उल्लेख चूकून राहीला असण्याची शक्यता आहे, तरी या विषयी गैरसमज होऊ नये.

प्रस्तूत विषयक समाजाचा पूर्व इतिहास पाहता हे लोक मूळचे 'क्षत्रिय' आहेत असे स्पष्ट होते, ते असे –

"खाटीक म्हणजें मूळचे खट्टीक तथा सैनिक. सूर्यवंशी लाड हे तर उघड क्षत्रिय शाखेचे लोक. 'लाड' हे पूर्वी घोडदलातील सैनिक होते. तसेच लाड व मराठा या दोन्ही शाखेचे लोक मूळचे 'राष्ट्रीक' आहेत."

या वरील सर्व इतिहासाचे अवलोकन करता हा संपूर्ण हिंदू खाटीक समाज मूळचा 'क्षत्रिय' आहे, हे कोणासही नाकारता येणार नाही. हे क्षत्रिय लोक पराजित झाल्यामुळें व दुष्काळाच्या दैवी आपत्तीत सांपडल्यामुळें जेत्यानी त्याना मांस विक्रीचा हलका व्यवसाय करण्यास भाग पाडले, असे दिसते.

या पुढे क्षत्रिय मराठ्यांच्या ९६ कुळीपैकी २४ कुळयांचे (आडनांवाची) माहिति देण्यात आली आहे. या पुढे दिलेल्या तक्त्यात वंश, गोत्र, कुळें, उपनांवे व देवक इत्यादिचा बऱ्याच अंशाने ज्यांच्याशी मेळ बसतो, ते सर्व महाराष्ट्रातील निरनिराळ्या क्षत्रिय शाखेचे लोक मूळचें एकच आहेत, असे लेखक श्री. के. बी. देशमुख ( अमरावती ) यांचे मत आहे. तेव्हां प्रस्तूत विषयक समाजाच्या ऐक्यासाठी पुढील माहिती अत्यंत उययुक्त व महत्वाचीं अशी आहे.

**क्षत्रिय मराठा जातींची ९६ मुख्य कुळे, उपकुळे, वंश, कुळाचार, वतनाचे गांव इत्यादी दर्शविणारा तक्ता –**

( जातवार क्षत्रियांचा सचित्र इतिहास ले. के. बी. देशमुख )

| अ. क्र. | मुख्य कुलाचे नांव | आडनांवे उर्फ पोटकुळे | वंश | गोत्र | कुलदैवत | लग्नातील देवक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | (आंगण) | घोलप | चंद्र | दुर्वास | भवानी देवी | सोनें, हळद, केतकी, कळंब | आंगणे हे कुळ कोणी कदम कुळाचा पोट भेद मानतात. |
| २ | इंगळे | कांबळे, चौधरी | चंद्र | भारद्वाज | ब्रम्हमाया | कमळ पिवळे | चालुक्य वंशातून निघालेली ही शाखा आहे. इंगळासारखे लाल, तेंजस्वी ते इंगळे. |
| ३ | काळे | कांबळे | सूर्य | भारद्वाज | भवानी देवी | कळंब | काळीचा म्हणजे शेती जमिनीचा बंदोबस्त करणारे ते काळीचें उर्फ काळे. |
| ४ | (खडतरे) | नखाते | चंद्र | लोमश | उमामहेश्वर | पंच पल्लव | खडतर, तापट स्वभावाचा |
| ५ | गव्हाणे | – | चंद्र | कौशीक | उमामहेश्वर | पंच पल्लव | – – |
| ६ | गायकवाड | गाढवे | चंद्र | गौतम | चामुंडेश्वरीदेवी | पंच पल्लव | वऱ्हाडात सूर्यवंशी, वशिष्ठ गोत्री मानतात. |
| ७ | (घाटगे) | खराटे, मानकर | सूर्य | कश्यप | प्रभाकर, प्रभावतीदेवी | साळुंखीचे पंख किंवा पंच पल्लव | – – |
| ८ | जाधव | (यादव) | चंद्र | आत्रि, कौण्डिण्य | शंकर-पार्वती (जोगेश्वरी) | पंच पल्लव | – |
| ९ | थोरात | ताठे | सूर्य | भारद्वाज | भवानीदेवी | सोने, हळद, केतकी, कळंब लाल | – |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | (निकम) | डोंगरे | सूर्य | पराशर | भवानीदेवी | कळंब, उंबर | – |
| ११ | पवार | लांडगे | सूर्य | वशिष्ठ | महादेव, महाकाली | कळंब | – |
| १२ | (बागवे) | जमदाडे | सूर्य | शौनक | महाकाली, महाकालेश्वर | कळंब, पंच पल्लव | – |
| १३ | (पठारे) | खडके | सूर्य | काश्यप | भवानीदेवी, महादेव | बासुंदीचा वेल, हळद, सोने, रुई व कळंब | – |
| १४ | (मोगले) | तपासे, जोंधळे | सूर्य | कौशिक | महादेव | पंच पल्लव | – |
| १५ | मौर्य उर्फ मोरे | भोपळे | चंद्र | भारद्वाज | दुर्गादेवी, गणपती | मयूर पंख | – |
| १६ | (राठोड) | बागुल | सूर्य | कश्यप | जोगेश्वरी | सूर्यकांत, पडछत्र | – |
| १७ | लाड | – | चंद्र | वशिष्ठ | जगदंबा | बासुंदीचा वेल | – |
| १८ | (शिलाहार, शेलार) | शेटगे | सूर्य | भारद्वाज किंवा विश्वामीत्र | जगदंबा | पंच पल्लव | – |
| १९ | (शितोळे) | लाट | सूर्य | काश्यप | जोगेश्वरी | सूर्यकांत-पडछत्र | – |
| २० | शिर्के | काठवडे, ताडे | चंद्र | शांडिल्य | शंकर-पार्वती | कळंब | – |
| २१ | (सावंत) | वणजारे | चंद्र | दुर्वास | जगदंबा | हस्तीदंत, कमळ | – |
| २२ | साळुंखे | इंगवले | सूर्य | भारद्वाज | महादेव, पार्वती तुळजाभवानी. | पंच पल्लव, साळुंखीचे पंख | – |
| २३ | (सुर्वे) | घोणे, साबणे | सूर्य | वशिष्ठ | श्री शंकर-महालक्ष्मी | पंच पल्लव | – |
| २४ | क्षीरसागर | घोडके, सूर्यवंशी, लांडगे | सूर्य | वशिष्ठ | (भवानी देवी) महादेव, महाकाली, जगदंबा. | कळंब | कांही कौण्डिण्य व कांही वशिष्ठ गोत्री क्षीरसागर आहे. |

या मागील तक्त्यातील कंसातील मुख्य कुळें सोडून बाकीची सर्व [४०] कुळें व उपकुळें प्रस्तूत विषयक समाजातही आहेत. यापैकीच बहुसंख्य कुलनामे (आडनावे) मराठवाडा व सीमा भागातील समाजात आहेत, त्याचप्रमाणे ती पश्चिम महाराष्ट्रातील या समाजातही आहेत.

ब्राह्मणेतर जातीमध्यें गोत्रें नाहीत व लग्नसंदर्भात गोत्रास महत्वही नाहीं. ते देवक पाहून लग्न ठरवितात. तेव्हां अब्राह्मणात गोत्राचा विचार करणे अनावश्यक आहे, असे प्रस्तूत विषयक लेखकाचे मत आहे. प्रस्तूत विषयक समाजातील लग्ने मात्र केवळ कुलनामे पाहूनच केली जातात व एकाच कुलनामात लग्न होत नाही. हा समाज लहान असल्यामुळे कुलनामे मोजकीच व सर्वांना परिचीत आहेत. यामुळे लग्ने ठरविताना देवक पाहण्याची याना गरज पडत नाहीं. यामुळेच यांच्यात देवकास विशेष महत्व नाही.

यांच्या पैकी बहुसंख्य लोकांचे देवक पांचपालवी (पंचपल्लवी) आहे. हे लोक मूळचें क्षत्रिय असून मराठवाडा व सीमा भागातील याच समाजातील लोक स्वतःस सूर्यवंशी म्हणवितात. या संपूर्ण समाजात कुलनामे व इतर चालीरितीबाबत बहुतांश साम्य आढळतें. तेव्हां लेखक श्री. देशमुख यांच्या वरील मताप्रमाणेच प्रस्तूत विषयक समाजातील सर्व ( ४० ) कुळातील लोकही मूळच्या एकाच क्षत्रिय शाखचे आहेत, असे प्रस्तूत विषयक लेखकाचे मत आहे. यावरून या समाजात लाड, मराठा व धनगर असे भेद असले तरी हा बहुसंख्य समाज मूळचा एकाच क्षत्रिय शाखेचा आहे, हे स्पष्ट होते.

लाट प्रदेश म्हणजें दक्षिण गुजराथ. दक्षिण गुजराथ व महाराष्ट्रातील लोकामध्यें मानववंशशास्त्रादृष्टचा किती जवळचे साम्य आहे, हे डॉ. इरावती कर्वे यांनी त्यांच्या 'मराठी लोकांची संस्कृती' या ग्रंथात स्पष्ट केले आहे. त्यांचा जो लेख या ग्रंथात सुरूवातीस दिला आहे, त्यातील ठळक अक्षरातील तेवढा मजकूर वाचकानी परत डोळ्याखालून घालावा, म्हणजें लाट प्रदेशातील लाड लोक व मराठी

माणूस यांच्यात वांशीकदृष्टचा किती जवळचे साम्य आहे, याचीं सर्वांना खात्री होईल. याच संदर्भात राजवाडे यांचा महाराष्ट्रीक लोकाविषयीचा मागे दिलेला ऐतिहासीक सिद्धांतही महत्वाचा असा आहे. तेव्हां या सर्व उपलब्ध माहितीवरून प्रस्तूत विषयक समाजातील लोक मूळच्या एकाच 'क्षत्रिय' शाखेचे आहेत, हेच सुस्पष्ट होते.

अकस्मात आकारलेले काळ मोडून टाकतो असे समर्थवचन आहे. या समाजाचेही असेच झालेले आहे. काळ, यवन, अज्ञान आणि उपेक्षा या चौघानी या समाजाचा विध्वंस जितका करता येईल तेवढा केलेला आहे. यामुळेच 'सूर्यवंशी लाड' हे समाजाच्या एका प्रमुख शाखेचे नांव काळाचे उदरात गडप झालेले आहे.

१) मराठवाडा व सीमा भागातील लोकांची आडनांवे, रीतीरिवाज व त्यांचे संबंधी जातीविषयक रिपोर्टमध्ये 'सूर्यवंशी लाड' असा आलेला स्पष्ट उल्लेख.

२) याच समाजातील पश्चिम महाराष्ट्रातील लोकांची आडनांवे व रीतीरिवाज यातील साम्य व त्यातही विपुल असलेली 'लाड' अशी आडनांवे.

३) तसेच धर्मांतरास बळी पडलेल्या महाराष्ट्रातील लोकांची गॅझेटियर्समधील उपलब्ध माहिती.

या वरील सर्व बाबी लक्षात घेता, या समाजातील बहुसंख्य लोक 'सूर्यवंशी लाड' आहेत, हे कोणासही नाकारता येणार नाही. पश्चिम महाराष्ट्रातील याच समाजातील लोकांचा कांही गॅझेटियर्समध्ये व जाती विषयक रिपोर्टमध्ये 'मराठा खाटीक' असा उल्लेख आढळतो. तेव्हा प्रस्तूत समाजात 'मराठा' व 'सूर्यवंशी लाड' असे भेद असले तरी, ते दोघेहीं मूळचे राष्ट्रीक या एकाच क्षत्रियशाखेंचें आहेत. अशा प्रकारे हा बहुसंख्य समाज मूळचा एकाच क्षत्रियशाखेचा असला तरी या समाजातील तिसऱ्या भागीदारास विसरून चालणार नाही. हा

तिसरा भागीदार म्हणजे या समाजातील पूर्वी घोंगडी विणकाम करणारे धनगरशाखेचे लोक होत. तेव्हां अशाप्रकारची या समाजाची जडण-घडण लक्षात घेऊनच या समाजाच्या धुरिणानी इ. स. १९३१ साली या समाजाचे महाराष्ट्र पातळीवर 'क्षत्रिय मराठा धनगर समाज' असे व्यापक नांव धारण केले, असे दिसते. या नांवामागील पूर्व इतिहास पुढें दिला आहे.

## 'क्षत्रिय मराठा धनगर समाज' या नांवाचा पूर्व इतिहास :

इ. स. १९२० साली प्रथमच महाराष्ट्र पातळीवर जेंजुरी येथें समस्त धनगर समाजाचीं एक परिषद झाली. या परिषदे मागील प्रयोजन असे कीं, "होळकरा, तुझ्यामागे कोण आहेत? माझ्या पाठीशी दोन कोट लोक आहेत. तसे तुझ्या पाठीशी कोण आहेत?" असा सवाल इदोरचे कै. तुकोजीराव होळकर महाराज यांना दुसऱ्या एका संस्थानिकानी हेटाळणीने केला. होळकरांच्या मनाला ही गोष्ट फार झोंबली. त्यानी इ. स. १९२० मध्ये जेजुरी येथे धनगर समाजोन्नती (शिक्षण) परिषद बोलावलीं व धनगर समाजातींल सर्व पोट शाखीयांचीं मजबूत संघटना बांधण्याचा एक प्रयत्न केला. मात्र "(इ. स. १९२०) जेंजुरीच्या परिषदेत आपली (प्रस्तूत विषयक समाजाची) मानखंडना झाली."*

---

* कै. ज.प जांभळे गुरुजी यांचे दि.३-१०-१९७१चे तुळजापूर परिषदेतील भाषणातून.

श्री. रामचंद्र हरिभाऊ जवारे हे सातारा येथील फार जुने व लोकप्रिय असे समाजाचे मार्गदर्शक आहेत. सर्व ठिकाणी जागृतीचे लोण त्या काळात त्यानीं नेले. समाजाला मार्गदर्शन करून त्यास संकटापार नेले. १९२० च्या अखिल धनगर परिषदेत त्यानी आपल्या समाजाला परिषदे बाहेर जावे लागू नये म्हणून अत्यंत समयसूचकतेनें तो प्रसंग टाळला. हा प्रसंग म्हणजे त्यांच्या मुत्सद्देगिरीचे मोठे उदाहरण म्हणता येईल.[१]

तात्पर्य १९२० चे अखिल धनगर परिषदेस प्रस्तूत समाजास प्रथमच आमंत्रित करण्यात आलें होते. मात्र या परिषदेत प्रस्तुत समाजातील प्रतिनिधीना सक्रिय भाग घेण्यास इतरांची मान्यता मिळाली नाही हे वरील माहितीवरून स्पष्ट दिसते.

१९२० चे अखिल धनगर शिक्षण परिषदेस इंदोरहून (मध्यप्रांत) प्रस्तूत समाजास आमंत्रण येण्याचे एक प्रमुख कारण संभवते. ते असे.

"मध्य प्रांतात हिंदु खाटिकांना तेथील गडरिया धनगर हे त्यांच्यापैकीच समजतात. गडरिया सांगतात कीं, ते त्यांचे वयस्कर झालेली शेरडे मेंढरे स्वतः मारत नसत. पूर्वी ते त्याना नैसर्गिक मृत्यू येईपर्यन्त सांभाळीत. कालांतराने ते आपल्या जातीतील गरीब माणसास अशा वृद्ध झालेल्या शेरडा मेंढरास मारण्यासाठी नोकरीस ठेवू लागले व त्यांचे मांस विकू लागले. यातील नफा दोघात वाटून घेवू लागले. अशा प्रकारे शेरडा मेंढरास मारून त्यांचे मांस विक्रय करणाऱ्या लोकांची पुढे रुढीने व्यवसायावरून 'खाटीक' जात निर्माण झाली, अशा प्रकारची समजूत गडरिया धनगरात आहे."

(दि ट्राइब्स अँड कास्टस् ऑफ दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ऑफ इंडिया – भाग ३,
पृ. क्र. ४५४ – आर. व्ही. रसेल)

१– डॉ. संतूजी रामजी लाड यांचे चरित्र पृ. क्र ३० – ले. ग वा. खराटे.

या वरील प्रकारचे-मध्य प्रांतातील गडरिया धनगरांचे रुढ समजुतीमुळें महाराष्ट्रातील हिंदू खाटीक हे धनगरापैकीच असले पाहिजेत असे वरील परिषदेचे इंदोरकर निमंत्रकाना वाटले असावे किंवा त्यांनी तसे नगर गॅझेटियरमधील यांचें संबंधीचे माहितींवरून गृहीत धरलें असावे. प्रत्यक्षात मात्र प्रस्तूत समाजातील कांबळे व बागुल या आडनांवाची दोन घराणी सध्या इदोर येथें आहेत व ती इकडूनच तिकडे अगदी अलीकडच्या काळात स्थाईक झालेली आहेत. यांचा गडरिया खाटिकांशी कांही एक ज्ञाती संबंध नाही. १९२० च्या अखिल धनगर शिक्षण परिषदेचीं माहिती पुढे दिली आहे.

## अखिल धनगर शिक्षण परिषद :

**बैठक पहिली –**

**श्री क्षेत्र जेजूरी, जिल्हा पुणे**

तारीख १ / २ / ३ नोव्हेंबर सन १९२० रोजी भरली

तीत झालेल्या कार्यक्रमाची डायरी (अहवाल)

जेंजूरीं ता. ३१–१०–१९२०

आज रोजी दुपारी दोन वाजण्याचे गाडीने तळोदे येथील जहागीरदार कृष्णरावजी बारगळ साहेब हे आले. ता. ३१–१०–२० रोजी रात्री सुमारे ८।। वाजण्याच्या सुमारास जहागिरदारसाहेब हे इंदूरची सरदारमंडळी होळकर वाड्यात उतरलेली होती, तेथें आले. नंतर रा. ब. गोविंदरावजी मतकर हे आजारी असल्यामुळे ते येऊ शकणार नाहीत, तरी आपण अध्यक्षस्थान स्वीकारावे, असे त्यांस सांगण्यात आले. त्यावर "आपण सर्वजण त्या कामास लायक आहांतच, तेव्हां मजकडे हे काम कशाला ?" असे त्यांनी लीनतेने सांगितले व आपल्या येण्याचा उद्देश, येथें जमलेल्या मंडळीत तट आहेत असे कळले तर त्या संबंधाने कसे काय, असे ते म्हणाले. तेव्हां परिषदेकडून सर्वांच्या जेवण्या खाण्याचीं व राहण्याची व्यवस्था पृथक् पृथक् करण्यात

आली असल्यामुळें तंटा संबंधाने कांहीं भानगड उपस्थित होईल, असे वाटत नाही, असे मंडळीने त्यांस कळविले. त्यावर रा. बारगळसाहेब म्हणाले की, "हे आपले म्हणणे ठीक आहे, परंतु मला असे कळले आहे की, खाटीक म्हणून जी एक जात आहे, तिला आपण परिषदेत सामील कसे केले, अशी लोकांची तक्रार त्यांनी मजकडे आणिली होती; म्हणून या गोष्टीची अगोदर चर्चा होऊन ती निकालात निघाल्याशिवाय परिषदेचे काम सुरळीतपणें चालणार नाही." त्यावर यांत समाधानकारक निकाल तो काय व्हावयाचा? **खाटीकवर्ग स्वतःस धनगर असे समजतो ही गोष्ट पुण्यास प्रसिद्ध** आहे. शिवाय परिषद भरविण्यासंबंधाने जे विनंतीपत्र प्रसिद्ध करण्यात आले होते, त्यात तर असे स्पष्टपणे जाहीर केलेले आहे की, या परिषदेत सामाजिक गोष्टीची चर्चा बिलकुल होणार नाही. आता वास्तविक ते धनगर आहेत की नाहीत या प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास रा. ब. जनरल मतकरसाहेब यांच्या छापील भाषणांत "स्पष्ट सांगावयाचे म्हणजे क्षत्रिय वर्णाच्या ज्या अनेक जाती बनल्या त्यात 'धनगर' ही एक जात बनली; त्यात पुनः देशस्थ व कोकणस्थ हे भेद डोकावले; धंद्यावरून खुटेंकर, हटकर, सनगर, कनगर, खाटिक इत्यादि भेद पडले." असे वाक्य आहे. ते रा. बारगळसाहेब यांस दाखविण्यात आले. तेव्हां त्यांनी ते भाषण समग्र वाचून पाहिले, त्यावर त्यानी भाषण सर्व ठीक आहे, परंतु जातीचे कसून संशोधन केले असते तर उपरोक्त वाक्य घालता आले नसते, असे मला वाटते. (असे ते म्हणाले.) तेव्हां जातीची माहिती मिळविण्याचा एक ठराव परिषदेपुढे यावयाचाच आहे, असे सांगून सर्व ठरावाचा मसूदा त्यांस दाखविण्यात आला. तें सर्व पाहून रा. बारगळसाहेब म्हणाले की, अध्यक्ष कोणीही असो, हल्ली गोष्टीचे स्वरुप ज्या प्रकारचे आहे, ते पाहता ते (वरील) वाक्य काढून टाकणेच इष्ट आहे, असे मला वाटते. ते ऐकून आरंभी उगीच बखेडा माजू नये; म्हणून रा. बारगळसाहेबांच्या सल्ल्याप्रमाणे ते वाक्य काढून टाकण्याविषयी सर्वांचे एकमत झाले. तरी पण पुनः अशीं शंका निघाली की, यद्यपि भाषणातले वादग्रस्त वाक्य काढून

टाकले तरी खाटिक लोकांच्या धनगरपणाचा प्रश्न मुग्धपणे कायम राहतोच, त्याची वाट काय? वाटेल त्याला परिषदेत सामील करावयाचे की काय? यावर कित्येकांनी असे उद्गार काढले की, वाटेल त्याला जरी सामील करता येणार नाही, **तरी जे आपणास धनगर म्हणवून घेतात**, त्यांस सामील करून घेण्यास काय हरकत आहे? तेव्हां ज्या अर्थी जाती निर्णयासारखे सामाजिक विषय सोडूनच जर या प्रश्नाचा विचार कर्तव्य आहे, त्याअर्थी त्याला इतका पुरावा पुरेसा आहे व त्यासंबंधाने हवीतर खात्री करून घ्यावी. इतक्यांत कर्मधर्म संयोगाने सातारचे रा. रामचंद्र हरी जव्हारे हे कांही कामा निमित्त वरील चर्चा चालल्या ठिकाणी आले. त्याजबरोबर त्या वर्गातील कांही प्रमुख मंडळीही होती. त्या सर्वांना मंडळी बसली होती तेथे बोलाविले. त्यांना रा. बारगळसाहेबांनी तुमची जात कोणती आणि धनगर असल्यास शाखा कोणती असे विचारले. त्यावर ते लोक म्हणाले, "आम्ही धनगर आहो. कोणत्या शाखेचे आहो तेही सांगू पण हा प्रश्नच येथे उत्पन्न कां व्हावा? धनगर हे नांव आम्ही परिषदेकरिताच धारण केलेले नाही; व त्यांत कांही मोठेपणा आहे असेही नाही. पूर्वीच्या जाहीर विनंतिपत्रात सामाजिक चर्चा न करण्याची अट आहेच, तशांत प्रतिनिधीची तिकीटे आमच्यातील लोकांनी घेतली असून स्वागत कमिटीत उपाध्यक्षही आमच्या वर्गातील गृहस्थास नेमण्यात आले आहे. येथपावेतो सर्व व्यवस्था झाल्यावर ऐनवेळेला अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित करणे कितपत वाजवी होणार आहे, याचा विचार आपणच करावा. शिवाय आम्ही होऊन तुमच्यात आलो नसून, **इंदूरकर मंडळीच्या आमंत्रणावरून आलो आहो**, ही गोष्टही विचारात घ्यावी." यावर त्या लोकांस असे सांगण्यात आले की, **इंदूरकर मंडळी दूर राहणारी असल्यामुळे त्यांना या वादग्रस्त गोष्टींचा अंदाज करिता आला नाही.** ही चर्चा स्थानिक लोकांनी सुरू केली असल्यामुळे त्या संबधाची विचारणा तुम्हांस केली, यात तरी गैर ते काय झाले? कोणालाही आपल्या जाती संबंधाने माहिती देण्यास शंका का वाटावी? तेव्हां खाटीक मंडळीतर्फे असे सांगण्यात आले कीं, ठीक आहे. आपली खात्री देण्याजोगा पुरावा

आम्ही देऊ पण त्यासाठीं अवसर मिळाला पाहिजे. उद्याची परिषद तहकूब करा. म्हणजे पुरावा आणून देतो. परंतु परिषद तहकूबीचीं कल्पना कोणासच आवडली नाही. शिवाय हा प्रश्नच अस्थानी असल्यामुळे तो प्रश्नच उपस्थित न होईल तर बरे असे कांही म्हणाले. तेव्हा रा. बारगळसाहेब म्हणाले की, प्रश्न कोणी उपस्थित न केला तर ठीकच आहे परंतु भरसभेत जर तो कोणी काढला तर त्याचे तोंड कोण धरू शकणार ? आणि असा प्रश्न निघाल्यास तो सामाजिक परिषदेचा आहे, असे सांगून त्याचा तात्पुरता निकाल लावता येईल. मात्र परिषदेच्या प्रोसिडिंगात तो नमूद झाल्याशिवाय राहणार नाही. या उपर कोणाकडून कांही उत्तर न आल्याने रात्रीची चर्चा संपली ?

ता. १-११-२० रोजी सकाळी वाड्यात रा. बारगळसाहेब यांनी रा. ब. जनरल मतकर यांच्या अध्यक्षत्वाच्या भाषणांत जो फेरबद्दल करावयाचा होता, तो करून व त्यास आपले प्रास्ताविक भाषण जोडून ते मंडळीस दाखविण्यासाठीं खाजगी रितीने आणिले. त्या भाषणात "ह्या सभेस फक्त धनगर म्हणवून घेणारासच मदत करिता येईल." म्हणजे या पुढें परिषदेच्या कामात सामील झाल्याने जी ज्यांची पूर्वस्थिती असेल म्हणजे जो बहिष्कृत केला गेला असेल, तो जातीत सामील झाला असे होणार नाही, तसेच जो वास्तविक धनगर नसेल, तो धनगर आहे, असे ठरले जाणार नाही. असा खुलासेवार मजकूर होता. परंतु हा प्रश्न एक तऱ्हेने सामाजिक परिषदेचा असल्याने व आपला धनगरपणा शाबित करण्याचा बोज धनगर म्हणवून घेणारांवर असल्याने उपरोक्त स्पष्ट खुलाशाची तितकी आवश्यकता नाही म्हणून तो मजकूर गाळण्यात येऊन वरील अवतरण चिन्हांतले वाक्यच कायम ठेवण्यात आले. हे इतके इकडे संपत आहे तोच कांही अंतरावर धनगर समाजात आपसात कुजबूज सुरू झाली होती. त्यांना काय प्रकरण आहे, असे विचारले गेले, व त्यावर या संबंधी त्यांनी काढलेल्या शंकेचे समाधान व्हावे, एतदर्थ जें काय ठरले होते ते सांगण्यात आले. या उपर कांही पुढाऱ्यांनी असे उद्गार काढले

की, आमचे जरी सदरहू वाक्याने समाधान झाले तरी आमच्यातील अप्रबुद्ध मंडळीचे मुळीच समाधान होत नाही, याला काय करावे? तेंव्हां आतां तुम्हीच त्यांची समजत घालून परिषद यशस्वी करणे हे तुमचे काम आहे असे त्यास सांगण्यात आले. याचा परिणाम कितपत झाला, हे जरी सांगता येत नाहीं तरी दुपारी परिषदेच्या कामास सुरूवात होण्यापूर्वी मंडपातही ही चर्चा चालत होती. बहुतेक मंडळी परिषद सोडून जाण्यास देखील तयार झाली. कारण त्यांचा खाटीक लोकांसह एका बैठकीवर देखील एकत्र बसावयाचे नाहीं, असा जोराचा आग्रह होता; म्हणून मंडपात लावलेल्या जिल्हानिहायच्या पाटचा त्यांच्या समजुतीकरिता काढण्यात आल्या. अशा प्रकारे कसे बसे करून जनतेचा धुमसत असलेला विरोधाग्नि सावरून धरण्याचा जरी यत्न झाला, तरी विषय नियामक कमिटीत प्रतिनिधी निवडण्याच्या वेळी त्याचा स्फोट झालाच, ती हकीकत पुढें क्रमाने येईल. असो.

नंतर कार्यक्रमांत लिहिलेले सहा गृहस्थांचे निबंधवाचन झाल्यानंतर विषय नियामक कमिटी मुक्रर करणे करिता दर जिल्ह्यातून पांच पांच मेंबर सुचविण्याबद्दल विनंती करण्यात आल्यावर मधल्या सुट्टीत प्रत्येक जिल्ह्यातील प्रतिनिधींनी आपआपल्या जिल्ह्यातील मेंबरांची नांवे सुचविली.

या (सुचविलेल्या) यादीत कांही कांही जिल्ह्यांतील नांवे पांचाच्या ऐवजी दहा आली आहेत, त्याचा तपास करता खाटीक समाजानी आपली नांवे निराळी दिली असून आम्हांस प्रत्येक जिल्हयापैकी फक्त पांचच नांवे पाहिजे असल्याने कोणती नांवे ठेवावीत याबद्दल बहुमत घेता बहुमताने खाटिक समाजाच्या नांवास हरकत आलीं. त्यावर खाटिक समाजातील मंडळी नाराज होऊन बिथरलीं. त्यामुळे प्रसंग मोठा कठीण होता, दंगा होण्याचा रंग होता परंतु तो प्रसंग ईश्वर कृपेने टळला कारण लागलीच खाटिक समाजाचे पुढारी श्रीयुत रामचंद्र हरी जव्हारे यानी भरसभेत सर्वास उपदेश करून चालू परिषदेत आम्ही आल्याप्रमाणें आम्हास सामील करावे. पुढचे वर्षापासून

आम्ही आपण बोलावले तरी येणार नाही, म्हणोन कळकळीचे भाषण केलें, त्यावर अध्यक्षानी उभे राहून सर्व समाजास उपदेश केला, तो असा –

सभ्य गृहस्थ हो ! आजचा प्रसंग एकजुटीचा आहे. आपसांत फूट न पाडता एकोप्याने कोणाचीही मनें न दुखविता चालू काम पार पाडणेबद्दल रा. जव्हारे यांनी जे सुंदर भाषण केले, त्याबद्दल मीं त्यांचे फार फार आभार मानून विनंती करितो की, खाटिक समाजाचें पुढारी रा. जव्हारे यांचा उपदेश सर्वांनी ध्यानी घेऊन त्यांचे म्हणणें चालू वर्षाकरिता मान्य करून पुढच्या वर्षी आम्ही येणार नाही, या त्यांच्या आश्वासनावर पूर्ण विश्वास ठेवून हल्ली सबजेक्ट कमिटीत त्याना सामील होऊं देण्यास कोणत्याही प्रकारे हरकत न कराल, अशी आशा आहे कारण पुढच्या वर्षाकरिता हा प्रश्न सुटला असल्याने आतां यावर हरकत करण्याचे कोणतेही कारण उरले नाहीं, तेव्हां ही परिषद संपेपावेतो खाटिक समाजातील मंडळीस या परिषदेच्या कार्यात भाग घेऊ देण्याबद्दल माझी विनंती समाजाकडून मान्य होईल, अशी मी आशा करितो.

या प्रमाणे कळकळीचे व मुद्देसूद असे अध्यक्षांचे भाषण झाल्यावर चालू परिषदेपुरती या समाजास हरकत नाही, म्हणून सभेतून टाळयांच्या गजरात परवानगी मिळाल्यानंतर सबजेक्ट कमिटींत निवडून आलेल्या मेंबरास उदईक सकाळी आठ वाजता सबजेक्ट कमिटीचे सभेस हजर राहण्यास सांगण्यात येऊन आजच्या दिवसाचे काम संपले.

++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++++

टीप : पुण्यातील खाटीक वर्ग स्वतःस धनगर समजतो, ही गोष्ट पुण्यास प्रसिद्ध आहे, असा उल्लेख वरील अहवालात आलेला आहे. या संबंधी लेखकाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

१) पेशवाई काळापासून पुणेकरांचा इंदोरकरांशी संबंध आहे. तसेच या समाजातील कांही मंडळी होळकरांच्या सैन्यदलात होती.

तेव्हां इंदोरमधील गडरिया धनगरांच्या रुढ समजूतीप्रमाणेच इतर इंदूरकर मराठी मंडळीही पुणेकर खाटीक मंडळींना धनगर समजत असावेत. इंदोरकर मंडळी व होळकर महाराज यांच्या प्रभावामुळे पुण्यातील कांही खाटीक मंडळी स्वतःस 'धनगर' समजत असावीत.

२) पुणे भागातील खाटीक समाजातील कांही घराण्यात पूर्वी घोंगडे विणण्याचा व्यवसाय होता व हेच लोक स्वतःस 'धनगर' म्हणवून घेत असावेत.

जेजूरीच्या १९२० च्या पहिल्या अखिल धनगर उन्नती परिषदेने प्रेरित होऊन पश्चिम महाराष्ट्रातील प्रस्तुत समाजातील समाजबांधवानी याच साली एक परिषद आयोजित केली. या परिषदेचे पहिले अधिवेशन ठाण्याचे प्रसिद्ध पुढारी श्रीयुत नारायणराव आंबाजी घोलप यांच्या अध्यक्षतेखाली सन १९२० च्या डिसेंबर महिन्यात पुणे येथे भरले होते.[1] पहिल्या परिषदेविषयी माहिती मिळवू लागतो तेव्हां बनावट, नामधारी व स्वार्थी पुढाऱ्यांनी समाजकार्याचा खेळ-खंडोबा करून बसले आहेत, असा खेदजनक प्रकार दिसून आला, परिषदेविषयी ही निराश-जनक परिस्थिती (समाज) मंडळीच्या मनाला टोचत होती.[2]

१९२० च्या परिषदेनंतर सन १९३१ च्या डिसेंबर महिन्यात पुणे येथेच दुसरे अधिवेशन भरले होते. या परिषदेचे अध्यक्ष बार्शीचे कै. भगवंतराव तथा रावसाहेब कांबळे हे होते.

१ – १९३१ चें परिषदेचा अहवाल पृठ क्र. १५

२ – १९३१ चे परिषदेचा अहवाल प्रस्तावना क्र. १

परिषदेची ही बैठक भरण्याचे श्रेय आमच्या पदरात कोणाच्या श्रमाने पडत असेल तर ती पुणे येथील आमच्या समाजातील 'क्षत्रिय मराठा धनगर तरुण मंडळ' या संस्थेचे श्रम होय. हे मंडळ ता. २०-४-१९२८ रोजी स्थापन झाले. याच्या स्थापनेचा समारंभ गुरुवर्य श्री. विठ्ठल रामजी शिंदे उर्फ अण्णासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाला.[१] या संस्थेचे सल्लागार मंडळामध्ये खालील सन्माननिय व्यक्ती होत्या.

१. गुरुवर्य व्ही. आर. शिंदे उर्फ महर्षि विठ्ठल रामजी शिंदे
२. श्रीयुत केशवराव गणेश बागडे, बी. ए. एल्‌एल्. बी.
३. कृ. गो. पाताडे
४. शं. बा. क्षीरसागर

यावरून हे स्पष्ट होते कीं, १९२० च्या जेजूरी येथील परिषदेनंतर प्रस्तूत समाजातील पश्चिम महाराष्ट्रातील कांही समाज बांधवानी 'क्षत्रिय मराठा धनगर' या नांवाचा वापर सुरू केला व महाराष्ट्र पातळीवर हे नांव जाहिरपणें १९३१ च्या समाज परिषदेत घेण्याचे ठरले.

आपला समाज व्यापारी पेशाचा असल्यामुळे धंद्यात ठिकठिकाणी फंड आहेत व त्याचप्रमाणे ठिकठिकाणी समाजाच्या मिळकतीही आहेत, परंतु अशा फंडाचा किंवा इमारतीच्या उत्पन्नाचा समाजाला फायदा मिळत नाही व त्याचे मुख्य कारण सर्व समाजाच्यावतीने योग्य रितीने झटणाऱ्या मध्यवर्ती संस्थेंचा अभाव हे होय. परिषदेत आपण या दृष्टीने विचार करून समाजाच्या सर्व फंडाची व मिळकतीचींही योग्य व्यवस्था राहील यासाठी मध्यवर्ती संस्था काढावी, असे आवाहन १९३१ च्या परिषदेत अध्यक्ष कै. रावसाहेब कांबळे यांनी आपल्या भाषणात केले आहे.

१ – १९३१ चें परिषदेचा अहवाल पृठ क्र. १८

या परिषदेत सर्व समाज बांधवानी 'क्षत्रिय मराठा धनगर' या नांवाने आपणास संबोधून घ्यावे अशी शिफारस करणारा ठराव पास करण्यात आला. तो ठराव असा –

ठराव २३ वा :– ( पृष्ठ क्र. ६८ )

आपला समाज वस्तुत: एकरुप असून निरनिराळ्या ठिकाणी कांही लोक निरनिराळी नांवे धारण करितात असे आढळून येते, असे केल्याने निष्कारण मतभेद वाढून समाजकार्यास अडथळा येतो. ही उणीव नाहीशी करण्याकरिता सर्व समाजात ऐक्य व प्रेम वाढून समाजाची प्रगती झपाट्यानें व्हावी, म्हणूम सर्व समाजबंधूनी 'क्षत्रिय मराठा धनगर' या नांवाने आपणाला संबोधून घ्यावे, अशी या परिषदेची शिफारस आहे.

हा ठराव श्री. रामचंद्र हरीबा जवारे, सातारा, यांनीं मांडला व त्यास श्री. कृष्णाजी नरसिंगराव घोडके, निपाणी, यांचे अनुमोदन मिळून तो सर्वानुमते पास झाला.

यावरून हे स्पष्ट होते की, वरील परिषदेत पश्चिम महाराष्ट्रातील समाजबांधवानीं 'क्षत्रिय मराठा धनगर' हे नांव धारण केले. मात्र हे नांव धारण करण्यापूर्वी प्रस्तूत समाजाच्या पूर्व इतिहासाचा सखोल अभ्यास केला गेला नाही हे याच परिषदेतील अध्यक्षाचे भाषणावरून स्पष्ट होते. ते असे. "इतिहास संशोधनाचे कार्य तज्ञ लोकांकडून चालू आहे. तेव्हां या गोष्टीचाहीं फायदा घेऊन आमच्या समाजातील सुशिक्षित व विद्वान लोकांनी पूर्व इतिहासाचे यथार्थ ज्ञान लोकांस करून दिले पाहिजे." असे म्हणून परिषदेचे अध्यक्ष कै. रावसाहेब कांबळे यांनी लोकांची तात्पूरती समजूत काढली व समाजातील सुशिक्षीतांना पूर्व इतिहासाचा अभ्यास करण्याचे आवाहन केले. मात्र गेली ४० वर्षे या विषयाकडे कोणीही लक्ष दिले नाही. यामुळे प्रस्तूत विषयक लेखकांस या विषयास समाजऐक्यासाठी हात घालावा लागला. असो.

परिषदेची ही बैठक भरण्याचे श्रेय आमच्या पदरात कोणाच्या श्रमाने पडत असेल तर ती पुणे येथील आमच्या समाजातील 'क्षत्रिय मराठा धनगर तरुण मंडळ' या संस्थेचे श्रम होय. हे मंडळ ता. २०-४-१९२८ रोजी स्थापन झाले. याच्या स्थापनेचा समारंभ गुरुवर्य श्री. विठ्ठल रामजी शिंदे उर्फ अण्णासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाला.[1] या संस्थेचे सल्लागार मंडळामध्ये खालील सन्माननिय व्यक्ती होत्या.

१. गुरुवर्य व्ही. आर. शिंदे उर्फ महर्षि विठ्ठल रामजी शिंदे
२. श्रीयुत केशवराव गणेश बागडे, बी. ए. एल्‌एल्‌. बी.
३. कृ. गो. पाताडे
४. शं. बा. क्षीरसागर

यावरून हे स्पष्ट होते कीं, १९२० च्या जेजूरी येथील परिषदेनंतर प्रस्तूत समाजातील पश्चिम महाराष्ट्रातील कांही समाज बांधवानी 'क्षत्रिय मराठा धनगर' या नांवाचा वापर सुरू केला व महाराष्ट्र पातळीवर हे नांव जाहिरपणें १९३१ च्या समाज परिषदेत घेण्याचे ठरले.

आपला समाज व्यापारी पेशाचा असल्यामुळे धंद्यात ठिकठिकाणी फंड आहेत व त्याचप्रमाणे ठिकठिकाणी समाजाच्या मिळकतीही आहेत, परंतु अशा फंडाचा किंवा इमारतीच्या उत्पन्नाचा समाजाला फायदा मिळत नाही व त्याचे मुख्य कारण सर्व समाजाच्यावतीने योग्य रितीने झटणाऱ्या मध्यवर्ती संस्थेचा अभाव हे होय. परिषदेत आपण या दृष्टीने विचार करून समाजाच्या सर्व फंडाची व मिळकतीचींही योग्य व्यवस्था राहील यासाठी मध्यवर्ती संस्था काढावी, असे आवाहन १९३१ च्या परिषदेत अध्यक्ष कै. रावसाहेब कांबळे यांनी आपल्या भाषणात केले आहे.

१ – १९३१ चें परिषदेचा अहवाल पृठ क्र. १८

या परिषदेत सर्व समाज बांधवानी 'क्षत्रिय मराठा धनगर' या नांवाने आपणास संबोधून घ्यावे अशी शिफारस करणारा ठराव पास करण्यात आला. तो ठराव असा –

ठराव २३ वा :– ( पृष्ठ क्र. ६८ )

आपला समाज वस्तुत: एकरुप असून निरनिराळ्या ठिकाणी कांही लोक निरनिराळी नांवे धारण करितात असे आढळून येते, असे केल्याने निष्कारण मतभेद वाढून समाजकार्यास अडथळा येतो. ही उणीव नाहीशी करण्याकरिता सर्व समाजात ऐक्य व प्रेम वाढून समाजाची प्रगती झपाट्यानें व्हावी, म्हणूम सर्व समाजबंधूनी 'क्षत्रिय मराठा धनगर' या नांवाने आपणाला संबोधून घ्यावे, अशी या परिषदेची शिफारस आहे.

हा ठराव श्री. रामचंद्र हरीबा जवारे, सातारा, यांनीं मांडला व त्यास श्री. कृष्णाजी नरसिंगराव घोडके, निपाणी, यांचे अनुमोदन मिळून तो सर्वानुमते पास झाला.

यावरून हे स्पष्ट होते की, वरील परिषदेत पश्चिम महाराष्ट्रातील समाजबांधवानीं 'क्षत्रिय मराठा धनगर' हे नांव धारण केले. मात्र हे नांव धारण करण्यापूर्वी प्रस्तूत समाजाच्या पूर्व इतिहासाचा सखोल अभ्यास केला गेला नाही हे याच परिषदेतील अध्यक्षाचे भाषणावरून स्पष्ट होते. ते असे. "इतिहास संशोधनाचे कार्य तज्ञ लोकांकडून चालू आहे. तेव्हां या गोष्टीचाहीं फायदा घेऊन आमच्या समाजातील सुशिक्षित व विद्वान लोकांनी पूर्व इतिहासाचे यथार्थ ज्ञान लोकांस करून दिले पाहिजे." असे म्हणून परिषदेचे अध्यक्ष कै. रावसाहेब कांबळे यांनी लोकांची तात्पूरती समजूत काढली व समाजातील सुशिक्षीतांना पूर्व इतिहासाचा अभ्यास करण्याचे आवाहन केले. मात्र गेली ४० वर्षे या विषयाकडे कोणीही लक्ष दिले नाही. यामुळे प्रस्तूत विषयक लेखकांस या विषयास समाजऐक्यासाठी हात घालावा लागला. असो.

'क्षत्रिय मराठा धनगर समाज' या व्यापक नांवाची वैचारिक प्रेरणा सातारचे कै. रामचंद्र हरिबा जवाहिरे यांच्याकडून प्रामुख्यानें मिळाली असें समजते. यांच्याशी व कै. रावसाहेब काबळें, बार्शी यांच्याशी लेखकास विचारविनीमय करण्याची सुसंधी प्राप्त झाली होती. कै. रावसाहेब यांच्यामते, आपण 'खाटीक' म्हणजे मूळचें क्षत्रिय असून आपल्या समाजात मराठा व धनगर या दोन्ही शाखेंचे लोक आहेत. यामुळे 'क्षत्रिय मराठा धनगर' हे सर्वांना सामावून घेणारे व्यापक नांव १९३१ च्या परिषदेत घेण्यात आले. तसेच कै. जवाहिरे यानी नगर गॅझेटियर व एन्थॉव्हेन रिपोर्टवरून वरील नांव घेण्यात आले, असे स्पष्ट केले. तसेच 'खाटीक' या जातीवाचक शब्दाचा रुढ अर्थ मांस विक्रेता असा असला तरी हा शब्द मराठी भाषेत अत्यंत हीन (निर्दयी) अर्थाने वापरण्याची प्रथा पडली असल्यामुळें वरील नांव धारण करण्याचे ठरले, असे या दोघांच्याही सांगण्यात आले. हे नांव धारण करताना मराठवाडा व सीमाभागातील लाड समाजाचा विचार करण्यात आलेला नसला तरी महाराष्ट्रीक लोकातच लाड समाजाचा अंतर्भाव होत असल्यामुळे या व्यापक नांवात त्यांचाही अंतर्भाव आपोआप होतो, हे वेगळे सांगण्याचे कारण नाही.

तेंव्हां 'क्षत्रिय मराठा धनगर' हे व्यापक नांव महाराष्ट्र पातळीवर समाज ऐक्यासाठी या पुढेही धारण करण्यास हरकत नाही, मात्र या नांवामागील इतिहास व व्यापक अर्थ याचा सर्वांना विसर पडता कामा नयें. हे नांव धारण केले तरी आपण मूळचे 'हिंदू खाटीक' आहोत हे या समाजाच्या एकीकरणासाठी सर्वांनी लक्षात ठेवणे अगत्याचे आहे. या उलट या नांवाचा आधार घेऊन आपण मूळचे 'हिंदू खाटीक' नसून 'क्षत्रिय धनगर' आहोत, अशी दुराग्रही भूमिका घेतल्यास या समाजाचे कदापीही एकीकरण होऊ शकणार नाही. एकीकरणास पोषक गोष्टी नसल्यास कशी फजिती होते याची प्रचिती सन १९२० च्या अखिल धनगर शिक्षण परिषदेवरून स्पष्ट येते, असो.

## नियोजित धनगर प्रॉजेक्ट रिपोर्ट :

धनगर समाजाच्या सर्व शाखेंचा सामाजिक, सांस्कृतिक व मानववंशशास्त्रीय अभ्यास समाजशास्त्रज्ञ डॉ.मल्होत्रा यांचे निरीक्षणा-खाली डेक्कन कॉलेज, पुणे येथें पूर्ण करण्यात आला आहे व त्यांचा धनगर प्रॉजेक्ट रिपोर्ट प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर आहे.

१९२० च्या अखिल धनगर शिक्षण परिषदेचे प्रस्तूत विषयक समाजास आलेले अकस्मात आमंत्रण व तद्नंतर १९३१ साली पश्चिम महाराष्ट्रातील समाजबांधवानी पुणे येथील परिषदेत या समाजाचें 'क्षत्रिय मराठा धनगर' असे धारण केलेले व्यापक नांव. यामुळें या समाजाचे 'क्षत्रिय धनगर' हे चुकीचे नांव पश्चिम महाराष्ट्रात रुढ होण्यास बऱ्याच प्रमाणात मदत झाली. यामुळें या भागातील बहुसंख्य समाजबांधवानी इ. स. १९२० पासून 'खाटीक' या मूळ नांवाचा पूर्णपणे त्याग करून 'क्षत्रिय धनगर' असे जातीवाचक नांव धारण करण्यास सुरूवात केली. यामुळे आपोआप या लोकांचा वरील धनगर प्रॉजेंक्ट रिपोर्टमध्ये 'धनगर खाटीक' या शाखेत समावेश करण्यात आला आहे. या संबंधी लेखकाची डॉ. मल्होत्रा यांच्याशी सखोल चर्चा झाली आहे. डॉ. मल्होत्रा याना प्रत्यक्ष पाहणीत या समाजातील कांही लोकामध्ये धनगर समाजाशीं साम्य असलेल्या प्रमुख दोन गोष्टी आढळल्या व त्या अशा आहेत.

१) या समाजातील कांही लोक पूर्वी घोंगडी विणकामाचा व्यवसाय करीत होती व यांच्या घरापुढे घोंगडी विणकामासाठीं रोवलेला खुट्टा व विणकरास बसण्यासाठी केलेला खड्डा आढळतो, असे ते म्हणतात. घोंगडी विणकामाची कला केवळ धनगरानाच अवगत असल्यामुळे वरील लोक मूळचे 'धनगर' असले पाहिजेत असे त्यांचे मत आहे व त्यांच्या या मताशी लेखक पूर्णपणे सहमत आहे. एकूण सर्व समाजाचा विचार करता मात्र लोक हे मांसकेच आहेत.

२२६२२ निबंध२०७

२) यांच्यापैकी कांही लोकांच्या लग्नात नवरदेवाच्या हातात लोकरीचे कंकण बांधण्याची चाल आहे व ही प्रथा उन्नी कंकण धनगरात रुढ आहे, असे डॉ. मल्होत्रा म्हणतात. त्यांच्या या मताशी मात्र लेखक सहमत नाही. लग्नातील ही प्रथा अनेक जातीमध्ये रुढ आहे, अशी माहिती आर. व्ही. रसेल यांच्या रिपोर्टमध्यें आलेली आहे. हा रिपोर्ट येथें दिला आहे.

**लोकरीचे पावित्र्य :**

लोकर ही सर्व हिंदूमध्यें पवित्र समजतात. ती विधिपूर्वक शुद्ध समजतात. ब्राह्मण हे जेंवताना किंवा धार्मिक कार्य करताना लोकरीचे कपडे घालू शकतात. **अनेक जातीमध्ये लग्नाचे वेळी नवरदेव लोकरीचे कंकण मनगटात घालतात.** संन्याशी व गोसावी हे लोकरीच्या जटा किंवा टोप वापरतात व जवळ नेहमी लोकरीचे गंडे बाळगतात. मंत्राचें जप करण्यासाठीं वापरण्यात येणाऱ्या रुद्राक्षाच्या माळा देखील लोकरीच्या असतात. अशा प्रकारे लोकर ही पवित्र मानण्याचे प्रमुख कारण म्हणजे सूती कापडाचे कपडें वापरण्यात येण्यापूर्वीचे पुरातन काळापासून लोकरीचे कपडे वापरले जातात व म्हणून पारंपारिकरुढीनें ते धर्मकार्याचे वेळी वापरतानाहि पवित्र समजतात. कदाचित आर्यांचा भारतात प्रवेश झाला त्यावेळींही ते लोकरीचेंच कपडे वापरीत असावेत.

(दि ट्राइब्स अँड कास्टस् ऑफ सेंट्रल प्रॉव्हिन्सेस - भाग ३ पृ.क्र. ९ - आर. व्ही. रसेल)

**घोंगडी विणकामाची कला :**

थंडीपासून संरक्षण करण्यासाठी जगातील प्रत्येक समुहातील मानवास घोंगड्यासारख्या वस्त्राची उत्पादन करण्याची कला अवगत करावी लागली. विणकामाची कला इतकी प्राचीन आहे की, तिचा उगम कधी झाला हे सांगणे कठीण आहे.प्राचीन काळांतला पहिला माग बहुदा

झाडाच्या फांदीवर बांधलेला लाकडाचा ओंडका असावा व आदिमानवाने याच मागावर एकाद्या सुईच्या मदतीने आपले वस्त्र विणण्यास सुरूवात केली असावी. परंतु प्रारंभीच्या या काळानंतर इतकी वर्षे लोटली तरी उभ्या आडव्या धाग्यांचे मागावर विणकाम करण्याची हीं मूलभूतक्रिया अजूनही चालू आहे. माणसाने पुढे हातमाग बनविला. या मागावर धोटा फेकून वस्त्र विणले जाऊ लागले.

ऋग्वेद १०/२६ यांत उल्लेख आढळतो कीं, ऋषीं मेंढया पाळीत, कामळे व वस्त्रें विणीत. तो उल्लेख असा[१] –

प्रत्यर्धियज्ञानामश्वहयोरथानाम् ।
ऋषिः स योमनुर्हितो विप्रस्य यावत्सखः ।।
आधीषमाणायाः पतिः शुचायाश्च शुचस्यच ।
वासोवायो वीनां वासांसिमर्मजत ।।

अर्थ : ऋषी यज्ञाचे प्रसारक आहेत.रथासंबंधीच्या अश्वविद्येचें ज्ञाते असे जे ऋषी आहेत, ते मनुष्य हितकारी असतात आणि ते विप्र– विद्वानांच्या दुःखाचा नाश करणारे मित्र आहेत. गाभण मेंढींच्या लोकरीसाठीं [मादी] मेंढी आणि [नर] मेंढयाचे ते पालक आहेत. मेंढयांच्या लोकरीपासून वस्त्र विणणारे आहेत आणि विणलेले वस्त्रे ते शुद्ध करितात.

++++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++ ++

१ – ( धनगर समाजाचे ऐतिहासिक दिग्दर्शन – ले. शंकर नानाजी बुचडे )

## पहिले पाऊल :

प्रस्तूत विषयक समाजात मराठा, लाड व धनगर असे भेंद असलें तरी यांच्यातील धार्मीक कल्पना, आचार-विचार, सण-उत्सव, व्रत वैकल्य इत्यादिबाबत बहुतांशपणे साम्य आढळते. यांच्यातील जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्व संस्कार जवळ जवळ सारखेच आहेत. कुलधर्म, कुलाचार, कुलनामे व कुलदैवते इत्यादिबाबत या समाजामध्ये बहुतांशपणे साम्य आढळते. हा समाज विस्कळीत असला तरी खंडोबा, ज्योतिबा, भरोबा, भैरवनाथ, भवानीदेवी ही मराठी माणसाची दैवते यांचीही उपास्य दैवते आहेत.

या समाजात मराठा, लाड व धनगर असे भेंद असले तरी हा संपूर्ण समाज मूळचा 'हिंदू खाटीक' आहे व हेच आज सर्वांनी समाजऐक्यासाठी विसरुन चालणार नाही. केवळ गोंडस नांवाचा हव्यास न धरता वास्तव्याला सामोरे जाण्यातच या समाजाचे हीत आहे. वृक्षाचे मूळावर घाव घातल्यास वृक्ष आपोआप कोसळून पडतो. तसेच जातीच्या मूळ नांवाला बाजूला सारल्यास या समाजाचे होईल व हा समाज संघटीतपणें कधीहि उभा राहू शकणार नाही. 'खाटीक' हा जातीवाचक शब्द केवळ हींन अर्थाने वापरतात म्हणून या नांवाचा त्याग करण्यात आला, हा खरा इतिहास आहे. यामुळेंच या समाजात अनेक वैचारीक घोटाळे निर्माण होऊन या समाजाच्या एकीकरणाचे कार्य अवघड होऊन बसले आहे. तेंव्हां मराठा, लाड व धनगर या एकाच हिंदू धर्मामधील जाती असल्यामुळें प्रस्तूत विषयक समाजाने 'हिंदू खाटीक समाज' असे वास्तव व व्यापक नांव घेऊन एकीकरणाचे पहिले पाऊल उचलणे आवश्यक आहे. हे नांव महाराष्ट्र पातळीवर स्विकारले गेल्यास आज असलेले मतभेद कायमचे मिटणार आहेत व सुटे वाचून खोकला जाणार आहे.

आनंदाची गोष्ट म्हणजे या समाजात मुंबई, पुणें व नाशिक येथे अनेक शिक्षण फंड आहेत. या फंडातून फक्त 'क्षत्रिय धनगर' या

खाटीक शाखेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जातात. यापुढे या शिष्यवृत्त्या मराठा खाटीक, धनगर खाटीक व लाड खाटीक तथा कलाल या हिंदू खाटीक समाजातील सर्व शाखेंच्या विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. यामुळे या समाजातील तरुण वर्गात आपलेपणाची भावना निर्माण होऊन एकीकरणाच्या कार्यास खऱ्या अर्थाने चालना मिळेल असे लेखकास वाटते.

कर्नाटक व सीमाभागातील मराठी भाषीक खाटीक समाज आज सर्वस्वी अलग पडलेला आहे. त्यांचे कर्नाटकातील कानडी भाषींक हिंदू खाटीकांशी लग्नसंबंध होत नाहीत, तसेच अज्ञानामुळें महाराष्ट्रा–तील हिंदू खाटीकही त्यांचेशी लग्नसंबंध करीत नाहीत. या ग्रंथात महाराष्ट्र व सीमाभागातील समस्त हिंदू खाटीक समाजाच्या आडनांवाची सूचि देण्यात आली आहे. या सूचिचा लग्नसंबंधासाठी सदुपयोग होईल असे लेखकास वाटते.

आई–बापाची जी जात तीच मुलांची जात, हे जोवर चालणार आहें, तोवर म्हणजें जगाच्या अंतापर्यंत जातीभेंद संपणार नाहीत. तेव्हां आंतरजातीय विवाह हा या प्रश्नावर अचूक तोडगा आहे. आज जेथें उच्च समजल्या जाणाऱ्या जातींचे लोक, त्यांच्यातच आंतरजातीय विवाह करण्यास घाबरतात, तेथें हे लोक मागासवर्गीयांशी विवाह–संबंधास कितपत तयार होतील, या विषयी शंका वाटतें. तेव्हां या सामाजिक परिस्थितीची जाण ठेवून या मागास समाजातील बांधवानी आपल्या जातीमधील पोटभेद गाडून टाकण्यासाठी परस्परात विवाह–संबंध वाढविणे अत्यंत आवश्यक आहे.

## समारोप :

कोणत्याही ज्ञातीचा पूर्वइतिहास व संस्कृती अभ्यासणे म्हणजे इतकी व्यापक गोष्ट आहे की, पूर्वइतिहास व संस्कृती ही अगोपांगाने समजावून सांगणे अष्टपैलू विद्वान, अभ्यासक व संशोधक ह्यासच शक्य होईल. माझा तरीं हा प्रांतच नव्हे. तेव्हां हे जमणार कसे अशी शंका

मनाला चाटून गेली. ह्या समस्येतून मी अशी वाट काढली कीं, अनेक ग्रंथातून उपलब्ध माहितींचे संकलन करावयाचे व आवश्यक तेथेच माझ्या अल्प बुद्धीने विवेचन करावयाचे. यामध्यें मी किती यशस्वी झालो हे प्रस्तुत समाजाचे एकीकरणाचे कार्यावरून लक्षात येणार आहे. वास्तविक संपूर्ण लाड समाजाचे सखोल संशोधन होणे आवश्यक आहे. संशोधकांना हा एक नवीन प्रांत उपलब्ध आहे. सर्व लाड समाजाचे सखोल संशोधन झाल्यास सूर्यवंशी लाड या क्षत्रियावर अधिक प्रकाश पडणार आहे.

सूर्यवंशी म्हणजे सूर्य संतती अथवा सूर्याची पूजा करणारे होय. " आकाशस्थ ज्योतीत सूर्य हा सर्वात महत्वाचा 'तारा' आहे. अत्यंत प्राचीन व सर्वात पूज्य असे दैवत मानव जातीने सूर्य हेच मानले आहे. मानव संतती ही सूर्य संतती (किंवा सूर्यवंशी) असल्याचा निर्वाळा इजिप्त, बाबिलोन, भारत, चीन, जपान, उत्तर व दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ग्रीस, स्कँडनीव्हिया यांच्या दैवतकथांतून मिळतो.[१]

ऋग्वेदांतील आर्यांचा गायत्री मंत्र हा मंत्रराज आहे व तोही सूर्य पूजेचा आहे. तात्पर्य सूर्यवंशी किंवा सूर्याची पूजा करणारे यांचा उल्लेख पुरातन काळापासून येतो. देवतापासून किंवा ऋषी-मुनीपासून जाती निर्माण झाल्याच्या अनेक भारतीय कथा आहेत. त्यापैकीच सूर्यवंशी, चंद्रवंशी व नागवंशी अशा जाती भारतभर पसरलेल्या आहेत.

हे सर्व लोक स्वतःस प्राचीन क्षत्रियांचे वंशज समजतात. डॉ. केतकर हे, प्राचीन क्षत्रियाचे बीज नाहीसे झाले असावे असे जे त्यांच्या ज्ञानकोषात म्हणतात, ते खरे नाही. क्षत्रिय व ब्राह्मण यांच्यातील वर्णसंघर्षामुळे, जेत्यांचे वर्चस्वामुळे व दुष्काळासारख्या दैवी आपत्तीमुळे-जिताना-हलके व्यवसाय पत्करणे भाग पडले व त्यांचें क्षत्रियत्व कायमचे लयास गेले.

१ – ( लोकसाहित्याची रुपरेखा – दुर्गा भागवत )

वास्तविक प्राचीनकाळी चातुर्वण्य व्यवस्था ही श्रमविभागाच्या तत्वावर रुढ होती व ती अत्यंत लवचीक होती. सर्व समाजाची ही मूळस्थिती लक्षात घेतल्यास आजच्या जन्मजात श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पना भ्रामक ठरतात. तसेच मानवी समाजात व वंशात एवढा संकर झाला आहे की,एक संपूर्ण समाज दुसऱ्या समाजापेक्षा रक्ताने श्रेष्ठ असे समजणें सर्वस्वी अयोग्य ठरते. रक्ताच्या पवित्रतेवर आज देखील वर्ण व जातींची शुद्धता टिकविण्याचे समर्थन केले जाते. या संदर्भात महाभारताच्या वनपर्वात युधिष्ठर म्हणतो, " चार वर्णाच्या अनियमीत समागमामुळे एखाद्याची जात (वर्ण) निश्चित करणे कठीण आहे." याचप्रमाणें मराठी लोकांच्या पिंडातही आर्य, द्रविड व नागवंशी (वन्य लोक) यांचा समावेश झालेला आहे. तेव्हां या विषयी आश्चर्य वाटण्याचें कांहीच कारण नाही. या उलट या सर्व लोकांना एकत्र आणण्याचे कार्य ज्या संस्कृतिने केले तिच्या लोकसंग्रहाबद्दल सर्वांना आदरच वाटला पाहिजे. आज हिंदू समाजातील अनेक जातीमध्यें श्रेष्ठत्वाच्या कल्पनेचे जें अवडंबर माजविण्यात आले आहे, तेच खरे जातीभेदाचें मूळ आहे व हें जातीभेदाचे मूळ सर्वांनी मनापासून उपटून टाकले पाहिजे.

'वादे वादे जायते तत्व बोध:' या न्यायाने निरनिराळ्या मतांचे मंथन करून शेवटी निर्णयरुपी जे नवनीत निघते तेच समाजास ग्राह्य असते. याची जाणीव ठेवूनच समाज ऐक्यासाठी जातीभेद निर्मीतिच्या इतिहासाचा मागोवा घेण्याचा लेखकाने या ठिकाणी अल्पसा प्रयत्न केला आहे.



सत्य असत्याशी मन केले ग्वाही ।
मानियले नाही थोरपण ॥

— मुक्तेश्वर.

# डॉ. संतुजी रामजी लाड यांचे चरित्र -

कै. गणपतराव वामनराव खराटे यानी आपल्या समाजातील डॉ. लाड यांचे चरित्र प्रसिद्ध करून फार मोठे सत्कार्य केले आहे. त्यांच्या या पुस्तकास महाराष्ट्रातील पुढील विचारवंताचे अभिप्राय आलेले आहेत. हे अभिप्राय वाचताक्षणीच डॉ. लाड यांची थोरवीं लक्षात येते व त्यांच्या कार्याची माहिती होते.

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी :**

आधुनिक युगाचें मुख्य लक्षण म्हणजें समाजातील खालच्या थरातील जनतेला स्वत:च्या हक्काची जाणीव होत आहे हे होय. या बहुजन समाजाच्या जागृतीची मंद प्रभात होण्याच्या समयी शंभर वर्षापूर्वी ह्या जागृतीचे जे अग्रदूत समाजात प्रगट झाले त्यांच्यामध्ये चमकून शोभायमान दिसलेले जे थोडें लोक होते, त्यांतच डॉ. लाड यांचा समावेश करता येतो.

राजाराम मोहन रॉय यांच्यापासून या नव्या प्रकारच्या महान संतांचीं परंपरा सुरू झाली. महाराष्ट्रात ज्योतिबा फुले, न्या. मू. रानडे डॉ. भांडारकर, कृष्णराव भालेकर, लोखंडे इत्यादि समाजसुधारक याच थोर परंपरेचे होते. त्यांच्यामध्येंच डॉ. लाड हे काम करीत होते. डॉ. लाड हीं अत्यंत उदार अंत:करणाची व नवविचारांच्या तेजानें भारलेली व्यक्ती होती. जुन्या समाजरचनेवर हल्ला करणाऱ्या बिनीच्या स्वारांत ते दाखल झाले होते. त्यांनी गरीब जनतेची स्वार्थत्यागपूर्वक सेवा करण्याचे व्रत जन्मभर स्विकारले.

**भास्करराव जाधव :**

पुणे येथे सत्यशोधक समाजाची जी कॉन्फरन्स भरली त्या वेळेपासून त्यांचा माझा परिचय. तेव्हांपासून मी त्यांस पहात असे. ते

नाशिक येथें सत्यशोधक समाजाच्या दुसरे परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांची कार्यतत्परता पाहूनच हा मान त्यांस एवढ्या जलदी मिळाला. जी तिसरी परिषद ठाणे येथे झाली त्यावेळेस त्यांनी स्वतः हा खर्च करून व अतिशय मेहनत घेऊन ती पार पाडण्यात आली. ते त्या परिषदेचे स्वागताध्यक्ष होते.

**श्रीपत रामजी शिंदे, संपादक - विजय मराठा**

धर्माच्या बाबतीत मागासलेल्या वर्गाचा उद्धार करण्याचा ज्या ज्या माणसांनी प्रयत्न केला अशांच्या म्हणजें महात्मा ज्योतिबा फुले वगैरे महापुरुषांच्या मालिकेत डॉ. संतुजी लाड ठाणेकर, यांचे नांव विराजमान झाले आहे. लाड यांना सर्व (ब्राह्मणेतर)पक्षाचे अभिमानी पूज्य मानीत असत.

**दारिद्र्याला वैभव समजून दलितांचे सेवेस वाहून घेणारे - महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :**

डॉ. लाड हे महात्मा ज्योतीबा फुले यांचे शिष्य व अभिमानी होते. माझे मोठें मित्र होते मजवर फार ममता करीत होते. मी त्यांना वडिलाप्रमाणे मान देत होतो. इ. स. १९०६ साली मी जेव्हां Depressed Classes Mission Society of India- अखिल भारतीय निराश्रीत (अस्पृश्य) साह्यकारी मंडळी ही संस्था मुंबई येथे प्रथम काढली, तेव्हां प्रथमचे पांचच संस्थापक सभासद होते, त्यांत डॉ. लाड हे एक होते. परळ येथे ह्या मंडळाच्या शाळा वगैरे इतर संस्था होत्या. त्यात गरीबासाठी एक मोफत दवाखाना होता. तो डॉ. लाड हे कांहीएक वेतन न घेता चालवीत असत. तें फार प्रेमाने हरीजनाला शिवून औषधोपचार करीत असत. अगदी मरेपर्यंत ही सेवा त्यांनी मनोभावाने केली.

डॉ. लाड हे महात्मा ज्योतीबांचे शिष्य व प्रार्थना समाजाचें मासलेवाईक सभासद होते. त्यांच्यात आळस नव्हता किंवा अहंकार

नव्हता. दवाखान्यातूनच कामे करून न रहाता अगदीं गलिच्छ मोहल्यातून जातीने हिंडून समाचार घेत असत. हे कार्यही उदारपणानें करीत. असे करीत होते म्हणून ह्या मंडळाच्या शाखा सर्व देशभर पसरून महात्मा गांधीसारख्या मोठ्या पुरुषाचे लक्ष पुढे लागून ह्या कार्यास आतां सर्वमान्य राष्ट्रीक स्वरुप आले आहे.

ठाण्याला एक रात्रीची शाळाहि त्यांनी चालविली होती. आपल्या घरी निराश्रीत ठेविले होतें. ही सर्व सेवा करीत असता त्यानी माझेविषयी इतकी कळकळ व तळमळ दाखविली कीं, ती आठवण झाली की माझे डोळ्यातून अश्रू गळतात.

**चरित्र लेखक– ग. वा. खराटे, मुंबई –**

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील चऱ्होली नांवाचे गांव आहे. ते डॉ. संतुजी लाड यांचें मूळ गांव. त्यांचे पणजोबा केरुजी, आजोबा बचाजी. हे तेथेच आपला पिढीजात धंदा करीत. बचाजी हे इसवीसन १८०० पूर्वी कांहीं वर्षे अगोदर चऱ्होली सोडून ठाणे येथे येवून राहिले. याच ठिकाणी डॉक्टरांचे वडिल रामजी यांचा जन्म झाला. रामजीचे लग्न चव्होले येथील जांभळे घराण्यातील लक्ष्मीबाई यांचेशी झाले. या पतिपत्नीच्या पोटी सदाशिव उर्फ संतुराम याचा जन्म १८४१ मध्ये झाला. डॉ. संतूजी लाड यांचे शिक्षण ठाण्याच्या मिशन स्कूलमध्ये झाले. त्यानी पुढील शिक्षण मुंबईतील त्यांची मावसबहीण राजूबाई भागोजीराव खराटे हिच्याकडे राहून घेतले.

शिक्षण संपल्यानंतर डॉक्टरांनी कांही काळ ठाणे हॉस्पिटलात नोकरी केली. नंतर त्यांची बदली कारवार येथे झाली. बोअर युद्धांत डॉक्टरानीं ॲबिसिनिया आदि भागात नोकरी केली. माथेरानला ते हाऊस सर्जन होते. मराठा प्लेग हॉस्पिटलमध्यें हाऊस सर्जन असताना त्यांनी केलेल्या कार्याबाबत डॉ. धारगळकरानी त्यांची मुक्तकंठाने स्तुति केली.



# डॉ. संतुजी रामजी लाड

जन्म : १८४१ मृत्यू : १९१६

संस्थेच्या अहवालात केलेला आजही आढळतो. सदर संस्थेचे सन १९४७ मध्ये श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी असे नामांतर झाले. सन १९३४ मध्यें कार्यरत झालेली ही संस्था ऋषीतुल्य कर्मवीर मामासाहेब जगदाळे यानी हाडाची काडे करुन वाढविली आहे. आज या संस्थेत २७ शाखा आहेत व ग्रामीण विद्यापीठाचा आकार या संस्थेस आज आलेला जाहे.

++ *-+ *++ *-+ *++ *-++-++ ++++++ *-++-++++

## समाजातील दानशूर व त्यांचे शिक्षण फंड :

१) कै. गणपतराव लक्ष्मण काथवटे, मुंबई- देणगी रु. ३८०००

कै. गणपतराव लक्ष्मण काथवटे फंड मुंबई - स्थापना १९३५

२) कै. गोविंदराव मारुती कांबळे, मुंबई - देणगी रु. ११०००

कै. गोविंदराव मा. फंड मुंबई

३) श्री. रघुनाथराव विठ्ठल कोथमिरे, मुंबई - देणगीं रु. १०,०००

श्री. गंगानाथ महाराज शिक्षण फंड, मुंबई - स्थापना १९५१

४) श्री. रघुनाथ विठ्ठल कोथमिरे, मुंबई - देणगीं रु. ५०००

श्री. गंगानाथ महाराज पारितोषिक फंड, - स्थापन १९६३

५) श्री. बागूल बंधू, नाशीक - देणगी रु. ११००१

कै. काशिराम रखमाजी बागूल फंड, नाशीक - स्थापना १९६८

६) श्री. हरिश्चंद्र कृष्णाजी घोडके, मुंबई - देणगी रु. १०,०००

तात्यासाहेब घोडके पारितोषक फंड, मुंबई

७) आप्पाजी ग्यानुजी व पार्वतीबाई आप्पाजी
कोथमिरे शिक्षण फंड, मुंबई - देणगी रु. १०,०००

## ' खाटीक ' शद्बाची व्युत्पत्ति :

खाटीक – मांस विक्रेता
संस्कृत – खट्टिक ( सैनिक ), खट्टिक, खाडओ.
प्राकृत – खाट्टिक्क, देप्रा – खट्टिक
प्रा. – खट्टिअ, खट्टिक
कानडी – कटक, कटिक, कडी
तामीळ – कटी

( मराठी व्युत्पत्ति कोश, पृष्ठ २२१ – लेखक : कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी. )

++—+++—+—+++—+—+—++++* ++++—+++—+++++++++—++++ *

टीप : हिंदी – कटक ( सैन्य ). संस्कृत ' खट्टिक ' पासून झालेला असावा.

### समाजातील मिळालेली इतर आडनांवे :

मराठवाडा व सीमाभाग – भातनाशे, बूयें ( चौधरी ), टोंगळे, रुमने, व आकाशकोरे.
पश्चिम महाराष्ट्र – ताटे, कस्तुरे, खिरडकर, बांगर, मांदळे ( चौधरी ), चेंवरे, कल्याणकर.

**खुलासा–** ' सि ' ( जोरात फेकणे ) या धातूपासून जोरात बाण, दगड वगैरे फेकणारा माणसांचा गट या अर्थी सेना हा शब्द बनलेला आहे व सैन्य हा शब्द ' सेना ' शब्दवरून निघाला आहे, असे कांही विव्दानांचे मत आहे. याचाच अर्थ सेना म्हणजे धनुर्धारी सैनिकांचा गट. भारतात सैनिक मात्र दोन प्रकारचें होते. एक धनुर्धारी व दुसरे ढाल तलवार घेऊन लढणारे. खट्टिक तथा सौनिक या संस्कृत शब्दाचा अर्थ ढाल तलवारीनें लढणारे सैनिक असा या ठिकाणी लेखकाने गृहित धरला आहे. याच संदर्भात हिंदी – कटक ( सैन्य ) व संस्कृत – खेटक ( ढाल-तलवारी सारखे शस्त्र ) या शब्दांचे अर्थ संयुक्तिक व महत्वाचे वाटतात

खट्टिक व सौनिक या संस्कृत शब्दांचा अर्थ ' शिकारी ' असाही आहे. प्राचीनकाळी प्रत्येकास स्वतःचे, स्वतःच्या मालमत्तेचें व आपल्या गांवाचें संरक्षण करण्याकरिता स्वतःजवळ शस्त्र बाळगावे लागे. याजबरोबर उपजिवेकीसाठी या शस्त्राचा उपयोग शिकारीसाठीही केला जाई. यामुळें प्राचीनकाळी समाजातील प्रत्येक जण सैनिक होता तसाच तो शिकारीही होता. यामुळेंच ' सैनिक ' हा शब्द सस्कृत ' सौनिक ' शब्दापासून झालेला असावा, असे लेखकास वाटते.

मोगल कालखंडातील कृष्ण नृसिंह शेष ह्याने ' शूद्राचार शिरोमणि ' या ग्रथांत चांडाळ पुरूष आणि केवट जातीच्या स्त्री पासून खाटिक ( सौनिक ) जातीची उत्पत्ती झाली आहे, असे मनूच्या धर्तीवर चुकीचे प्रतिपादन केलेले आहे. आजच्या विज्ञान युगात अशा तऱ्हेच्या प्रतिपादनास कोणीही समाजशास्त्रज्ञ मान्यता देणार नाहीत. केवळ वर्ण संकरामुळे अनेक जाती निर्माण झाल्या, या मनुच्या कल्पनेचे भूत कृष्ण नृसिह शेष यांच्यावर स्वार झालेले दिसते. हिस्टरी ऑफ कास्ट इन इंडिया या ग्रंथात डॉ. श्रीधर केतकर यानी या मताचा योग्य समाचार घेतला आहे. ते म्हणतात–

वेद व वेदांगें ह्यांचे ज्ञान असलेल्या मनूला जातीसंस्थेचे अस्तित्व जाणवले, परंतु तिचा विस्तार व कारणमिमांसा मात्र आकळता आली नाही. तो स्वतः ब्राम्हण असल्यामुळें निरनिराळ्या जाती व त्यांचे आचार ह्यांचे खोल ज्ञान त्याला नव्हते, त्याला चातुर्वर्ण्य मात्र माहीत होते आणि त्याने जातीचे उत्पत्ति देतांना स्वतःच्या माहितीच्या ज्या दोन गोष्टी–चातुर्वर्ण्य व वर्णसंकर –त्यांचा उपयोग करून, त्यामुळें जाती उत्पन्न झाल्या, असे प्रतिपादन केले आहे, आणि हीच चुकीची मिमांसा आजपर्यंत जातिसंस्थेसंबंधी हिंदू समाजात केली जाते.

---

टीपः सस्कृत ' सौनिक ' पासुन उत्तरेकडे ' सोनकर ' हा खाटिक वाचक शब्द प्रचलित झाला असावा.

# INDIAN STATISTICAL INSTITUTE

Telegram :
STATISTICA, CALCUTTA 700 035

203, BARRACKPORE TRUNK ROAD
CALCUTTA 700 035

2 October 1978

Shri M. B. Gaikwad
221 Shukarwar Peth,
TULJAPUR.
Maharashtra

Dear Shri Gaikwad,

I am indeed highly grateful to you for very kindly sending me a copy of your book ARADH.

Please accept my heartiest congratulations for writing this very important book. The book contains extremly useful material and your able hands have given it a very good shape. I am indeed very happy to see the work in print. The book clearly demonstrates that you have been busy and occupied in both academic and social persuits It is my sincere wish that with the publication of this important work, significant progress will be achieved in bringing together various people.

I am highly moved by your kind gesture in sending me a copy of your valuable contribution in the cultural and social history of Maharashtra. I wish your continued success in your efforts. With warm best wishes & regards.

Cordially yours,
**Dr. K. C. Malhotra**
Associate Professor

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
४२६४२

# आराध

## प्रकाशन समारंभ

तुळजाभवानी मंदीराचे
प्रमुख महंत –

**श्री. वाकोजीबुवा**

यांचे शुभहस्ते

★

डावीकडून :

- महंत श्री. वाकोजीबुवा
- प्रा. श्री. वि. ह. देवकर
- लेखक - मुक्तेश्वर



REEFBK-0022622

# आराध

**प्रकाशन सोहळा**

★

स्थळ :

श्री तुळजाभवानी मंदीर

तुळजापूर.

दिनांक : २ ऑक्टोबर १९७८



आदिशक्ती तुळजाभवानी देवी ही महाराष्ट्राची कुलस्वामीनी आहे. घरात मंगलकार्य झाल्यास मराठी मंडळी आवर्जून देवीच्या दर्शनास येतात. नवदांपत्याचा संसार सुखाचा व्हावा व सर्व कुटुंबाचे संकटापासून संरक्षण व्हावे यासाठी ते देवीच्या मंदीरात सतत नऊ दिवस देवीची आराधना करण्यासाठी राहतात. विधीयुक्त, शास्त्रोक्त व भावनात्मक देवीची आराधना नऊ दिवस नवदांपत्य व त्यांचें कुटुंबीय यानी करावयाची व नंतर प्रजाउत्पत्तीसाठी नवदांपत्यानी मंदीराबाहेर पाऊल ठेवायचे अशी प्रथा आहे. या नऊ दिवसाच्या आराधनेस "आराध बसणे" असे म्हणतात.

याच प्रमाणें कुटुंबावर, समाजावर किंवा देशावर संकट आल्यास देविचें भक्तगण आराध बसतात व देविची करुणा भाकतात. प्रस्तुत विषयक समाजात जागृति निर्माण व्हावी व आपाआपसातील मतभेदाना तिलांजली देऊन या सर्व समाजाचे एकीकरण व्हावे यासाठी हा 'आराध' चालु आहे. त्यासाठी भवानीमातेबरोबर समाजरुपी मातेची आराधना करीत आहे. या समाजास जाग येईपर्यंत हा 'आराध' अखंडीतपणें चालणार आहे. याला नऊ दिवसाची कालमर्यादा नाही.

'बया दार उघड, दार उघड बया, दार उघड' म्हणून आदिशक्ती-च्या रुपाने पारतंत्र्यात खितपत पडलेल्या लोकाना स्वातंत्र्यासाठी जागे व्हा, अशी साद शिवपूर्व कालात महान संत एकनाथ यांनीही घातली आहे. तीच साद समाजऐक्य व जागृतिसाठी येथ घालीत आहे. 'बया दार उघड, दार उघड बया, दार उघड.'